संदर्भ विभाग
निबंध
२२६९१
२७५२
२५।९।७

# आगळी माणसे

[ व्यक्ती आणि विचार ]

प्रभाकर पाध्ये

# आगळी माणसे

[ व्यक्ती आणि विचार ]

REFBK-0022691

विश्वकर्मा साहित्यालय
१०३५ टिळक पथ, पुणे ३०

प्रकाशक सौ. मालती माटे
विश्वकर्मा साहित्यालय
२०३५/२ सदाशिव पेठ
टिळक पथ, पुणे ४११ ०३०

© प्रभाकर पाध्ये

पहिली आवृत्ती
एप्रिल १९७९

मूल्य रु. १२-५०

मुद्रक वि. ग. माटे
विश्वकर्मा साहित्यालय (प्रा.) लि.
४०५, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०

'अनुष्टुभ्' परिवारास

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | मो. क. गांधी | ९ |
| २ | माओ त्से-तुंग | १८ |
| ३ | जोसेफ स्टालिन | ३३ |
| ४ | लिऑं ट्रॉट्स्की | ४४ |
| ५ | बाळ गंगाधर टिळक | ५२ |
| ६ | पं. जवाहरलाल नेहरू | ५८ |
| ७ | जयप्रकाश नारायण | ६४ |
| ८ | विनोबा भावे | ७१ |
| ९ | गो. ग. आगरकर आणि वा. म. जोशी | ८२ |
| १० | वामन मल्हार जोशी | ९१ |
| ११ | शंकरराव जावडेकर | ९७ |
| १२ | धनंजयराव गाडगीळ | १०५ |
| १३ | चिंतामणराव देशमुख | ११० |
| १४ | जॉर्ज केनन | ११४ |
| १५ | मॅक्स ईस्टमन | १२२ |
| १६ | उ थांट | १३० |
| १७ | रा. भि. जोशी | १३३ |
| १८ | ज. र. आजगावकर | १३७ |
| १९ | अच्युत बळवंत कोल्हटकर | १४४ |
| २० | श्री. शं. नवरे | १५१ |

निबंध
२२६९९
२०५२

१.

आजच्या राज्यकर्त्यांना गांधीजींच्या नावाचा उल्लेख करण्याची हुक्की वारंवार येते. जे सांगूनसवरून गांधीवादी आहेत ते तर गांधीजींच्या नावाचा निर्वाळा हक्कानेच देतात. आजच्या राजकारणाच्या आणि व्यवहाराच्या संदर्भात गांधीजींचे नाव असे वारंवार ऐकले की खरोखरच प्रश्न पडतो की, आज गांधीजी आपल्यात असते तर काय झाले असते ?

शारीरिक जीवनाच्या दृष्टीने हा प्रश्न फारसा अगाऊ वाटण्याचे कारण नाही. 'आज टिळक असते तर' असे फारसे कोणी म्हणणार नाही. आज टिळक असते तर त्यांचे वय ११२ वर्षांचे असते, एवढी एक साधी गणिती गोष्ट या प्रश्नाचा निरास करण्यास पुरेशी आहे. आज गांधीजी असते तर त्यांचे वय ९९ असते. हेही जरा अधिकच. ९९ व्या वर्षी महर्षी कर्वे यांची काय अवस्था झाली होती हे जाणत्यांना ठाऊक आहे. पण १०० व्या वर्षी सातवळेकर यांची प्रकृती ठणठणीत होती आणि कार्य निर्वेध सुरू होते. गांधीजींची प्रकृती आणि कार्य तसेच सुरू राहिले असते याबद्दल शंका वाटण्याचे कारण नाही. स्वतःच्या प्रकृतीबद्दल इतकी कसोशीने काळजी घेणारा दुसरा पुराणपुरुष भारतात होऊन गेला असे वाटत नाही. शरीर हे एक यंत्र आहे आणि आपले कार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठी परमेश्वराने त्याची देणगी दिलेली आहे, अशी त्यांची निष्ठा होती आणि या यंत्राला गंजाचा स्पर्शही कसा होऊ द्यायचा नाही हे त्यांना चांगले ठाऊक होते.

## मो. क. गांधी

महर्षी सातवळेकर गेल्यानंतर त्यांच्या कार्याबद्दल आपुलकीचे आणि आदराचे उद्गार सर्वत्र निर्वेधपणे निघाले त्याचे एक कारण मात्र लक्षात घ्यायला हवे. सातवळेकरांच्या कार्याचा देशाच्या दैनंदिन व्यावहारिक जीवनाशी तसा फारसा संबंध येत नव्हता. त्या अर्थाने ते ऋषीच होते—म्हणजे दूर अरण्यात जाऊन तपश्चर्या करणाऱ्या ऋषीसारखे होते. महात्मा गांधींनी असे काही कदापि केले नसते. एकदा कोणी तरी त्यांना सुचविले होते की त्यांनी हिमालयात निघून

जावे. तेव्हा त्यांनी उत्तर दिले होते की, आपण हिमालयात जाऊन निवृत्त कधीच होणार नाही, आणि यदाकदाचित आपण हिमालयात गेलो, तरी आपण सध्याचे कार्य तेथून सुरू ठेवू.

तेव्हा, गांधीजींचे अंगीकृत कार्य आज देशाला कसे काय मानवले असते, हा प्रश्न आहे. आपले मोठमोठे अनुयायी म्हणून गणल्या गेलेल्या व्यक्तींनी आपले खरेखुरे शिष्यत्व पत्करले नव्हते, त्यांनी फक्त आपला उपयोग करून घेतला, अशी त्रस्त जाणीव त्यांना अखेरच्या दिवसांत झाली होती हे प्रसिद्धच आहे. मग आज त्यांचे बरेचसे मातबर अनुयायी निवून गेल्यानंतर, त्यांची ही त्रस्त जाणीव आणखी किती तीव्र झाली असती याची कल्पनाच करावी.

वस्तुस्थिती अशी आहे की, गांधीजी जिवंत असतानाच त्यांची मनोवृत्ती आणि देशाची मनोवृत्ती यांच्यात महदंतर पडलेले होते. ते अंतर सारखे वाढत होते, आणि सारखे वाढत च राहिले असते. याचे साधे कारण असे की, ज्या आधुनिकीकरणाचा स्वीकार देशाने कळत न कळत, आणि नव्या पिढीने तर मनःपूर्वक, केलेला आहे, त्या आधुनिकीकरणाला गांधीजींचा अंतःकरणपूर्वक विरोध होता. गांधीजी होते तेव्हा त्यांची या संबंधीची भाषा लोकांना, फारशी पटली नाही तरी, कळत तरी होती; पण आज त्यांची भाषा लोकांना कळलीही नसती. टेरिलिन अगर टेरिकॉट न वापरता खादी वापरा, हे आजचा कोणता कॉलेजकुमार कबूल करील ? संततिनियमन हे पाप आहे, हे कोणत्या सुबुद्ध व्यक्तीला पटेल ? मोठमोठे पोलादी कारखाने म्हणजे, देशाच्या संपत्तीचाच नव्हे तर, अर्थविषयक बुद्धीचाच अपहार आहे, याचा विद्वानांच्या विचारशक्तीवर कितपत ठसा उमटेल ?

तत्त्वप्रणालीची बाब बाजूला ठेवली तरी देशाच्या प्रत्यक्ष व्यवहारात गांधीजींचे लोकांशी कितपत पटले असते ? भाषावार प्रांतरचनेसारख्या एखाद्या प्रश्नावर त्यांचा लोकांना पाठिंबा मिळाला असता, पण शेतीच्या आधुनिकीकरणाला त्यांचा पाठिंबा मिळाला असता काय ? हरिजन आणि गिरिजन यांच्या उद्धाराच्या कार्यक्रमांत सरकारला त्यांची मोठीच मदत झाली असती, पण हिंदू–मुसलमान–ख्रिश्चनांसकट सर्वांना एक ‘ सिव्हिल कोड ’ लागू करावे या अत्यंत आवश्यक सुधारणेला त्यांचा पाठिंबा मिळाला असता काय ? आज काँग्रेससारखे राजकीय पक्ष या सुधारणेचा पाठपुरावा करीत नाहीत, कारण त्यांना निवडणुकीत मुसलमानांच्या मतांचा लोभ जडलेला आहे. पण गांधीजींनी काही निराळेच तात्त्विक कारण त्या अति आवश्यक सुधारणेला विरोध करण्यासाठी काढले असते आणि त्यांच्या मागे आपले सरकार शहाजोगपणे दडले असते, असे मला राहून राहून वाटते. हा अंतर्गत मुसलमानांच्याबद्दलचा प्रश्न राहू द्या. पण पाकिस्तानच्या बाबतीत देशाला गांधीजींचा निर्भेळ पाठिंबा मिळाला असता का, याबद्दल मला शंका आहे. पाकिस्तान हे भारताचेच सख्खे भावंड आहे, या भावविवश भूमिकेवरून त्यांनी सतत विचार केला असता, आणि वस्तुनिष्ठ धोरणाच्या अवलंबनात अडथळा आणला असता अशी भीती मला वाटते. पाकिस्तानचेच कशाला, पण चीनबाबत तरी गांधीजींचा निरपवाद पाठिंबा

देशाला मिळाला असता काय, याची मला शंका वाटते. देशादेशांतील सरहद्दीचे भांडण हे भावाभावांच्या जमिनीच्या वाटपासारखेच भांडण आहे अशा प्रकारची काही भूमिका गांधीजींच्या मनात जाऊन बसलीच नसती आणि तिचा आविष्कार वाणी-लेखणीवाटे झालाच नसता असे मला वाटत नाही. याच्या पुढे जाऊन, मला असे म्हणावेसे वाटते की, माओच्या अलीकडच्या तत्त्वज्ञानात, प्रत्येकाने थोडे शेतकरी, थोडे कामगार, थोडे बुद्धिजीवी आणि थोडेसे सैनिक बनले पाहिजे अशा प्रकारचे जे विचार आहेत त्यांच्या-बद्दल विलक्षण आत्मीयता वाटल्यामुळे गांधीजींनी कदाचित चीनमधील आजच्या ' सांस्कृतिक क्रांती 'ला सहानुभूतीच दाखविली असती.

या माझ्या शंकांचा प्रतिवाद करण्याचा एक मार्ग मला माहीत आहे. गांधीजींचे तत्त्वज्ञान काहीही असले तरी ते हाडाचे पक्के व्यवहारी पुरुष होते. हिटलरला विरोध करण्यासाठी पोलंडने शस्त्र उगारले तेव्हा अहिंसक गांधींचा पोलंडला पाठिंबा मिळाला. काश्मीरात पाकिस्तानी घुसखोर शिरले तेव्हा भारतीय सैन्य पाठवा असा सल्ला त्यांनी दिला. १९४२ साली स्वातंत्र्यवाद्यांनी काही ठिकाणी हिंसक प्रकार केले, तेव्हा कित्येक पोथीप्रणीत गांधीवाद्यांप्रमाणे त्या स्वातंत्र्यवाद्यांचा निषेध करण्याची घाई त्यांनी केली नाही. अशी कित्येक उदाहरणे काढून दाखविता येतील. ती सारी खरी असली तरी गांधीजींची आंतरिक धारणा आधुनिकीकरणाला विरोधीच होती असे मला वाटते, आणि म्हणून देशाच्या आधुनिकीकरणाला त्यांनी काही ना काही अर्थाने विरोधच केला असता. येथे तत्त्वाने व्यवहार ठरतो की तत्त्व हे व्यवहाराचे बौद्धिक समर्थन असते, असला वाद घालण्याचे कारण नाही. तत्त्व आणि व्यवहार या दोहोंचाही स्वीकार आंतरिक प्रवृत्तीने ठरतो आणि गांधीजींची आंतरिक प्रवृत्ती आधुनिकीकरणाला विरोधीच होती असे मला वाटते. येथेच नेमका गांधी आणि नेहरू यांच्यात विरोध आला असता. आधुनिकीकरण हा नेहरूंच्या जीवनाचा धर्म बनला होता. त्यांच्या बहुतेक धोरणांचा अर्थ या एका सूत्राने लागतो. पण हे सूत्र गांधीजींच्या जीवनसूत्राशी जुळले नसते; उलट विचित्र रीतीने गुरफटले असते असे मला वाटते.

आणि तरी —

गांधीजींच्या जीवनाचा मी जेव्हा विचार करू लागतो तेव्हा, त्यांच्या जीवनातली एक घटना मला अत्यंत आकर्षक आणि अत्यंत अर्थपूर्ण वाटते. गांधीजींच्या समग्र जीवनाचे सार त्या एका घटनेने व्यक्त झाले, असे मला वाटते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी सारा देश स्वातंत्र्यसंपादनाच्या सोहळयात दंग होता, नेहरूंसारखे पुढारी सत्तासंक्रमणाच्या दरबारी समारंभात निमग्न होऊन गेलेले होते, तेव्हा गांधीजी काय करीत होते ? तर कलकत्त्याच्या एका दंगलग्रस्त विभागात एका चंद्र-मौळी झोपडीत तपश्चर्या करीत होते.

आपण या देशात राम, बुद्ध इत्यादींच्या सत्तात्यागाच्या, वनवासस्वीकाराच्या, तपः-साधनेच्या गोष्टी वाचतो. पुष्कळदा त्यांचे मर्मग्रहण आपण साहित्यिक अगर धार्मिक

भूमिकेवरून करतो. असे काही प्रत्यक्षात घडले होते का, हा प्रश्न आपण कळत न कळत खुंटीलाच टांगून ठेवतो. Active suspension of disbelief म्हणजे काय याचा प्रत्यय येथे येतो. विचार करणे भागच पडले तर या कथा म्हणजे पूर्व मानवाच्या कल्पना-विलासाचा उल्लास होय, असे भाष्य करून आपण मोकळे होतो. पण १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्याला रामाचे अगर बुद्धाचे प्रत्यक्ष दर्शन घडले. माझ्या दृष्टीने ही घटना म्हणजे गांधीजींच्या जीवनातली सर्वात रम्याद्भुत अशी घटना आहे आणि जितकी रम्याद्भुत तितकीच तत्त्वार्थपरिपूर्ण !

१५ ऑगस्ट १९४७ रोजी गांधीजींची ही जी महानुभव चित्ररम्य प्रतिमा दिसली तीच खरोखर प्रभावशाली ठरली असती आणि आज गांधीजी असते तर तेच त्यांचे महान् कार्य ठरले असते.

हे कार्य म्हणजे राष्ट्राची सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवण्याचे कार्य.

याचीच आज निकडीची गरज आहे. राजकारणाचा आज चुथडा झाला आहे. राज्य-कर्त्यांची आणि विरोधकांची राजनैतिक नालायकी हे तर याचे सकृद्दर्शनी जाणवणारे कारण आहे. साधे पक्षबदलाचे उदाहरण घेतले तर आपल्या राजकारणाची अवस्था किती हल्लक झाली आहे याची कल्पना येईल. आजच्या राज्यकर्त्यांच्या मानसिक दौर्ब-ल्याची तर गोष्टच काढायला नको. सीमावाद असो अगर सरहद्दीवरील राजकीय प्रश्न सोडविण्याची गोष्ट असो, कोणताही ठाम निर्णय घेण्याची कुवतच आपल्या राज्यकर्त्यांत दिसत नाही. राज्यकर्त्यांच्या जनताहितबुद्धीचा किती बोजवारा उडाला आहे हे पाहण्या-साठी फार खोलात शिरण्याचे कारण नाही; शेजारच्या वाण्याला डाळीचा भाव विचारला तरी पुरे! परराष्ट्रीय राजकारणाचे कसे दिवाळे वाजले आहे, ते रशियाच्या अवसान-घातकी पाकिस्तानी दोस्तीने चांगलेच चवाठ्यावर आले आहे. पण हे सारे वरवरचे आहे. अंतरंग शाबूत असते तर याची धास्ती बाळगण्याचे फारसे कारण नसते. पण तेथेच पाणी मुरत आहे. आपल्या राज्यकर्त्यांची आणि विरोधकांची सदसद्विवेकबुद्धीच कितपत शाबूत आहे याबद्दल संभ्रम उत्पन्न झालेला आहे. या सर्वच मंडळींनी जनाच्या बरोबर मनाच्याही 'त्या' वैशिष्ट्याची रजा घेतलेली दिसते. कोणत्याही विशिष्ट प्रकरणाचा उल्लेख करण्याची गरज पडू नये इतकी ही परिस्थिती चारी बाजूंनी उतू जात आहे.

आज गांधीजी असते तर आपल्या राजकारणाच्या या मूलभूत दुर्धर अवस्थेला थोडा आळा बसला असता. कारण त्यांनी राज्यकर्त्यांची सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवण्याचे कार्य खात्रीने पार पाडले असते. गांधीजींच्या व्यक्तित्वाचा एक मोठा लक्षणीय विशेष होता. एखादा अन्याय घडत आहे अगर घडला आहे हे एकदा त्यांना पटले म्हणजे त्यांची लेखणी-वाणी अडखळत नसे, अगर कोणाची पत्रास राखीत नसे. असा अन्याय घडत आहे हे मुळात त्यांना पटवून देणे हे महाकर्मकठिण असे. त्यांना एखादी गोष्ट पटवून द्यायला गेले तर त्यांच्या कठोर उलटतपासणीने जीव हैराण होई. १९४२–४५ च्या आंदोलनाच्या काळात बिर्लाशेठवर अनेक आक्षेप आले, पण ते गांधीजींना पटवून देणे अशक्य झाले. पण

एकदा त्यांच्या मनाची खात्री पटली की मग त्यांना थांबविणे कठीण असे. गांधीजींच्या सदसद्विवेकबुद्धीला कौल लावण्याचे कार्य काही मातबर व्यक्तींनाच शक्य होते असे नव्हे. कोणाही यःकश्चित व्यक्तीला यासाठी धाव घेणे शक्य होते. म्हणूनच त्यांचा इतका नैतिक दरारा होता.

गांधीजींनंतर हा नैतिक दरारा कोणीही संपादन करू शकले नाही. विनोबांना ते शक्य होते. पण नेहरू–इंदिरांना विरोध करणे त्यांना जमले नाही. नेहरूंबाबत त्यांना एक प्रकारचा न्यूनगंडच होता की काय न कळे. काहीही असो, पण विनोबांचे अफाट चारित्र्य, अमाप विद्वत्ता आणि आश्चर्यकारक कर्तृत्व, राज्यकर्त्यांची सदसद्विवेकबुद्धी जागृत करण्याच्या कामी उणे पडले. एक काळ असा होता की जयप्रकाश ‘ प्रिय भाई ’ नेहरू यांना त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीस कौल लावण्यासाठी पत्रावर पत्रे लिहीत. त्याचा थोडासा उपयोगही होई. पण नेहरूंचे, काही म्हटले तरी, जयप्रकाश हे ‘ छोटे भाई. ’ त्यांचे वजन किती पडणार ? आणि अखेरीअखेरीस नेहरू आणि जयप्रकाश यांचे मतभेद इतके वाढले की, जयप्रकाशांच्या पत्रांचा काही परिणामच होईनासा झाला असे वाटते.

पण मग गांधीजींचा प्रभाव कसा पडला असता ? गांधीजींचा मतप्रवाह आणि राष्ट्राचा मतप्रवाह यांच्यामध्ये दिवसेंदिवस तफावत पडत गेली असती आणि मतभेदाची ही दरी सारखी रुंदावत गेली असती असे मी वर म्हटलेलेच आहे. मग गांधीजींनी राज्यकर्त्यांची सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवली असती असे मी कसे काय म्हणू शकतो ?

फ्रॉइडच्या भाषेत आपण हा प्रश्न मांडला तर त्याचे उत्तर देणे सोयीचे ठरेल. फ्रॉइडच्या मते, माणसाच्या मनाची एक सुप्त आद्य शक्ती असते. या शक्तीतून त्याच्या मनस्वी अशा उपजत सहजप्रेरणांचा जन्म होतो. किंवा या साऱ्या प्रभावी सहजप्रेरणांचे आद्य स्वरूप म्हणजेच ही सुप्त शक्ती. माणसाचे सारे उपजत सहजप्रेरणात्मक जीवन म्हणजे ही सुप्त शक्ती. फ्रॉइड हिला इड ( Id ) असे संबोधतो. माणूस जन्माला येतो तो ही सुप्त शक्ती तेवढी घेऊन येतो. पण जन्माला आल्यावर त्याचा सभोवतालच्या परिस्थितीशी संबंध जडतो, या परिस्थितीचे आकलन होण्यावरच त्याचे जीवन अवलंबून असते. हे आकलन त्याला संवेदनांच्या, बोधनेच्या, विचारांच्या वगैरे रूपाने होते. या आकलनातूनच त्याच्या अहम्‌ची ( Ego ) निर्मिती होते. हा अहम् म्हणजे ‘ इड ’चाच एक भाग. वास्तवाचा ‘ इड ’शी संयोग जुळल्यामुळे या संयोगातून अहम्‌ची जाणीव निर्माण होते. हे कार्य ज्या बालवयात विशेष आवेगाने होते त्या बालवयात मुलाचे आईवडील म्हणजे त्याच्या वास्तवसृष्टीचा प्रचंड भाग असतो. आईवडील आणि सभोवतालचा समाज हीच त्याची प्रचंड वास्तवता. या वास्तवाशी ‘ इड ’चा संयोग जमल्यामुळे त्यातून जो अहम् उदयास येतो त्याची प्रकृती, ते आईवडील आणि तो समाज याचे जे स्वरूप त्याला प्रतीत होते त्यानुसार ठरते. आता आईवडील प्रेम करतात, खाऊपिऊ घालतात, लाड करतात, आयुष्यातली इतर सुखे पुरवितात. त्याचप्रमाणे ती शिक्षा करतात, दम देतात, भीती घालतात, अनेक प्रकारची बंधने लादतात. ही सारी बंधने अखेरीस समाजाचीच

असतात. आईवडील हे समाजाचे प्रतिनिधी असतात. ते प्रेम करतात आणि शिक्षाही करतात. समाज आधारही देतो आणि नियंत्रणेही लादतो. व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधांचा हा जो पूर्वोक्त सुखकारक भास असतो त्यातून अहम्चे आदर्श ( Ego Ideals ) निर्माण होतात, तर जो उत्तरोक्त दबकावणीचा भाग असतो त्यातून अहम्ची सदसद्विवेकबुद्धी ( Super Ego अगर Conscience ) निर्माण होते. आदर्श हे सुखकारक असतात तर सदसद्विवेकबुद्धी त्रास देत असते.

फ्रॉइडचे हे व्यक्तिविषयक सिद्धान्त राजकारणाला लावले तर काय निष्पन्न होते ? राजकारणातली ' इड ' म्हणजे सत्तेचा हव्यास. सत्ता हीच राजकारणाची सहजप्रेरणा असते. पुष्कळदा ती सुप्त प्रेरणा असते. आदर्शांच्या आवरणाखाली लपलेली असते. राजकारणातले वास्तव म्हणजे जनता. जनतेशी झालेल्या संयोगातून राजकारणाचा अहम् (Ego) तयार होत असतो. राजकीय आदर्शांचा जनतेशी संबंध असतो. जनतेचे कल्याण करणे, तिची उन्नती करणे, तिला शांतता आणि संपन्नता यांची प्राप्ती करून देणे, असे राजकारणाचे आदर्श असतात. आणि जनता कदाचित बंड करील, निदान विरुद्ध मत देऊन आपल्याला पदच्युत करील, ही धास्ती ही राजकारणाची सदसद्विवेकबुद्धी असते. सत्तेच्या ओढीने राजकारणात पडलेला आत्मा आदर्शांची (ध्येयवादाची) भाषा बोलत बोलतच येतो, तर जनतेच्या बंडाच्या किंवा संतापाच्या भीतीने आपल्या सत्तालोभाला थोडे नियंत्रण घालण्याचा प्रयत्न करीत असतो.

भारतात आज दुर्दैवाची गोष्ट अशी झाली आहे की राजकीय आदर्श कोळपत चालले आहेत आणि जनतेच्या विरोधाची धास्ती नाश पावत आहे. राजकारण हा आता उघड उघड धंदा बनला आहे. सत्तेच्या ' इड 'चे शमन करण्याची ती एक कामगिरी झाली आहे. उलट विरोधी पक्षांच्या दारुण अपात्रतेमुळे जनतेच्या कोपाचीही पर्वा वाटण्याचे कारण नाहीसे झाले आहे. म्हणजे मनाची (आदर्शांची) लाज नाही आणि जनाचीही (सदसद्विवेकबुद्धीची) पण नाही ! आता भारतीय राजकारणाच्या अहम्चे तोंड ' इड '-कडे अगदी निर्धास्तपणे वळले आहे !

महात्मा गांधी हे भारतीय जनतेशी इतके एकरूप झाले होते की भारताचे राजकीय आदर्श आणि राजकीय सदसद्विवेकबुद्धी या दोघांचे अधिष्ठान त्यांच्या ठिकाणी झाले होते. आज गांधी असते तर त्यांचे आदर्श आणि जनतेचे आदर्श यांच्यात इतका विसंवाद निर्माण झाला असता की भारतीय राजकारणाला आदर्श पुरविण्याची त्यांची शक्ती बहुतेक लोपली असती. व्यक्तीचे आदर्श आणि सदसद्विवेकबुद्धी दोन्ही आई-वडील आणि समाज (किंवा समाजाचे प्रतिनिधी म्हणून आईवडील) यांच्याकडून येते, असे फ्रॉइडचे म्हणणे होते. महात्मा गांधी हे खरोखर राष्ट्रपिता बनले होते. या राष्ट्रपित्यात राष्ट्राचे पितृत्व आणि राष्ट्राचा इतिहास हे एकरूप बनले होते. आज गांधी असते तर त्यांची ' राष्ट्र-पिता ' ही पदवी कायमच राहिली असती. पण ती पूर्णांशाने अर्थपूर्ण राहिली नसती. कारण या ' राष्ट्रपित्या 'चे आदर्श हे राष्ट्राचे आदर्श राहिले नसते.

तरीपण ‘ राष्ट्राची सदसद्विवेकबुद्धी ’ हा त्यांचा नैतिक दरारा कायमच राहिला असता, आणि याचे कारण उघड आहे. आदर्श हे बदलत असतात. व्यक्तित्वाचा तो सबोध (Conscious) भाग असतो. तो वरवरचा असतो. उलट सदसद्विवेकबुद्धी हा बाल-वयात मनाच्या आतल्या कप्प्यात खोल दडलेला असा भाग असतो. तो अधिक काल टिकतो. आपल्या जनतेचे आदर्श आज बदलले असले तरी तिच्या अंतरंगात खोल भिनलेली सदसद्विवेकबुद्धी कायम आहे. आपल्या राज्यकर्त्यांची सदसद्विवेकबुद्धी ऱ्हास पावली असली तरी जनतेची सदसद्विवेकबुद्धी कायम आहे. ती मरगळलेली असेल. तिचे तेज मंदावले असेल. पण जनतेला अद्याप सद्-असद्‌ची चाड आहे. गांधीजी असते तर त्यांनी जनतेची सदसद्विवेकबुद्धी जागृत केली असती. तिची धार परजली असती. क्वचित प्रसंगी तिची धग अगदी प्रज्वलित केली असती. याचा अर्थ तिचे आणि गांधीजींचे आदर्श एक झाले असते असे नाही. १९६५ साली भारतीय सैन्याने लाहोरकडे कूच करण्याचा निर्णय घेतला तेव्हा गांधीजींनी, समजा, त्याला विरोध केला असता, तर जनतेने गांधी-जींचे मुळीच ऐकले नसते. भारतीय सैन्य अशा प्रकारचा ‘ आक्रमक ’ पवित्रा धारण करते हीच मुळी अतिशय अनपेक्षित गोष्ट होती. तिनेच भारतीय जनतेचे अंतःकरण हेलावून गेले. या वेळी गांधीजी सतत विरोध करून उठले असते तरी जनतेने त्यांचे ऐकले नसते. येथे मुळी आदर्शाचाच भेद निर्माण झाला असता. भारतीय धोरणातल्या त्या निर्णयाची तेजस्विताच जनतेचे अंतःकरण भारून टाकणारी होती. ही विशिष्ट तेज-स्विता हाच एक आदर्श बनला होता, आणि या आदर्शाला विरोध जनतेने सहन केला नसता. याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय सैन्याचा पवित्रा आणि भारतीय राष्ट्राची सदसद्विवेकबुद्धी यात त्या वेळी कोणत्याही प्रकारचा विसंवाद निर्माण झालेला नव्हता. पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमण केलेले होते. या आक्रमणाचा प्रतिकार काश्मीरच्या मर्यादित प्रदेशात करणे अशक्य होते. तेव्हा लाहोरकडे कूच हा आक्रमणाचा प्रतिकारच होता, त्यात आक्रमण नव्हते, त्याने भारतीय सदसद्विवेकबुद्धीला धक्का बसण्याचे कारण नव्हते. पण चेकोस्लोव्हाकियावर सोविएत रशियाचे नंगे आक्रमण झाल्यावर भारतीय सरकार भेकडपणाने मूग गिळून बसते हा भारतीय जनतेच्या सदसद्विवेकबुद्धीवर अत्या-चार होता, आणि त्या अत्याचाराविरुद्ध गांधीजी उभे राहिले असते. पोलंडवर हिटलरने हल्ला केला तेव्हा गांधीजींनी, आपली अहिंसा बाजूला ठेवून, पोलंडला शस्त्र चाल-विण्याचा अधिकार आहे, असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला होता.

चेकोस्लोव्हाकियावरील आक्रमणाविषयी मौन, भारताची सून बनलेल्या स्वेतलानाला भारतात राहण्याची बंदी, स्वतःच्या मुलाला अगर नातेवाइकांना व्यापारी अगर औद्योगिक (अगर चाचेगिरीचा) फायदा उठविण्यास मोठमोठ्या महामंत्र्यासकट मातबर मंत्र्यांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मुभा अशी जी भारताच्या नैतिक अभिमानाचा साफ चक्काचूर करणारी प्रकरणे आहेत, त्यात गांधीजी आणि जनता यांत मतभेद झाला नसता आणि याचे कारण असे आहे की, आदर्श आणि सदसद्विवेकबुद्धी यांच्यामध्ये फ्रॉइड बदल करीत असला तरी,

मनुष्यजातीचे काही सनातन आदर्श असे आहेत की ते जनतेची सदसद्विवेकबुद्धीच बनतात. येथे फ्रॉइडच्या जोडीला हवी तर युंगची ‘ सामूहिक नेणिवे ’ची कल्पना आणावी. पण तसे करण्याचे कारण नाही. समाजाचे काही आदर्श सनातनच असतात, कारण ते मानवी स्वभाव आणि मानवी समाजाच्या चिरंतन गरजा यांनी ठरलेले असतात. असे आदर्श आणि समाजाची सदसद्विवेकबुद्धी यांच्यात भेद निर्माण होण्याचे कारण नाही, कारण ते दोन एकरूपच असतात. एखाद्या छोट्या निष्पाप राष्ट्रावर बड्या बेदाद राष्ट्राने आक्रमण करणे हे कोणत्याच समाजाच्या सदसद्विवेकबुद्धीला पटणार नाही. कारण त्यामुळे समाजाच्या प्रस्थापनेचा तात्त्विक पायाच उखडला जातो. आपल्या कुटुंबात सामील झालेल्या आणि त्या कुटुंबाच्या आश्रयास आलेल्या निराधार स्त्रीस आश्रय न देणे हे त्या कुटुंबाच्या सातत्यावरच घाला घालण्यासारखे आहे. महामंत्री व मंत्र्यांच्या नातेवाइकांना निर्लज्ज स्वार्थ साधण्याची मुभा देणे म्हणजे कुंपणास शेत खाण्याची मुभा देणे. अगदी फ्रॉइडच्या मानसशास्त्राप्रमाणे पाहिले तरी या अशा बाबतीत राष्ट्र आणि राष्ट्रपिता ( पिता आणि मुले ) यांच्यात विसंवाद येण्याचे कारण नाही. ‘ इड ’ आणि ‘ सुपर-ईगो ’ यांच्यात सर्वच बाबतीत विसंवाद निर्माण होतो असे नाही. तसे असते तर समाजाची निर्मितीच अशक्य झाली असती. या दोघांत विसंवाद होत नाही म्हणूनच ‘ ईगो ’ आणि ‘ सुपर-ईगो ’ यांचाही सर्व बाबतीत विरोध होण्याचे कारण नाही. अशा वेळी व्यक्ती समाजाचे निर्बंध आत्मसात (internalize) करते. ते स्वतःचे, स्वतः निर्माण केलेले असे निर्बंध मानते. राष्ट्र आणि राष्ट्रपिता यांतील विरोधाला हेच लागू आहे. अखेरीला राष्ट्रपिता हा राष्ट्राचा निर्माता असतो, त्याप्रमाणे राष्ट्राचा प्रतिनिधीही असतो. तेव्हा जनतेचे आणि गांधीजींचे काही आदर्श वेगळे झाले असते, त्यांच्यात त्यावरून विसंवाद निर्माण झाला असता, तर काही सनातन आदर्शांच्या बाबतीत जनता आणि गांधीजी एकरूपच बनले असते.

आणि आज राज्यकर्त्यांचे तरी सर्व सनातन आदर्श नष्ट झाले आहेत असे थोडेच आहे ? स्वेतलानाच्या दुःखाने इंदिरा गांधींच्या अंतःकरणात कणव उठली नसेल असे मानण्यास माझे मन मुळीच तयार नाही. पण भारताची प्रवक्ती आज रशियाच्या भीतीने भेदरून गेली आहे हेच अधिक संभवते. इंदिरा गांधीच काय, इतर राज्यकर्त्यांची हीच स्थिती झाली आहे. आमच्या राजकीय–लष्करी स्थितीचा हा परिणाम आहे. यामुळे रशियाच्या कृत्यांचा खोटा अर्थ लावणे भाग पडत आहे. रशियाने पाकिस्तानला लष्करी मदत दिली ती त्या राष्ट्राला चीनच्या मगरमिठीतून सोडविण्यासाठी, असे बयाण आपण चालवून घेत आहोत. भारताला कमकुवत राखण्याची रशियाची सत्तासमतोलाची ही गरज असेल, हा विचार आपल्या मनातसुद्धा येत नाही. भारताला कमकुवत ठेवायचे असेल तर रशिया आपल्याला इतकी मदत का देतो असा प्रश्न येथे पुढे येतो. कोणतेही राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला जी मदत करते ते स्वार्थासाठी हा प्राथमिक विचार येथे सुचत नाही. १९६५ च्या भारत–पाक युद्धात भारताने जी लष्करी चुणूक दाखविली त्यामुळे

' भू-राजनैतिक ' ( geopolitical ) दृष्टीने रशिया गांगरून गेला असेल. एकीकडे मदत देण्याचा देखावा करून दुसऱ्या बाजूने भारताला कमकुवत करण्याचा त्याचा डाव असेल, कदाचित ' ताश्कंद ' हा देखील या धोरणाचाच अविष्कार असेल, हे आपल्या मनातसुद्धा येत नाही.

हा आपल्या आर्थिक आणि लष्करी कमकुवतपणाचा परिणाम आहे. त्यामुळेच आपले राज्यकर्ते भेदरून गेले आहेत, आणि रशियाविरुद्ध साधे मतप्रदर्शन करण्यास घाबरत आहेत. (मग स्वेतलानाला आश्रय देण्याची गोष्ट बाजूलाच राहिली ! ) पण आपला हा जो लष्करी व आर्थिक कमकुवतपणा आहे त्यात आपल्या नैतिक कमकुवतपणाची भर पडली आहे. आपली सदसद्विवेकबुद्धी आज मरगळून गेली आहे. कित्येक पिढ्यांनंतर आपल्या व आपल्या जमातीच्या हाती सत्ता आल्यामुळे तिचा किती फायदा उठवू असे राज्यकर्त्यांना झाले आहे. आणि राज्यकर्त्यांच्या स्वार्थात जमातीच्या स्वार्थाची भेसळ झाल्यामुळे जनताही – म्हणजे जनतेचा काही भाग – काही प्रमाणात त्यांच्या अपकृत्यांत सामील झाला आहे. अशा वेळी जनतेची सदसद्विवेकबुद्धी जागृत करण्याचा प्रश्न आहे. राज्यकर्त्यांच्या ' इड 'वर (म्हणजे सत्तालोभावर) आणि जनतेच्या ' इड ' वर (म्हणजे तात्पुरत्या स्वार्थावर ) आदर्शाची आणि सदसद्विवेकबुद्धीची मात होण्याचा हा प्रश्न आहे. हे आदर्श आणि ही सदसद्विवेकबुद्धी जागृत करणारा महान पुरुष आज कोणी उरला नाही ही आजची मोठी अडचण आहे. महात्मा गांधींनी हे कार्य केले असते. या राष्ट्रपित्याने राष्ट्राची सदसद्विवेकबुद्धी जागृत राखली असती. निदान अशी कल्पना करणे शक्य होते.

ऑक्टोबर, १९६८

१९६८ साली लिहिलेला हा लेख होता तसा मुद्दामच ठेवला आहे. आणी-बाणी येऊन गेली तरी देशाची नैतिक स्थिती होती तशीच आहे हे या लेखात निर्देशिलेल्या वस्तुस्थितीने पटावे. मध्यंतरी श्री. जयप्रकाश नारायण यांनी राष्ट्राची सदसद्विवेकबुद्धी जागृत केली होती, पण त्यांच्या प्रकृतीने दगा दिला. — लेखक

२.

# माओ त्से–तुंग

माओचा एक विशेष होता. तो अर्थात त्याची मूळ प्रकृती आणि त्याचा अनुभव यांचा संयुक्त परिपाक होता. माओमध्ये एक सतत आढळणारी वृत्ती म्हणजे त्याची रोमांचक साहसी वृत्ती. या वृत्तीच्या जोरावर त्याने १९२७ साली चिंग कांग डोंगरात आपले स्वतंत्र ठाणे निर्माण करून आपल्या स्वतंत्रप्रज्ञ क्रांतीचा प्रारंभ केला होता. या वृत्तीचाच उत्कर्ष पुढे १९३५ च्या 'लाँग मार्च'मध्ये झाला. दुसरी गोष्ट म्हणजे त्याच्या स्वभावातली नाट्यमयता. माओला नाट्यपूर्णतेची विलक्षण आवड होती. सांस्कृतिक क्रांतीला सुरुवात करण्यापूर्वी, वयाच्या ७३ व्या वर्षी (१९६६ च्या उन्हाळ्यात), त्याने यांग त्सी नदीत पोहण्याचा एकदा सोडून तीनदा विक्रम केला, (निदान तसे नारे लावण्यात आले,) ही गोष्ट माओच्या नाट्यवेड्या स्वभावाचीच द्योतक होती. आपल्या प्रत्येक मोहिमेत अशी एक नाट्यमय चूष माओ सोडून देत असे. उदाहरणार्थ, लाल सैन्याचा आदर्श पुढे ठेवताना त्याने ले फेंग आणि वांग त्से या दोन सामान्य सोजिरांचे नाट्यपुरुष बनवून जनतेपुढे उभे केले! तिसरी गोष्ट म्हणजे माओच्या पाचवीस पुजलेली अस्वस्थता. त्याला स्वस्थ बसणे, आत्मसंतुष्टतेत निमग्न राहणे अशक्य होते. एक प्रकारच्या दैवी असंतोषाने (डिव्हाइन डिस्कंटेंट) त्याचे समग्र जीवन ग्रासलेले होते असे वाटते. एखादी प्रिय घटना घडली किंवा हवी असलेली गोष्ट साध्य झाली म्हणजे त्याची वृत्ती लगेच उलून जाई. मग तो एखादी उत्साहपूर्ण कविता लिही; पण तो त्यात आत्मसंतुष्ट वृत्तीने मश्गूल होऊन राहत नसे. मार्क्सवादाचा विकास करताना त्याने 'निरंतर क्रांती'चा (ट्रॉट्स्कीच्या सिद्धान्तापेक्षा अगदी वेगळा) असा सिद्धान्त काढला तो खरोखर त्याच्या प्रज्ञेच्या विलासापेक्षा त्याच्या आत्म्याचा हुंकार होता. निसर्ग आणि मानव यांतील संघर्ष कायम राहणार आहे, आणि क्रांतीचे मूळ या संघर्षात असते. अर्थात क्रांतीची जोपासना निरंतरच करायला हवी. ज्या क्रांतीला कधीकाळी खंड पडणार आहे तिचा पाईक बनणे

त्याच्या स्वभावालाच मानवणारे नव्हते. माओच्या स्वभावातली आणखी एक गोष्ट म्हणजे तो साधारणपणे उतावळा असूनही कसलेल्या राजकारण्याला आवश्यक अशी सावध संधिसाधुत्वाची किमया त्याला साधलेली होती. तिची जात अर्थात स्टालिनच्या सैतानी संधिसाधुत्वाची नव्हे. जीवनातला सर्वात मोठा आनंद म्हणजे शत्रूच्या निःपाताची योजना आखणे, तिच्या परिपूर्तीची वाट पाहत बसणे आणि योग्य क्षणी त्या परिपूर्तीचा अचूक डाव टाकणे, असे वर्णन स्टालिनने एकदा केले होते. ट्रॉट्स्की, बुखारिन प्रभृति प्रतिस्पर्ध्यांचा काटा त्याने नेमका याच निर्घृण संधिसाधुत्वाने काढला होता. माओचे संधिसाधुत्व अधिक उदात्त प्रकृतीचे होते. १९३०–३२ पासून १९३५ अखेरपर्यंत ज्या चँग कै–शेकने त्याची अक्षरशः ससेहोलपट करून त्याला येनानच्या वैराणात पळवून लावले होते त्याच्याशी जपानविरोधी युती करायचे ठरल्यानंतर त्याची स्तुती करण्यासच काय, पण जपानविरोधी लढ्याचे नेतृत्व त्याला देण्यास माओची तयारी होती. (अर्थात हा लढा चालू असताना आपले स्वतंत्र तळ आणि मोर्चे बांधण्याची सावधगिरी त्याने बाळगलीच) पण असे संधिसाधुत्व असूनही माओने आपल्या अंतिम ध्येयवादाशी कधी तडजोड केली नाही.

माओचा ध्येयवाद तो कोणता ? १९२० साली आपण मार्क्सवादी बनलो असे माओने एडगर स्नो याला सांगितले. १९२१ मध्ये चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापनेच्या वेळी माओ हजर होता. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या पुस्तकी चर्चेत त्याने फारसा रस कधी घेतला नाही, तरी मार्क्सवादाचे ‘ चिनीकरण ’ त्याने केले याला फार मोठा अर्थ आहे, ( मार्क्स-वादाचे ‘ युगोस्लाव्हीकरण ’ करण्याचे टिटोच्या मनातही आले नाही.) माओ जितका मार्क्सवादी होता तितकाच तो चिनीवादी होता. माओचा आत्मा चिनी वाङ्मयावर आणि चीनच्या ऐतिहासिक व्यक्तित्वावर पोसलेला होता. हे व्यक्तित्व चीन हे केंद्र मानून जगाच्या वर्तुळाचा वेध घेत असते, आणि म्हणूनच कॉमिन्टर्नचा प्रतिनिधी मारिंग याने सन् यत–सेनशी, कम्युनिस्टांनी केमिन्टांगमध्ये प्रवेश करण्याबद्दल वाटाघाटी केल्या तेव्हा माओचा त्याला अबोल पण हार्दिक पाठिंबा असावा असे त्याच्या पुढील वर्तनावरून म्हणता येते. पुढील काळात, पक्षाच्या मोठमोठ्या विद्वान नेत्यांचा कोमिन्टांगला विरोध असतानाही, माओने कोमिन्टांगमधून कार्य करण्याचा क्रम कायम ठेवला, पण त्याच-बरोबर हे कार्य करताना कम्युनिस्ट क्रांतीसाठी ग्रामीण भागातील तळाची शेतकरी-शक्ती जागृत करण्याचे व्रत सोडले नाही. लेनिनने रशियन क्रांतीत शेतकरी वर्गाचे सहकार्य महत्त्वाचे मानले. वसाहतीतील राष्ट्रीय आंदोलनाचे महत्त्वही, जागतिक कम्युनिस्ट क्रांतीच्या दृष्टीने, त्याने महत्त्वाचे मानले. या राष्ट्रीय आंदोलनाचे नेतृत्व वसाहतीतील ज्या वर्गांकडे असेल त्यांत शेतकरीवर्गाचे महत्त्व फार असणार. पण लेनिनने कम्युनिस्ट क्रांती शेतकऱ्यांच्या नेतृत्वाखाली होईल असे कधी मानले नाही. माओने सुद्धा मार्क्सवादाचे मंत्र म्हणताना कामगारांच्या वर्गीय ऋचांचे स्मरण व्यवस्थित ठेवले, पण प्रत्यक्षात शेतकरी-वर्गाच्या प्रमुखत्वाचा कार्यक्रम आखला–आणि शहरांना खेड्यांतून वेढा घालण्याच्या

तत्त्वज्ञानात त्याची परिणती झाली. कम्युनिस्ट क्रांतीच्या मार्क्सप्रणीत वर्गीय पायाची अशी उपेक्षा झाल्यानंतर तिचे पर्यवसान मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाला धक्के बसण्यात व्हावे हे स्वाभाविकच झाले. १९२५ साली वूहानमधील शेतकऱ्यांचा अभ्यास करून जो प्रसिद्ध वृत्तांत माओने लिहिला त्यातच मानवाच्या अंतर्यामीच्या (सब्जेक्टिव) शक्तीचे स्तवन झालेले होते. अर्थात येथे सुद्धा लेनिनपर्यंत सूत्र पोचविता येते. १९०२ च्या 'व्हॉट इज् टु बी डन् ?'मध्ये 'आजीव क्रांतीकारकां'चा सिद्धान्त मांडताना, राजकीय दृष्टिकोण वर्गीय सत्त्वाचे परिवर्तन करू शकतो असा विचार लेनिनने मांडलाच होता. पण जी गोष्ट मार्क्सवादी बुद्धिवाद्यांबाबत लेनिन कल्पित होता ती ग्रामीण गुंडांबद्दल (व्हेग्रंट्स) कल्पिण्याची माओची तयारी होती. पुढे याच तत्त्वज्ञानाचा विकास 'वस्तुनिष्ठ, परिस्थितीवर आत्मिक शक्तीची मात' करण्याच्या सिद्धान्तापर्यंत झाला आणि अर्थात त्याचे पर्यवसान नवा मानव घडविण्याच्या कल्पनेत झाले. पण माओचा मानव हा सर्वप्रथम चिनी मानव होता हे लक्षात घेतले पाहिजे. आणि मार्क्सवादाचा तात्त्विक–व्यावहारिक विचार त्याने सतत चीनच्याच संदर्भात केला. माओने मार्क्स–लेनिनवाद चीनच्या परिस्थितीला केवळ लावून दाखविला असे नव्हे तर चीनच्या संदर्भात त्याचा गुणात्मक विकास केला आणि अशा प्रकारे, आशियाई–आफ्रिकी–लॅटिन अमेरिकी जनतेला नवा सैद्धान्तिक प्रकाश दिला. पण असे करीत असताना कम्युनिस्ट समाजाच्या विकासाचा एक नवा आलेखही त्याने निर्माण केला आणि त्याचीच प्रेरणा सांस्कृतिक क्रांतीला मिळाली.

माओची महत्त्वाकांक्षा कां व कशी डिवचली गेली ?

१९५३ साली स्टालिन मेला आणि जागतिक कम्युनिस्ट चळवळीच्या नेतृत्वाचे आसन रिकामे पडले. या आसनावर माओची प्रस्थापना होणे हे सर्वार्थांनी रास्त होते. कम्युनिस्ट क्रांतीचा माओसारखा साक्षात दीर्घकालीन यशस्वी अनुभव दुसऱ्या कोणत्या नेत्याला नव्हता. चिनी क्रांती यशस्वी करण्यात माओने जी प्रतिभा, संग्रामशीलता, संघटनाचातुर्य, चिकाटी आणि सर्वांगीण कर्तृत्व दाखविले तसे पूर्वी फक्त टिटोने दाखविले होते. अर्थात ते माओच्या इतके दीर्घकालीन आणि सर्वांगीण नव्हते, पण त्याची जात ती होती. पण स्टालिन मेला तेव्हा टिटो वाळीत पडलेलाच होता. अर्थात माओखेरीज इतर कोणाच्या नावाचा विचार करण्याचे कारणच नव्हते. पण माओच्या नावाचा विचार झालाच नाही. रशियात स्टालिननंतर कोण, याबाबत जेवढी घालमेल आणि उलथापालथ झाली तेवढीही कम्युनिस्ट क्रांतीच्या जागतिक क्षेत्रात झाली नाही. आर्थिक, लष्करी दृष्ट्या रशिया प्रबळ होता ( आणि अर्थात निरनिराळ्या कम्युनिस्ट पक्षांना पैशाची वगैरे मदत करण्याची त्याची ताकद सर्वाधिक होती ), या एकाच कारणाने रशियाचा – रशियन कम्युनिस्ट पक्षाचा – नेता हा जागतिक कम्युनिस्ट चळवळीचा नेता आपसूक ठरला. अर्थात चीनच्या मानाने, रशियाचा कम्युनिझमच्या विकास-मार्गावरचा अनुभव ३२ वर्षांनी अधिक आहे असा

शहाजोग सैद्धान्तिक आधारही शोधण्यात आला. खरे म्हणजे एवढे औपचारिक रीतीने करण्याची आवश्यकताही कोणाला भासली असे दिसत नाही. पण जे इतरांना जाणवलेसुद्धा नाही ते माओला जिव्हारी झोंबले असावे यात शंका नाही.

१९५३ सालीच चीनची पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली. या योजनेला रशियाची प्रेरणा होती आणि साहाय्यही होते. सोव्हिएट आदर्शावरच ती बेतलेली होती. अवजड उद्योगीकरणावर तिचा भर होता. शेतीच्या क्षेत्रात शेतकऱ्यांच्या सहकारी उत्पादनावर जोर देण्यात आला होता. इकडे ही योजना कार्यान्वित असताना तिकडे माओचे डोके व्यग्र होते. एक दिवस तो सार्वजनिक नजरेच्या आड झाला. नंतर जेव्हा एकदम प्रकट झाला, तेव्हा – ३१ जुलै १९५५ रोजी – त्याने शेतीच्या सामुदायीकरणाची घोषणा केली. लोक चकित झाले. एक म्हणजे हा पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमात जबरदस्त हस्तक्षेप होता. दुसरे म्हणजे यांत्रिक नांगर वगैरे नसताना सामुदायिक शेती कशी करणार ? पण माओच्या डोक्यातला हिशेब निराळा होता. सामुदायिकीकरणाने निर्माण होणारे वातावरण आणि मानसिक परिवर्तन याचेच महत्त्व माओला अधिक होते. त्याने जाहीर केलेच की, वर्षभरात समाजवादाचा विजय बहुतेक नक्कीच दृग्गोचर होईल. रशियाची ३२ वर्षांची आघाडी तोडण्याची आच त्याला लागली होती.

माओच्या डोक्यात जे खदखदत होते त्या दृष्टीने १९५६ साल फार महत्त्वाचे ठरले. सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाच्या विसाव्या काँग्रेसमध्ये ख्रुश्चोव्हने ते विख्यात, स्टालिनचे वस्त्रहरण करणारे, गुप्त भाषण केले आणि त्याचे ऐतिहासिक पडसाद जगभर उठले. अधिक प्रत्यक्ष परिणाम पोलंड–हंगेरीतील क्रांतिकारक प्रतिक्रिया होण्यात झाला. या प्रकरणी माओचा सल्ला घेण्याचा धोरणीपणा ख्रुश्चोव्हने दाखविला, पण स्टालिनच्या वस्त्रहरणाचे खुद्द चीनमधले परिणाम माओच्या अंगाशी येऊन भिडले. १९४५ साली चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या सातव्या काँग्रेसमध्ये माओ-विचारांना मार्क्स–लेनिनवादाच्या बरोबरीने मान्यता देण्यात आली होती. पण स्टालिनभंजनामुळे जागतिक कम्युनिस्ट चळवळीत व्यक्तिस्तोमाविरुद्ध गहजब माजला. त्याचा परिणाम असा झाला की, चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या आठव्या काँग्रेसमध्ये पक्षीय नियमांत बदल करण्यात येऊन पक्षाच्या मार्गदर्शनातून माओ-विचारांचा प्रत्यक्ष उल्लेख वगळण्यात आला. माओच्या अस्मितेवर हा मोठाच आघात होता.

माओच्या स्टालिनप्रशस्तीचा उगम मला या घटनेत दिसतो. स्टालिनने चिनी क्रांतीत माओला काहीही मदत केलेली नव्हती. त्याने नेहमी सोव्हिएट पक्षातील अंतर्गत वादाच्या आणि रशियन राष्ट्राच्या राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय हिताच्या दृष्टीने चिनी क्रांतीकडे पाहिले. आपल्या राष्ट्राच्या शेजारी एक प्रबळ प्रतिस्पर्धी कम्युनिस्ट राष्ट्र निर्माण होण्यास त्याचा विरोधच होता. ( आणि पुढे जे घडले ते पाहता त्याच्या धूर्त हिशेबास आक्षेप कसा घेता येईल ? ) कोमिटांग राजवटीस अखेरचे आचके लागलेले असतानाही त्याने चँगची साथ सोडली नव्हती. ( कम्युनिस्ट चढाईला पाठ दाखवून चँगचे सरकार कुन्मिंगहून कुटनला

पळाले तेव्हा सोव्हिएट वकील त्याच्या बरोबर कँटनला गेला, कुन्मिंगला राहिला नाही.) माओच्या विजयी सरकारला आर्थिक व इतर मदत करताना ज्याने क्षुद्र खळखळ दर्शविली व कबूल करूनही पोर्ट आर्थर, दैरानमधून आपले ठाणे मरेपर्यंत हलविले नाही अशा स्टालिनबद्दल माओला प्रेम वाटण्याचे काही कारण नव्हते आणि त्याच्या विषयी रशियन नेत्यांशी वाद घालताना 'स्टालिनच्या चुकांचा आम्हाला साक्षात अनुभव आहे' असे उद्‌गार चिनी नेत्यानी काढले होते. तरीही ख्रुश्चोव्हच्या स्टालिनभंजनाचा निषेध माओने केला, कारण एकतर आपले रास्त पद हिरावून घेणाऱ्या ख्रुश्चोव्हने केलेले ते भंजन होते आणि दुसरी गोष्ट म्हणजे ज्या पदावर माओ आरूढ होऊ इच्छित होता त्या पदाची अप्रतिष्ठा करण्याची त्याची तयारी नव्हती. मार्क्स–लेनिन–स्टालिन अशा परंपरेत माओ वाढलेला होता आणि ख्रुश्चोव्हला विरोध करण्यासाठी या पदपरंपरेचा त्याला आधारच मिळत होता. त्याचे रास्त पद ख्रुश्चोव्हने हिरावून घेतले होते, स्टालिनने नव्हे.

पण खरा महत्त्वाचा मुद्दा निराळाच होता. माओचे इतिहासदत्त पद ख्रुश्चोव्हने ज्या आधारावर हिरावून घेतलेले होते आणि जो आधार आर्थिक मलिद्याच्या जोरावर जगातील कम्युनिस्ट पक्षांना (वाद उपस्थित न करताच) मान्य करायला लावला होता तो मुख्य मुद्दा होता – सोव्हिएट रशिया कम्युनिझमच्या मार्गावर ३२ वर्षांनी आघाडीला होता हा. त्याच्याशी मुकाबला करायला हवा होता. या प्रश्नाने माओचे डोके त्रस्त केले होते.

पण हे डोके सुपीक होते. १९५६ साली त्याने 'शंभर पुष्पे फुलू देत'चा कार्यक्रम काढला. त्याने बुद्धिवाद्यांना कम्युनिस्ट राजवटीबद्दल जे वाटते ते प्रांजळपणे सांगण्याचे आवाहन केले. हे बुद्धिवादी आपल्या राजवटीची स्तुतिस्तोत्रे गातील आणि बुद्धिवाद्यांची गळचेपी करणाऱ्या रशियाला धडा शिकविता येईल असे त्याला वाटले. पण झाले भलतेच. चिनी बुद्धिवादी माओच्या राजवटीवर तुटून पडले. पण अपयशाने खचून जाणे ही माओची प्रकृती नव्हे. १९५७ साली त्याच्या डोक्यातून गरूड झेपेची (ग्रेट लीपची) कल्पना निघाली. औद्योगिक संपत्ती निर्माण करण्यासाठी मोठमोठे अजस्र कारखाने बांधले पाहिजेत या रशियन कल्पनेची गरजच काय? आपल्या घरांच्या मागे आवारात छोटे-छोटे कारखाने बांधता येणार नाहीत काय? एवढ्या प्रचंड देशात ठिकठिकाणी छोटे छोटे कारखाने धूर ओकू लागले तर औद्योगिक मालाचे डोंगर उठायला वेळ किती? मोठमोठे कारखाने बांधा, त्यासाठी मोठमोठी शहरे उभारा, कामगारांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी सामुदायिक शेतीचा पसारा मांडा, हा रशियन उपद्व्याप हवाच कशाला! अर्थात नुसते औद्योगिक उत्पादन म्हणजे कम्युनिझम नव्हे. पण या घरेलू कारखान्यांना शेतकऱ्यांच्या 'कम्यून'ची जोड दिली म्हणजे झाले. 'कम्यून'च्या चौथऱ्यावरून कम्युनिझमची गरूड झेप मारण्याचा मनसुबा माओने केला आणि १९५८ च्या प्रारंभी त्याला प्रत्यक्ष आकार देण्यास सुरुवातही झाली. कम्यूनच्या या प्रयोगामुळे, कम्युनिझमच्या मार्गावर आपण

आघाडी मारू असे माओच्या प्रवक्त्यांनी उद्‌गारही काढले.

हा आततायी प्रयोग अंगाशी येणार हे वर्तविण्यास खास रशियन प्रतिभेची आवश्यकता नव्हती. तरी खुद्द ख्रुश्चोव्ह त्याची चेष्टा करण्यास प्रवृत्त व्हावा, आणि ती करताना त्याला साधा व्यावहारिक पोच उरू नये, असे का घडले ? ख्रुश्चोव्हने या कम्यूनची चेष्टा, चिन्यांच्या खास शत्रुत्वास पात्र झालेल्या अमेरिकेच्या सेनेटर ह्युबर्ट हम्फ्रेपाशी करावी काय ? आणि या खासगी चेष्टेस त्याने पुढे जाहीर रूप द्यावे काय ? पण एवढा साधा विवेक ख्रुश्चोव्हला उरला नाही याचे कारण साधे मानसशास्त्रीय होते. चिनी कम्यून हा साधा सामाजिक रचनेचा मुद्दा उरलाच नव्हता. तो सत्तास्पर्धेमुळे अधू बनलेल्या अहंकाराचा सल बनला होता.

ख्रुश्चोव्हच्या चेष्टेमुळे माओ आणि त्याचे अनुयायी यांच्या संतापाची शेगडी चांगलीच भडकली. त्यात घरभेदेपणाची भर पडली. संरक्षणमंत्री फंग तेह–हुआय् क्रायमियात ख्रुश्चोव्हला भेटला तेव्हा त्याने त्याच्या टीकेला दुजोरा दिला ! कारण स्वच्छ होते. कम्यूनच्या चौथऱ्यावरून मारलेल्या ऊंच उडीचा पार फज्जा उडाला होता. फंग तेह–हुआय् आणि त्याचे हुआंग खो–चेंगसारखे सहकारी यांचा सुरुवातीपासून या ‘ गरूड झेपे ’स विरोध होता. आणि त्यांनी तो लपवून ठेवला नव्हता. आता १० डिसेंबर १९५८ रोजी चिनी पक्षाच्या मध्यवर्ती समितीने कम्यूनच्या ‘ गरूड झेपे ’पासून माघार घ्यावयाचे ठरविले. माओने राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि त्याची जागा लिऊ शाव–छीनी घेतली ( पुढे, जानेवारी १९६७ मध्ये पेकिंगमध्ये प्रकाशित केलेल्या एका भित्तिपत्रकाने जाहीर केले की माओचा राजीनामा नाखुषीचा होता. ‘ मला पक्षाचा हा निर्णय अमान्य होता. पण मी काहीच करू शकत नव्हतो ’ असे माओचे उद्‌गार या भित्तिपत्रकात नमूद झाले होते. ) कम्यूनपासून माघार घेण्याचे धोरण चीनने स्वीकारले आणि या माघारीचे नेतृत्व लिऊ शाव–छीनी पत्करले.

लिऊंच्या या नव्या भूमिकेने काही जुन्या स्मृती जागृत होणे अपरिहार्य होते. लिऊ हे माओप्रमाणेच हुनान प्रांतातले – त्याचे फार पूर्वीपासूनचे सहकारी. माओ ही चिनी क्रांतीची ऊर्जस्वल प्रतिभा, तर लिऊ ही कार्यक्रम-संघटनाचातुरी. प्रतिभेला निव्वळ कार्यक्षमतेबद्दल फारसा आदर नसतो. ट्रॉट्स्कीला स्टालिनबद्दल नव्हता, आणि युगोस्लाव्हियाच्या जिलासला कार्डेलीबद्दल नव्हता. ( नेहरूंना वल्लभभाईंबद्दल होता ? ) पण एवढेच कारण नव्हते. १९४५ साली चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या सिद्धान्त-त्रयीत मार्क्सवाद –लेनिनवादाबरोबर माओच्या विचाराचा समावेश करताना लिऊंनी माओबरोबर इतरांचाही उल्लेख केला होता. ( We must learn from Comrade Mao Tse–Tung and many other Comrades. ) म्हणजे माओ इतरांबरोबरच एक ! आता लिऊंच्या नेतृत्वाखाली चिनी सरकारने कम्यूनपासून फार झपाट्याने माघार घेण्यास सुरुवात केली. लाख–पाऊण लाख वस्तीचे कम्यून होते; आता त्यांची लोकसंख्या लहान करण्यात आली. कम्यूनची संख्या ७६ हजार होती ती २४ हजार करण्यात

आली. शेतकऱ्यांना त्यांचे खासगी जमिनीचे तुकडे परत करण्यात आले. त्यावरचे भाजी-पाला, धान्य खासगी रीतीने विकण्यास परवानगी देण्यात आली. आवारातले घरेलू कारखाने मोडण्यात आले. उत्पादनवाढीचे रीतसर (रूटीन) उपाय, म्हणजे बोनस, भत्ते, खास अधिकाराच्या जागा, विषमता यांचा अवलंब करण्यात येऊ लागला.

इकडे पेटलेल्या खाईत ख्रुश्चोव्हनेही आपल्या धसमुसळेपणाची भर टाकली. १९५७ साली रशियाचा स्पुटनिक अंतराळात उडाला. अणु-क्षेपणास्त्र आकाशात उडाले. माओची अपेक्षा अशी की रशियाने आपल्या या नव्या शक्तीचा क्रांतीसाठी उपयोग करावा. पण कम्युनिझमच्या स्वप्नापेक्षा रशियन राजकारणाच्या दैनंदिन व्यवहारात दंग असणाऱ्या ख्रुश्चोव्हला अण्वस्त्र-युद्धाची धास्ती बेजार करू लागली. तो शांततेच्या धोरणाचा ध्यास घेऊ लागला. उलट त्या वर्षीच्या मॉस्कोच्या जागतिक कम्युनिस्ट परिषदेत माओने अणुगोल म्हणजे ‘कागदी वाघ’ हा आपला जुना सिद्धान्त मांडला आणि त्याच्या समर्थनार्थ असा युक्तिवाद केला की अणुयुद्धाने जग बेचिराख होईल म्हणजे काय होईल? अर्धी मानवजात तर उरेल! ती कम्युनिझमचे सुंदर विश्व उभारील! माओच्या या बेधडक युक्तिवादाने ख्रुश्चोव्ह चक्रावून गेला असेल यात शंकाच नाही. त्यातच कम्यूनचा रशियाला नाक खाजवून दाखविणारा अतिरेक! ख्रुश्चोव्ह संतापला. त्याने चीनला देऊ केलेली अण्वस्त्रे द्यायला नकार दिला. चिनी आर्थिक विकासासाठी देऊ केलेली मदत रद्द केली आणि सोव्हिएट तंत्रविशारद काढून घेतले. ख्रुश्चोव्हचा आततायीपणा एवढ्यावर थांबला नाही. माओवर मात करण्यासाठी—कम्युनिस्ट मार्गा-वरील प्रगतीबाबत तू आमच्याशी खुली स्पर्धा करू नको असे त्याला बजावण्यासाठी—त्याने १९६१ च्या सोव्हिएट पक्षाच्या २६ व्या काँग्रेसमध्ये, रशियात आता वर्गव्यवस्थेचे विसर्जन झाले आहे असे जाहीर करून टाकले! अर्थात लिऊप्रभृति चिनी पुढारी सोव्हिएटविरोधात माओला साथ देऊ लागले. पण कम्युनिझमच्या मार्गावरील स्पर्धेचे माओचे अंतस्थ रहस्य त्यांच्या अंतरंगात भिडण्याचे कारण नव्हते म्हणून म्हणा, किंवा वास्तवाशी तडजोड करण्याची हिंमत त्याजपाशी होती म्हणून म्हणा, ते चीनच्या आर्थिक विकासाचा पाश्चात्त्यप्रणीत रीतसर मार्गच चोखाळू लागले. म्हणजे त्यांनी स्पष्टपणे स्वीकारले की, उद्योगीकरण आले की तंत्रज्ञ आले; तंत्रज्ञ आले की त्यांचे प्रभुत्व आले; प्रभुत्व आले की त्यांचे खास अधिकार आले; म्हणजे विषमता आली, नोकरशाही आली, कामगारांना काम करण्यासाठी प्रलोभने आली, बोनस आले, भत्ते आले, नोकरशाही आली. थोडा भ्रष्टाचारसुद्धा आला!

रशियाबद्दल विशेष चिकित्सक बनलेल्या माओच्या बुद्धीला या वस्तुस्थितीने एक मोठा साक्षात्कार झाला! रशिया समाजवादाच्या गोष्टी सांगतो आहे, कम्युनिझमच्या मार्गा-वरील प्रगतीची मिजास मारतो आहे, आपल्या प्रागतिकतेचा दिमाख दाखवितो आहे, पण रशिया खरोखर प्रतिगामी बनला आहे. त्याची पावले कम्युनिझमच्या नव्हे तर भांड-वलशाहीच्या मार्गावर पडत आहेत—तो फेरवादी बनत आहे. भांडवलशाही राष्ट्रे व ही

युरोपीय कम्युनिस्ट राष्ट्रे यांच्यांत तसा काय फरक आहे ? येथे तशीच विषमता आहे, तशीच चैनबाजी आहे, तशीच अधिकारशाहीची दादागिरी आहे, तसाच भ्रष्टाचार आहे. शहरे–खेडी यांत तसाच विसंवाद आहे, शासनात आणि पक्षकारभारात स्वार्थ साधण्याची तशीच वृत्ती आहे. ही भांडवलशाहीच. भांडवलशाही म्हणजे काय ? तिचे रहस्य तरी काय ? भांडवलशाही म्हणजे श्रम न करता उपटलेला नफा – जे समाजाच्या मालकीचे ते स्वतःच्या घशात घालण्याचा उद्योग. बस् ! रशिया भांडवलशाहीचाच मार्ग चोखाळीत आहे. आणि चीनमध्ये सुद्धा आपले कित्येक सहकारी हा भांडवलशाहीचा मार्ग चोखाळण्यास सज्ज झाले आहेत – नव्हे तो बेगुमानपणे चोखाळताहेत !

पण आता घिसाडघाई करण्यात अर्थ नव्हता. १९५८च्या कम्यून-प्रयोगाने माओचे हात पोळलेले होते. माओ उतावळा होता, पण दूरदर्शीपणामुळे त्याच्या ठिकाणी धीरगंभीर-पणाचा गुण आलेला होता. त्याने दूरगामी उपायांचा अवलंब करण्याचे ठरविले. माओ आणि लेनिनसकट इतर कम्युनिस्ट नेते (याला ट्रॉट्स्की–टिटो हे क्वचित अपवाद) यांच्यांत मोठा फरक असा की माओ हा जितका राजकीय नेता होता तितकाच तो लष्करी नेता होता. त्याच्या साहसवादी रोमांचक वृत्तीला लष्कराचा लोभ होता. सैनिकांचे आकर्षण होते. अगदी बालवयात – १९११ च्या लोकसत्ताक क्रांतीनंतर १९१२ साली – तो सन् यत्–सेनच्या सैन्यात सामील झाला होता. पुढे १९२७ साली चिंग कांग डोंगरात त्याने आपले ठाणे रोवले ते लष्करी ठाणेच होते. पुढे १९३५ पर्यंत तो चँग कै–शेकशी लष्करी धडक देतदेतच चिनी कम्युनिस्ट क्रांतीचा प्रधान नेता बनला. ही धडक देत असतानाच त्याने आपले गनिमी काव्याचे शस्त्र आणि शास्त्र बनविले. हे निव्वळ लष्करी शास्त्र नव्हते हे त्याचे ऐतिहासिक महत्त्व होय. या लष्करी शास्त्राशी त्याने कम्युनिस्ट क्रांतीच्या शास्त्राचा मिलाफ करून टाकला होता. लष्करी विजय आणि सामाजिक परि-वर्तन यांचा गुणाकार बांधला होता आणि यातून राजकीय सत्तेचे गणित मांडले होते. सत्ता बंदुकीच्या नळीतून येते; पण या नळीवर पक्षाचे नियंत्रण असायला हवे; आणि या नियंत्रणाची निष्ठा समाजक्रांतीची असेल तरच ते यशस्वी होते, असा माओचा सिद्धान्त होता. माओचे गनीम क्रांती करीत मोर्चे बांधीत, आणि क्रांतीच्या मोर्च्यांतून जन्म घेत. अशी माओची क्रांतिकारक प्रवृत्ती लष्करी वृत्तीने रांधून निघालेली आहे.

आता हा नवीन पवित्रा धारण करताना अगदी साहजिकच त्याचे लक्ष सैन्याकडे गेले. आपल्या ध्येयवादाचे मोर्चे सैन्यात बांधण्याचा त्याने मनसुबा केला. सैन्याच्या राजकीय कायापालटाचा पवित्रा त्याने धारण केला. संरक्षणमंत्री फंग तेह–हुआय याने कम्यूनची चेष्टा तर केलेली होतीच, पण फंगची टीका आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित नव्हती. लष्करातदेखील नोकरशाही होती. विषमता होती. उच्चनीच भेदभाव होते. आणि हे सारे लष्कराच्या यशस्वी कारभारासाठी आवश्यक आहे अशी फंगची भूमिका होती. एवढेच

असते, तर फारशी हरकत नव्हती. लिऊ शाव-छीप्रभृतींची भूमिका तशीच होती. पण फंग तेह-हुआय याने क्रायमियात ख्रुश्चोव्हची भेट घेऊन त्याच्याशी 'संधान' बांधलेले होते, आणि या पापाला क्षमा नव्हती. लुसान येथील मध्यवर्ती समितीच्या सभेत फंग तेह-हुआयने सैन्याच्या या नव्या राजकीयीकरणाला विरोध केला तेव्हा त्याला चक्क काढून टाकण्याचा पवित्रा माओने घेतला, आणि तो सिद्धीस नेला. फंगच्या जागी लिन पिआव याची योजना झाली. माओच्या पुढील डावपेचांच्या दृष्टीने हा बदल निर्णायक ठरला.

लष्कराच्या राजकीय शिक्षणाबरोबर तरुणांच्या राजकीय शिक्षणाचीही योजना माओने आखली. माओ शांतपणे आणि सखोल बुद्धीने क्रांतिकारक शक्ती गोळा करीत होता. तरुणांचे रक्त ताजे असते, प्रकृती स्वच्छ असते, उदात्त ध्येयवादाचे त्यांना स्वाभाविक आकर्षण असते, भ्रष्टाचारविरोधाचे आवाहन त्यांना करता येते, हे माओने अचूक ओळखले. चीन गरीब आणि कोरा आहे, त्याच्या स्वच्छ पाटीवर हवी ती सुंदर चित्रे रेखाटता येतील असे उद्‌गार माओने एकदा काढले होते. या स्वच्छ पाटीचे दर्शन त्याला तरुणांत - आपल्या उद्याच्या वारसदारांत – झाले. पण त्याचे अधिकतर लक्ष सैन्यावर होते, आणि नवा संरक्षण मंत्री लिन पिआव त्याच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास तयार होता, तत्पर होता. लिनने सैन्याचे त्वरेने शुद्धीकरण केले. बेभरवशी अधिकाऱ्यांचे उच्चाटन केले. सैनिकांना माओच्या विचारांचे पद्धतशीर डोझ देण्यात येऊ लागले आणि दोनतीन वर्षांत सैन्याचा कायापालट झाला असे माओ–लिनना वाटू लागले. १९६२ मध्ये मध्यवर्ती समितीच्या बैठकीत खुद्द माओने देशापुढे सैन्याचा आदर्श उभा केला. देशाने 'लोकमुक्तिसेने'कडून (पीपल्स लिबरेशन आर्मीकडून) शिकावे अशी घोषणा झाली.

एकदा अशी घोषणा झाल्यावर तिची अंमलबजावणी होण्यास उशीर लागण्याचे कारण नव्हते. १९६४ च्या अखेरीस लष्कराधिकाऱ्यांची नेमणूक निरनिराळ्या सरकारी खात्यात आणि मंत्रालयात झाली. मे १९६५ मध्ये सैन्यातर्फे हुद्दे आणि अधिकार यांचे विसर्जन करण्याचे नेत्रदीपक पाऊल टाकले गेले. (पुढे खुद्द ख्रुश्चोव्हनेच माओचे याबद्दल कौतुक केले!) कित्येक निवृत्त सैन्याधिकाऱ्यांची ऑक्टोबरमध्ये शिक्षणखात्यात आणि शिक्षण-संस्थांत नेमणूक करण्यात आली. १९६५ अखेरीस चिनी कम्युनिस्ट पक्षाचे एकतृतीयांश सभासद सैनिक होते आणि कित्येक सैन्याधिकारी पक्षाधिकारी बनले. राजकीय आघाडी-वरही मोर्चे बांधले गेले. क्रांतीचा संघटनात्मक पाया तयार होत होता. माओची पत्नी चिअँग छिंग आणि पूर्वीची चिटणीस चेन पो–टा यांनी सांस्कृतिक क्रांतीचे गट तयार केले.

•

माओ नाट्यपूर्ण संधीची वाट पाहात बसला.

पण नाटक रंगण्यासाठी वातावरण तयार व्हावे लागते. तेही थोडेबहुत नाट्यपूर्ण असले तर फारच उत्तम. इकडे वातावरण तयार होत होतेच, आणि ते अक्षरशः नाट्यपूर्ण झाले. वू हान नावाच्या एका लेखकाने 'हुई रुईची बडतर्फी' नावाचे एक नाटक लिहिले आणि

रंगभूमीवरही आणले. नाटकाचा विषय जुना पण प्रस्तुत वातावरणात आगीचा लोळ फेकणारा होता. मिंग दरबारातील हुई रुई नावाच्या एका अधिकाऱ्याच्या अन्याय्य बडतर्फीचा विषय वू हानने रंगविला होता. फंग तेह–हुआय्च्या बडतर्फीशी जुळणारा हा विषय होता. त्याने एका जुन्या जखमेवरची, नीटशी न धरलेली, खपली उडाली ! फंग तेह–हुआय्बद्दल सहानुभूती बाळगणारे लोक पक्षात होते, पण त्याच्या सोव्हिएट संबंधामुळे त्याचा उघड पुरस्कार करणे अशक्य होते. ते कार्य आता एका नाटकाच्या रूपाने होऊ लागले. हे कसे शक्य झाले ? कारण पेकिंगचा महापौर पेंग चेंग याचा वू हानला पाठिंबा होता. त्याने वू हानच्या कृत्यावर सफेती करणारा एक अहवाल तयार केला. पण १६ मे १९६६ रोजी भरलेल्या मध्यवर्ती समितीच्या बैठकीत तो फेटाळण्यात आला.

एवढी सूचना पुरे होती. समाजवादी प्रशिक्षण मोहिमेत तयार झालेल्या विद्यार्थ्यांनी पेकिंग विद्यापीठाच्या प्रमुखावर आघात करणारा फलक २ जून रोजी टांगला ! या सांस्कृतिक क्रांतीत फलकांचे जे युद्ध देशभर सर्वत्र माजले त्यातला हा पहिला फलक ! या फलकांच्या युद्धाला एक खास चिनी अर्थ आहे. चीनमध्ये सार्वजनिक अप्रतिष्ठा ही मरणप्राय गोष्ट मानली जाते. प्रत्यक्ष मरणाचा प्रयोग करण्याऐवजी हा मरणप्राय अप्रतिष्ठेचा मार्ग सांस्कृतिक क्रांतीच्या नेत्यांनी स्वीकारला. चीनच्या सांस्कृतिक संदर्भात अत्यंत परिणामकारक पण तुलनेने सुसंस्कृत असा हा मार्ग होता.

माओ त्यावेळी पेकिंगमध्ये नव्हता. तो तिकडे यांगत्सीमध्ये नाट्यपूर्ण पोहण्याने आपले चैतन्यपूर्ण अस्तित्व प्रत्ययास आणून देत होता. जुलैच्या अखेरीस माओ पेकिंगला परतला. त्याने ५ ऑगस्ट रोजी आपला स्वतःचाच फलक टांगला — त्यावर लिहिले होते, ‘ मध्यवर्ती कचेरीवर मारा करा ! ’ कम्युनिझमच्या उभ्या इतिहासात ही गोष्ट अपूर्व असेल. एका राष्ट्राचा आणि राष्ट्रनियंत्या पक्षाचा नेता केंद्रीय सत्तेवर आघात करण्याचेच आवाहन करीत होता ! क्रांतिकर्तृत्वाच्या दृष्टीने पाहिले तर माओ हा अभिजात लेनिनिस्ट, आणि संघटना हा लेनिनवादाचा प्राण. आता हा सर्वोत्कृष्ट लेनिनिस्ट संघटनेवरच आघात करायला सज्ज झाला. यात जितके नाट्य होते त्याच्या सहस्र पटींनी क्रांतिकारक आशय होता. पक्षाला त्याची दखल घेणे भागच होते. ८ ऑगस्टला मध्यवर्ती समितीची बैठक भरली. तिने सांस्कृतिक क्रांतीवर शिक्कामोर्तब केला आणि तिच्या मार्गदर्शनासाठी सोळा मुद्यांचा एक मसुदा प्रसिद्ध केला.

पण या क्रांतीची प्रकृती आता मर्यादांच्या मसुद्यात घोटाळत राहण्याइतकी मर्यादित राहिली नव्हती. मार्क्सवादाचे सार माओने ‘ बंडखोरी ’ ( टु रिबेल इज राइट ) असे पूर्वीच काढले होते. तिचा अवलंब करण्यासाठी माओने तरुणांना आवाहन केले आणि हजारोंच्या संख्येने तरुण पुढे आले. हेच ते ‘ हुंगवेपिंग ’ ( लाल रक्षक — रेड गार्ड्स ). १८ ऑगस्ट १९६६ ला असंख्य लाल रक्षक पेकिंगच्या विख्यात तिएन आन मेन चौकात जमा झाले. त्यांचे स्वागत स्वतः माओने केले, आणि लाल रक्षकांच्या नेत्यांनी माओच्या दंडाला सांस्कृतिक क्रांतीचा पट्टा बांधला — अशी या लाल रक्षकांच्या निदर्शनांना,

हल्ल्यांना आणि धुमश्चक्रीला नाट्यपूर्ण सुरुवात झाली. या लाल रक्षकांना ' फेरवादी ', ' प्रतिगामी ', ' भांडवली पंथा 'चा स्वीकार करणाऱ्या नेत्यांविरुद्ध आणि कार्यकर्त्यांविरुद्ध कारवाई करण्याची चेतावणी देण्यात आली, आणि लाल रक्षकांचे आक्रमक पवित्रे सर्व देशभर सुरू झाले. त्यांना अर्थात कामगारांची आणि शेतकऱ्यांचीही साथ मिळू लागली. या लाल रक्षकांनी आणि त्यांच्या साथीदारांनी प्रतिगामी नेत्यांविरुद्ध फलक उभारण्याची आणि त्यांच्या केंद्रावर हल्ले करण्याची सर्वत्र मोहिमच उघडली. पेकिंग–शांघायसारख्या शहरांत त्यांना अर्थात विशेष जोर आला, पण इतरत्रही त्यांचे हमले झालेच. थोड्याच काळात लाल रक्षकांची फळी उभारण्याचे तंत्र विरोधकांनीही अवलंबिले आणि लाल रक्षकांचे तांडे एकमेकांविरुद्ध, एकमेकांच्या पुरस्कर्त्यांविरुद्ध, आरोळ्या ठोकीत झगडू लागले. काही ठिकाणी विलक्षण शांतताभंग झाला, क्वचित रक्तपातही झाला. या अशांततेची झळ उत्पादनालाही लागली. कारखाने बंद पडले, खाणी उद्‌ध्वस्त झाल्या. सांस्कृतिक क्रांती असांस्कृतिक बनून हाताबाहेर जाऊ लागली.

अद्यापपावेतो लिन् पिआवचे सैन्य – राजकीय जाणिवेने मुसमुसत असूनही – बाजूला होते, स्तब्ध राहून नुसता दृष्टिक्षेप करीत होते. पण आता हे परस्परविरोधी लाल रक्षक आणि त्यांचा संघर्ष हाताबाहेर जात असल्याचे पाहून सैन्याला पाचारण करण्यात आले, आणि पुष्कळ ठिकाणी लाल सैनिक विरुद्ध लाल रक्षक असे मुकाबले झाले. लिन् पिआवचे सैन्य माओ विचाराने भारण्यात आलेले होते, पण अखेरीस ते सैन्य होते, त्याची प्रथम प्रवृत्ती सुव्यवस्था निर्माण करण्याकडे होती, आणि ' सुव्यवस्थे 'ची प्रकृती स्थिति-स्थापक असते. दुसरे असे की, सैन्यात देखील स्थानिक – प्रादेशिक – भेद होते, त्यांचे आपसात हेवेदावे होते, कांक्षा-महत्त्वाकांक्षा होत्या. माओ विचार ओठावर, प्रादेशिक वगैरे कांक्षा अंतःकरणात, आणि शिस्तबाज प्रवृत्ती हाताखांद्यावर, असे सैन्याचे दर्शन घडू लागले.

अराजकच माजले आहे की काय अशी शंका येण्यासारखी परिस्थिती काही काळ निर्माण झाली. पक्षीय केंद्रावर आणि नेत्यांवर लाल रक्षकांचे आघात, लाल रक्षकांचे परस्परांवर आघात-प्रत्याघात, या सर्वांवर सैन्याची जरब, सैन्याचे परस्परविरोधी पवित्रे, अशी दृश्ये दिसू लागली. या अवस्थेतून व्यवस्था निर्माण करण्यासाठी ' क्रांतिकारक समित्यां 'ची स्थापना होऊ लागली. या समित्यांत लाल रक्षक, सैनिक आणि निष्ठावंत पक्षीय कार्यकर्ते यांचा भरणा होता. कारभाराची सूत्रे या समित्यांकडे जाऊ लागली. कम्युनिस्टांना परमेश्वराप्रमाणे पवित्र असणाऱ्या पक्षसंघटनेवरच प्रहार करण्याचा अपूर्व प्रयोग माओने केला होता, पण माओचे कम्युनिस्ट जीवन संघटनेतून उभे राहिलेले होते. पक्षाची समूळ विघटना होते की काय, अशी धास्ती निर्माण झाल्याबरोबर त्याने ' क्रांतिकारक समित्यां 'ची योजना केली. पक्षाची प्रबळ पुनर्घटना करण्याची ही अर्थात पूर्वतयारी होती.

या वेळेपर्यंत ( म्हणजे आक्टोबर १९६८ पर्यंत ) क्रांतीचा भर ओसरला होता, आणि

तिचे पर्यवसान नवीन पक्षीय शासकीय व्यवस्थेत करण्याच्या दिशेने नेत्यांचे मार्गक्रमण होऊ लागले होते. ज्या हेतूने क्रांतीला सुरुवात करण्यात आली होती तो हेतू बहुतांशी साध्य झाला होता. लिऊ शाव–छी आणि त्याचे साथीदार याचे नाव घेऊन वस्त्रहरण करण्यात आले होते. 'चिनी ख्रुश्चोव्ह', 'चिनी ख्रुश्चोव्ह' तो हाच असे प्रस्थापित करण्यात आले होते. म्हणजे लिऊंचे रशियनांशी संबंध आहेत असे काही सिद्ध झाले असे नव्हे. पण रशियन समाजरचनेचे ते पुरस्कर्ते आहेत. चिनी कम्युनिस्ट क्रांतीचा रथ रशियाच्या मार्गानेच जायला हवा, म्हणून रशियन अर्थव्यवस्थेचे (आणि अर्थात राज्यव्यवस्थेचे) अनुकरण आपण केले पाहिजे अशा प्रबळ मतप्रणालीचे ते नेते आहेत, म्हणजे भांडवली मार्गाचे पुरस्कर्ते आहेत आणि त्यांचे व त्यांच्या साथीदारांचे नेतृत्व नेस्तनाबूद केले पाहिजे, एवढे जनमानसात बिंबविण्यात क्रांती यशस्वी झाली होती. म्हणजे माओची जी वैयक्तिक महत्त्वाकांक्षा होती तिचे आता उन्नयन (सब्लिमेशन) झाले होते. स्टालिननंतर आपल्याकडे हक्काने येणारे जागतिक कम्युनिस्ट चळवळीचे नेतृत्वपद ख्रुश्चोव्हने हिरावून घेतले या माओच्या वैयक्तिक व्यथेचे रूपांतर रशियन कम्युनिस्ट कांक्षांशी स्पर्धा करण्यात झाले आणि या स्पर्धेचे पर्यवसान, रशियन समाजरचना हा मुळी कम्युनिस्ट क्रांतीचाच विश्वासघात आहे आणि लाल चीनने आपला कम्युनिस्ट विकसनाचा मार्ग स्वतंत्र आखला पाहिजे, या सार्वत्रिक साक्षात्कारात झाले. सांस्कृतिक क्रांती ही या साक्षात्काराचे वाहनही होते आणि परिणतीही होती. या साक्षात्काराला रूप देणारी नवीन पक्षसंघटना आणि शासनव्यवस्था निर्माण करणे क्रमप्राप्त होते.

या उद्देशानेच १ एप्रिल १९६९ रोजी ९व्या पक्षीय काँग्रेसची सुरुवात झाली. या काँग्रेसमध्ये लिऊ शाव–छींना पदच्युत करण्यात आले आणि लिन् पिआवला माओचा अधिकृत वारसदार म्हणून पुकारण्यात आले. पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पक्षाची नवीन घटना बांधण्यात आली आणि त्यात एक महत्त्वाची तरतूद करण्यात आली. ही तरतूद अशी की पक्षाच्या कोणत्याही सभासदाला आपल्या नजीकच्या वरच्या आणि क्रमाने त्यावरच्या अधिकाऱ्यांना डावलून थेट अध्यक्षापर्यंत ( म्हणजे माओपर्यंत ) आपले गाऱ्हाणे नेता येईल. नेत्यांच्या डोक्यांवरून थेट माओपर्यंत पोचण्याची ही व्यवस्था अर्थपूर्ण होती. १९५६ मध्ये व्यक्तिस्तोमविरोधाच्या नावाखाली माओविचाराचा खास उल्लेख पक्षीय नियमांतून काढून टाकण्यात आला होता. आपली व्यक्तिप्रस्थापना अशा निर्विवाद रीतीने करून माओने याचा सूड घेतला. माओ-विचाराची प्रस्थापना हा मुळी या सांस्कृतिक क्रांतीचा पायाच होता. आता त्याचे पर्यवसान माओच्या निर्विवाद व्यक्तिप्रभुत्वात झाले.

१९६६–६८ ची सांस्कृतिक क्रांती हा, माओचे महत्त्वाकांक्षी, साहसवादी, नाट्यवेडे व्यक्तित्व; माओच्या महत्वाकांक्षेतून निर्माण झालेला रशियाविरोध; माओचा पृथगात्म ध्येयवाद; आणि माओने मार्क्सवादाचा केलेला सैद्धान्तिक विकास यांचा एकत्रित आवि-

ष्कार होता असे मी म्हटले. सांस्कृतिक क्रांती ही मुळी नाट्यमय प्रसंगांची एक मालिकाच होती. स्वतःच्या सत्तेशीच नव्हे तर प्रसंगी अस्तित्वाशी खेळण्याची साहसवादी वृत्ती तिच्यात होती. रशियाविरोधाचा ध्येयवादी अविष्कार तिच्यात होता. पण फारशी लक्षात न येणारी गोष्ट म्हणजे मार्क्सवादी विचाराच्या सैद्धान्तिक विकासाचा आलेखही तिच्यात होता.

मार्क्सवादाचे चिनीकरण माओने १९२७ सालीच सुरू केले होते. शेतकरीवर्गाला कम्युनिस्ट क्रांतीची कमान बनविण्यात त्याने लेनिनच्या पुढे मोठी मजल मारली होती. पण यात काही मार्क्स–लेनिनवादाची विपरीत ओढाताण नव्हती. ग्रामीण भागातील गुंडांचा क्रांतीसाठी उपयोग करून घ्यायला हवा हा आग्रह थोडा अतिरेकी होता. पण मार्क्सवादी तत्त्वज्ञानातील कॉंट्रॅडिक्शन (विग्रहा) ची जी कल्पना आहे तिच्यावरचे माओचे भाष्य या तत्त्वज्ञानाला मोठी विलक्षण कलाटणी देणारे आहे. मार्क्सच्या तत्वज्ञानातली कॉंट्रॅडिक्शन (विग्रहा) ची कल्पना मुख्यतः सामाजिक आहे. विशिष्ट ऐतिहासिक अवस्थेत समाजात विग्रह निर्माण होतो, आणि विशिष्ट ऐतिहासिक अवस्थेत (संपूर्ण साम्यवादी समाजात) विग्रहाचे विसर्जन होते. पण माओ विग्रहाकडे दुहेरी दृष्टीने पाहत होता. एक विग्रह मानवामानवातला असतो. तर दुसरा मानव आणि निसर्ग यांच्या दरम्यान असतो, आणि तो कधीच नष्ट होणार नाही. मार्क्सवर ग्रीक विचारांचा पगडा होता, आणि ग्रीक संस्कृतीत निसर्गाबद्दल एक आत्मीयता होती. त्याचप्रमाणे मार्क्स अखेरीस निसर्ग आणि मानव यांच्या युतीच्या दृष्टीने पाहतो, आणि म्हणूनच नॅचरलाइज्ड् ह्यूमन (निसर्गित मानव) आणि ह्यूमनाइज्ड् नेचर (मानुषी निसर्ग) असे शब्दप्रयोग तो वापरतो. पण माओ निसर्ग आणि मानव यांच्यात अखंड संघर्षच कल्पितो, आणि ज्या अर्थी हा संघर्ष कायम टिकणार आहे त्या अर्थी समाजातला विग्रहही कधी संपुष्टात येणार नाही असे प्रतिपादितो. याचा अर्थ, कितीही सामाजिक परिवर्तने झाली तरी सामाजिक विग्रहाचे स्वरूप तसेच अक्षत राहील असे तो मानतो असा नव्हे. विग्रहाचे दोन प्रकार त्याने मानले आहेत. एक अॅन्टॅगॉनिस्टिक (अंतिम विरोधात्मक) विग्रह आणि दुसरा नॉन-अॅन्टॅगॉनिस्टिक (अविरोधात्मक) विग्रह. कम्युनिस्ट समाजात अंतिम स्वरूपाचे विरोध मावळतील, पण मिटणारे अविरोधात्मक विग्रह कायम राहतील. या अर्थाने त्याची क्रांती अखंड आहे. निरंतर क्रांतीचा सिद्धान्त निसर्ग–मानवामधील अखंड झगड्याच्या दृष्टीने तो मांडतो. लेनिननेसुद्धा 'अॅन्टॅगॉनिझम' आणि 'कॉंट्रॅडिक्शन' असा फरक केला होता, पण त्याला त्याने असा पक्का तात्त्विक पाया दिला नव्हता. माओने तो दिला याचे कारण मार्क्सवादी तत्त्वज्ञानात काही नेत्रदीपक भर टाकण्याच्या ईर्ष्येने तो प्रेरित झाला होता असे नव्हे. साधारणपणे मार्क्सवादी नेत्यांना अशी प्रेरणा होत असतेच, कारण कम्युनिस्ट चळवळीला प्रचंड तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान मार्क्सने देऊन ठेवले आहे, आणि मार्क्सचे लायक अनुयायी बनण्यासाठी आपणही तत्त्वज्ञानाच्या रिंगणात एक दोन वस्तादी उड्या माराव्या असे मार्क्सवाद्यांना – विशेषतः नेत्यांना वाटते. तसे माओला

फारसे वाटले असावे असे दिसत नाही. त्याने 'ऑन प्रॅक्टिस' आणि 'ऑन काँट्रॅडिक्शन' असे दोन तत्त्वज्ञानात्मक प्रबंध लिहिले ते चळवळीचे नेतृत्व पदरात पडल्यानंतर दहा वर्षांनी. पण ज्या चळवळीला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे तिचा निष्ठावंत अनुयायी जीवनाचा प्रत्यक्ष पराक्रमी वेध घेतो तेव्हा त्याच्या मनातल्या तत्त्वज्ञानाला आपोआप स्फुरण चढते, तसे ते माओच्या तत्त्वज्ञानालाही चढले. क्रांत्युत्तर काळात समाजवादाचा प्रयोग सुरू झाल्यानंतर १९५७ साली 'ऑन दि करेक्ट हँडलिंग ऑव्ह काँट्रॅडिक्शन इन सोसायटी' असे व्याख्यान देऊन 'अँटॅगॉनिस्टिक' आणि 'नॉन-अँटॅगॉनिस्टिक' काँट्रॅडिक्शन असा फरक त्याने केला यावरूनच त्याची तात्त्विक नजर वस्तुस्थितीचा वेध किती घेत होती आणि अनुभवाने ती कशी आंदोळली होती याचा प्रत्यय येतो.

वस्तुस्थितीवरील आत्मिकतेच्या प्रभावाचे जे तत्त्वज्ञान त्याने मांडले आहे ते मात्र मार्क्सवादाच्या पार पलीकडे जाते असे वाटते. 'सब्जेक्टिव' आणि 'ऑब्जेक्टिव्ह' यांमध्ये प्राथम्य (प्रायमसी) कशाला एवढीच गोष्ट महत्त्वाची आहे, कोणता दुसऱ्यावर प्रभुत्व गाजवितो ही नाही, असे माओचे म्हणणे दिसते. विचार ही देखील एक भौतिक शक्ती (मटिरियल फोर्स) आहे असे म्हणून त्याने आपल्या भौतिकतेचा बचाव करण्याचा प्रयत्न केला आहे, पण मार्क्सची दृष्टी अशी अकरणात्मक (निगेटिव) नव्हती. भौतिक शक्ती ही सतत प्रेरक – प्रवर्तक असते असेच तो मानतो. पण ऑब्जेक्टिव्हवर सब्जेक्टिव्हचे प्रभुत्व कल्पून 'नवा मानव' (तोही नवा चिनी मानव) निर्माण करण्याची निश्चिती माओ बोलून दाखवीत होता. त्याच्या साऱ्या 'शैक्षणिक' मोहिमा या श्रद्धेने सुरू झाल्या आणि चालविल्या गेल्या. अशा शैक्षणिक मोहिमांनीच सांस्कृतिक क्रांतीची पूर्वतयारी झाली आणि या क्रांतीतून 'नवा मानव' निर्माण करण्याची निष्ठा व्यक्त झाली. या क्रांतीत माओने जो विग्रहाचा व्यूह मांडला त्यात त्याची 'नॉन-अँटॅगॉनिस्टिक' काँट्रॅडिक्शनची भूमिका पायाभूत नसेल असे नाही. पण या काँट्रॅडिक्शनचे रूपांतर 'अँटॅगॉनिस्टिक' काँट्रॅडिक्शनमध्ये झाले आणि ते सांस्कृतिक क्रांतीबरोबर संपुष्टात आले असेही नाही.

या क्रांतीचे एक पर्यवसान म्हणून ज्या लिन पिआवची माओचा अस्सल वारस म्हणून नियुक्ती झाली त्या लिन पिआवनेच पुढे द्रोह केला, (आता म्हणे माओने १९६६ सालीच आपल्या पत्नीला लिहिलेल्या एका पत्रात लिनबद्दल आशंका व्यक्त केली होती! १९६६ सालीच माओला लिनबद्दल शंका आली होती तर त्याने १९६९ साली त्याला वारस नेमले कसे? आणि लिनचे बंड प्रकट होईपर्यंत दुसऱ्या कोणत्याही क्षणी या शंकेची आवृत्ती कशी निघाली नाही?)

पण लिनच्या नियुक्तीबरोबर सांस्कृतिक क्रांतीचे पर्व संपले असे समजण्याचे कारण नव्हतेच. माओने स्वतःच म्हटले होते की, दर १०–१५ वर्षांनी अशी क्रांती करावी लागेल. प्रत्यक्षात तीन वर्षांच्या आत दुसरी सांस्कृतिक क्रांती सुरू झाली. अखंड क्रांतीचा सिद्धान्त येथेच प्रस्तुत ठरला. माओने आधुनिक औद्योगिक क्रांतीचा मार्ग स्वीकारला; पण या क्रांतीबरोबर जी औद्योगिक नोकरशाही येते, जी विषमता येते, जी खास बोनस वगैरे

आर्थिक प्रचोदनांची (इनसेंटिव्ह) पद्धती येते – थोडक्यात म्हणजे लेनिनच्या भाषेत जो आर्थिकवाद (इकनॉमिझम) येतो – तो कसा टाळायचा ते त्याला कळले नाही. माओच्या भूमिकेत एक आंतर्विरोध आहे. (त्याला उद्योगीकरण हवे पण तज्जन्य विषमता नको.) त्यातून मानव बदलण्याची, ' नवा मानव ' निर्माण करण्याची स्वप्ने त्याने पाहिली.

माओच्या सांस्कृतिक क्रांतीचे कार्यकारी नेतृत्व त्याची पत्नी चिअँग छिंग करीत असे. अखेरच्या कालातील त्याच्या धोरणावर आणि मतांवर तिचा प्रभाव नसेल असे नाही. पण माओ मेल्यानंतर लवकरच तिच्यासकट तिच्या ' चांडाळ चवकडी 'ला अटक झाली, आणि चीनच्या धोरणाने पलटी घेतली. आता तर माओच्या धोरणाला (त्याची काही वचने उद्धृत करूनच) तीलांजली देण्यात येत आहे.

माओच्या वारसदारांनी पक्के ओळखले आहे की, चीनला आधुनिक राष्ट्रांच्या पंक्तीला आणायचे असेल, चीनला जगात प्रभुत्वाचे स्थान प्राप्त करून द्यायचे असेल तर माओच्या या ' प्रतिगामी ' ध्येयवादाचे विसर्जन करून औद्योगिक क्रांतीकडे नेणाऱ्या आधुनिकतेची जोरदार योजना करायला हवी. त्यासाठी व्यावहारिक दृष्टिकोनाचा अवलंब करायला हवा. ' मांजराचा रंग कोणता आहे हा प्रश्न नाही, ते उंदीर पकडतं की नाही खरा प्रश्न आहे ' असे माओला एकदा सांगणाऱ्या डुंग शिआ–पिंगच्या नेतृत्वाखाली चीनने हा इतिहाससिद्ध निष्कर्ष स्वीकारला आहे.

अभिजात कम्युनिस्ट ध्येयवाद आणि औद्योगिक प्रगती यांचा संवाद शक्य नाही हेच या घडामोडीने सिद्ध केले आहे. मार्क्सचे सिद्धान्त औद्योगिक युगात या युगाच्या प्रेरणेनेच स्फुरले असले तरी औद्योगिक युगाची एकंदर धारणा मार्क्सवाद्यांच्या अभिजात ध्येयांना आणि स्वप्नांना पोषक नाही. उद्योगीकरणाने विमुक्त समाज निर्माण होत नाही, तर समाजातील सत्तेचे केंद्रीकरण होते. नोकरशाहीचा पाया पक्का होतो. औद्योगिक नोकरशाही, सरकारी नोकरशाही, लष्करी नोकरशाही आणि राजकीय पक्षीय नोकरशाही यांची अभद्र युती होते आणि अंतिम सत्ता नोकरशहांच्या हातात जाते. राजकीय नेते त्यांच्या हातातली बाहुली बनतात.

माओ हा युगपुरुष आणि युगनिर्माता होता. पण त्याने निर्मिलेले युग अंतर्धान पावत आहे. औद्योगिक युगात तो कालबाह्य ठरत आहे. पण मानवाला उदात्त स्वप्ने पाहण्याची खोड आहे. या मानवाला माओकडून स्फूर्ती मिळेल. माओ प्रचंड राष्ट्राचा नेता बनला. राष्ट्रविधाता बनला. पण आपले व राष्ट्राचे नेतृत्व टिकविण्यासाठी आपल्या ध्येयवादाचे विकृतीकरण करण्याची त्याची तयारी नव्हती. जी स्वप्ने जन्मभर पाहिली ती सत्तेच्या चुडीने भस्मसात करण्याची त्याची तयारी नव्हती. आजच्या जगात – सत्तेच्या उन्मादाच्या आजच्या काळात – आपल्या ध्येयदर्शित्वाला शाबूत राखण्याकरिता अगदी कड्यावरचा धोका पत्करण्यासही माओने मागे पाहिले नाही हे मला त्याच्या व्यक्तित्वाचे वैभव वाटते.

# ३.

# जोसेफ स्टालीन

आपण साधारपणे जन्मदिनाचा रौप्यमहोत्सव करतो. पुण्यतिथ्याही करतो. पण एखाद्या मृत्यूचा रौप्यमहोत्सव साजरा होण्यासाठी तो मृत्यूही तसाच महान असला पाहिजे. मुख्यतः तो मृत्यू सत्य, शिव आणि सुंदर या वैश्विक सत्यांशी कसे तरी साधक वा बाधक नाते जोडणारा असला पाहिजे. असा मृत्यू गेल्या पंचवीस वर्षांत एकच झाला. तो मृत्यू म्हणजे स्टालीनचा मृत्यू. स्टालीन ता. ५ मार्च १९५३ रोजी मृत्यू पावला. तो दिवस सत्य, शिव आणि सुंदर यांच्या उपासकांनी मुक्तिदिन म्हणून साजरा केला. ता. ५ मार्च १९७८ रोजी त्याला २५ वर्षे पुरी झाली. त्या महान मृत्यूचा तो रौप्यमहोत्सव साजरा व्हायला हवा होता, पण झाला नाही. करण्याची कोणाची हिंमत झाली नाही. स्टालीनच्या तुलनेने ही (विकृत) हिंमत कमी पडली. हा दिन रौप्यमहोत्सव दिन म्हणून साजरा करण्याचे कारण असे की स्टालीनची कर्तबगारीच तशी महान होती. त्याने जे काही केले त्याला मानवी इतिहासात तोड नव्हती. 'नवशक्तीत' स्टालीनवर मृत्यूलेख लिहिताना मी त्याचे वर्णन 'हिटलर आणि मॅकिएव्हेली यांचा संयुक्त अवतार' असे केले होते. त्यासाठी येथील काही कम्युनिस्टांनी माझा धिक्कार केला. काही ठिकाणी 'नवशक्ती'च्या प्रती जाळण्यात आल्या. पण पुढे तीन वर्षांच्या आतच खुद्द स्टालीनच्या वारसाने त्याचे विदारक वस्त्रहरण करून स्टालीनचे ओंगळ दर्शन चव्हाट्यावर मांडले. त्याबद्दल बोलताना कै. नाथ पै एकदा मला म्हणाले, 'प्रभाकर, स्टालीनबद्दल त्या भयंकर गोष्टी तू छापीस तेव्हा माझ्यासारख्यालासुद्धा त्या पुरेशा विश्वसनीय वाटत नसत, पण आता ख्रुश्चोव्हने स्टालीनचे जे विदारक दर्शन चव्हाट्यावर मांडले आहे ते त्याहूनही किती तरी महाभयंकर आहे.' वस्तुस्थिती अशी आहे की ख्रुश्चोव्हनेसुद्धा स्टालीनचे वस्त्रहरण करताना कम्युनिस्ट पक्षाची अब्रू राखण्याचा, त्याच्यावर पांघरूण घालण्याचा शक्य तितका प्रयत्न केलाच. खुद्द ख्रुश्चोव्ह हा स्टालीनच्या राजनीतीचाच वारस होता. त्याचे अभद्र, ओंगळ, किळसवाणे

राजकारण अनेक बाबतीत तो पुढे चालवीत होताच. स्टालीनने प्रचलित केलेली अनेक असत्ये त्याला उपकारक वाटत होतीच. मुख्य म्हणजे स्टालीनने बद्धमूल केलेली सर्वंकष अधिकारशाही सैल करण्याचा त्याचा काडीमात्र इरादा नव्हता. जागतिक कम्युनिस्ट चळवळीवर स्टालीनने प्रस्थापित केलेले रशियन प्रभुत्व किंचितही सौम्य करण्याची त्याची तयारी नव्हती. थोडक्यात म्हणजे ती एका व्यक्तीची किंवा एका गटाची दुसऱ्या व्यक्तीविरुद्ध अगर गटाच्या दादाविरुद्ध कौटुंबिक तक्रार होती. तिला तात्त्विक अधिष्ठान काही नव्हते. अर्थात हुकूमशाहीची चालच अशी असते की एक पाऊल जरी चुकीचे पडले तरी सारी चालच बिघडते. याचा अनुभव आपण भारतीयांनी नुकताच घेतलेला आहे. इंदिरा गांधींनी १८ जानेवारी १९७७ रोजी एक चुकीचे पाऊल टाकले. परिणामी त्यांची फरफट जी सुरू झाली तिची अखेर अद्याप दृष्टिपथात येत नाही.

असे स्टालिनने काय केले की त्याच्या मृत्यूचा रौप्यमहोत्सव सत्य–शिव–सुंदरच्या उपासकांनी उत्साहाने साजरा करावा ?

एक नव्हे अनेक गोष्टी केल्या. काहींचा उल्लेख येथे करतो.

प्रथम म्हणजे स्टालीनने कम्युनिझमचे फॅशिझम्‌मध्ये रूपांतर केले. तसे म्हटले तर या रूपांतराची मुळे लेनिनमध्ये, किंबहुना मार्क्समध्येही शोधता येतील. पण एकदोन गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. लेनिन हा मार्क्सप्रमाणे युरोपमधील उदारमतवादी प्रबोधनाचा अपत्य नसला, तो रशियातील झारविरोधी अतिरेकी क्रांतीचा अपत्य असला तरी त्याला अंःतकरण होते. स्टालीनला अंतःकरण नव्हते; फक्त हृदय होते. (ते कितपत शाबूत होते, किंवा योग्य ठिकाणी योग्य रीतीने बसविले होते किंवा काय याची मला माहिती नाही) मार्क्स हा प्रबोधनाचे अपत्य असला तरी या निर्मितीत अनेक गुंतावे होते. एक म्हणजे तो प्रबोधनाचा प्रतिभाशाली विरोधक जो हेगल त्याचा शिष्य होता आणि तोसुद्धा एक प्रकारच्या विरोधभक्तीने रांधलेला शिष्य ! पण इंग्लंडमधल्या दीर्घकालीन वास्तव्याने आणि त्याहीपेक्षा अधिक दीर्घकालीन अभ्यासाने मार्क्समधे काही उदारमतवादी परिवर्तन झाले होते. पण मार्क्स नुसता विद्वान किंवा विद्वत्तेचा पाईक नव्हता. तो एक एकांतिक क्रांतिकारकही होता. मात्र मार्क्सच्या क्रांतिजीवनाची एक गंमत पाहण्यासारखी आहे. हा क्रांतिकारक क्रांतीच्या क्षणी क्रांतीच्या ठिकाणी सहसा उपस्थित नसे. क्रांती होऊन किंवा फसून गेल्यानंतर तो तेथे हजर होई, आणि या उणिवेची भरपाई त्याच्या ज्वलज्जहाल वक्तव्यात व्यक्त होई. त्यामुळे त्याचा विवेक अनेकदा सुटे. मार्क्सवादाला खास रशियन क्रांतिकारक (आततायी) वळण देण्यासाठी लेनिनने मार्क्सच्या या उद्‌गारांचा बहुधा आधार घेतलेला आढळतो.

तेव्हा स्टालीनच्या अपकृत्यांना मार्क्स–लेनिनमध्ये जरूर आधार सापडेल, पण त्याने कम्युनिझमचे जसे परिवर्तन केले तसे लेनिनने खास केले नसते. क्रांतिपूर्वी लेनिनला

स्टालीनबद्दल फार भरवसा वाटे, पण स्टालीनच्या हातात राज्यकारभार आल्यानंतर स्टालीनचे जे कूट दर्शन लेनिनला घडले त्याने त्याला त्याच्या अखेरच्या आजारी अपंग स्थितीतही उबग आला, आणि त्याला कम्युनिस्ट पक्षाच्या सरचिटणीसपदावरून दूर करावा असे आदेश त्याने दिले. (ते अर्थात स्टालीनने दडपून टाकले.) स्टालीनशी वैयक्तिक संबंध तोडून टाकण्याचा निर्धारही त्याने व्यक्त केला. लेनिन मेला, लेनिनच्या ट्रॉट्स्कीप्रभृती सहकाऱ्यांचा काटा काढण्यात स्टालीनला यश आले, आणि स्टालीनने कम्युनिस्ट राजवटीचे आपल्या सर्वंकष हुकूमशाहीत रूपांतर करण्यास सुरुवात केली. त्यात त्याने अफलातून यश मिळविले.

प्रथम म्हणजे कम्युनिझमच्या प्रस्थापनेसाठी अवलंबलेले सर्व मार्ग नैतिक असतात या लेनिनच्या आदेशाचा स्टालीनने राक्षसी गुणाकार केला. उदाहरणार्थ, लेनिनने छळछावण्यांची थोडीबहुत सुरूवात केली (असे सोलझेनित्सिन सांगतो), तर स्टालीनने या छळछावण्यांची (कॉन्सेन्ट्रेशन कॅम्प्सची) अभूतपूर्व आवृत्ती काढली. (हिटलरने फक्त त्याचे अनुकरण केले.) या छावण्यांचे उत्कृष्ट ‘आंखो देखा हाल’ वर्णनच केवळ नव्हे तर स्वानुभवनिष्ठ वर्णन सोलझेनित्सिन याने आपल्या ‘वन डे इन द लाइफ ऑव्ह इव्हॅन डेनिसोव्हिच्’ या कादंबरीत केलेले आहे. विरोधकांची बदनामी करणे, त्यांना जरूर तर ठार मारणे, बेगुमान थापा मारणे, इतिहासाचे पुनर्लेखन करून त्याची विटंबना करणे, सत्य लपविणे, कलेला ‘कुळंबीण’ बनविणे, इत्यादी गोष्टी स्टालीनने सर्रास केल्या. ज्यूविरोधी वर्णविद्वेषाचाही आसरा त्याने घेतला. मार्क्सवादाचे तात्त्विक विकृतीकरण केले. आपल्याला गैरसोयीचे असे मार्क्सवादी लिखाण त्याने दडपून टाकले. बाप विरुद्ध मुलगा, नातेवाईक विरुद्ध नातेवाईक, मित्र विरुद्ध मित्र अशा कृत्रिम कळी लावल्या. स्वतःची स्तुती करणारे ग्रंथ, काव्य, कादंबऱ्या, कलाकृती, चरित्रे, ‘इतिहास’ यांचा बेसुमार फैलावा केला. सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाचा खोटा इतिहास तयार करवून, आणि त्यात स्वहस्ते मजकूर घुसडून, आपल्या अधिकृत चरित्रात स्वतः आत्मस्तुतिपूर्ण दुरुस्त्या करून, खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे करण्यासाठी केवळ पांढऱ्यावर काळे करण्याचे कारखाने खोलले असे नाही, तर पांढऱ्याचे काळे करण्याचे कारखाने खोलले.

इतकेच काय तर खुद्द मार्क्सवादाच्या भ्रष्टीकरणाचा मार्गसुद्धा स्टालीनने चोखाळला. यथेसुद्धा लेनिनकडून मुबलक स्फूर्ती तो घेऊ शकत होता आणि त्याने ती घेतलीही. प्रथम म्हणजे मार्क्सवादी क्रांती ही कामगारांची क्रांती होती आणि ती औद्योगिक दृष्ट्या प्रगत अशा देशातच व्हायची होती. कोणत्याही समाजाची पुढची अवस्था, पहिल्या अवस्थेचा पूर्ण विकास झाल्याशिवाय, या विकासाच्या सर्व शक्यता आत्मसात झाल्याखेरीज, अस्तित्वात येत नसते, असे मार्क्सने स्वच्छ म्हटलेले आहे. म्हणजे भांडवलशाहीचा सर्व तो सारा विकास झाल्याखेरीज पुढची कामगारशाहीची अवस्था अस्तित्वात येत नाही. याचाच अर्थ असा की, तशी ती बळजबरीने अस्तित्वात आणली तर समाजाचे विकृतीकरण होईल. म्हणून मार्क्स क्रांतीची शक्यता, इंग्लंड–अमेरिका–जर्मनीसारख्या औद्योगिक दृष्ट्या प्रगत

अशा राष्ट्रांमध्ये पाहात होता. पण रशियात क्रांती सुरू करण्यासाठी ‘ भांडवलशाही ही एक आंतरराष्ट्रीय साखळी असून क्रांतीची सुरुवात तिचा कच्चा दुवा तोडण्याने होईल, म्हणजे रशियात क्रांती करण्याने होईल,’ असा सिद्धान्त लेनिनने मांडला, आणि ज्याअर्थी औद्योगिक दृष्टया मागास असलेल्या रशियात पुरेसे कामगार नाहीत त्याअर्थी येथील कामगारवर्गाने शेतकऱ्यांशी युती केली पाहिजे असे प्रतिपादिले. एवढेच नाही. मार्क्सचा कामगारवर्गाच्या नेतृत्वावर कटाक्ष होता. कामगारक्रांती म्हणजे कामगारवर्गाची वर्गीय आत्ममुक्ती असा त्याचा सिद्धान्त होता. याच्या उलट लेनिनने, कामगारवर्ग हा स्वतःच्या आर्थिक स्वार्थाकडे पाहू लागतो, (इकॉनॉमिझम्) असे प्रतिपादिले आणि क्रांतीचे नेतृत्व ‘ वर्गमुक्त ’ बनलेल्या मध्यमवर्गीय आजीव क्रांतिकारकांच्या स्वाधीन केले. तरीसुद्धा मार्क्सवादाच्या अनेक वर्षांच्या (एक प्रकारच्या धर्मनिष्ठ) अभ्यासामुळे औद्योगिक दृष्टया प्रगत अशा राष्ट्रांमध्ये (उदा० जर्मनीमध्ये) कामगारक्रांती झाल्याखेरीज रशियन क्रांती स्थिरावणार नाही असेच (ट्रॉट्स्कीप्रमाणे) त्याचे मत होते. ‘ जर्मन क्रांतीसाठी आपण रशियन क्रांतीचा होम करण्यास तयार आहोत ’ असे उद्गार त्याने काढले होते. याच्या उलट स्टालीनने ‘ एकराष्ट्रीय समाजवादा ’ (socialism in one country) चा सिद्धान्त मांडला आणि त्यासाठी, एकंदर लोकशाही मार्गाचाच नव्हे तर पक्षांतर्गत लोकशाहीचा बळी दिला. त्याने सारी सत्ता स्वतःच्या हातात गोळा केली आणि ती राबविण्याची सूत्रे आपल्या काही निवडक (आपल्यासारख्याच क्रूर आणि हलकट ) बगलबच्चांच्या हातात दिली. समाजवाद याचा अर्थ त्याने खरोखर उद्योगीकरण असा केला, आणि उद्योगीकरणासाठी हवे असलेले कामगार आणि या कामगारांच्या पोटास जाळण्यासाठी अन्न यांचा पुरवठा करण्यासाठी त्याने पन्नास लाखांहून अधिक शेतकऱ्यांची छळवादाने आणि उपासमारीने हत्त्या केली.

‘ एकराष्ट्रीय समाजवादा ’चा खरा अर्थ असा होता की, स्टालीनने मूलतः आंतरराष्ट्रीय असलेल्या मार्क्सवादाचे रूपांतर राष्ट्रवादात, आणि तेसुद्धा रशियन राष्ट्रवादात केले. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट आंदोलनाचे केंद्र आणि मुख्य आधार सोव्हिएट रशिया आहे असा सिद्धान्त त्याने मांडला, आणि रशियाच्या हितासाठी झगडणे हे त्याने आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचे मुख्य कर्तव्य आणि उद्दिष्ट ठरविले. प्रत्येक राष्ट्रातला कम्युनिस्ट पक्ष हा रशियाची भडवेगिरी करू लागला. ही अस्सल भडवेगिरी होती, कारण हे सारे पक्ष (म्हणजे मुख्यतः त्यांचे पुढारी) रशियन मलिद्यावर चरत होते. सारे कम्युनिस्ट पक्ष रशियाचे गुलाम झाले. रशियन हितासाठी आपल्या राष्ट्राच्या हिताचा बळी देणे हे आपले ‘ धर्मकार्य ’ मानू लागले. रशियाचे हित म्हणजे खरोखर स्टालीनचे हित. स्टालीनच्या शत्रूंचा काटा काढण्यासाठी झटणे हे त्यांना आपले क्रांतिकारक कर्तव्य वाटू लागले. दूर मेक्सिकोत ट्रॉट्स्कीचा डोक्यात हातोडा घालून खून हे या कर्तव्यपूर्तीचेच एक प्रचंड उदाहरण होते, पण असे असंख्य छोटे ‘ ट्रॉट्स्की ’ देशोदेशीच्या कम्युनिस्टांनी ठार केले. अशा रीतीने स्टालीनने आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचे रशियन

राष्ट्रवादात रूपांतर केले. कामगारवर्गाच्या आंतरराष्ट्रीय क्रांतिगीताच्या – इंटरनॅशनलच्या – ठिकाणी स्टालीनने जे रशियन राष्ट्रगीत प्रस्थापित केले होते ते या राष्ट्रीयीकरणाचे बिनतोड उदाहरण होते. पण आंतरराष्ट्रीय दृष्टया भयानक असे उदाहरण निराळेच होते. ' लोकसत्ताक समाजवादी ' हेसुद्धा राष्ट्रवादीच होते, पण ते लोकसत्तावादी होते व म्हणून त्यांचा हुकूमशाहीवादी आणि रशियावादी कम्युनिस्टांना विरोध होता. स्टालीनने, जर्मनीच्या १९३२ च्या निवडणुकीत, जर्मन कम्युनिस्टांना सोशल डेमोक्रॅट्स (लोकसत्तावादी समाजवाद्यां)विरुद्ध हिटलरला मत देण्यास सांगितले. रशियाची आणि स्टालीनची भडवेगिरी करण्यास सोकावलेल्या जर्मन कम्युनिस्टांनी स्टालीनची आज्ञा शंभर टक्के पाळली आणि हिटलरला जर्मनीचा चॅन्सेलर म्हणून निवडून आणले. अशा रीतीने हिटलरशाही हे स्टालीनचे – खास त्याचे – एक अनौरस अपत्य होते, आणि या आपल्या अपत्याविषयी त्याच्या पोटात प्रेम होते हे त्याने हिटलरशी, १९३९ साली, करार करून सिद्ध केले. हा करार म्हणजे कम्युनिस्टांच्या आंतरराष्ट्रीय निःसंगपणाचा नमुना होता.

उभ्या आंतरराष्ट्रीय चळवळीला स्टालीनने भाडोत्री भडवेगिरी शिकविली ही त्याची नेत्रदीपक करामत होती यात शंकाच नाही. ठिकठिकाणी त्याने स्वतंत्र कम्युनिस्ट पक्षांचा आणि नेत्यांचा निकाल लावला, आणि खास लाचार पुढाऱ्यांना नेतृत्व प्राप्त करून दिले – म्हणजे भल्याबुऱ्या मार्गांनी त्यांचे पक्षावर प्रभुत्व प्रस्थापित होईल अशी व्यवस्था केली. थोडक्यात म्हणजे निरनिराळ्या राष्ट्रांत त्याने लाल ' गोलायटर्स ' (हिटलरचे असत तसे) निर्माण केले. हिटलर जर्मन वंशाच्या प्रभुत्वाचाच मंत्र म्हणत असल्यामुळे त्याच्या या कर्तृत्वाला मर्यादा असत. पण स्टालीन हा कामगारक्रांती आणि मानवमुक्ती या भाषेत बोलत असल्यामुळे उभ्या आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीला कम्युनिस्ट भडवेगिरीचे स्वरूप त्याने आणले. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचा आद्य आधार आणि प्रधान केंद्र रशिया हेच आहे, हा आंतरराष्ट्रीयवादाच्या एका प्रचंड विकृतीकरणावर आधारलेला सिद्धान्त, आंतरराष्ट्रीय कामगारक्रांती आणि समग्र मानवमुक्ती या मंत्रावर उभारू शकल्यामुळे तो हे करू शकला, थोडक्यात म्हणजे त्याने एक आंतरराष्ट्रीय फॅसिस्टवाद उभारला.

थोडक्यात म्हणजे त्याने कम्युनिझमच्या नावाने एक सर्वंकषशाही (**totalitarianism**) निर्माण केली. या सर्वंकषशाहीची सूत्रे सोपी होती. पक्ष म्हणजेच राष्ट्र. पक्ष म्हणजेच पुढारी. राष्ट्र म्हणजेच जग. जग म्हणजेच कम्युनिस्ट जग. कम्युनिस्ट जग म्हणजे सोव्हिएट रशियाचा अमर नेता स्टालीन ! ' डिक्टेटरशिप ऑव्ह द प्रॉलेटेरिएट ' या मार्क्सच्या घोषणेत या सर्वंकषशाहीला स्टालीनला हवा तो आधार होता. तो त्याच्याकडे लेनिनकडून वारसाहक्काने आलेला होता. पण या ' डिक्टेटरशिप 'ची मार्क्सची कल्पना किती तरी उदारमतवादी होती. कामगारवर्गाच्या हितात सर्व लोकांचे हित सामावलेले आहे. कारण कामगारवर्गाचा विकसित दृष्टिकोण इतका व्यापक असणार आहे अशी मार्क्सची कल्पना होती म्हणून तर १८७२ साली ॲम्स्टर्डाम येथे बोलताना इंग्लंड–अमेरिकेसारख्या

देशात कामगार-क्रांती शांततेने होईल असे उद्‌गार त्याने काढले होते. कामगारशाही म्हणजे लोकशाहीचेच एक विकसित रूप अशी त्याची श्रद्धा होती. पण स्टालीनने तिचे रूपांतर लोकशाहीचा गळा समूळ घोटणाऱ्या स्वतःच्या सर्वंकष हुकूमशाहीत केले.

स्टालीन हा क्रूरकर्मा नरराक्षस होता. त्याने लाखो लोक जिवे मारले. लाखोंना छळ-छावण्यात डांबले. पक्षातील सहकाऱ्यांचा निर्घृणपणे काटा काढला. ‘सूडाची योजना आखायची, तिच्या अंमलबजावणीची व्यवस्था करायची आणि तिची संधी येईपर्यंत शांत चित्ताने आणि निश्चयाने वाट पाहात दबा धरून राह्यचे’ हा आपला छंद असल्याचे त्याने एकदा बोलून दाखविल्याचे मी वाचले होते. पण स्टालीनच्या या उद्योगाचा काही तपशील सांगितल्याशिवाय त्याची नीटशी कल्पना येणार नाही.

रशियातील भयंकर शिर्काणात स्टालीनने खालील लोकांचा निकाल लावला—

—लेनिनच्या पोलिटब्यूरोचे (स्वतःखेरीज व नंतर मेक्सिकोत घातपाताने मारलेल्या ट्रॉट्स्कीखेरीज) सर्व सभासद.

—सैन्यप्रमुख (द चीफ ऑफ् जनरल स्टाफ), सैन्याचा राजकीय प्रमुख आणि बहुतेक महत्त्वाच्या विभागांचे लष्करी प्रमुख.

—सोव्हिएट रशियाचे ९० टक्के राजदूत.

—निदान २५ टक्के लष्करी अधिकारी.

—१९३४ साली स्वतः स्टालीनच्या यंत्रणेने निवडलेल्या सतराव्या सोव्हिएट कम्युनिस्ट काँग्रेसच्या १९६६ प्रतिनिधींपैकी ११०८ प्रतिनिधी.

—१७ व्या काँग्रेसने निवडलेल्या मध्यवर्ती समितीच्या १३९ सभासदांपैकी ९८ सभासद.

—ज्या दोघा गुप्त पोलिसप्रमुखांनी स्टालीनच्या विरोधकांचा काटा काढण्यासाठी खोटा पुरावा निर्माण केला ते यागोडा आणि येझोव्ह—कारण ‘त्यांना बरेच काही माहीत होते.’

—ज्या किरोव्हच्या खूनामुळे शिर्काण—युगाची नांदी म्हटली गेली तो खून स्टालीननेच घडवून आणला होता.

—मॅक्झिम गोर्की या प्रसिद्ध लेखकाचा खूनही स्टालीननेच घडवून आणला.

—स्टालीनची क्रूरकर्मे सहन न झाल्यामुळे खुद्द त्याच्या बायकोने (आपल्या आईने) आत्महत्या केली असे स्वेटलाना सांगते.

—युद्धकालात स्टालीनने जमातीच्या जमाती (उदा० चेचिन व इंगुअश जमाती, बाल्काव व काराचाई जमाती) त्यांच्या परंपरागत भूमितून उखडल्या आणि देशोधडीस लावल्या.

—महायुद्धानंतर व्होझनेसेन्स्की (प्रमुख आर्थिक योजनाकार) सारखे काही उच्चपदस्थ सहकारी.

—आणि अखेरीस स्टालीनच्या मृत्यूमुळेच केवळ वाचलेले नऊ प्रमुख डॉक्टर्स—

त्यांच्यावर कटाचा आरोप.

—त्याच प्रमाणे इतर असंख्य ज्यू.

स्टालीनने लेखक, विद्वान, प्राध्यापक, वैज्ञानिक इत्यादिकांचा छळवाद मांडला. त्याचा आणखी आणि स्वतंत्र उल्लेख करायला हवा. त्याच्या हातात सत्ता आल्याबरोबर त्याने वाङ्मयाची अशी अवस्था करून सोडली की त्या सबंध कालखंडाचे वर्णन मॅक्स ईस्टमनने 'कवींच्या आत्महत्त्या आणि गद्य लेखकांचे मौन यांनी गाजलेला कालखंड' असे केले आहे. मायकोव्हस्की—इसेनिनसारख्या कवींनी आत्महत्त्या केली. असंख्य लेखकांना छळछावण्यांत खितपत पडावे लागले. आयझॅक बॅबेलसारख्या लेखकांनी लेखणीला विराम दिला. पण लेखकांना गप्प राहण्याचेही स्वातंत्र्य नव्हते. आपण लिहीत का नाही याचा खुलासा त्यांना करावा लागे. त्यामुळे खुषमस्कऱ्या लेखकांचे पेव फुटले आणि बोरीस पॅस्टरनाकसारख्या प्रतिभाशाली लेखकाने स्वतंत्र लेखन सोडून देऊन शेक्स्पीअरची भाषांतरे करण्याचा मार्ग स्वीकारला. (तो एक फायदाच) त्या मानाचे वैज्ञानिकांना थोडे स्वातंत्र्य असे. विरोधविकासवाद या तत्त्वज्ञानाच्या नंदीला स्पर्श केला की त्यांना आपले संशोधन करण्यास तुलनेने बरेच स्वातंत्र्य असे. कारण त्यांच्या संशोधनाची स्टालीनच्या कार्यक्रमास गरज होती. पण येथेही स्टालीनची विकृत बुद्धी काम करती झालीच. स्टालीनच्या राजवटीत लायसेन्कोसारख्या 'तोतया' प्राणिशास्त्रज्ञाचे अमाप फावले. अर्जित गुण (acquired qualities) वंशपरंपरेने वारसात उतरत नाहीत असा प्राणिशास्त्राचा एक प्रस्थापित सिद्धान्त आहे. त्याला नकार देऊन भरपूर आणि संस्कारित पीक काढण्याची एक योजना लायसेन्कोने स्टालीनपुढे मांडली आणि तिच्यापुढे स्टालीन लट्टू झाला. परिणामी लायसेन्को अधिकृत प्राणिशास्त्रज्ञ बनला आणि त्याच्या विरोधकांचे (खरोखर लायक प्राणि) शास्त्रज्ञांचे शिर्काण झाले. (काही छळछावण्यात गेले) लायसेन्कोमुळे रशियन प्राणिशास्त्राची निदान २५ वर्षांनी पिछेहाट झाली.

मार्क्सवादाच्या भ्रष्टीकरणाची कमाल म्हणजे स्टालीनने त्याचे साम्राज्यवादात केलेले रूपांतर. दुसऱ्या महायुद्धानंतर त्याने पूर्व यूरोपचे एक साम्राज्य बनविले. या राष्ट्रांवर लाल सैन्याची घट्ट पकड बसविली. त्यांचे राजकीय स्वातंत्र्य तर काय पण पक्षीय स्वातंत्र्यही संपुष्टात आणले. प्रत्येक पूर्व युरोपीय राष्ट्राच्या कम्युनिस्ट पक्षात आपल्या बगलबच्च्यांचे अधिराज्य आपल्या कुटिल नीतीच्या आणि लाल सैन्याच्या संगिनींच्या जोरावर त्याने प्रस्थापित केले. त्यांचे आर्थिक जीवन (जसे भारताचे आर्थिक जीवन ब्रिटिश साम्राज्यशाहीने ब्रिटनच्या वेठीस धरले होते तसे) सोव्हिएट रशियाच्या वेठीस धरले. परिणामी ही राष्ट्रे म्हणजे सोव्हिएट रशियाचे 'पाणक्ये आणि लाकूडतोडये' झाले.

मौज अशी की स्टालीनने आपल्या साम्राज्यशाहीचे एक ‘ साम्राज्यवादी ’ तत्त्वज्ञान बनविले. ज्याप्रमाणे पूर्वीच्या ब्रिटन वगैरे राष्ट्रांनी जर्मनीच्या साम्राज्याची अभिलाषा धरून जर्मनीवर, ते लोकशाहीविरोधी आहे वगैरे नैतिक हल्ले करून अखेरीस त्याचे रूपांतर पहिल्या महायुद्धातील सशस्त्र हल्ल्यात केले त्याप्रमाणे स्टालीनने पाश्चात्त्य लोकशाही राष्ट्रांना साम्राज्यवादी संबोधून स्वतःला मुक्तीचे मक्तेदार बनविले. या त्याच्या मतलबी मुक्ताफळांनी, त्याचे गुलाम बनलेल्या कम्युनिस्टांनी हुरळून जावे हे ठीक होते, पण नेहरूंसारख्या उदारमतवादाचे टॉनिक सेविलेल्या व्यक्तीनेही फसावे हे आश्चर्य होते. इतके होऊनही स्टालीनचा विश्वास नेहरू कमावू शकले नव्हतेच. ‘ हिंदुस्थान हे गुलाम राष्ट्र आहे आणि नेहरू हे ब्रिटिश साम्राज्यशाहीचे लाळघोटे श्वान आहे ’ असा त्यांना अहेर, स्टालीनच्या चिथावणीने, कम्युनिस्टांनी सारखा केला. पण अमेरिकेचे धोरण इतके कल्पनाशून्य होते की त्याने नेहरूंना जवळ जवळ रशियाच्या गोटात लोटले. त्यांनी कोरियात सोव्हिएट साम्राज्यवादाच्या बाजूनेच चार पावले टाकली व त्यानंतरच स्टालीनचा विश्वास नेहरूंना लाभला. या साऱ्या भानगडीत नेहरूंनी स्वातंत्र्याच्या लढ्यात पूर्ण बदनाम झालेल्या भारतीय कम्युनिस्टांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आणि ती भारताला अद्याप नडत आहे.

ते असो. पण स्टालीनने मार्क्सवाद आणि कम्युनिस्ट यांचे इतके भ्रष्टीकरण केले की देशोदेशीचे कम्युनिस्ट त्याच्या साम्राज्यवादी पवित्र्यांबरोबर आनंदाने पदक्षेप करू लागले. ठिकठिकाणचे कम्युनिस्ट (उदा० भारत, ग्रीस, तुर्कस्तान) आपल्याच स्वातंत्र्यवादी सरकारविरुद्ध बंड करून उठले. अर्थात लाचारांचे सत्त्व नेहमी कमअस्सलच असते. त्यामुळे हे उठाव बहुतेक फुकट गेले. ज्या चीन, व्हिएटनामसारख्या राष्ट्रांतील कम्युनिस्टांनी विजय मिळविले ते स्टालीनचे लाचार अनुयायी नव्हतेच. पण स्टालीनचे धोरण इतके भ्रष्ट होते की त्याचे एके काळचे काही एकनिष्ठ अनुयायीही बिथरले. याचे अतिशय ऊर्जस्वल उदाहरण म्हणजे युगोस्लाव्हियाचा मार्शल टिटो. ‘ आपण नुसती एक करांगुली उचलण्याचा अवकाश की टिटो खलास होईल ’ असे उद्दाम उद्गार मुजोर स्टालीनने काढले. ते काढण्यास त्याला अर्थात आधार होता. कारण तसा त्याचा स्वदेशातला अनुभवच होता. जागतिक कम्युनिस्ट चळवळीचाही तसाच अनुभव होता. त्याच्या तर्जनीच्या एका फेऱ्याबरोबर मोठमोठ्या मातबरांची नशिबे फिरत असत. पण टिटो वेगळ्या सत्त्वाचा निघाला. त्याने युगोस्लाव्हियात बंड यशस्वी केले, आणि त्याचबरोबर मार्क्सवादाचेही बरेचसे शुद्धीकरण केले. टिटोचे बंड याचमुळे ऐतिहासिक महत्त्वाचे ठरले. आज युरोपात मार्क्सवादाच्या पुनर्मूल्यनाचे पीक फोफावले आहे. त्याचे मूळ बियाणे युगोस्लाव्हियात पैदा झाले.

पण स्टालीनची मार्क्सवादी मग्रुरी इतकी विलक्षण होती की न पेलणारी साहसेही त्याने केली. उदाहरणार्थ, मार्क्सवादाचे सैद्धान्तिक पुनर्लेखनाचेही काही प्रयोग त्याने केले. त्या पाण्यात खोल जाण्याचे मी ग्रंथे टाळतो, पण एका हास्यास्पद गोष्टीचा उल्लेख

केल्याखेरीज राहावत नाही. उदाहरणार्थ, विरोधविकासवादाचा आधार घेऊन स्टालीन-वाद्यांनी त्याच्या सर्वंकष हुकूमशाहीचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. विरोधविकास सांगतो की प्रत्येक गोष्ट विकासाच्या ओघात आपल्या विरोधी प्रकृतीचे स्वरूप धारण करते. उदहरणार्थ, पाण्याचे बर्फ होते. त्याचप्रमाणे आजच्या सर्वंकष हुकूमशाहीचे उद्या सर्वंकष स्वातंत्र्यात रूपांतर होणार आहे, म्हणून आजच्या हुकूमशाहीचे समर्थन करा, असा आदेश स्टालीनवाद्यांनी ठिकठिकाणी दिला.

स्टालीनच्या अजब धाष्टर्याचे आणखी एक उदाहरण म्हणजे चीनचे स्वतंत्र कम्युनिस्ट राष्ट्रांत रूपांतर होऊ नये अशी स्टालीनची इच्छा होती. म्हणून १९४९ च्या चिनी यादवी युद्धात स्टालीनची सहानुभूती माओचा प्रतिस्पर्धी चँग कै-शेक याच्या बाजूने राहिली. (चँग कै-शेकच्या दरबारी असलेला स्टालीनचा वकील त्या सरकारच्या पुळपुटया सरकारबरोबर स्थलांतर करी, पण चँग-कै-शेकची साथ सोडून माओला मिळण्याची हिंमत त्याला कधी झाली नाही. अखेरीस चँग चीन सोडून तैवानला पळाला तेव्हा तो चँगबरोबर पळाला नाही, मग रशियाने कम्युनिस्ट चीनला मान्यता दिली, एवढीच स्टालीनची बहादुरी म्हणायची!)

प्रश्न एवढाच की स्टालीनसारखी अद्‌भुत गोष्ट कम्युनिस्ट जगात निर्माण झालीच कशी ? याचे उत्तर देताना सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीने असे स्पष्टी-करण दिले की हा सारा 'व्यक्तिस्तोमा'चा (द कल्ट ऑव्ह पर्सनॅलिटी) परिणाम. पण मार्क्सवाद हा सोव्हिएट रशियाचा आणि कम्युनिस्ट जगताचा धर्म आहे. मार्क्सवादात व्यक्तिस्तोमाला अजिबात मज्जाव आहे. जे काही घडते ते सामाजिक परिस्थितीमुळे असा मार्क्सवादाचा ठाम सिद्धान्त आहे. महान व्यक्ती परिस्थिती निर्माण करीत नाही, तर परिस्थिती महान व्यक्ती निर्माण करते, असे मार्क्सवाद कोकलून सांगतो. तेव्हा हे व्यक्तिस्तोम मार्क्सवादी रशियात माजलेच कसे, आणि माजले तर माजले, त्याने दैवत म्हणून स्टालीनची निवड कशी केली हा खरोखर प्रश्न आहे.

सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाच्या विसाव्या काँग्रेसमध्ये (फेब्रुवारी १९५६) ख्रुश्चोव्हने स्टालीनचे वस्त्रहरण केले आणि त्याच्या भाषणाचा वृत्तांत, अनधिकृतपणे, अमेरिकेत प्रसिद्ध झाला. त्याचा इन्कार करण्याची विलक्षण अनिच्छा रशियन नेत्यांनी दाखविली तेव्हा अनेक कम्युनिस्ट सहप्रवासी थक्क झाले. त्यांची बुद्धी दुःख आणि आश्चर्य यांच्या एका विलक्षण मिश्रणाने चिडल्यासारखी झाली. यात इटालियन कम्युनिस्ट पक्षाचा नेता तॉलिअत्ती, अमेरिकन लेखक हॉवर्ड फास्ट आणि भारतीय पत्रकार श्यामलाल ('अदिब') यांचा समावेश होता. सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाने व्यक्तिस्तोमावर सारे टेपरण ठेवले तेव्हा तॉलिअत्ती म्हणाला, 'खरा प्रश्न हा आहे की सोव्हिएट समाज लोकसत्ताक मार्गा-पासून चळलाच कसा ?' 'अदिब'नी विचारले. 'हे सारे एकटी व्यक्ती करू शकेल

काय ? सोव्हिएट समाजरचनेत काहीच दोष नव्हता काय ?' ते आणखी म्हणाले की, 'व्यक्तिस्तोमाचे स्पष्टीकरण ही धूळफेक आहे.'

खरी स्थिती अशी आहे की कम्युनिस्ट पद्धतीच स्टालीनसारखे नरराक्षस आणि त्याचे अत्याचार यांच्या उगमांचा आधार आहे. स्टालीन हा अतिशय कर्तबगार माणूस होता यात शंकाच नाही, पण ही कर्तबगारी खलपुरुषाची होती. हुकूमशाहीत नायकाला वाव नसतोच, खलनायकाला फक्त असतो. (आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींची चांडाळ चौकडी कशी निर्माण झाली ?) ज्या समाजात व्यक्तिस्वातंत्र्यादी स्वातंत्र्यांना मूठमाती देण्यात येते त्याची उद्दिष्टे कितीही उदात्त असली तरी त्यातून स्टालीन आणि त्याची राक्षसी राजवट यांचीच निर्मिती व्हायची.

स्टालीन, हिटलर, इंदिरा गांधी वगैरे प्रकृतीच्या व्यक्तींबद्दल आदर आणि सहानुभूती बाळगणारे लोक प्रत्येक समाजात असतात. मानव हा परमेश्वरही नव्हे आणि पशूही नव्हे – उदात्तता आणि अधमता यांचे निरनिराळ्या प्रमाणातील मिश्रणाची ती एक किमया असते. तेव्हा अशा नरराक्षसांचे कौतुक करणारे, त्यांच्याबद्दल प्रेमादर बाळगणारे लोक निर्माण व्हावे यात काही आश्चर्य नाही. अशा लोकांत अनेक प्रकारच्या व्यक्तींचा विस्मयकारक समावेश आढळतो. यांतच सी. पी. स्नो हे ब्रिटिश वैज्ञानिक व कादंबरीकार आहेत. ऐझाक डॉयश्चर सारखे ट्रॉट्स्कीवादीही आहेत. 'लाकडी नांगराच्या युगातून स्टालीनने रशियाला अणुयुगात नेऊन बसविले' याचे विलक्षण कौतुक या लोकांना वाटते, आणि मग स्टालीनबद्दल आदराचे चमत्कारिक दुग्धप्रवाह त्यांच्या अंतःकरणात वाहायला लागतात. पण मग स्टालीनच्या राक्षसी कृत्याचे स्पष्टीकरण कसे द्यायचे ? मग ही मंडळी मानसशास्त्रीय शोधात शिरतात आणि चमत्कारिक युक्तिवाद सुरू करतात. स्टालीन हा मोठा ध्येयवादी कर्तबगार पुरुष होता, पण त्याला मधूनमधून मानसिक आजार उद्‌भवे, असे स्नो सांगतात. असे होते तर युद्धाच्या चार वर्षांत स्टालीनचे बरेचसे विवेकशाली दर्शन कसे घडले ? स्टालीनची कन्या स्वेटलाना हिने या मानसिक आजाराच्या बयाणात काही तथ्य नसल्याचे कौटुंबिक स्वानुभवाच्या आधारावर सांगितले आहे. तिने आपल्या 'ओन्ली वन इयर' या पुस्तकात असे, अनेक उदाहरणांनी, दाखवून दिले आहे की स्टालीन हा बुद्धी शाबूत असलेला पुरुष होता, त्याला मानसिक आजार वगैरे काही जडलेला नव्हता. तो प्रत्येक वेळी विचारपूर्वक, बुद्धिपुरस्सर आणि व्यवस्थित हिशेबाने वागत असे. वस्तुस्थिती अशी आहे की तो जात्याच क्रूर, कपटी, दुष्ट, संशयखोर आणि महत्त्वाकांक्षी होता. हा त्याचा स्वभाव घट्ट कसा बनला याचीही तपशीलवार संगती स्वेटलानाने लावून दाखविली आहे. त्याचे दरिद्री बालपण, ख्रिश्चन सेमिनरीमधले त्याचे करडे आणि कोरडे शिक्षण, कम्युनिस्ट पक्षातील त्याचे कष्टमय कटकारस्थानावर आधारलेले कार्य, लेनिनने त्याचे केलेले अवास्तव कौतुक, झारच्या पोलिसांनी

केलेला त्याचा छळवाद, झारच्या गुप्त पोलिसांनी केलेली बोल्शेव्हिकांची सपशेल फसवणूक, रशियाबाहेरील जीवनाबद्दल अज्ञान, आणि एकंदरीत सत्प्रवृत्ती आणि सदाचार यांच्या संस्कारांचा विकृत अभाव या साऱ्यांचे, मूळच्या लोभी, क्रूर, कपटी, दुष्ट, संशयखोर आणि सावध प्रकृतीशी जे रसायन जमले त्याला सोव्हिएट समाजपद्धती आणि राज्यकारभारपद्धती यात भरपूर अवसर मिळाला. आणि एकदा हातात सत्ता आल्याबरोबर त्याने विरोधकांचा पद्धतशीर नायनाट आणि स्वतःचा पद्धतशीर पुरस्कार केला आणि करविला – असे स्वेटलानाचे मोठे मार्मिक विवेचन आहे.

म्हणून स्टालीनचा निषेध आणि कम्युनिस्ट तत्त्वज्ञान आणि पद्धती यांचा पुरस्कार यात काही अर्थ नाही. ती एक कुटील प्रकृतीची फसवणूक आहे. (त्यात स्वतःची फसवणूकही पुष्कळदा अंतर्भूत असते.) स्टालीनचे वारसदार हे स्टालीनचेच निरनिराळ्या पातळ्यांवरील अवतार आहेत. त्यांनी व्यक्तिस्तोमास रजा देऊन सामुदायिक नेतृत्वाची उभारणी केली. पण हे नेतृत्व स्टालीनचीच धोरणे चालवीत असते. उदाहरणार्थ, या नेतृत्वाची पूर्व युरोपवरील साम्राज्यवादी पकड सैल करण्याची तयारी नाही. चेकोस्लोव्हाकियाचा उदार मार्क्सवाद त्याने लाल सैन्याच्या जोरावर निर्दयपणे मोडून काढलाच. राजकीय मतभेदाबद्दल (केवळ तात्त्विक मतभेदाबद्दल) मोठमोठ्या वैज्ञानिकांना आणि लेखकांना आणि विचारवंतांना वेड्याच्या इस्पितळात डांबण्याचे क्रूर किळसवाणे कृत्य रशियात सर्रास चालते. त्याचप्रमाणे देश सोडू पहाणाऱ्या ज्यूंचा छळ मांडण्यात येतो. पूर्व युरोपीय राष्ट्राला (कोणत्याच समाजवादी राष्ट्राला) स्वातंत्र्य नाही हा निर्लज्ज सिद्धान्त देखील ब्रेझनेव्हने मांडला. आता युरोपीय कम्युनिस्ट वेगळे आवाज काढतात आणि लाल चीनने तर उभा दावाच मांडला, पण त्या सोव्हिएट नेतृत्वाच्या हातातल्या गोष्टी नव्हत्या. शेवटी या सामुदायिक नेतृत्वातूनसुद्धा ब्रेझनेवचे वर्चस्व निर्माण झाले, यावरून कम्युनिस्ट तत्त्वज्ञान आणि कम्युनिस्ट पद्धती यातूनच स्टालीनवादाला खतपाणी मिळते हे निर्विवाद सिद्ध होते.

४.

# लिऑं ट्रॉट्स्की

**अलीकडेच प्रसिद्ध** झालेल्या आपल्या आत्मचरित्रात आपल्या पक्षाने स्टालीनच्या आज्ञेने ट्रॉट्स्कीचा खून करविला अशी जी कबुली मेक्सिकन कम्युनिस्ट पक्षाच्या प्रमुखाने दिली तिच्या प्रकाशात हा मृत्यूलेख महत्त्वाचा वाटेल –

रशियन राज्यक्रांतीचा प्रणेता म्हणून लेनिनचे श्रेष्ठत्व निखालस निरपवाद मानले तरी इतिहासात ट्रॉट्स्कीचेच नाव अधिक क्षेत्रात आणि अधिक विविधतेने चमकत राहील एवढे कबूल केलेच पाहिजे. याचे कारण अगदी साधे आणि स्पष्ट आहे. ट्रॉट्स्कीची प्रतिभा, लेनिनच्या मानाने, अधिक तेजस्वी होती. तिची भरारी जशी अधिक उंच आणि अधिक नेत्रदीपक होती तसे तिचे उड्डाण देखील अधिक प्रांतांवरून होई. सोव्हिएट रशियाचे पहिले शिक्षणमंत्री कॉ. ल्युनाचार्स्की यांनी तर स्वच्छच म्हटले होते की, लेनिनच्या मानाने ट्रॉट्स्कीची प्रतिभा अधिक तेजस्वी, अधिक निरभ्र आणि चैतन्यपूर्ण आहे.

ट्रॉट्स्कीचे श्रेष्ठत्व असे झगझगीत असूनही थोरपणात तो लेनिनच्या अगदी जवळपास बसतो हे कबूल करण्यास सर्वसाधारण मनुष्यास थोडेबहुत कष्टच पडतात. याचे कारण शोधण्यासाठी फार खोलात शिरावयास नको. ट्रॉट्स्की हा खरोखर कवडी किंमतीचा, परंतु परिस्थितीच्या लाटेवर उचलला जाऊन योगायोगाने रशियन क्रांतीचा एक – अनेकांपैकी एक – नेता बनलेला उठावगीर होता, असा अविरत प्रचार स्टालीनवाद्यांकडून होत असतो, व या प्रचाराचे प्रहार सर्वसाधारण मनुष्याच्या मेंदूवर केव्हातरी झालेले असतात. शिवाय लेनिनचे निरपवाद श्रेष्ठत्व लोकांच्या मनावर खोलवर रुतून बसण्याचे खरे कारण असे आहे की, रशियन राज्यक्रांती किंवा कम्युनिस्ट क्रांती हेच लेनिन व ट्रॉट्स्की यांचे जीवनकार्य होते, व म्हणून साहजिकच आपण त्यांच्या एकंदर कार्याकडे या एकाच दृष्टीने पाहतो व तेवढ्यापुरते पाहून श्रेष्ठत्वाच्या बाबतीत लेनिनच्या बाजूने झटकन कौल देऊन मोकळे होतो.

रशियन राज्यक्रांतीचा प्रणेता म्हणून लेनिन ट्रॉट्स्कीहून श्रेष्ठ होता, ही गोष्ट वाद घालून ठरविण्याचे खरोखर काय कारण आहे ? ती गोष्ट जवळ जवळ स्वयंसिद्ध मानली जाते. पण याही बाबतीत एकदोन गोष्टींचे अवधान राखिले पाहिजे. लेनिन काय अगर ट्रॉट्स्की काय, रशियात मार्क्सवादाचा पाया घालण्याचे, रशियाच्या ‘ स्थितप्रज्ञ ’ प्रकृतीला या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाची तोंडओळख करून देण्याचे श्रेय त्यांच्यापैकी एकाकडेही जात नाही. ते उज्ज्वल कार्य जॉर्ज प्लेखानोव्ह याने केले. रशियन मार्क्सवादाचा मूळ पुरुष प्लेखानोव्हच होता व त्याच्याशी पुढे जीवनमरणाचा मतभेद झाल्यानंतरही लेनिनने त्याचे श्रेष्ठत्व सदैव मान्य केले. प्लेखानोव्हच्या या कार्याचा, त्याच्या ग्रंथांचा तो नेहमीच अत्यादराने उल्लेख करी, आणि ते वाचण्याची शिफारस करी.

दुसरी विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की, रशियन क्रांतीच्या विकासाचे खरे स्वरूप ट्रॉट्स्कीच्याच ध्यानात सर्वांच्या अगोदर – लेनिनच्याही अगोदर – आले होते. रशियन क्रांतीचा विकास ट्रॉट्स्कीच्या शोधक बुद्धीने आणि ध्येयदर्शित्वाने, इतर कोणत्याही मार्क्सवाद्याच्या अगोदर – १९०५ साली – जसा पाहिला तसाच तो १९१७ साली झाला. १९०५ सालच्या क्रांतीच्या धुमाळीत ट्रॉट्स्कीने चळवळीचे नेतृत्व स्वीकारून आपले क्रांतिकारक नेतृत्व इतिहासाच्या प्रयोगशाळेत प्रत्ययास आणून तर दिलेच, पण आपला ‘ अखंड क्रांती ’चा जगप्रसिद्ध सिद्धान्त कल्पून आपली मार्क्सवादी बुद्धिमत्ता किती प्रखर आणि साहसी आहे याचीही कल्पना आणून दिली. ट्रॉट्स्कीच्या या सिद्धान्ताने मवाळ मेन्शेव्हिक तर भेदरलेच, पण स्वतः लेनिन देखील स्तिमित झाला. इंग्लंड-अमेरिकेमध्ये आहे तशा स्वरूपाची भांडवली लोकशाही स्थापन करणे हेच रशियन क्रांतीचे कार्य आहे, असे मेन्शेव्हिकांचे मत होते, तर त्याच्या उलट ‘ कामकरी-शेतकरी वर्गाची अनियंत्रित लोकसत्ता ’ असे क्रांत्युत्तर सत्तेचे स्वरूप लेनिनच्या ध्येयवादी नजरेस पडत होते; परंतु ट्रॉट्स्कीने स्वच्छ सांगितले की, ‘ एकदा क्रांती सुरू झाली म्हणजे तिचे स्वरूप असे मर्यादित राहणे शक्य नाही. क्रांतीने जागृत झालेला कामगार वर्ग आपल्या विशिष्ट मागण्या पुढे करील, या मागण्यांना शेतकरी वर्गाचे प्रतिनिधी विरोध करतील, व म्हणून कामगारांना अखेरीस आपली अनियंत्रित हुकमत प्रस्थापित करावी लागेल. ’ ( यातूनच ट्रॉट्स्कीचा अखंड जागतिक क्रांतीचा सिद्धान्त निर्माण होतो, पण त्याची चर्चा येथे नको. ) १९०५ साली लेनिनला ट्रॉट्स्कीचे सिद्धान्त पटले नाहीत, पण पुढे लेनिनच्या धोरणात अनेक बदल झाले व शेवटी १९१७ साली त्याचा दृष्टिकोण ट्रॉट्स्कीच्या दृष्टि-कोणाशी बराच जुळता झाला. एकच महत्त्वाचा फरक उरला होता. क्रांतीने प्रस्थापित केलेल्या ‘ लोकसत्तावादी ’ सरकारात कामगारांच्या प्रतिनिधींचे अल्पमत राहिले तरी चालेल की नाही, या प्रश्नावर मतभेद शिल्लक राहिला. लेनिनने ह्या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर दिले, पण पुढे नोव्हेंबरात ‘ संयुक्त सरकारा ’त बोल्शेव्हिकांनाच निर्विवाद बहुमत मिळाले पाहिजे असा लेनिनने आग्रह धरला; म्हणजे पर्यायाने ट्रॉट्स्कीचेच मत मान्य केले. म्हणून मॅक्स नोमॅड म्हणतात, ‘ अखेरीस १९१७ साली ट्रॉट्स्कीचाच दृष्टिकोण प्रत्यक्षात

उतरला.' रशियन क्रांतीच्या ऐतिहासिक प्रयोगशाळत क्रांतीच्या अनेक सिद्धान्तांवर प्रयोग झाले व त्यात ट्रॉट्स्कीचाच सिद्धान्त तावून सुलाखून निघाला.

या नोव्हेंबर क्रांतीमध्ये प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीने लेनिनपेक्षा ट्रॉट्स्कीच अधिक प्रभावी ठरला, हे ट्रॉट्स्कीच्या एकंदर व्यक्तित्वास धरूनच झाले. ट्रॉट्स्कीचा स्वभावच तसा होता. कोठेही क्रांतीची ठिणगी उडाली की त्याचे सारे चैतन्य नुसते फुलून निघे. त्याचे सारे तेज, सारा उत्साह, सारा आशावाद अशा वेळी उत्कर्षाला पोहोचे व तो एकदम क्रांतीच्या नेतृत्वपदावर तळपू लागे. पूर्वी १९०५ सालच्या क्रांतीत हेच झाले होते. रशियन समाजवादी पक्षाच्या मेन्शेव्हिक अगर बोल्शेव्हिक, कोणत्याही शाखेचा तो सभासद नसून देखील क्रांती सुरू झाली तेव्हा अल्पावधीतच तो तिचा नेता बनला. त्या वेळी कोणी तरी लेनिनला जरा मत्सरयुक्त स्वरात म्हटले, 'आज सर्वात सामर्थ्यशाली व्यक्ती ट्रॉट्स्कीच बनली आहे.' त्यावर लेनिन लगेच गंभीर मुद्रेने म्हणाला, 'मग त्यात काय झाले! ट्रॉट्स्कीने हे यश स्वतःच्या अविश्रांत परिश्रमाने व ठसठशीत कर्तृत्वाने मिळविले आहे.' नोव्हेंबर-क्रांतीत ट्रॉट्स्कीने काही विशेष असामान्य कामगिरी केलेली नाही असे सिद्ध करण्याची जिवापाड धडपड स्टालिनवादी आज करीत असतात, आणि त्यासाठी सत्याचे हवे तसे मुडदे ते विकृत उत्साहाने पाडीत असतात; परंतु १९१८ साली स्टालिननेच ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाचा गौरव पुढील शब्दात केला होता. प्रावदा पत्राच्या २४१ नं. च्या अंकात लिहिताना स्टालिन म्हणतो, '१९१७ च्या क्रांतीतील सर्व प्रत्यक्ष संघटना पेट्रोग्राड सोव्हिएटचा अध्यक्ष कॉ. ट्रॉट्स्की याच्याच साक्षात नेतृत्वाखाली झाली. सोव्हिएटच्या बाजूस तेथील शिबंदी तेव्हा आली याबद्दलचे सारे श्रेय, तसेच क्रांतिकारक लष्करी कमिटीचे कार्य हे मुख्यतः व प्रथमतः ट्रॉट्स्कीच्याच पदरात टाकले पाहिजे.' नोव्हेंबर क्रांतीचा नेता लेनिनऐवजी ट्रॉट्स्की बनला हा अर्थात लेनिनचा दोष नाही. लेनिन त्यावेळी फिनलंडमध्य अज्ञातवासात होता. प्रत्यक्ष क्रांतीच्या ठिकाणी हजर होऊन तिचे नेतृत्व स्वीकारणे त्याला शक्य नव्हते. आणि ट्रॉट्स्कीसारखा असामान्य धडाडीचा आणि विद्युत्-गतीचा प्रतिभाशाली पुरुष तेथे दुसरा कोणी नव्हता. ट्रॉट्स्कीला मिळाले ते स्थान नैसर्गिकच होते. लेनिनच्या पार्श्वभूमीवर ट्रॉट्स्कीचीच प्रतिभा त्यावेळी विजलीप्रमाणे चमकली, हा परिस्थिती आणि प्रतिभा यांचा ऐतिहासिक संयोगच होता!

नोव्हेंबर क्रांतीप्रमाणेच क्रांतीनंतर जी यादवी माजली तीतही ट्रॉट्स्कीने असामान्य कर्तबगारी गाजविली व एक 'अचाट कर्तृत्वाचा लष्करी नेता' म्हणून जगभर कीर्ती संपादन केली. सतत दोन-अडीच वर्षे तो क्रांतीच्या संरक्षणार्थ, जागतिक भांडवलशाहीने उठविलेल्या प्रतिक्रांतीच्या भुताशी, आघाडीवर झुंजत होता. कोठेही प्रतिक्रांतीचा ध्वनी उठला म्हणजे ट्रॉट्स्की तेथे जातीने हजर राही, प्रतिक्रांतीच्या कल्लोळात वेगाने शिरे आणि आपल्या अलौकिक वक्तृत्वाने सैनिकांची अंतःकरणे भरून टाकी, व प्रसंगी धाकदपटशा दाखवून त्यांच्या भित्र्या मनाला सावरून धरी. ट्रॉट्स्कीची भेट म्हणजे विद्युल्लतेची चमक! जेथे पूर्वी प्रतिक्रांतीचे वारे घुमे तेथे क्षणार्धात क्रांतीच्या ठिणग्या उडत!

स्वतः लेनिनने युद्धशास्त्र आणि लष्करी डावपेच यांचा कसून अभ्यास केला होता; पण प्रसंग येताच या क्षेत्रातले ट्रॉट्स्कीचे श्रेष्ठत्व त्याने आनंदाने मान्य केले आणि त्याची युद्धखात्याच्या प्रमुखपदी स्थापना केली. या पदावरून दुरून हुकूम सोडावयाची सुरक्षित कामगिरी तेवढीच त्याने केली असे नव्हे, तर कित्येकदा जातीने रणधुमाळीत शिरून त्याने प्रत्यक्ष मृत्यूशी हस्तान्दोलन केले होते. कम्युनिस्टांच्या अभिमानाची जागती ज्योत अशी जी लाल फौज तिचा निर्माता म्हणून ट्रॉट्स्कीचे नाव इतिहासात नेहमीच आदराने घेतले जाईल. ट्रॉट्स्कीच्या या कामगिरीचा लेनिनला अतिशय अभिमान वाटत असे. त्याने मॅक्झिम गॉर्कीपाशी एकदा उद्गार काढले होते की, ‘एका वर्षाच्या अल्पावधीत अशी नमुनेदार फौज उभारणारा आणि लष्करी तज्ज्ञांच्या आदराचा विषय होणारा दुसरा एखादा इसम मला दाखव पाहू! आपल्यापाशी ट्रॉट्स्की आहे, म्हणजेच सर्वस्व आहे. आता चमत्कार घडतील!’

रशियन क्रांतीचा विकास ट्रॉट्स्कीच्याच ध्येयदर्शित्वाने अगोदर पाहिला; प्रत्यक्ष क्रांतीचे कार्य ट्रॉट्स्कीच्याच साक्षात नेतृत्वाखाली पार पडले. क्रांतीनंतर माजलेल्या यादवीत क्रांतीचे रक्षण देखील ट्रॉट्स्कीच्या अचाट व्यक्तित्वाने केले. असे जर आहे तर रशियन क्रांतीचा प्रणेता या नात्याने तरी लेनिन ट्रॉट्स्कीहून श्रेष्ठ कसा? असा प्रश्न यावर सहजच विचारता येईल. या प्रश्नाला अगदी सरळ उत्तर असे की, स्वतः ट्रॉट्स्कीच लेनिनचे श्रेष्ठत्व मान्य करीत असे. ट्रॉट्स्की मोठा अभिमानी पुरुष होता. विनयाची बाधा त्याला फार करून कधी झाली नाही. स्वतःच्या ऐतिहासिक स्थानाविषयी त्याला पुरेपूर कल्पनाही होती आणि खात्री देखील होती. आपल्या ऐतिहासिक स्थानाला धक्का लागू नये म्हणून हवे ते दिव्य करावयास तो तयार असे. पण तो दुरभिमानी नव्हता, आणि भलत्याच महत्त्वाकांक्षेने त्याला कधी ग्रासले नव्हते. आपल्याहून निकृष्ट प्रतीच्या माणसाला त्याने खोटे महत्त्व ज्याप्रमाणे कधी दिले नाही त्याप्रमाणे आपल्याहून श्रेष्ठ माणसाला वंदन करावयासही तो कधी नाराज नसे आणि म्हणूनच मतभेदाच्या प्रसंगी लेनिनवर हवी तितकी कठोर टीका करूनही त्याला त्याने नेता मानले. उभ्या आयुष्यात दोनच व्यक्तींचे निर्विवाद श्रेष्ठत्व त्याने मान्य केले – एक मार्क्स व दुसरा लेनिन.

लेनिनचे श्रेष्ठत्व ट्रॉट्स्कीला एकदम पटले नाही. त्यासाठी त्याला स्वतःशी बराच झगडा करावा लागला. पण एकदा लेनिनचे श्रेष्ठत्व पटल्यानंतर मात्र त्याने कसलाही आखडतेपणा दाखविला नाही. त्याने स्वतःच म्हटले आहे, ‘मी झगडतच लेनिनकडे आलो, पण आलो तेव्हा निःशेष आलो.’ रशियन राज्यक्रांतीच्या ऐतिहासिक स्वरूपाचे आपले विश्लेषण जरी अधिक अचूक असले तरी त्या क्रांतीसाठी योग्य ती संघटना आणि राजकीय उपाययोजना लेनिननेच आखली होती, हे रशियन क्रांतीच्या दूरस्थ छाया दिसू लागल्याबरोबर त्याच्या ध्यानात आले. १९०३ साली रशियन समाजवादी पक्षात मेन्शेव्हिक व बोल्शेव्हिक अशी दुफळी पडल्यापासून हे दोन पक्ष पुनरपी एकत्र आणण्यासाठी ट्रॉट्स्की धडपडत होता. परंतु रशियन क्रांतीचा वेग आणि तीव्रता जसजशी वाढू लागली तसतसे

मेन्शेव्हिक पक्ष किती कमअस्सल आहे व त्याला नेस्तनाबूत करण्याचे धोरण आखण्यात लेनिन किती बरोबर होता हे त्याच्या ध्यानात आले व त्याने लेनिनचे नेतृत्व स्वीकारून बोल्शेव्हिक पक्षात प्रवेश केला. राजकारणातील पक्षविशिष्ट संघटनेस ट्रॉट्स्की लेनिन-प्रमाणे लायक नव्हता. लेनिनचे मन जितके चिवट तितकेच लवचिक होते. ट्रॉट्स्कीच्या मनाचा कणखरपणाच अधिक नजरेत भरे. लेनिन अतिशय शांत स्वभावाचा आणि धिमा माणूस होता, तर ट्रॉट्स्की अधिऱ्या वृत्तीचा आणि संतापी होता. देवाणघेवाण करण्याची लेनिनची गोड आणि मृदु वृत्ती ट्रॉट्स्कीपाशी नव्हती. कोणाच्याही मूर्खपणाची गय करण्यास तो कधीच तयार नसे आणि जगात मूर्खांचाच बाजार अधिक, याचीही अति तीव्र जाणीव त्याला असे. प्रो. लास्कीनी म्हटल्याप्रमाणे, ' Trotsky has no power to suffer fools gladly, and he is profoundly aware that men are mostly fools. '

थोडक्यात म्हणजे लेनिनचे राजकीय शहाणपण त्याजपाशी बऱ्याच प्रमाणात असले तरी त्याचे व्यावहारिक शहाणपण त्याजपाशी फारच कमी होते. ट्रॉट्स्कीची राजकीय दृष्टीदेखील लेनिनच्या इतकी लवचिक आणि भेदक नव्हती. मार्क्सच्या सिद्धान्तां-वर दोघांचेही सारखेच प्रभुत्व होते. मार्क्सवरील ट्रॉट्स्कीची भाष्ये त्याच्या प्रतिभा-शालित्वामुळे अधिक तेजस्वी आणि चमकदार झाली आहेत. परंतु मार्क्सच्या सिद्धान्तांना परिस्थितीप्रमाणे बेमालूम कलाटणी देण्याची लेनिनची आश्चर्यकारक शक्ती ट्रॉट्स्कीपाशी नव्हती; निदान त्या प्रमाणात नव्हती. म्हणूनच मॅक्स ईस्टमनसारखा ट्रॉट्स्कीचा पक्का पक्षपाती आणि जिव्हाळ्याचा मित्रसुद्धा असे उद्‍गार काढतो की, ' Trotsky substitutes the logical deductions from an intellectual *schema* for the full rich human sensing of a total situation which was Lenin's magic gift. ' मानवी जीवन हे कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या चौकटीत चपखल बसू शकत नाही इतके ते विविध आणि चैतन्यपूर्ण आहे हे सत्य लेनिनच्या रक्तातच भिनले होते की काय न कळे !

लेनिनचे हे जादूमय व्यक्तित्व ट्रॉट्स्कीपाशी नसल्यामुळे लेनिनचा आधार तुटल्या-बरोबर त्याच्या तल्लख आणि तिखट व्यक्तित्वाने दुखावलेल्या दशम दर्जाच्या लोकांनी अक्षरशः कट केला, आणि त्याला त्याच्या कर्मभूमीतून आणि मायभूमीतून हद्दपार केले.

राजकीय नेतृत्वाची बाब सोडली तर लेखन आणि वक्तृत्व या दोन प्रांतात ट्रॉट्स्कीच्या पासंगासही लेनिन पुरला नसता. सबंध समाजसत्तावादी आंदोलनात ट्रॉट्स्की-सारखा प्रतिभाशाली वक्ता दुसरा झाला नाही, असे ल्युनाचार्स्कीने म्हटले आहे. वक्तृत्वात ट्रॉट्स्कीशी मुकाबला करणारा दुसरा वक्ता म्हणजे ज्यॉरेज ( Juares ), आणि विरोधविकासवाद किंवा ऐतिहासिक भौतिकवाद असल्या तात्त्विक आणि गहन विषयांवर तीनतीन तास आपल्या अमोघ वक्तृत्वाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकणारा ट्रॉट्स्की-सारखा दुसरा वक्ता तोच. ट्रॉट्स्कीच्या वक्तृत्वाचे उत्कृष्ट वर्णन ल्युनाचार्स्कीने पुढील

वेचक वाक्यात केले आहे –

' Effective presence, beautiful broad gesture, mighty rhythm of speech, loud, absolutely tireless voice, wonderful compactness, literariness of phrase, wealth of imagery, scorching irony, flowing pathos, and an absolutely extraordinary logic, really steel-like in its clarity—those are the qualities of Trotsky's speech. He can speak epigrammatically, shoot a few remarkably well-aimed arrows, and he can pronounce such majestic political discourses as I have heard elsewhere only from Juares,' (परिणामकारक व्यक्तित्व, विस्तृत आकर्षक हावभाव, तालबद्ध भाषा, खणखणीत तजेल आवाज, आश्चर्यकारक सूत्रबद्धता, भाषाप्रयोगाचे लालित्य, अलौकिक कल्पनाविलास, जळजळित उपहास, हृदयविदारक कारुण्य, लखलखित तर्कशुद्धता, युक्तिवादाचे अचाट प्रयोग, हे ट्रॉट्स्कीच्या वक्तृत्वाचे विशेष होत. तो सुभाषितांची खैरात करू शकतो, त्याच्या वाग्बाणांचा नेम अचूक असतो, आणि भर सभेत हवी तितकी भारदस्त राजकीय चर्चाही त्याला वॉरेजसारखी सहज साधते.)

ट्रॉट्स्कीपुढे लेनिनचे वक्तृत्व म्हणजे विजेपुढे मेणबत्ती ! ते कमालीचे तर्कशुद्ध आणि कोणत्याही कामगाराला समजेल इतके साधे आणि सरळ असे. हेच त्याचे वैशिष्टय. वक्तृत्वाच्या इतिहासात ट्रॉट्स्कीचे नाव सिसेरोप्रभृतींच्या बरोबरीने तेजस्वितेने विलसेल. त्या संदर्भात लेनिनचे नाव उच्चारले जाण्याचा फारसा संभव नाही.

ट्रॉट्स्कीच्या वक्तृत्वाचे ल्युनाचार्स्कीकृत वर्णन आवश्यक ते फेरफार करून त्याच्या लेखनालाही लावता येते. बर्नार्ड शॉने एकदा ट्रॉट्स्कीचे वर्णन the Prince of Pamphleteers असे केले होते. साहित्यसृष्टीतील एका ' प्रिन्स 'ने दुसऱ्या ' प्रिन्स 'ला उद्देशून हे उद्‌गार काढले असले तरी ट्रॉट्स्कीच्या प्रतिभेचे विशालत्व शॉपाशी नाही, एवढे मात्र स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. अलौकिक कल्पनाविलास, मर्मभेदक उपहास, बुद्धिदीपक तर्कवाद इत्यादी गुणांमुळे ट्रॉट्स्कीचा अगदी मामुली लेखही अभिजात साहित्यात जमा होतो. मग त्याच्या ' रशियन राज्यक्रांतीच्या इतिहासा 'सारख्या अपूर्व ग्रंथाचे वर्णन मि. एडमंड विल्सनसारख्या विचिकित्सक टीकाकाराने ' विसाव्या शतकाचे महाकाव्य ' असे केले तर त्यात आश्चर्य ते कसले ? हा ग्रंथ अक्षरशः अपूर्व आहे. कारण रशियन क्रांतीसारख्या एका प्रचंड ऐतिहासिक घटनेचा शास्त्रशुद्ध इतिहास त्याच घटनेच्या एका अतिप्रमुख नेत्याने लिहिल्याचे इतिहासातले हे पहिलेच उदाहरण आहे. या ग्रंथाइतकेच त्याचे आत्मचरित्रही चिरंतन स्वरूपाचे आहे, व आत्मचरित्रवाङ्मयात त्याला, रूसोच्या अभिजात आत्मचरित्राइतकी प्रतिष्ठा खात्रीने प्राप्त होईल. ' मानवांची मने भारून टाकण्याचे सामर्थ्य जोवर थोर साहसांच्या वृत्तांतात आहे तोवर हे आत्मचरित्र टिकेल,' असे ट्रॉट्स्कीच्या आत्मवृत्ताबद्दल प्रो. लास्की यांचे उद्‌गार आहेत. ट्रॉट्स्कीची साहित्यविषयक निर्मिती जितकी प्रतिभाशाली तितकीच ती बहुविध आहे. त्याने इतिहास आणि आत्म-

चरित्र ज्याप्रमाणे लिहिले त्याचप्रमाणे अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य, राजकारण यांवर प्रेरक, प्रवर्तक आणि प्रचारक प्रबंध लिहिले आणि मनोवेधक आठवणी देखील लिहिल्या.

रशियन वाङ्मयाची परंपरा फार थोर आहे. स्टालिनच्या राजवटीत मात्र ती खुंटलेली दिसते. सुदैवाने ट्रॉट्स्कीने अमर स्वरूपाची साहित्यनिर्मिती केली आणि रशियन वाङ्मयाची लाज राखली. रशियन साहित्याच्या भविष्यकालीन इतिहासकाराला याबद्दल ट्रॉट्स्कीला धन्यवादच द्यावे लागतील.

ट्रॉट्स्की काही धंदेवाईक लेखक नव्हता. तो साहित्यिक नव्हता. परंतु साहित्यिकांची प्रतिभा त्याजपाशी होती. ट्रॉट्स्कीच्या बालपणातील एका हकीगतीवरून ही प्रतिभा किती अभिजात होती हे समजून येईल. तो आठनऊ वर्षांचा असताना शिक्षणासाठी एका नातेवाइकाकडे राहत होता. तेथे सर्जी आयव्हॅनोव्हिच नावाचा एक नामांकित टीकाकार येत असे. ट्रॉट्स्कीसारखा तरतरीत मुलगा सर्जीच्या प्रथमदर्शनीच मनात भरला. प्रथम भेटीतच त्याने ट्रॉट्स्कीला पुश्किनची ' कवि आणि ग्रंथविक्रेता,' व नेक्रासोव्हची ' कवि आणि नागरिक ' या कवितांची तुलना करावयास सांगितले. ट्रॉट्स्कीने नेक्रासोव्हच्या कवितेचे नावही ऐकले नव्हते. परंतु आयव्हॅनोव्हिचला धीर कसचा ? त्याने ती कविता तेथच्या तेथे एका पुस्तकातून वाचायला सुरुवात केली; व ट्रॉट्स्कीला आपली हुशारी दर्शविण्यास एका तासाचा अवधी दिला. तासाभरानंतर ट्रॉट्स्कीने कापऱ्या हाताने आपला लेख त्या ' श्रेष्ठा 'च्या हातात दिला व भयभीत अंतःकरणाने पुढे काय होणार याचा विचार तो करू लागला. सर्जी आयव्हॅनोव्हिचने तो लेख वाचला मात्र, क्षणार्धात लेख हातात धरून तो जवळ जवळ नाचू लागला. ' किती हुशार पोरगा आहे हो हा ! पहा, याने काय लिहिलं आहे ! ' असे म्हणून आपल्या पाणीदार डोळ्यांनी तो वाचू लागला, ' The Poet lived with his beloved nature whose every sound both gay and sad echoed in the poet's heart. ' नऊ वर्षे वयाच्या पोराने केलेली ही रचना होती !

लेनिनच्या लेखनात ही प्रतिभेची चमक फारशी कोठे नाहीच. त्याचे लेखन कमालीचे साधे, रोखठोक, व्यावहारिक आणि लालित्यशून्य होते. कल्पनाविलासाचा लेनिनला अगदी वीट होता. त्याच्या लेखनात उपमा, उत्प्रेक्षा आणि अलंकार यांचा जवळ जवळ संपूर्ण अभावच असे. एखादी उपमा आलीच तर ती कमालीची कामचलाऊ असेल. अलंकारादी आभरणे ही साहित्यसृष्टीतील भांडवलशाहीची लक्षणे त्याला वाटत असत की काय नकळे ! लेनिनच्या लेखनाचा प्रमुख गुण म्हणजे तर्कवाद, युक्तिवाद आणि त्याच्या शिकवणुकीचे सामर्थ्य ! युक्तिवाद अपुरा ठरला म्हणजेच मनुष्य शिव्यागाळीचे शस्त्र उगारतो अशी जी समजूत आहे तिला लेनिन हा मोठा ठळक अपवाद आहे. अतिसुंदर युक्तिवादाला भयंकर शिव्याबाजीचे अस्तर जोडताना तो अनेकदा आढळतो. तसेच बेसुमार पुनरुक्तीमुळे लेनिनच्या लेखनाचा पुढे पुढे कंटाळा येऊ लागतो. ट्रॉट्स्कीची नवनवोन्मेषशाली प्रतिभा त्यात नाही — व म्हणून केवळ वाङ्मयीन आनंदाकरिता ट्रॉट्स्कीचे ग्रंथ

भावी कालात वाचले जाण्याचा संभव आहे, तसा लेनिनच्या बाबतीत नाही. वक्तृत्वा-प्रमाणे लेखनातही लेनिनला ट्रॉट्स्कीकडे वर टक लावूनच पाहिले पाहिजे.

क्रांतिकारक नेतृत्व, प्रभावी वक्तृत्व आणि प्रतिभाशाली लेखन या गुणांप्रमाणेच उज्ज्वल ध्येयवादासाठीसुद्धा ट्रॉट्स्कीचे नाव इतिहासात अजरामर राहील. ट्रॉट्स्कीचा ध्येयवाद उज्ज्वल आणि सत्त्वशील असल्यामुळे स्टालिनपुढे नामोहरम झाल्यावर त्याने अधिकाराचा त्याग केला, मायभूमीचा निरोप घेतला आणि हद्दपारीत भटक भटक भटकण्याचा मार्ग स्वीकारला; पण ध्येयवाद सोडला नाही की स्वतःच्या प्रामाणिक मतांना मूठमाती दिली नाही ! स्टालिनने त्याचे सारे वैभव हिरावून घेण्याचा प्रयत्न केला, त्यासाठी सत्याचे हवे तसे मुडदे पाडले, बोल्शेव्हिक क्रांतीच्या स्फूर्तिजन्य इतिहासाचे स्मरण करून देणाऱ्या अनेक गोष्टींचा नायनाट केला; पण ट्रॉट्स्कीने सत्त्व सोडले नाही. इतक्या हालअपेष्टा, इतकी मानहानी त्याने सोसली, परंतु स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखाने जगाचे मोजमाप करण्याइतके त्याचे दिल कधीच कमकुवत झाले नाही. ‘ इतिहासाची प्रक्रिया मी स्वतःच्या नशिबाच्या निकषाने मापीत नाही ’ असे तेजस्वी आणि तत्त्वनिर्भर उद्गार त्याने काढले. अशा या थोर व्यक्तीवर स्टालीनच्या चिथावणीमुळे एका मारेकऱ्याने खुनशी हल्ला चढ-विला व तिचे पार्थिव शरीर नष्ट केले. परंतु या मारेकऱ्याच्या म्होरक्याने हे लक्षात ठेवले पाहिजे की, ट्रॉट्स्कीचे ऐतिहासिक कर्तृत्व नष्ट करण्यास जगातील साऱ्या खुनशी संहार-शक्ती अपुऱ्याच पडतील आणि आपली तत्त्वभक्षक राक्षसी राजवट तर अगदीच अपुरी पडेल ! आणि कदाचित आपणच इतिहासात कायमचे बदनाम होऊ !

# ५.

# बाळ गंगाधर टिळक

**लोकमान्य टिळकांच्या** आयुष्याकडे मागे वळून पाहिले की एक गोष्ट ध्यानात येते – त्यांच्या व्यक्तित्वाच्या विकासाच्या दृष्टीने त्यांचे तीन तुरुंगवास फार महत्त्वाचे होते. व्यक्तित्व म्हणजे अर्थात संचित अनुभव. व्यक्तीच्या आनुवंशिक देणगीवर अनुभवाचे जे संस्कार होतात त्यांनी तिचे व्यक्तित्व तयार होते. टिळकांचे सारे आयुष्यच अर्थपूर्ण अनुभवांनी भरलेले होते. त्या दृष्टीने त्यांचे व्यक्तित्व अखेरपर्यंत क्रमाक्रमाने विकसित होतच होते. पण काही अनुभव असे निर्वाणीचे असतात की अवघ्या आयुष्याला अनपेक्षित कलाटणी देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते. असे अनुभव टिळकांच्या आयुष्यामध्ये अनेक. पण ज्या आयुष्याची आखणी त्यांनी बुद्धिपुरस्सर केली होती त्याचीच ती प्रकरणे असल्याने त्यांचे परिणामहि त्यांच्या एकंदर आयुष्याशी सुसंगत असेच झाले. उदाहरणार्थ, सुरतेच्या काँग्रेसमध्ये काँग्रेस दुभंगली ही मोठी धक्का देणारी घटना होती. पण ज्या लोकांनी ही काँग्रेस मोडली त्यांच्याबद्दल टिळकांचे मन अगोदरच विटले असल्यामुळे त्या प्रसंगाचा काही अकल्पित परिणाम त्यांच्या व्यक्तित्वावर झाला नाही.

पण तुरुंगवास हे थोडेसे निराळे प्रकरण होते. टिळकांच्या कार्यव्यग्र आणि कार्यप्रचुर आयुष्यात तो एक सक्तीचा खंड होता. सक्तीची विश्रांती आणि सक्तीचा एकांतवास तुरुंगवासामुळे त्यांना लाभला. सार्वजनिक कार्यकर्त्याचे जीवन हे धांदले जीवन असते. चिंतन आणि मनन करण्यास त्याला आवश्यक ती फुरसत मिळत नाही. बहुतेक कार्यकर्त्यांची यामुळे काही अडचण होत नाही, कारण चिंतनाचे वरदान त्यांच्या प्रकृतीला लाभलेलेच नसते. पण टिळक हे स्वभावतःच विचारवंत. त्यांना चिंतनाची फार गरज. शिवाय त्यांचे हे चिंतन हे निव्वळ विचारवंताचे चिंतन नसे. त्यात केवळ बुद्धीचा विलास नसे. त्यात आत्म्याची साधना असे. लोकोद्धाराचे व्रत त्यांनी घेतलेले होते. यात त्यांचे अवघे स्वत्व आणि सत्त्व गुंतलेले होते. चिंतनाने त्यांचे सारे व्यक्तित्वच घुसळले जाई. कर्मयोगाचे

चक्र त्यामुळे अनेक गतींनी फिरविले जाई. म्हणून टिळकांच्या जीवनातले चिंतनाचे प्रसंग हे व्यक्तित्व-विकसनाच्या दृष्टीने क्रांतिकारक परिवर्तनाचे प्रसंग ठरले.

असे प्रसंग त्यांना तुरुंगात बरेच लाभले असावेत. तुरुंगात त्यांनी लेखन-वाचन केले तसेच असे सत्त्वशोधक चिंतनहि केले. म्हणून प्रत्येक तुरुंगवासात त्यांच्या व्यक्तित्वाचे आशयधन विकसित झाले. एक नवे व्यक्तित्व घेऊन ते तुरुंगाबाहेर आले. या व्यक्तित्वाचा आविष्कार त्यांच्या पुढील कार्यात आणि वर्तनात आढळला.

याचा अर्थ असा नव्हे की, आपले सारे जुने व्यक्तित्व तुरुंगात ठेवून ते बाहेर आले. टिळकांचे व्यक्तित्व खरे म्हणजे एकसंध व्यक्तित्व होते. त्यांच्या व्यक्तित्वाला अपरिवर्तन-शील अशी काही झार होतीच. ही त्यांची मूळ प्रकृती जन्मभर वारंवार व्यक्त झाली. उदाहरणार्थ, ज्याला Political Sense (राजकीय जाण अगर बुद्धी) असे म्हणतात तिची टिळकांना फार मोठी देणगी होती. एखादी राजकीय घटना घडली अगर एखादा राजकीय डाव पुढे आला की त्याचे स्वरूप आणि त्याचे संभाव्य परिणाम ते अचूक हेरीत. ही त्यांची राजकीय बुद्धी त्यांना कधीच सोडून गेली नाही. म्हणून प्रत्येक तुरुंग-वासात सिद्ध झालेले त्यांचे नवे व्यक्तित्व हे त्यांच्या जुन्या व्यक्तित्वाचेच विकसित रूप असे. पण जुन्या व नव्या व्यक्तित्वांत असा काही फरक असे की त्या अनुरोधाने त्यांच्या जीवनाचे कालखंड आपण पाडू शकतो.

टिळकांचा पहिला तुरुंगवास म्हणजे डोंगरीतील एकशे एक दिवस. या दिवसांचे अप्रतिम वर्णन आगरकरांनी करून ठेवलेले आहे. प्रज्ञा, प्रांजळपणा आणि पुरुषार्थाची जाण यांचा आकर्षक संगम त्या वर्णनात आढळतो. टिळक–आगरकरांच्या सार्वजनिक जीवनाला नुकतीच कोठे सुरुवात झाली होती. सार्वजनिक क्षेत्रात त्यांची पावले अद्याप चाचपडतच होती. पण या तुरुंगवासाने त्यांच्या पावलांत एक प्रकारची स्थिरता आली. या १०१ दिवसांच्या एकान्तवासात टिळक–आगरकरांनी आपल्या जीवनाचे एक अंतर्मुख दर्शन घेतले. हे कसे घेतले असेल याचे वर्णन आगरकरांनीच केले आहे–

‘ आपले मूळ हेतु कोणते व ते कितपत सिद्धीस गेले आहेत... आम्ही आरंभिलेलीं कामें आमच्या हयातींत व आमच्या पाठीमागे कित्येक वर्षें अप्रतिहत चाललीं तर आमच्या देशस्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल; या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें त्याचें कोणकोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे; लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल... आपण याप्रमाणें येथें अडकून राहिल्यानें लोकांच्या मनावर काय परिणाम होईल...आता फिरून तुरुंगांत न येण्यासाठीं कोणत्या गोष्टींची खबरदारी घेतली पाहिजे; फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या, वगैरे नाहीं नाहीं त्या विषयांवर आमचा एकेक वेळ एवढ्या जोरानें वाद घाले कीं...इतउत्तर आमची इतकीच उमेद आहे कीं, सकल

महाराष्ट्रीयांनीं आम्हांवर प्रीति दाखविली आणि आम्हांस जो सन्मान दिला त्या प्रीतीला आणि सन्मानाला आम्ही वास्तविक पात्र आहों असें केव्हां तरी आम्हांस दाखविता आलें म्हणजे आम्हीं कृतकृत्य झालों...तसेंच आम्हीं आरंभिलेल्या उद्योगांत जर काहीं प्रशंसनीय भाग असला तर त्याचा चोहोंकडे विस्तार होऊन या महाराष्ट्रभूमीच्या उदरीं स्नेहं दयांच च सौख्यंच च यदि वा जानकीमपि। आराधनाय लोकांनां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥ असे मानणारे पुत्र निपजोत.'

हे उतारे आगरकरांचे असले तरी त्यांत टिळकांच्या मनाचेहि प्रतिबिंब पडते. किंबहुना टिळकांची जिद्द, युयुत्सावृत्ती आणि लोकाभिमुखता अधिक असल्यामुळे या तुरुंगवासाचा आगरकरांच्या व्यक्तित्वावर जितका परिणाम झाला त्यापेक्षा टिळकांवर किती तरी अधिक परिणाम झाला असला पाहिजे. किंबहुना झाला हे त्यांच्या पुढील कार्याने सिद्धच झाले.

डोंगरीच्या तुरुंगवासापूर्वी त्यांनी एका ध्येयनिष्ठ जीवनक्रमाची निश्चिती केली होती. या तुरुंगवासात ही निश्चिती प्रज्वलित झाली. या अनुभवाने त्यांच्या ठिकाणी एक नवा निर्धार आणि आत्मविश्वास निर्माण झाला.ते आता आपले स्वतंत्र नेतृत्व आणि आपली कार्यपद्धती प्रस्थापित करण्याच्या दिशेने पाऊल टाकू लागले. पहिली गोष्ट म्हणजे स्वतःविषयीची एक नवीन जाणीव त्यांच्यात निर्माण झाली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या लोकांनी जेझुईट लोकांच्या निष्ठेने आणि त्यागाने वागले पाहिजे असा जो आग्रह त्यांनी धरला त्यात तिचे सूचन होते. या नव्या आत्मजाणिवेमुळे ते डी. ई. सोसायटीतून बाहेर पडले हे क्रमप्राप्तच झाले. ते स्वतंत्र बाण्याने वागू लागले. त्याचबरोबर ते आपल्या कार्याला एक स्वतंत्र सैद्धान्तिक पायाही देऊ लागले.

या काळात त्यांचे सुधारकांशी जे वाद झाले तो प्रकार त्यांचे आक्षेपक म्हणतात त्याप्रमाणे केवळ लोकाराधनेचा नव्हता. मिल्ल–बेन्टॅम–स्पेन्सर वगैरेंचा चांगला अभ्यास करूनही हिंदू धर्म, हिंदू तत्त्वज्ञान आणि हिंदू नीतिशास्त्र याचा एक सैद्धान्तिक अभिमान त्यांच्या ठिकाणी परिणत होत होता. (याचेच फल पुढे 'गीतारहस्य'च्या रूपाने दिसले.) आधुनिक तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र अगर समाजशास्त्र यांनी हिंदू विज्ञान आणि तत्त्वज्ञान बाद होत नाही अशी त्यांची अधिक अधिक वैचारिक खात्री होऊ लागली. पाश्चात्त्य विद्येकडे ते स्वतंत्र दृष्टीने पाहू लागले. कारण पाश्चात्त्य राज्यकर्त्यांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी निश्चित झाली. ब्रिटिशांचे राज्य ईश्वरी योजनेने आले ही रानड्यांसारख्या प्रतिभासंपन्नाची दृष्टी त्यांना नुसतीच चूक नव्हे तर देशाला अपायकारक वाटू लागली.

ही नवी जाण त्यांच्या हिंदु-मुस्लिम दंग्यांवरील लेखात आणि गणेशोत्सव, शिवाजी-उत्सव यासारख्या उपक्रमांत दिसू लागली. हिंदु-मुसलमान दंग्यांच्या मुळाशी ब्रिटिश राजनीती आहे हा अचूक सिद्धान्त त्यांनी मांडला (त्यांचा हा सिद्धान्त 'ईश्वरी योजने'च्या तत्त्वावर विश्वास न ठेवणाऱ्या आगरकरांनाहि थोडा अवास्तव वाटला. पण तो किती अचूक होता हे पुढच्या इतिहासाने सिद्ध झाले. किंबहुना पाकिस्तानसुद्धा ब्रिटिशांच्या प्रेरणेने — काँग्रेसविरोधी प्रेरणेने — प्रस्थापित झाले हे आता अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या अमेरी–

लिन्‌लिथगो–वेव्हेल यांच्या ' कागदपत्रां 'वरून सिद्ध होत आहे.)

टिळकांच्या राजकारणात आता शहाणपणा आणि आक्रमक बुद्धी यांचे एक मजेदार मिश्रण दिसू लागले. पुण्यातला प्लेग आणि महाराष्ट्रातला दुष्काळ यांच्या बाबतीत व्यक्त झालेल्या टिळकांच्या धोरणात आणि कार्यक्रमात या राजकारणाचा अर्थपूर्ण आविष्कार झाला. प्लेग आणि रॅण्डसाहेबाचा खून या प्रकरणी त्यांनी एक स्तिमित करणारी आक्रमक राजनीती व्यक्त केली. (सार्वजनिक सभा ताब्यात घेण्याची क्रिया हा या राजनीतीचा एक ठळक शिक्काच. दुष्काळ-प्रकरणी त्यांनी एक असामान्य शहाणपणा व्यक्त केला. ' सरकारशी कायद्याने लढण्याच्या ' त्यांच्या घोषणेत एकाच वेळी संग्राम आणि सावधपणा यांचा अवलंब कसा करता येतो याचे एक प्रात्यक्षिकच होते.

याचा परिणाम राजद्रोहाच्या खटल्यामध्ये व्हावा हे क्रमप्राप्तच झाले. खऱ्या अर्थाने राजद्रोहाचा हा ब्रिटिशांच्या अमदानीतला पहिलाच खटला होता. किती शिक्षा होईल याची कोणाला कल्पना नव्हती आणि तरी अटकेच्या पहिल्या दिवशी एकीकडे जामिनाची खटपट होत असताना दुसरीकडे टिळक तुरुंगात डाराडूर झोपले होते, या एका घटनेने टिळकांचे एक नवे दर्शन घडले. या नव्या टिळकांचाच एक चिंतनशील विकास या खटल्यातून ओढवलेल्या कैदेत झाला.

या कैदेतून सुटून आलेले आणि ' पुनश्च हरि ॐ ' अशी घोषणा करणारे टिळक म्हणजे एक नवेच टिळक होते, याचा पुरावा ताईमहाराज खटल्याने मिळाला. फाटकांनी या प्रकरणाचे वर्णन ' भयंकर दिव्य ' असे केले आहे आणि ते अगदी अचूक आहे. या प्रकरणात टिळकांचे धैर्य, टिळकांचे चातुर्य, टिळकांचे चारित्र्य आणि टिळकांचा आत्मविश्वास वगैरे अनेक गुणांची अशी काही सत्त्वपरीक्षा झाली की एवढे एकच प्रकरण त्यांच्या जीवनामध्ये घडले असते तरी महाराष्ट्राच्या लक्षणीय पुरुषोत्तमांत त्यांची गणना करावी लागली असती. (अर्थात एवढे एकच प्रकरण त्यांच्या आयुष्यात घडले असते तर त्यात त्यांचे असे दर्शन घडले असते का असा प्रश्न विचारता येतो.)

पण राजकारणातही एक नवेच आत्मप्रत्यययुक्त टिळक दिसले. अर्थात यापुढे त्यांचे विरोधक म्हणजे केवळ काही सुधारक विचारवंत नव्हते अगर नेमस्त पुढारी नव्हते. आता त्यांचा मुकाबला सरळसरळ कर्झनशी होता आणि याची जाणीव त्यांना होती. त्यांच्या राजकीय कार्याला आता एक नवीनच धार आणि दीप्ती आली. (ही जाणण्याची ताकद न. र. फाटकांत नाही. म्हणून त्यांचे टिळक-चरित्र अपेशी ठरले. वंगभंगाच्या काळातल्या टिळकांच्या घोषणा बंगाली पुढाऱ्यांकडून उसन्या घेतलेल्या होत्या अशी टीका त्यांनी केली आहे. हे वादासाठी खरे मानले तरी या घोषणांचा सैद्धान्तिक आविष्कार ' केसरी 'च्या अग्रलेखांतून कसा व किती झाला हे फाटकांनी कधी जाणलेच नाही.) वंगभंगाची चळवळ ही बंगालची चळवळ आणि तरी दूरच्या महाराष्ट्राचा एक चळवळ्या

अखिल भारतीय पुढारी ठरतो हा चमत्कार म्हणजे टिळकांच्या नव्या दर्शनाचा एक विलास होता. सुधारकांशी आणि नेमस्तांशी त्यांचा जो विरोध होता तो म्हणजे खरोखर ब्रिटिश साम्राज्यशाहीशी मुकाबला होता हे या काळात सिद्ध झाले, आणि याची जाणीव सुधारक नेमस्तांपेक्षा साम्राज्यवाद्यांनाच अधिक होती. म्हणूनच त्यांनी १९०८ साली टिळकांना हद्दपारीची शिक्षा दिली. (गोखल्यांना ही शिक्षा पसंत नव्हती आणि तरी त्या शिक्षेचा जाहीर निषेध करण्याची बुद्धी त्यांना झाली नाही यांतच नेमस्त राजकारणाचे जे काय दर्शन घडायचे ते घडले!)

'ज्युरीचा निर्णय विरुद्ध असला तरी मी निरपराध असल्याबद्दल माझें मत कायम आहे. वस्तुमात्राच्या भवितव्याचें नियंत्रण करणारी (याहून निराळी) उच्च सामर्थ्यें आहेत. मी मोकळा राहण्यापेक्षा माझ्या कार्याचा उत्कर्ष माझ्या क्लेशांनीं व्हावा, अशीच कदाचित ईश्वराची इच्छा असावी.' असे जे उद्गार १९०८ च्या खटल्यात ज्युरींच्या 'दोषी' या अभिप्रायावर टिळकांनी काढले ते उद्गार म्हणजे त्यांचे जे व्यक्तित्व आतापर्यंत परिणत झाले होते त्याची एक देदीप्यमान शलाका होती. याच व्यक्तिमत्वाचे अर्थपूर्ण विकसन मंडालेला झाले. या तुरुंगवासात तीन विलक्षण गोष्टी घडल्या. एक म्हणजे एकान्तवास—एवढा जबरदस्त एकान्तवास की बाहेरच्या विशाल जगात काय चालले आहे याचेच ज्ञान टिळकांना होऊ नये. आणि तो सुद्धा एक-दोन वर्षे नव्हे तर तब्बल सहा वर्षे! अशा या सक्त दीर्घकालीन एकान्तवासात टिळकांच्या चिंतनाला एक निराळीच खोली आणि व्यापकता लाभली. दुसरी गोष्ट म्हणजे 'गीतारहस्या'चे लेखन. हे लेखन म्हणजे नुसतीच वैचारिक साधना नव्हती. ती एक आत्मिक साधना होती. तिसरी गोष्ट म्हणजे टिळकांच्या पत्नीचे निधन. 'माझ्या आयुष्यातला एक अध्याय समाप्त झाला' असे उद्गार यानंतर त्यांनी काढले. या उद्गारात बराच काही अर्थ दडलेला होता आणि त्याची जाणीव ज्या पत्रात त्यांनी हे उद्गार काढले त्याच्या भावनिक स्वरूपात दिसते. असे आर्त पत्र टिळकांनी दुसरे कधी लिहिले होते असे वाटत नाही.

टिळक बाहेर आले ते नव्या स्वरूपात. 'कर्मयोगी', 'स्थितप्रज्ञ' ही अभिधाने टिळकांना आता पुरेपूर शोभू लागली. अर्थात जुने टिळक पार लोपले नव्हते याचा पुरावा काँग्रेस प्रवेशाबाबत गोखल्यांशी झालेल्या त्यांच्या झटापटीत मिळालाच. पण टिळकांच्या व्यक्तित्वाचे ते अभिजात दर्शन नव्हतेच. ते दर्शन त्यांच्या झपाटलेल्या उद्योगात मिळाले. होमरूल लीग, हिंदू-मुस्लिम ऐक्य, चिरोल खटला, इंग्लंडमधील मुक्कामात मजूरपक्षाशी त्यांनी साधलेला संपर्क, भारतातला मजूर वर्ग, अस्पृश्य–ब्राह्मणेतर वगैरेंबद्दलच्या त्यांच्या उद्गारातला एक नवा व्यापक जिव्हाळा, इत्यादी गोष्टींतून दिसणारे टिळक हे सर्वस्वी नवे टिळक होते. टिळकांची प्रकृती या साऱ्या काळांत अतिशय वाईट होती. उभे राहिले तर त्यांचे पाय लटपटत. पण या लटपटत्या पायांवर उभे राहणारे आणि चालणारे हृदय

अतिशय खंबीर होते आणि त्यावरचे डोके प्रगल्भ आणि उदात्त होते. फुरसत व विश्रांती हे शब्द ज्यातून बाद झाले आहेत असे ते जीवन होते. वैयक्तिकतेची जागा भारतीयत्वाने पूर्णतः घेतली आहे असे ते जीवन होते. (चिरोल खटल्याकडे ते सर्वस्वी वैयक्तिक दृष्टीने पाहत असते तर त्यांनी तो खटला लढविलाच नसता असे वाटते.) भौतिक शक्तीचे रूपांतर आत्मिक शक्तीत आणि व्यावहारिक कर्माचे रूपांतर तापसी कर्मात झाले आहे असे ते जीवन होते. व्यक्तीचे रूपांतर तिच्या कार्यातच व्हावे असे ते जीवन होते. व्यक्ती वावरत नाही तर ध्येयच वावरते आहे असे ते जीवन होते. ते त्यांच्या अधू शरीरातील शक्तीने वावरत होते असे वाटतच नव्हते. अंतराळातील कोणत्या तरी शक्तीने ते वावरत होते. (आणि म्हणूनच त्यांना त्या वेळी विरोध करणारे भारतीय क्षुद्र ठरले.)

लोकमान्य गेले त्याच दिवशी म. गांधींच्या भारतीय सत्याग्रहपर्वाची सुरुवात झाली. शठं प्रति सत्यम् या विरुद्ध शठं प्रति शाठ्यम् अशी घोषणा करणारे युग संपुष्टात आले असे वाचिक अर्थाने वाटते. पण टिळकांच्या राजकारणाचा आत्मिक सांधा गांधींच्या राजकारणापाशी चपलख जुळावा असेच त्याचे तात्त्विक विकसन झाले होते. निदान टिळकांच्या आंतरिक व्यक्तित्वाचे झाले होते. आणि म्हणून टिळक ते गांधी हे परिवर्तन अगदी अकृत्रिम ठरले. दुर्दैवाची गोष्ट अशी की त्यांच्या कित्येक महाराष्ट्रीय भक्तांच्या हे कधी ध्यानातच आले नाही.

६.

# पं. जवाहरलाल नेहरू

**स्वा**तंत्र्यानंतर '**रावसाहेब**,' 'रावबहादूर' यासारख्या ब्रिटिश-समर्पित पदव्या टाकून देण्याची फॅशन निघाली त्या वेळी पं. नेहरू आपली 'पंडित' ही पदवी सोडून देणार अशी एक बातमी पसरली. तेव्हा नेहरूंनी असे जाहीर केले की, 'पंडित' या पदवीचा आपल्याला अभिमान वाटतो, आणि ती पदवी टाकून देण्याचा आपला मुळीच इरादा नाही. प्रथम म्हणजे 'पंडित' ही पदवी ब्रिटिश सरकारने दिलेली नव्हती. ती विद्वत्तेची निदर्शक होती आणि ती अनेक काश्मिरी कुटुंबांत परंपरेने लाभत असे. पंडित नेहरू परंपरेचे भोक्ते नव्हते, पण 'पंडित' या पदवीत जी ज्ञानाची शान आढळे ती त्यांना पसंत होती. पंडित नेहरू हे ज्ञानाचे अतीव भोक्ते होते आणि ज्ञानवंतांचे चाहते होते. ते राजकारणात पडले नसते तर वकिलीच्या व्यवसायाला जखडून राहिले असते असे मला वाटत नाही. प्राध्यापक म्हणा अगर पत्रकार म्हणा अथवा लेखक म्हणा, कोणत्या तरी भूमिकेतून त्यांनी ज्ञानाचीच साधना केली असती. कदाचित ते कलावंतही बनले असते. पं. नेहरू हे अतिशय संवेदनाशील गृहस्थ होते. एखादी घटना अगर विचार यांचा अगदी सूक्ष्मतरल नादही त्यांच्या मनाच्या गाभाऱ्यात घुमत असे. पण नेहरूंची प्रकृती जशी संवेदनाक्षम होती तशीच ती अतिशय क्रियाप्रवण होती. त्यांच्या चैतन्यशाली स्वभावाला संथपणा मानवत नसे. कसल्या तरी उद्योगाच्या, कार्याच्या धडपडीत व्यक्तित्वाची परिपूर्ती त्यांच्या प्रत्ययास येई. कार्यव्यग्रतेचे जीवन त्यांना अंतरीचे समाधान देत असे. पण क्रियाशील प्रकृती ही बहुधा बहिर्मुख असते, अंतर्मुख नसते. स्वतःच्याच संवेदनांत, भावनांत अगर विचारांत स्वरसात्मक वृत्तीने रमून जाण्यात तिला तितकासा रस नसतो. संवेदनाशील व्यक्तीला संवेदनांच्या कळा अनुभवण्यात मौज वाटते, पण क्रियाशील व्यक्तीला या संवेदनांच्या विश्वात गुंगून जाण्यास फुरसत नसते. अशी व्यक्ती कलावंतापेक्षा विचारवंत होण्याचाच संभव अधिक असतो. पण विचारवंत म्हणजे तत्त्वज्ञ नव्हे. तत्त्वज्ञाला विचारांचे अमूर्त जगच

आवडते. निरनिराळ्या संकल्पनांच्या विरळ वातावरणात त्याचा जीव विहरत असतो. विचारवंत आपल्या अमूर्त विचारांची सांगड जगाच्या समूर्त व्यवहाराशी घालण्यास उत्सुक असतो. म्हणून मे. पुं. रेग्यांनी एकदा म्हटले होते की, तत्त्वज्ञाचा मुक्काम साधारणपणे एखाद्या ग्रंथालयात असतो, तर विचारवंतांचा कॉफी हाऊसमध्ये असतो. त्याला चौकात येऊन जगाच्या व्यवहाराची चौकशी करण्याचा मोह फार. म्हणून सॉक्रेटिसाला विचारवंत म्हणायचे तर प्लेटोला तत्त्वज्ञ. नेहरू हे विचारवंत होते.

सतेज वृत्तीचे नेहरू राजकारणाच्या धकाधकीत पडले. त्यामुळे त्यांना आपली विचारवंत म्हणूनही भूमिका नीटशी पार पाडता आली नाही. विचारवंताला संकल्पनांच्या विरळ अमूर्त जगात मुक्काम करणे आवडले नाही तरी आपल्या विचारांचा कस वेळोवेळी पारखून घेण्याची, तो शक्य तितका वाढवून घेण्याची, गरज असतेच. म्हणून पुस्तक हे त्याचे दैवत असते. नेहरू पुष्कळदा पुस्तकांच्या संगतीत असत. कोठे प्रवासाला निघाले की, पुस्तकांचा मोठा भारा बरोबर घेतल्याखेरीज त्यांना चैन पडत नसे. पण राजकीय कार्याचा एवढा मोठा दट्ट्या त्यांच्यावर पडे की, क्वचित तो भारा उलगडलाहि जात नसे. पुढे पुढे याची त्यांना तीव्र जाणीव होई आणि खंतही वाटे. पारतंत्र्याच्या काळात तुरुंगवास त्यांची सोय करी. तुरुंगात त्यांनी अफाट वाचन केले आणि लेखनही केले. पण भारताची राज्यधुरा त्यांच्या हातात आल्यापासून ही सक्तीची फुरसतही अशक्य झाली. याचा परिणाम म्हणून की काय, किंवा याची भरपाई म्हणून की काय, ते विचारवंतांची कदर करीत.

त्यांची विचारवंतांची कदर विक्रमादित्य गुप्तासारखी केवळ गुणांची कदर नव्हती, तर हर्षवर्धनासारखी त्यात समरसता होती. त्यांनी राजधानीत किती विचारवंत गोळा केले होते ! त्यांच्यासाठी किती संस्था काढून दिल्या होत्या ! त्यांच्या वेळी साहित्यसमारोहासारखे किती समारंभ होत ! एका तत्त्वज्ञाला त्यांनी राष्ट्रपती केले तेव्हा त्यांना आत्मपूर्तीचे समाधान लाभले असेल. ते विचारवंतांना आणि विद्वानांना कसे चाहत याचे एक उदाहरण मला अल्मोड्याचे बोशि सेन यानी सांगितले होते. बोशि सेन यांनी वनस्पतिशास्त्रात काही विशेष कार्य केले होते. नेहरूंना ते समजल्याबरोबर त्यांना त्यांनी दिल्लीला बोलाविले, काही जमीन त्यांच्या हवाली केली, आणि ' जे काय प्रयोग करायचे ते कर ' असे सांगितले. विचारांच्या राज्यात आपल्याला मनमुराद विहरता आले नाही हे नेहरूंचे एक चिरंतन दुःख असे. कारण विचारांची मागणी मोठी कडक असते. त्याला सवत सहन होत नाही, आणि राजकारण ही नेहरूंच्या वैचारिकतेची जबरदस्त सवत होती.

अलाहाबाद विद्यापीठाचे प्रो. पी. ई. दस्तूर यांनी नेहरूंच्या इंग्रजीबद्दल लिहिताना त्यांच्या या उणीवेवर नेमके बोट ठेवले होते. खरे म्हणजे दस्तुरांची टीका अधिक मूलभूत होती. नेहरूंच्या इंग्रजीत स्वतंत्र प्रज्ञेची प्रतीती येत नाही अशी त्यांची टीका होती. ही प्रतीती आपल्याला गांधीजींच्या इंग्रजीत येते, असे दस्तुरांचे म्हणणे होते. गांधीजी मुळी

या जगाचे नव्हतेच. चुकून ते या आजच्या जगात जन्माला आले. त्यांची परिमाणेच वेगळी होती. अर्थात त्यांच्या उक्तीला नावीन्याचा तत्काळ स्पर्श होई. नेहरू हे या जगातले होते. तुमच्या आमच्यातले होते. या जगाची प्रचलित परिमाणे स्वीकारून जगाची सुधारणा करण्यासाठी झटत होते. प्रचलित विचार स्वीकारून नावीन्याची प्रज्ञा दाखवावयाची असेल तर या विचारविश्वाशी विलक्षण झटापट करावी लागते आणि ती करायला नेहरूंना फुरसत नव्हती. त्यामुळे त्यांच्या सहजसुंदर, नितळ, पारदर्शक इंग्रजीनेसुद्धा दस्तुरांची निराशा केली.

दस्तुरांच्या अभिप्रायाची थोडीशी आत्मीय जाणीव, परवा मी त्यांचे ‘ द डिस्कव्हरी ऑव्ह इंडिया ’ हे पुस्तक वाचले तेव्हा आली. त्या पुस्तकात अर्थात नेहरूंच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडतेच. प्रथम म्हणजे त्यांची दृष्टी. भूतकालाचा शोध घ्यायला ते निघाले, पण ज्या भूतकालाचा वर्तमानाला स्पर्श नाही त्या भूतकालात त्यांना रस नव्हता. वर्तमानकालाचे सारे चैतन्य आणि अर्थपूर्णता नेत्रात ओतून ते भूतकालाकडे पाहू लागले आणि म्हणून भूतकाल एकदम जिवंत झाला.

त्यांचे हे बुद्धाचे वर्णनच पाहा : ‘ बुद्धाची जी कल्पना मानवी दृष्टीने न्याहाळली आहे, जिला असंख्य प्रेमळ हातांनी कोरीव दगडात, स्फटिकात आणि धातूत आकार दिला आहे ती भारतीय विचारांच्या समग्र आत्म्याचे, निदान त्याच्या एका जिवंत विशेषाचे, प्रतीक आहे. कमलपुष्पावर अधिष्ठित झालेली, शांत निर्विकार मुद्रेची, मानवी इच्छा-अपेक्षांच्या पलीकडे असलेली, जगाच्या गदारोळापासून दूर गेलेली ही मूर्ती किती अगम्य, अप्राप्य वाटते ! पण या मूर्तीच्या शांतस्तब्ध अवयवांपलीकडे आपण आपली नजर नेतो तेव्हा वाटते की आहे, या मूर्तीतही भावना आहे, विकार आहे; आपल्याला ज्ञात असलेल्या साऱ्या भावनांच्या आणि विकारांच्या पेक्षाही प्रबल आणि चमत्कारिक असा ! तिचे डोळे मिटलेले आहेत, पण त्यातून कसली तरी शक्ती पाहत आहे असे वाटते. ती सारीच मूर्ती कसल्या तरी अननुभूत चैतन्याने भरलेली आणि भारलेली वाटते. मग काळाचा पडदा दूर सरकतो, आणि गौतम बुद्ध जवळ येतात. त्यांचा आवाज आपल्या कानात काही तरी सांगू लागतो. तो सांगतो की, जीवनापासून, त्याच्या संग्रामापासून, पळ काढू नका, तर शांत चित्ताने त्याला तोंड द्या. जीवनामध्ये विकासाची आणि प्रगतीची आजवरपेक्षाही अर्थपूर्ण अशी संधी पाहा.’ (द डिस्कव्हरी ऑफ इंडिया पृ. १४२–१४३)

पण या पुस्तकाने माझी थोडी निराशाच केली. विचारांचा कस मला त्यात आढळला नाही. एकाच उदाहरणाने मी हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. बुद्ध भारतात जन्मले, भारतात एकदा बौद्ध धर्माचा प्रचंड प्रसार झाला, आणि तरी सुद्धा हिंदु धर्माने – फारसा हिंसाचाराचा वगैरे अवलंब न करता त्याचा पराभव कसा केला, असा प्रश्न फ्रेंच लेखक आणि विचारवंत आन्द्रे मोलरॉं यांनी नेहरूंना एकदा केला. (भारतीयेतरांना पडणारा हा एक ठराविक प्रश्न. टोकिओ विद्यापीठाचे एमरिटस प्रेसिडेण्ट नान्बारा शिगेरू यांनी मला नेमका हाच प्रश्न विचारला होता.) नेहरूंनी काय उत्तर दिले ? प्रथम ते मोलरॉं यांच्याबद्दल आणि त्यांना हा प्रश्न का पडला असावा याबद्दलच दोन तीन परिच्छेद

लिहितात. मग ए. बी. कीथ आणि श्रीमती ऱ्हाइस डेव्हिडस् यांचे दोन उतारे देतात. नंतर पाचव्या शतकात भारतात आलेले फा-हिएन आणि सातव्या शतकात आलेले युआन-च्वांग यांची बौद्ध धर्माच्या प्रभावाबद्दल आणि त्याच्या अभावाबद्दल साक्ष काढतात. पण बौद्ध धर्माच्या अस्ताची फारशी मीमांसा करीतच नाहीत.

जी थोडीशी मीमांसा त्यांनी केली ती काय आहे ? तर हिंदू धर्माचा पूर्ण लोप कधी झालाच नव्हता. बौद्ध धर्म भारताचेच अपत्य होते. त्याचे तत्त्वज्ञान वेदान्ताच्या तत्त्वज्ञाना-पासून फारसे वेगळे नव्हते. ब्राह्मण धर्म आणि बौद्ध धर्म यांचा एकमेकांवर परिणाम झाला. पुढे शंकराचार्यांनी संन्यास धर्माची स्थापना करून बौद्ध संघाचे अनुकरण केले. विशेष म्हणजे हिंदू धर्माने बुद्धाला अवतार बनविले. नेहरूंसारख्या आधुनिक विचारवंता-कडून मी काही निराळ्या गोष्टीची अपेक्षा करीत होतो. एखादा धर्म एखाद्या समाजात पसरतो तो लोकांची काही सामाजिक आणि मानसिक गरज भागवीत असतो म्हणून. त्या दृष्टीने या प्रश्नाची चर्चा अपेक्षित होती. पण नेहरूंनी ती केली नाही.

पण ‘ भारताच्या शोधा ’कडून ‘ आत्मचरित्रा ’कडे वळा. तुम्हाला साफल्याचा एक आगळाच अनुभव मिळेल. नेहरूंचे व्यक्तित्व हे अतिशय संवेदनाशील व्यक्तित्व होते. त्याच्यावर पाश्चात्त्य शिक्षणाचे आणि भारतीय संस्कृतीचे मुबलक संस्कार झाले आणि या साऱ्यांतून एक अतिशय आशयसंपन्न असे व्यक्तिमत्त्व विकसित झाले. त्याचा मोठा प्रसन्न असा आविष्कार त्यांच्या आत्मचरित्रात दिसतो.

जीवनाला सामोरी जाण्याची नेहरूंमध्ये एक प्रचंड शक्ती होती. जीवनातले सुख-दुःखाचे, हर्षामर्षाचे, कसोटीचे, आव्हानाचे, श्रान्त आस्वादाचे, सारेच प्रसंग त्यांना सारखेच आकर्षित करीत. आयुष्याचा अनुभव ही त्यांच्या जीवनाची मूलभूत ओढ होती. जीवनापासून ते कधी पळाले नाहीत, तर प्रत्येक गोष्टीचा त्यांनी स्वीकार केला, नव्हे स्वागत केले. जीवनातला प्रत्येक अनुभव त्यांच्या मनोमंदिरात साकार झाला आणि त्याचे शब्दशिल्प त्यांनी अगदी साहजिकपणे बनविले. म्हणून स्वातंत्र्य आले तेव्हा त्यांना ‘ नियतीशी केलेल्या संकेता ’ची आठवण झाली आणि गांधींचा खून झाला तेव्हा ‘ जीवना-तला प्रकाश गेल्या ’चा प्रत्यय आला. आत्मचरित्रात याचा नितान्त साक्षात्कार होतो.

मी याची काही निवडकच उदाहरणे देतो. वसंत ऋतूत झाडांना नवनवी पालवी फुटते तशी नेहरूंच्या शैलीला कशी फुटते याचा प्रत्यय ती वाचताना येईल.

स्वतःच्या लोकप्रियतेबद्दल ते लिहितात, ‘ अशा परिस्थितीत मन अक्षत अगर अविकृत राखणारी व्यक्ती मुक्त किंवा पशू यांच्या कोटीतली असली पाहिजे. मी यांपैकी कोणत्याच कोटीत बसत नाही. ही स्तुती माझ्या डोक्यात गेली, थोडा उन्माद आला. काही विशेष हिंमत आणि सामर्थ्य मला वाटू लागले. अर्थात स्वतःकडे असे बाहेरून पाहणे कठिणच. पण मला वाटते, माझ्या वर्तनात थोडी अरेरावी शिरली, हुकूमशाहीची झाक आली.

पण माझा अहंकार फारसा वाढला असे मला वाटत नाही. मला माझ्या कर्तृत्वाची कल्पना होती, आणि मी त्या बाबतीत फारसा विनम्र नव्हतो. पण मला पक्के माहीत होते की यात असामान्य असे फारसे काही नाही. मला माझ्या दोषांचीही चांगली जाणीव होती. आत्मपरीक्षणाची संवय मला होती आणि बहुधा तिच्यामुळेच मला तोल सांभाळता आला, आणि स्वतःकडे अलिप्तपणाने पाहाता आले. सार्वजनिक जीवनाचा थोडासा अनुभव असल्यामुळे माझ्या ध्यानात आले की, लोकप्रियता पुष्कळदा अनिष्ट व्यक्तींनाच माळ घालते; ती गुणांची अगर बुद्धिमत्तेची निदर्शक असतेच असे नाही. मग मला जी लोकप्रियता मिळाली ती माझ्या गुणांमुळे की अवगुणांमुळे? खरोखर मी लोकप्रिय झालो तो का? ' (आत्मचरित्र, पृ. २०४)

गांधीजींबद्दल पं. मोतिलालजींनी उद्धृत केलेल्या कवी स्विन्बर्नच्या

Have we not men with us royal
Men the master of things ?...

या ओळी देऊन ते म्हणतात, ' संत अगर महात्मा म्हणून नव्हे तर एक मानव म्हणून गांधीजींबद्दल आपल्याला आदर वाटतो असे त्यांना सांगायचे होते. स्वतः कणखर आणि प्रबल वृत्तीच्या असलेल्या त्यांना गांधीजींतल्या शक्तिशालित्वाचे कौतुक वाटे. कारण दुबळ्या शरीराच्या या छोटया माणसामध्ये एक पोलादी सत्त्व होते. केवढयाही प्रमाथी शक्तीला शरण जाणार नाही असे काही तरी खडकासारखे होते. फाटक्या शरीराच्या आणि पंचा नेसलेल्या उघडयाबागडया अंगाच्या या पुरुषात एक असे ऐश्वर्य आणि असे राजतेज होते की लोक त्यांच्यापुढे स्वेच्छेने विनम्र होत. त्यांनी जाणूनबुजून लहानपणा आणि नम्रता स्वीकारली होती, पण त्यांच्यात एक अधिकार आणि शक्ती होती आणि त्याची त्यांना जाणीव होती. त्यांचे खोल, शांत डोळे दुसऱ्याला बांधून टाकीत आणि त्याच्या अंतरंगाचा हळूच ठाव घेत. त्यांचा स्वच्छ आणि स्पष्ट आवाज लोकांच्या अंतःकरणात शिरे आणि त्याला भावस्पर्श करी. ' (आत्मचरित्र, पृ. १२९).

आपल्या वडिलांबद्दल त्यांनी लिहिले, ' माझे वडील गांधीजींपेक्षा किती निराळे ! पण त्यांच्यातसुद्धा व्यक्तिमत्त्वाचे ऐश्वर्य आणि राजेश्वराची कळा होतीच. गांधींबाबत त्यांनी वापरलेले स्विन्बर्नचे उद्गार त्यांनाही लागू होत. त्यांची वृत्ती सौम्य नव्हती आणि दबकलेलीही नव्हती. आपल्यापेक्षा वेगळया मतांच्या लोकांची ते गांधीजींप्रमाणे गय करीत नसत. त्यांच्यात एक जाणीवपूर्व आढयता होती, आणि म्हणून ते स्वतःबद्दल आत्यंतिक निष्ठा किंवा कडवा विरोध निर्माण करीत. त्यांच्या बाबतीत तटस्थता स्वीकारणे कठीण होते. त्यामुळे ते ठोक आवडत किंवा ठोक नावडत. भव्य कपाळ, घट्ट मिटलेले ओठ आणि करारी हनुवटी अशी त्यांची मुद्रा इटलीतील वस्तुसंग्रहातल्या एखाद्या रोमन सम्राटाच्या पुतळयाच्या मुद्रेसारखी दिसे. ' (आत्मचरित्र, पृ. १३०).

ब्रिटिशांच्या लाठीमाराविषयीची त्यांची ही स्मृती पाहा – ' प्रत्यक्ष लाठीमारापेक्षा तो करणाऱ्या पोलिसांच्या, विशेषतः त्यांच्या अधिकाऱ्यांच्या, चेहऱ्यांची माझी आठवण अद्यापी

ताजी आहे. रक्तपिपासेच्या आणि शत्रुत्वाच्या भावनांनी पिसाटलेले ते चेहरे किती सहानुभूतिशून्य आणि मानवताहीन दिसत होते ! आमच्याकडच्या लोकांचे चेहरेही बहुधा असेच विद्रूप असावेत. आम्ही प्रतिकार करीत नव्हतो तरी आमची मने आणि अंतः-करणे प्रेमाने ओसंडून जात होती असे नाही. मग आमच्या चेहऱ्यांच्या सौंदर्यात भर कशी पडणार ? आणि तरी मौज अशी की, आमची एकमेकांविरुद्ध काही वैयक्तिक तक्रार नव्हती, आमच्यात काही खासगी भांडण नव्हते, आणि वैयक्तिक द्वेषाचा आमच्या संबंधांना स्पर्श नव्हता. ' (आत्मचरित्र, पृ. १८०–१).

डेहराडूनच्या तुरुंगातले हे वर्णन पाहा – ' डेहराडूनमधील वसंत फार सुंदर असतो, आणि खालच्या सपाट प्रदेशातल्यापेक्षा त्याचे येथे वास्तव्य अधिक काल असते. बहुतेक सर्व वृक्षांची हरित वसने शिशिर ऋतूने ओरबाडून नेली होती, आणि ते नागडे उघडे दिसत होते. नवल म्हणजे, आमच्या तुरुंगाच्या दारातच असलेल्या चार पिंपळांची बहुतेक सारी पाने गळून पडली. वसंताच्या आगमनापर्यंत ते तसेच रूक्ष, खडबडीत अवस्थेत उभे होते. पण वसंतवायूने त्यांच्या अंगात थोडी ऊब भरली आणि जीवनाचा नवसंदेश त्यांच्या अंतरंगात ओतला. एकाएकी त्यांच्यात एक सळसळ उठली. तशीच ती इतर वृक्षांत उठली. त्यांच्या सभोवती गुप्त घडामोडींचे एक गूढ वातावरण निर्माण झाले; आणि थोड्याच दिवसांत त्यांच्या फांद्यांवर इवलाले हिरवे कोंब उठले. ' (आत्मचरित्र, पृ. ३५४).

अधिक उतारे देण्याचे कारण नाही. नेहरूंचे व्यक्तित्व जीवनाच्या विभ्रमांना कसे सामोरे जाई याची कल्पना येण्यासाठी एवढे पुरे आहेत. पण यातही फार मोठी उत्तुंग प्रतिभा आहे असे म्हणता येणार नाही. म्हणून अनेक ठिकाणी अपेक्षितही काव्य उद्गोचर होत नाही. उदाहरणार्थ, तुरुंगात त्यांच्या पायावर चढणाऱ्या खारीच्या डोळयांतली जादू शब्दांकित होत नाही. पण याचे कारण, वाटले त्यापेक्षा अधिक लिहिण्याची त्यांची तयारी नव्हती. त्यांच्या लेखनात नितान्त प्रामाणिकपणा आहे, आणि त्यांच्या शैलीत नितळ आत्मदर्शन आहे. या आत्मदर्शनात थोडेसे तत्त्वचिंतन असते. म्हणून त्यांचे लघुनिबंधपर लेख अतिशय हृदयंगम वाटतात. त्यांचा ' मुंबईत मान्सूनचे आगमन ' अशा काही तरी नावाचा एक लेख आहे. त्यांना एका मित्राने सांगितले होते की, मुंबईत पावसाळ्याचे आगमन कडक लक्ष्मीच्या कडाक्याने होते. एका हंगामात त्यांचा मुक्काम मुंबईत होता. ते मोठया उत्सुकतेने या वर्षा-लक्ष्मीच्या कडाकेबाज आगमनाची वाट पाहत बसले. पण कडाका आलाच नाही. इतक्यात एकाने त्यांना सांगितले की मान्सूनला सुरुवात केव्हाच होऊन गेली ! One more illusion gone (आणखी एक भ्रमनिरास) असा या लेखाचा शेवट नेहरूंनी केला आहे. नेहरूंच्या शैलीचे हे मोठे सामर्थ्य आहे. पल्लेदार इंग्रजी लिहिण्याच्या काळात ते सहजसुंदर प्रासादिक इंग्रजी लिहीत. चाळीस वर्षांपूर्वीचे हे इंग्रजी आजहि ताजे वाटते. कारण नेहरूंचे अंतःकरण स्वच्छ, सुंदर, प्रसन्न आणि आधुनिक होते. अंतःकरणाचे स्फटिकदर्शन हेच त्यांच्या वाङ्मयीन गुणांचे रहस्य आहे.

७.

# जयप्रकाश नारायण

**राष्ट्रीय नेत्यांची** 'नेता' ही भूमिका बाजूला ठेवून निव्वळ माणूस म्हणून गांधी, नेहरू, जयप्रकाश यासारख्यांचा आपण विचारच करू शकत नाही — इतके त्यांचे खाजगी आणि सार्वजनिक जीवन एकात्म बनलेले असते. कित्येकदा असे वाटते की, या व्यक्तींचे सार्वजनिक जीवन ही त्यांनी धारण केलेल्या अखंड रंगभूमीवरची भूमिका असते आणि तिचा भेद करून आपण त्यांच्या अंतरंगा-पर्यंत पोहोचूच शकत नाही. कदाचित असे असेल की त्यांची ही दोन जीवने इतकी एकरूप झालेली असतात की एक संपते कोठे आणि दुसरे सुरू होते कोठे हे त्यांचे त्यांनाच कळत नसावे. पण त्यातली खरी स्थिती अशी दिसते की त्यांच्या सार्वजनिक जीवनाला त्यांच्या खाजगी व्यक्तित्वाचा भरमक्कम पाया असतो आणि त्यांचे खाजगी जीवन त्यांच्या सार्वजनिक जीवनाने प्रस्फुरित झालेले असते. संस्कारित झालेले असते.

ते काहीही असले तरी जयप्रकाशांचे सार्वजनिक जीवनच इतके पारदर्शक आहे की त्यांच्या खाजगी व्यक्तित्वाचे दर्शन घडणे फारसे कठीण पडू नये, आणि या दर्शनाने अनपेक्षित असे काही जाणवू नये.

जयप्रकाशांच्या व्यक्तित्वाचे असे काहीसे वैयक्तिक दर्शन मला अधून-मधून घडलेले आहे. १९५१ सालची गोष्ट. मी जे. पीं.बरोबर त्यांच्या कोकणच्या दौऱ्याला गेलो होतो. त्यांच्या मोटारीतूनच प्रवास केला. एकदा रस्त्यालगतच्या एका पाण्याच्या साठ्यात मुलांना डुंबताना पाहिले. पाणी घाण होते आणि या पाण्यात ही लहान मुले डुंबावी हे दृश्य जे. पीं. च्या जिवाला लागले. ते म्हणाले, " या मुलांना स्वच्छतेचे धडे कोणी दिलेलेच नाहीत. अमेरिकेत असं दृश्य दिसणार नाही. "

ते एवढे म्हणाले नि त्यांची स्मृती भूतकालात शिरली. त्यांची नजर थोडी मुग्ध झाली. आवाज ओला झाला. त्यांनी आयोवा आणि विस्कॉन्सिन विद्यापीठांतले अनुभव सांगण्यास सुरुवात केली. तेव्हा आपण गणित—विज्ञान वगैरेंच्या अभ्यासात किती गढून गेलो होतो

हे सांगितले, आणि त्या भरात, एकदा गणिताच्या परीक्षेत आपल्याला पैकीच्या पैकी मार्क मिळाल्याचे त्यांनी, एखाद्या शाळकरी विद्यार्थ्याच्या उत्साहाने, सांगितले. पण लगेच त्यांचा आवाज गंभीर झाला. ते म्हणाले, " आम्हा विद्यार्थ्यांचं यश हे खरोखर आमच्या प्राध्यापकांचं यश होतं. आम्हाला प्राध्यापकच तसे मिळाले होते. " असे म्हणून त्यांनी ऑल्बर्ट वाइज यांचा खास उल्लेख केला. हा उल्लेख करताना त्यांचा आवाज आदराने भरून आला होता. जयप्रकाश अमेरिकेत होते तेव्हा तेथे वर्तनवादाला विशेष भर आलेला होता. वॉटसननी सुरू केलेला हा विचार फोफावत होता. ऑल्बर्ट वाइज यांच्या वर्तनवादाचा उल्लेख जे. पीं.नी केला, पण लगेच थोडया ठाशीव स्वरात बजावले, " ते वॉटसनसारखे भरड वर्तनवादी नव्हते. " अमेरिकेतल्या या आठवणी सांगताना त्यांच्या आवाजाचे जे बदलते विभ्रम जाणवले ते विसरणे शक्य नव्हते.

आमची गाडी जात होती. बाजूला कोकणच्या मनोरम निसर्गाची दृश्ये उलगडत होती. मी जे. पीं.ना म्हटले, " कोकणची माणसं पोट भरण्यासाठी मुंबईला जातात, पण निवृत्त झाल्यावर कोकणात येऊन राहयचं, इथं मरायचं असा प्रत्येकाचा निश्चय असतो. " जे. पी. म्हणाले, " काही आश्चर्य नाही. हा निसर्गच त्यांना साद घालीत असेल. " जे. पी. हे म्हणाले, पण या निसर्गावर ते स्वतः आता भाळून गेले होते असे काही मला वाटले नाही. त्या रात्री आमचा मुक्काम वेंगुर्ल्याच्या डाकबंगल्यावर होता. कोकणच्या वनश्रीने विनटलेली ती टेकडी, त्या टेकडीच्या कडयावर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटांचा लयदार आवाज, तो टुमदार डाकबंगला, वरून स्रवणारा चंद्रप्रकाश आणि या साऱ्यावर पसरलेले ते दैवी विश्रब्ध वातावरण – जयप्रकाश एकदम खूष झाले आणि एकदम उत्सुक आवाजात म्हणाले, " एकदा इथं आठ दिवस येऊन राहयलं पाहिजे. " हे कधी जमणार नाही याची त्यांनाही जाणीव असली पाहिजे. पण या संदेहावर त्यांच्या उत्साहाने पूर्ण मात केली. त्या उत्साहाचे कण तेथे जमलेल्या अनेकांच्या अंतःकरणात शिरले.

जयप्रकाशांचे व्यक्तित्व इतके विमल की त्यांचे निरनिराळे ' मूड्स ' पकडणे अगदी सोपे. त्यांच्या मनाची सूक्ष्मात सूक्ष्म आंदोलने मनाला तसाच सूक्ष्म स्पर्श करून जातात.

१९५२ साली ते पुण्याला एका ' नेचर क्यूअर क्लिनिक 'मध्ये उपवास करीत होते म्हणून त्यांना भेटायला मी प्रो. रॉबर्ट नॉर्थ यांच्या बरोबर आलो होतो त्यावेळची गोष्ट. तेव्हा ते मला कमालीचे गंभीर, आत्ममुग्ध, निवृत्त वाटले होते. रॉबर्ट नॉर्थची चौकशी वगैरे त्यांनी केली, पण त्यांचे चित्त अंतरी लागलेले दिसत होते. जयप्रकाशजी मोकळे किती होऊ शकतात, ते तुम्हाला किती विश्वासात घेऊ शकतात हे मी पूर्वी अनुभवलेले होते. कोकणच्या दौऱ्याच्या अगदी शेवटी, पुणे स्टेशनवर, दिवाडकरांच्या उपाहारगृहात चहा घेताना, त्यांनी मला, श्री अच्युतराव पटवर्धन यांनी समाजवादी पक्ष व राजकारण का सोडले ते सांगितले होते. माझ्यावर त्यांनी टाकलेल्या या विश्वासाने मी स्वतःच

चकित झालो होतो. पण आता जयप्रकाश काही बोलण्याच्या मनःस्थितीत दिसलेच नाहीत. अर्थात आम्ही याची उपपत्ती त्यांच्या उपोषणामुळे झालेल्या शारिरिक अवस्थेत शोधली. पण हे बरोबर नव्हते. जयप्रकाश त्यावेळी एका मानसिक क्रांतीतून जात होते. या क्रांतीची कल्पना त्यानंतर काही दिवसांनी ‘ फ्रीडम फर्स्ट ’ या नियतकालिकात त्यांनी लिहिलेल्या ‘ द इन्सेंटिव्हज् टु गुडनेस ’ (शिवाच्या प्रेरणा) या लेखावरून आली. जयप्रकाश अद्यापपर्यंत पूर्ण भौतिकवादी होते. मार्क्सप्रणीत ‘ विरोधविकासात्मक भौतिकवादा ’वर त्यांचा विश्वास होता. या उपोषणाच्या काळात जी एक अंतःप्रेरित अंतर्मुखता त्यांना लाभली तिच्यामुळे ते आपल्या उभ्या जीवन-तत्त्वज्ञानाचाच पुनर्विचार करू लागले. याचा परिणाम म्हणून इतकी वर्षे जपलेल्या भौतिकवादाचा त्याग त्यांनी केला, आणि एखाद्या दैवी शक्तीला आवाहन केल्याखेरीज नीतिमानतेला खरा आधार मिळत नाही असा प्रतीतीपूर्वक विश्वास त्यांनी व्यक्त केला. या आमूलाग्र क्रांतीला कारण ठरणाऱ्या पुनर्विचाराच्या कालात आम्ही त्यांना भेटलो होतो, आणि म्हणून आम्हाला त्यांचे ते अंतर्मुख, आत्ममुग्ध दर्शन झाले होते.

याचाच परिणाम म्हणून त्यांनी आपले ते प्रख्यात ‘ जीवनदान ’ केले. सारे जीवन सर्वोदयाला वाहून टाकण्याची प्रतिज्ञा केली. पण जयप्रकाश इतर सर्वोदयवाद्यांप्रमाणे राजकीय घडामोडींबद्दल पूर्ण उदासीन राहू शकत नसत. विशेषतः कोठेही स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित झाला की त्यांचे अंतःकरण उलून येई. १९५६ साली हंगेरीत सोव्हिएट सत्तेविरुद्ध बंड झाले तेव्हा सोव्हिएट रशियाबद्दल अर्धे अंतःकरण धारण करणारे नेहरू गप्प बसले; तिकडे यू. एन्.मध्ये नेहरूंचा उंडारलेला प्रतिनिधी – कृष्ण मेनन – अकलेचे तारे तोडून देशाला लाज आणीत होता; हिटलरविरुद्ध पोलंडने हिंसेचे शस्त्र उगारले तेच योग्य केले असे सांगणाऱ्या गांधींचे शिष्योत्तम विनोबा भावे ब्रह्मोपासनेत मग्न होते; अशा वेळी हंगेरीच्या आत्म्याच्या आक्रोशाला भारतात वाचा फोडायला जयप्रकाश उभे राहिले. या पार्श्वभूमीवर जयप्रकाशांना मी एकदा म्हटले, “ जे. पी., आम्हाला तुमच्याकडून आणखी एक दान हवं आहे. ” “ ते कोणतं ? ” जे. पी.नी विचारले. “ तुमच्या जीवनदानाचं दान. ” यावर जे. पी. इतके खळाळून हसले की त्यांच्या विमुक्त वृत्तीचे एक अनोखे दर्शन झाले.

असे निरागस दर्शन त्यांच्या मित्रांना अनेकदा झालेले आहे. बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. जयप्रकाश पटण्याला असले आणि एखाद्या फारच निकडीच्या कामाने त्यांना धरून ठेवलेले नसले तर संध्याकाळी पाच वाजता प्रभावतीजीबरोबर फिरायला जायची त्यांची सवय होती. आज चार वाजताच त्यांची फिरायला जायची घाई सुरू झाली. ‘ प्रभा, आज फिरायला नाही जायचं ? ’ हा इशारा दोनतीनदा प्रभावतीजींच्या कानावर आला. त्यांना जरा नवल वाटले. रोज पाच वाजले तरी यांची तयारी नसायची. कोणत्या तरी वर्तमानपत्रातून, नाहीतर पुस्तकातून, अगर कागदपत्रांतून त्यांना ओढून काढायला लागायचे. पण आज यांचीच घाई. प्रभावतीजी तर चरख्यावर सूत कातीत होत्या. त्यांचा रोजचा ‘ कोटा ’

अद्याप पुरा व्हायचा होता.

अखेर त्या उठल्या. इकडे तिकडे आवरून ती दोघे घराबाहेर पडली तेव्हा प्रभावती-जींच्या ध्यानात जे. पीं.च्या आजच्या घाईचे कारण आले. जे. पीं.च्या हातात फिरायला जायची एक झकास काठी होती. पूर्वी कधी न पाहिलेली. आजच सकाळी अवधेशबाबूंनी त्यांना ती भेट दिली होती. फिरायला जायच्या काठ्यांचे जे. पीं.ना मुळातच वेड. आणि ही काठी तर त्यांना फार आवडली होती. सकाळपासून दोनचारदा हातात घेऊन त्यांनी ती आडवीतिडवी फिरविली होती. पण ती फिरायला घेऊन गेल्याशिवाय तिचे सार्थक होणार नव्हते. आणि ती घेऊन केव्हा एकदा फिरायला जातो असे त्यांना झाले होते.

याच बालकवृत्तीच्या जयप्रकाशांना मी एकदा विलक्षण रागावलेले पाहिले आहे.

तसे जे. पी. कार्यकर्त्यांवर रागावतात आणि लगेच विसरून जातात. ज्यांना 'टेबल मॅनर्स' म्हणतात त्यांचा कोणी भंग केला तरही ते रागवतात. एकदा जेवताना एकाने जरा दूर असलेली मिठाची बाटली हात लांब करून घेतली तर जे. पीं. नी त्याला लगेच फटकारले, 'तू मागितली का नाहीस ?'

पण या वेळचा त्यांचा राग काही निराळाच होता. आणि ते रागावले होते कोणावर, तर खुद्द नेहरूंवर ! त्यांचा उल्लेख त्यांनी 'दॅट मॅन' (तो इसम) असा केला.

या संतापाला कारणही तसेच घडले होते.

पटणा विद्यापीठाचे विद्यार्थी आणि कुलगुरू यांच्या दरम्यात काही झगडा निर्माण झाला होता. कुलगुरू आणि स्थानिक काँग्रेस सरकार यांची युती झाली होती, आणि पोलिसांनी गोळीबारही केला होता. त्याच सुमारास नेहरूंनी पटण्याला भेट दिली. त्यांना भेटून जयप्रकाशांनी त्यांना एवढेच विनविले की, तुम्ही विद्यार्थ्यांची बाजू एकवार ऐकून घ्या. पण नेहरूनी तसे काही न करता संध्याकाळच्या सभेत विद्यार्थ्यांवर टीकास्त्र सोडले. याचाच जे. पी.ना राग आला होता, आणि त्याचे पर्यवसान नेहरूंच्या 'दॅट मॅन' अशा उल्लेखात झाले.

जयप्रकाश नेहरूंवर इतके रागावले होते की नेहरूंना त्यानंतर लिहिलेल्या पत्रात त्यांना नेहमीप्रमाणे 'प्रिय भाई' (माय डीअर भाई) असे न म्हणता 'प्रिय महाशय' (डीअर सर) असे म्हटले होते. मायन्यातील या बदलाने नेहरू इतके व्यथित झाले की त्यांनी जे. पी.ना उलट लिहिले, 'माझ्याबद्दलच्या तुझ्या भावना जर अशाच असतील आणि माझे तुझे संबंध यापुढे जर असेच राह्यचे असतील तर तुझ्याशी पत्रव्यवहार चालू ठेवण्यात तरी काय अर्थ आहे ?' जे. पीं.नीच ही गोष्ट आम्हाला सांगितली. गढूळलेले पाणी स्वच्छ झाल्यावर त्यात जशी एक नवीनच स्वच्छता प्रतीत होते तशी त्यांच्या आवाजात प्रतीत होत होती.

पण काही वेळा राग येण्यासारखी परिस्थिती असूनही जे. पीं. च्या आवाजात रागाचा लवलेश नसे.

आचार्य कृपलानींनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजिनामा दिल्यानंतर त्या पदावर जयप्रकाश नारायणांची स्थापना करावी अशी गांधीजींची इच्छा होती. त्यांनी ही इच्छा नेहरूंपाशी व्यक्त केली. तेव्हा नेहरू म्हणाले, " कोणा तरी समाजवाद्यालाच हे पद द्यायचं असले तर आचार्य नरेंद्र देवांचा त्या पदावर किती तरी अधिक हक्क पोचतो. एक तर वयाने व ज्ञानाने ते ज्येष्ठ आहेत. शिवाय लोकमान्य टिळकांच्या काळापासून ते काँग्रेसमधे आहेत. "

गांधींचा त्या दिवशी मौनवार होता. त्यांनी पाटीवर एवढेच लिहिले की, ' नरेंद्र देव मला जयप्रकाशइतकाच प्रिय आहे. '

पण नरेंद्र देवांनी नकार दिला आणि जे. पीं.चे नाव वर्किंग कमिटीसमोर आले. तेव्हा तीन महाराष्ट्रीय नेत्यांनी त्यांना विरोध केला – बाळासाहेब खेर, स. का. पाटील आणि शंकरराव देव !

ही गोष्ट खुद्द जे. पीं.नीच मला एकदा सांगितली. एका महाराष्ट्रीयाला ते ही गोष्ट सांगत होते. पण त्यांच्या आवाजात रागाचा वा उद्वेगाचा वा विषादाचा लवलेश नव्हता.

दिल्लीला जे. पी. आमच्या फारसे कधी वाट्याला यायचे नाहीत, पण १९६० साली बर्लिन येथे जे. पी. माझ्यापाशी अगदी निवांत गप्पा मारीत बसले होते – आणि ते सुद्धा अगदी एकट्याने.

त्याचे असे झाले की आम्ही सारे ' काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम 'च्या दशवार्षिक महोत्सवासाठी जमलो होतो. जे. पी. एका दुसऱ्या हॉटेलमध्ये व्ही. आय्. पीज्.बरोबर राहत होते. त्या दिवशीच सकाळी सारे व्ही. आय्. पीज्. निघून गेले. आमचे विमान संध्याकाळी सुटायचे होते. जे. पी.ना एकटे राहायची सवयच नसावी. त्यांचा मला फोन आला, ' ये.' गेलो. काम काही नव्हते. नुसत्या गप्पा. या गप्पात जे. पीं.नी अनेक नामवंत व्यक्तींबद्दलची आपली अंतरीची मते मला सांगितली. गोष्टीवेल्हाळ जे. पीं.चे दर्शन मला त्या बैठकीत झाले.

याच्या अगदी उलट स्वरूपाचे जे. पी. मला १९७३ साली, प्रभावतीजींच्या निधनानंतर भेटले. प्रा. ए. बी. शाह आणि मी त्यांना भेटायला गेलो होतो. प्रभावतीजी गेल्यानंतर मी त्यांना प्रथमच भेटत होतो.

जे. पीं.च्या आयुष्यात प्रभावतीजींना कोणते स्थान होते याची मला कल्पना होती. माता, भगिनी, पत्नी ही तीनही नाती त्यांच्यात एकवटली होती हे मला माहीत होते. आणि तरीही त्यांच्या मृत्यूने जे. पीं. वर एवढा मोठा आघात झाला असेल याची मला कल्पना नव्हती. त्यांचा चेहरा विलक्षण विमनस्क दिसला. त्यांची हालचाल जड भासली.

एक अपरिहार्य कर्तव्य म्हणूनच ते आम्हाला भेटत होतेसे वाटले. जरा वेळाने ते शाहना म्हणाले, " मला चांगलं इंग्रजी लिहिण्यास मदत करणारी काही पुस्तकं सांगाल ? "

मी चकित झालो. मी त्यांना म्हटलंच, " हिंदुस्थानात चांगलं इंग्रजी जाणणारांत तुमची गणना होते. मेहरअलींनी तुमच्या या विशेषाचा एकदा मुद्दाम उल्लेख केला होता. ठीक आहे, पण ही चांगलं इंग्रजी लिहिण्याची काळजी कशाला ? "

विकल स्वरात ते म्हणाले, " मी आता दुसरं काय करणार ? थोडं वृत्तलेखन करावं असं म्हणतोय् मी. "

त्यांचा आवाज उदास, निराश, हताश वाटला. तो मला सर्वस्वी अपरिचित होता.

पण हेच जे. पी. पुढच्याच वर्षी मी पुण्यात पाहिले तेव्हा साफ निराळे वाटले. इंदिरा-विरोधी आंदोलनाचे विशाल नेतृत्व ते करीत होते. या आंदोलनाचा उन्माद अर्थात काडीमात्र नव्हता. पण त्यांच्या आवाजात एक संयत असा आत्मविश्वास होता. आणि त्याहून अधिक म्हणजे एक निर्धार होता.

जे. पी. कोणत्याही मनःस्थितीत असोत, शरीराच्या कोणत्याही अवस्थेस असोत, त्यांची अंगभूत सहृदयता, त्यांची मानवता, दुसऱ्याच्या परिस्थितीबद्दलचा विचार त्यांना कधी सोडून गेला नाही.

माझ्या कचेरीतील माझ्या एका सहकाऱ्याने जे. पीं.पाशी माझ्याबद्दल काही तक्रार केली होती. माझ्याकडून त्याला अन्याय होत आहे अशी त्याची भावना झाली होती. जे. पी.नी मला त्याबद्दल विचारले. जे. पीं.ना या गृहस्थांबद्दल आत्मीयता होती. जिव्हाळा होता. किंबहुना त्यांचे त्यांच्यावर भावासारखे प्रेम होते.

जे. पी.ना मी माझ्या सहकाऱ्यांना कसे वागवितो हे थोडेसे तपशीलवार सांगितले. या सहकाऱ्याला विचारल्याशिवाय एकही निर्णय मी घेतला नाही, पण काही कोठे बिघडले की, ' हा तुझा निर्णय होता ' असे तो म्हणतो, ' आपला निर्णय होता ' असे म्हणत नाही, असे एक उदाहरणही मी दिले. जे. पी. काही बोलले नाहीत. थोडे विचारमग्न झालेले दिसले. थोड्या वेळाने मी विचारले, " या सहकाऱ्याबद्दल मी काय करावं असं वाटतं तुम्हाला ? "

जे. पी. म्हणाले, " हे पहा, प्रभाकर, तू या तुझ्या सहकाऱ्याबद्दल इतक्या बाजूंनी विचार केलेला दिसतो आहे की तुला काही सांगण्याची गरज आहे असं मला वाटतच नाही. "

दुसरी आठवण, गतवर्षी ते मुंबईला आजारी असताना एक्स्प्रेस टॉवरमध्ये राहत होते तेव्हाची आहे. डॉ. पी. व्ही. मंडलिक दर दिवसाआड त्यांना पाहायला जात. एकदा मला घेऊन जा असे मी त्यांना सांगितले. त्याप्रमाणे मी अमुक दिवशी अमुक वेळी भेटायला येणार आहे असे मंडलिकांनी त्यांना दोनचारदा सांगितले होते. आणि तरी मी

येणार हे ते विसरले होते. त्यांची प्रकृती वाईट होती आणि स्मृती दगा देत होती.

मी त्याना एक पत्र पाठविले होते, ते पोचले का असे गेल्यावर बोलताना सहज विचारले. "तुला त्याची पोच मिळाली नाही ?" त्यानी विचारले. मी म्हटले, "नाही." त्याबरोबर ते आपल्या सेक्रेटरीकडे वळले आणि म्हणाले, "तू यांच्या पत्राची पोच का पाठविली नाहीस ?"

त्या आस्थेत अशी त्यांची आस्था.

पण त्याच्या आस्थेचा जो एक अनुभव मला आला आणि कमलला आला तो आम्ही कदापि विसरणार नाही.

आमच्या एकुलत्या एक मुलाचे अपघाती निधन झाले होते. त्यानंतर लवकरच जे. पी. आणि प्रभावतीजी यांचे दिल्लीत आगमन झाले. त्यांचा निरोप आला, 'संध्याकाळी येतो.'

जे. पी. आले तरी घाईगर्दीने येतील, थोडावेळ बसतील नि जातील अशी आमची कल्पना होती. दिल्लीला त्यांच्यामागे कामांचा वाघ लागलेला असे. कधी आले तरी फोन त्यांचा पिच्छा धरी.

जे. पी. प्रभावतीजींसह आले आणि म्हणाले, "आज मी तुमच्याकडे मनसोक्त बसणार आहे. सारी कामं बाजूला सारून आलो आहे."

जे. पी. दोन तास बसले.

जयप्रकाशांच्या त्या भेटीने, त्यांच्या स्नेहार्द शब्दांनी, आम्हाला जितके सावरले तितके दुसरे कशाने नाही. एक विलक्षण शक्ती देऊन प्रभावतीजी आणि ते गेले.

## ८.

**१९५३ साली विनोबांची** भूदानाची कल्पना प्रसिद्ध झाली आणि या गांधीवादी प्रतिभाविलासाने जग चकित झाले.

जमिनीचा प्रश्न हा भारतातला एक महान प्रश्न आहे. सरंजामी अवस्थेतून भारताचे आधुनिक औद्योगिक अवस्थेत जे संक्रमण होत आहे आणि या संक्रमणावस्थेत भांडवलशाहीच्या प्रगत अवस्थेत उदयास आलेल्या साम्यवादी शक्तींनी आपला जो कोलदांडा टाकला आहे त्यामुळे या प्रश्नाला एक विलक्षण रूप प्राप्त झाले आहे. त्याचे एक विद्रूप दर्शन तेलंगणात कम्युनिस्टप्रणीत शेतकरी उठावाने दिसले. अशा परिस्थितीत असंतोषाच्या आणि बंडाच्या या भडकत्या ज्वाला शमविण्याचा एक अभूतपूर्व उपाय विनोबांनी सांगितला आणि जगाला स्तिमित केले.

## विनोबा भावे

उपाय तसा समजण्यास सोपा होता आणि भारतीय प्रकृतीस अगदी धरून होता. प्रत्येकाने आपल्या जवळची शक्य तितकी जादा जमीन भूहीनांना द्यायची. भरपूर जमीन असणारांनी निदान १/६ जमीन भूदानाला द्यावी अशी विनोबांची अपेक्षा होती. या कल्पनेने गांधीवाद्यांत एक नवचैतन्य निर्माण झाले. गांधीवधानंतर हताश, हतबल झालेल्या गांधीवाद्यांना एक नवा प्रकाश दिसला.

१९४५ साली मी विनोबांना एकदा भेटलो होतो. गांधींनी पहिला सत्याग्रही म्हणून १९४० साली विनोबांना निवडल्यापासून त्यांच्याभोवती एक माहात्म्याचे अद्भुत वलय निर्माण झाले होते. आज आपण गांधीजींच्या या निवडीकडे चिकित्सक दृष्टीने पाहू शकतो. गांधीजी द्रष्टे होते, पण विद्वान नव्हते. आपल्या कार्याविष्ट विचारांचे तत्त्वज्ञान बांधण्याची त्यांची प्रवृत्ती नव्हती. ते कार्य विनोबा प्रतिभाशालित्वाने करीत. म्हणून विनोबांबद्दल गांधीजींना एक न्यूनगंड वाटत असावा आणि त्यातून त्यांची ही निवड झाली असे आपण आज म्हणू शकतो. पण तेव्हा गांधीजींकडे इतका चिकित्सेने मी तरी पाहू शकत नव्हतो. मार्क्सवादाच्या गिरिमिटाचे काही फेरे बुद्धीला पडलेले असूनसुद्धा पाहू शकत नव्हतो. विनोबां-

बद्दलच्या एका विलक्षण आदरभावनेनेच मी त्यांना भेटायला गेलो होतो. विनोबांच्या तेजस्वितेने मी भारून गेलो होतो. पण त्याही क्षणी त्यांच्या एका प्रतिपादनात थोडी बनावबुद्धी असावी असे वाटले होते. यंत्राधिष्ठित उद्योगीकरणाबद्दल मी त्यांना विचारले होते, त्याबद्दल बोलताना ते म्हणाले, ' मी उद्योगीकरणाच्या विरुद्ध नाही. मला दिल्लीला जायचं असलं तर मी विमान घेईन, आणि वैमानिकाला सांगेन की तुझं विमान फार सावकाश चालत आहे. इतकी मंदगती मला परवडणार नाही. तू तुझा वेग वाढव. पण मला येथेच कोठे तरी जायचं असेल, तर मी पायी जाईन किंवा बैलगाडीतून जाईन. मला निसर्ग पाह्यचा आहे. मला शेतकऱ्याचं जीवन पाहयचं आहे, त्याच्याशी बोलायचं आहे. ' या उत्तरात चलाखी आहे, मूळ मुद्दा डावलणे आहे, हे जरा विचार केल्याबरोबर ध्यानात येईल. पण मी तेव्हा याला फारसे महत्त्व दिले नाही.

असा अंतःकरणात कुठेतरी थोडा अंदेशा असूनसुद्धा विनोबांच्या भू-दान कल्पनेने मी भारून गेलो. जमिनीचा प्रश्न सोडविण्याचा हा अतिशय अहिंसक, आत्मस्फूर्त, सहयोगवादी, संस्कृतिसंवर्धक मार्ग आहे असे मला वाटले आणि मी या कल्पनेचा समर्थक बनलो. जयप्रकाश नारायण जेव्हा या आंदोलनात उतरले तेव्हा तर मला भूदानाबद्दल एक आत्मीयताच वाटायला लागली.

पुढे भूदान बारगळले. त्याची काही थोडी कारणमीमांसाही मी क्वचित केली. पण त्याच्या प्रणेत्याचे जे दर्शन अलीकडे, गेल्या तीन-चार वर्षांत घडले त्याला मात्र माझी तयारी नव्हती. विनोबांची अलीकडची तात्त्विक आणि व्यावहारिक चेष्टिते पाहून मी चकित झालो असे म्हणणे हीही एक विलक्षण अल्पोक्तीच. अगदी ताजेच उदाहरण पाहा. ता. २५ जून १९७८ रोजी इंदिरा गांधी आणि त्यांचे अरस प्रभृती सहकारी हे विनोबांना भेटले, त्यांच्याशी त्यांनी आपल्या कार्यक्रमाची चर्चा केली आणि त्यांचा या कार्यक्रमास आशीर्वादही मिळविला, असे वर्तमानपत्रात वाचले. पण विनोबांनी तर ' कर्ममुक्ती ' स्वीकारली होती. जगाच्या व्यवहारापासून सर्वस्वी अलिप्त राहायचे व्रत स्वीकारले होते !

गांधींच्या सर्वश्रेष्ठ अनुयायाच्या बाबतीत हा अर्थात एक विनोदच होता. गांधींवर रागावलेले लोक त्यांना हिमालयात जाऊन निवृत्त होण्याचा सल्ला देत तेव्हा ते स्वच्छ नकार देत. मी लोकांत राहून आपले कार्य करीत राहणार असा निर्धार ते व्यक्त करीत, आणि अशा प्रकारे सव्वाशे वर्षे जगण्याची हिंमत त्यांनी धरली होती.

पण ठीक आहे. विनोबा प्रतिभाशाली स्वतंत्रप्रज्ञ आहेत. ते गुरूचे आंधळे अनुकरण काय म्हणून करतील ? पण ' कर्ममुक्ती'च्या प्रतिज्ञेचे काय ? ती काही त्यांनी क्षणाच्या भरात पत्करली नव्हती. निश्चयात्मक विचारपूर्वकतेने तिचा त्यांनी स्वीकार केलेला होता. या कर्ममुक्तीचा इतिहास लहानसहान नव्हता. त्यांची गांधीजींशी पहिली भेट झाली तिला १९६६ साली पन्नास वर्षे होतात म्हणून त्यांनी ' सूक्ष्मप्रवेश ' केला होता. त्या पहिल्या

भेटीचा असा सूक्ष्मचिंतनात्मक सुवर्णमहोत्सव त्यांनी या निश्चयाने साजरा केला !

'सूक्ष्मप्रवेश' म्हणजे काय ? सूक्ष्मप्रवेश म्हणजे सार्वजनिक कार्यातून निवृत्त होणे. 'अभिध्याना'च्या म्हणजे सूक्ष्मचिंतनाच्या द्वारे कार्य घडवून आणणे. हे साधेसुधे व्रत नव्हते. विनोबांनी सूक्ष्मप्रवेश करायचे ठरविले म्हणजे पवनारचे ब्रह्मविद्यामंदिर सोडून कोठेही न जाण्याचे ठरविले. आवडत्या धार्मिक ग्रंथांचेही परिशीलन न करण्याचे ठरविले. कार्यकर्त्यांच्या पत्रांना उत्तरे न लिहिण्याचे ठरविले. वर्तमानपत्रे न वाचण्याचे ठरविले. म्हणजेच स्थूल सार्वजनिक कार्यातून निवृत्त व्हायचे ठरविले. इतकेच काय, विष्णुसहस्रनामातील ईश्वराच्या हजार संस्कृत नावांपैकी ३६० पेक्षा अधिक नावांवर हिंदी टीका लिहिण्याचा त्यांचा बेत होता तोही त्यांनी रद्द केला. एवढ्यावर भागले नव्हते. आचार्यांनी सारा पत्रव्यवहार जाळण्याचे ठरविले. म्हणजे पुरावा नष्ट करण्याचे ठरविले ! याचाच अर्थ हा 'असत्याचा प्रयोग' होता. सत्याच्या प्रयोगकर्त्याला हे केवढे ऐतिहासिक अभिवादन !

याचीच पुढची पायरी म्हणून त्यांनी, १९७४ च्या क्रिस्तजन्मदिनी, एक वर्षाच्या मौनपालनाची निश्चिती केली. १९७५ च्या क्रिस्मस रोजी मौन सुटल्यावर ते मागे गेले नाहीत. त्यांनी एक पुढचे पाऊल टाकले. त्यांनी 'कर्ममुक्ती' स्वीकारली. म्हणजे अध्यात्माखेरीज ते दुसऱ्या कोणत्याच विषयावर बोलणार नाहीत.

अशा परिस्थितीत त्यांनी ता. २५–६–७८ रोजी इंदिरा गांधींशी त्यांच्या कार्यक्रमाबद्दल चर्चा करून त्याला आशीर्वादही दिला हे काय गौडबंगाल आहे ? या गौडबंगालाचे 'अधिकृत' उत्तर १६ जुलै १९७८ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया'त मिळाले. इंदिरा गांधी आणि त्यांचे पक्षीय सहकारी यांनी आचार्य विनोबा भाव्यांशी आपल्या कार्यक्रमाची चर्चा केली नाही, आणि त्याला आचार्यांचे आशीर्वादही मागितले नाहीत, असे जाहीर करणारे, आचार्यांचे खासगी चिटणीस श्री. विजय टेंबेकर यांचे पत्रक त्या अंकात प्रसिद्ध झाले.

या पत्रकासंबंधी पहिला प्रश्न उत्पन्न होतो तो असा की हा खुलासा होण्यास इतका विलंब का ? इंदिराप्रभृतींनी आपल्या कार्यक्रमाला आचार्यांचे आशीर्वाद मिळाल्याचे नगारे लगेच बडविले होते. ते कदाचित आचार्यांनी ऐकले नसतील. पण ते कानांनी ऐकत नसले तरी डोळ्यांनी 'ऐकतात'. अर्थात आचार्य वर्तमानपत्रे वाचीत नाहीत. पण त्यांच्याभोवती वावरणारे विजय टेंबेकर प्रभृती तर ऐकतात ? त्यांनी ही गोष्ट पाटीवर लिहून ती पाटी आचार्यांना दाखविली नव्हती काय ?

पण एवढ्याने भागत नाही. टेंबेकर आपल्या पत्रकात आणखी म्हणतात, 'देवराज अरस आचार्यांना भेटायला येण्याचा बेत करीत होते, पण इंदिरा काँग्रेसचे इतर पुढारी त्यांच्याबरोबर येणार हे कुमारी निर्मला देशपांडे यांचा फोन येईपर्यंत माहीत नव्हते.' टेंबेकर यापुढे जे म्हणतात ते महत्त्वाचे आहे. 'गरिबांच्या उद्धारासाठी आणि भूमिहीनांना जमीन वाटण्यासाठी यांनी आखलेल्या योजनेवर आचार्यांचा "सल्ला" यांना हवा आहे हे ते वर्ध्यावर आल्यानंतर समजले. पण प्रत्यक्ष भेटीत त्यांनी आचार्यांशी कसल्याही कार्यक्रमाची चर्चा केली नाही अगर त्यांचा आशीर्वादही मागितला नाही.'

आता प्रश्न असा की, निर्मलाबाईंनी फोन केला तेव्हा इंदिराप्रभृती येणार एवढी कोरडी बातमी दिली काय ? समजा तशी अगदी कोरडी बातमी मिळाली तरी निर्मलाबाईंचे जे उद्योग अलीकडे दिल्लीला इंदिरागोटात चाललेले असतात ते लक्षात घेऊन विनोबांनी सावध व्हायला हवे होते की नाही ? बरे हे राहिले ! पण वर्ध्याला हा लवाजमा आल्यानंतर त्यांना आचार्यांशी कार्यक्रमासंबंधी बोलायचे होते हे माहीत असल्याचे टेंबेकर मान्यच करतात. मग आचार्यांनी त्यांची भेट द्यायचे कबूल केलेच कसे ?

टेंबेकर पुढे म्हणतात की, पूर्वीच्या अनुभवामुळे पत्रकारांना आणि पक्षीय कार्यकर्त्यांना आश्रमाच्या आवारात येऊ दिले नाही. आश्रमाच्या आवाराचा उपयोग राजकीय हेतूंसाठी होऊ नये हा याचा मुख्य हेतू होता. आता कार्यक्रमासहवर्तमान येणाऱ्या इंदिरा गांधी, देवराज अरस आणि त्यांचे सहकारी हे पक्षीय कार्यकर्ते नव्हत काय ? आणि ज्याअर्थी आचार्य विनोबांनी आपल्या कार्यक्रमास भरघोस पाठिंबा दिला आहे असे इंदिरा गांधी आणि त्यांचे सहकारी यांनी 'खोटेच' जाहीर केले, त्याअर्थी या थापेबाजांना आश्रमात पुन्हा प्रवेश नाही असे काही आचार्यांनी ठरवले आहे काय ? या 'पूर्वानुभवा'वर आचार्यांची प्रतिक्रिया काय ? तीन आठवडे उशिरा काढलेल्या या पत्रकात याबद्दल काहीच खुलासा का नाही ? बरे. 'पूर्वानुभव' एवढ्या या प्रसंगापुरताच होता असे नाही. मागे १९७७ च्या जुलैमध्ये इंदिरा गांधी विनोबांना भेटून गेल्या तेव्हा आपण आचार्यांशी फक्त वेदान्तावर चर्चा केली असे त्यांनी जाहीर केले होते. ही उघडउघड थाप होती. इंदिरा गांधींची प्रकृती आणि वेदान्त यांचे काही नाते असण्याचे कारण नाही. इंदिराजींच्या या थापेचा पत्ता आचार्यांना लागला होता की नाही ?

यातली खरी अशी स्थिती आहे की १९७४ साली श्री. जयप्रकाश नारायण यांनी इंदिरा गांधींच्या राजवटीविरुद्ध आंदोलन सुरू केल्यापासून आचार्यांच्या बुद्धीचे आणि प्रकृतीचे जे एकेक पैलू व्यक्त झाले त्यावरून आचार्य विनोबा भावे हे एक 'निराळेच प्रकरण' आहे असे आढळून आले आहे.

याचे अनेक किस्से कॅनाडचे श्री. वसंतराव नारगोलकर यांनी वेळोवेळी सांगितले आहेत. श्री. वसंतराव नारगोलकर हे आचार्यांचे एक चहाते आहेत. (भक्त आहेत असेही हवे तर म्हणावे.) त्यांनी आचार्यांवर एक स्वतंत्र पुस्तकही लिहिले आहे. त्यात त्यांचा आचार्यांविषयीचा आदर आणि प्रेम भरपूर व्यक्त होते. फक्त विनोबांनी गांधीवादाला जी एक विशिष्ट कलाटणी दिली ती त्यांना मान्य नाही. जयप्रकाश नारायणांच्या आंदोलनात त्यांची साथ जयप्रकाशांना होती. आणीबाणीविरुद्ध त्यांनी उपवासही केला होता. जयप्रकाशांच्या आंदोलनावर आणि या उपोषणावर त्यांनी ग्रंथही लिहिलेला आहे. या आंदोलनाबाबत आचार्यांशी त्यांचा तीव्र मतभेद झाला.

खरे म्हणजे जयप्रकाशांच्या आंदोलनामुळे आचार्यांचे पितळच उघडे पडायला लागले.

हे आंदोलन सुरू होईपर्यंत आचार्य हेगांधीवादाचे एकमेव प्रवक्ते होते. गांधीवाद्यांनी त्यांना एवढ्या अत्युच्च स्थानावर नेऊन बसविले होते, की आचार्य कधी कोणत्या बाबतीत चुकतील असे कबूल करण्याचीच गांधीवादी सर्वोदय कार्यकर्त्यांची तयारी नव्हती. पण सर्वोदयाच्या कार्याला यश मिळत नव्हते. भूदान–ग्रामदान–ग्रामराज्यादी घोषणांनी प्रवर्तित झालेले कार्यक्रम फसत होते. विनोबांच्या सहयोगाचे काही साधन दिसत नव्हते. १९६९ मध्ये जयप्रकाशजी म्हणाले की, ' हमे गांधीजीके पास वापस जाना होगा. ' पण विनोबांच्या सहयोगात हे बसत नव्हते. १९७४ साली जयप्रकाशांचे उग्र प्रतिकारवादी आंदोलन सुरू झाले तेव्हा विनोबा संतप्तच झाले. ते म्हणाले, ' इस बिहार आंदोलनसे होनेजानेवाला कुछ नही. ' हे आंदोलन लोकसेवकाने घेतलेल्या प्रतिज्ञेच्या विरुद्ध आहे असेही त्यांचे मत बनले. पण बहुतेक सर्वोदयवाद्यांना हे मान्य नव्हते. बहुसंख्य सर्वोदयवादी बिहार आंदोलनात सामील झाले. पण हा नुसता प्रामाणिक मतभेदाचा प्रश्न नव्हता, हे म्हणण्यास आधार आहे. ५ जून १९७४ रोजी पाटण्यात आंदोलनवाद्यांचा एक मोर्चा निघाला. या मोर्च्यावर ' इंदिरा ब्रिगेड 'च्या कार्यकर्त्यांनी एका इमारतीतून गोळीबार केला आणि २१ जण जखमी झाले. याबद्दल विनोबांना विचारले असताना ते हिंदीत उत्तरले, ' पटणामे जो कुछ भलाबुरा हुवा वो भगवानको समर्पण. ' म्हणजे पाटण्यामध्ये जे बरेवाईट झाले त्याचा निर्णय ईश्वरच करील ! हा शुद्ध निःसंगपणा होता, आणि याने शांततामूर्ती जयप्रकाशही संतापले. ते म्हणाले, ' When Vinobaji is passing the responsibility to God in a matter of such patently criminal and dastardly act, I wish he had left for His judgement other matters too connected with the movement, such as resignation of the Bihar Ministry or dissolution of the Bihar Assembly. '

बिहार चळवळ सुरू झाल्यापासून विनोबांनी इंदिरा गांधींना पक्षपाती अशी भूमिका स्वीकारली. या ' संता 'चा असा तोल का गेला ? याची एक कारणमीमांसा आचार्य दादा धर्माधिकारी यांनी ' साधना ' साप्ताहिकाच्या प्रजासत्ताकदिन (१९७८) विशेषांकात केली आहे. विनोबांची भूमिका दादांनी अशी मांडली आहे : ' सध्याच्या परिस्थितीत राष्ट्रीय राजकारणापेक्षा आंतरराष्ट्रीय राजकारणाला महत्त्व विशेष आहे. आपला देश हुकूमशाही शेजारी राष्ट्रांनी वेढलेला आहे. अशा वेळी या देशातील सरकार दुबळे होणे परवडण्यासारखे नाही. त्या संधीचा फायदा घेण्यासाठी अनेक लहानमोठे देश टपून बसलेले आहेत. म्हणून इंदिरा सरकार बलवान कसे होईल हाच प्रयत्न आपण केला पाहिजे. इंदिराजींचे परराष्ट्रीय धोरण खंबीरपणाचे व शहाणपणाचे आहे. देशाच्या अंतर्गत परिस्थितीत त्यांच्या हातून काही गंभीर चुका होत असतील – त्यातून काही गंभीर समस्याही निर्माण होत आहेत – त्या साऱ्या समस्या वाटाघाटीने सोडविण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे देशात सहयोगाचे व सद्भावनेचे वातावरण राहील. आपली भूमिका माणसे जोडण्याची असावी, तोडण्याची नसावी. म्हणून यावेळी संघर्षापेक्षा सहयोगच उपकारक ठरेल. '

इंदिरा गांधींच्या कृत्यांचे समर्थन तर करता येत नाही, पण त्यांचा बचाव तर केला पाहिजे या बुद्धीतून हा युक्तिवाद जन्मला आहे हे उघड आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात आबादीआबाद असल्यावरच राष्ट्रीय प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा, याचा अर्थ हा प्रश्न सोडविण्याचा, त्यासाठी संघर्ष करण्याचा, कधीच प्रयत्न करू नये असा होतो. आणि तोच विनोबांचा हेतू होय यात शंका नाही. कारण इंदिरा गांधीबद्दल त्यांना इतके ममत्व वाटते की त्यांचे कोणतेही अपराध पोटात घालण्याची त्यांची तयारी दिसते. याचा पुरावा त्यांनी लवकरच दिला. इंदिरा गांधींनी आणीबाणी पुकारली तेव्हा या निर्लज्ज बनावाचे वर्णन या संतबाबाने अनुशासनपर्व (म्हणजे शिस्तयुग) असे केले. श्री. वसंतराव नारगोलकर सांगतात की सहा महिन्यांच्या अवधीत त्यांचा आणीबाणीबद्दल भ्रमनिरास झाला. झाला असेल, पण तो गुप्त राखण्याची विलक्षण काळजी बाबांनी घेतलेली दिसते. कारण आणीबाणीविरुद्ध काहीही विशेष असे त्यांनी केले नाही. आचार्य परिषदेचा एक फार्स त्यांनी केला, पण इंदिराजींनी डोळे वटारताच आचार्य परिषदेची दुसरी बैठक खुंटीला अडकवून ठेवण्यात आली! खुद्द बाबांच्या 'मैत्री' नियतकालिकावर पोलिसांनी धाड घातली तेव्हा टाळ्या पिटण्याचे क्रांतिकारक कार्य तेवढे त्यांनी केले! २५ डिसेंबर १९७५ रोजी वर्षभराचे मौन सोडताना विनोबा काही तरी विशेष वक्तव्य करतील अशी आशा त्यांच्या चहात्यांनी बाळगली होती, पण या भाषणाला एखाद्या आपटबाराचीही कळा नव्हती. खरे म्हणजे या भाषणाबद्दल खुद्द विनोबांनी काही अपेक्षा निर्माण केल्या होत्या. श्री. वसंत नारगोलकर यांनी ता. १४ नोव्हेंबर १९७५ पासून उपोषण करण्याचा बेत केला तेव्हा ता. २५–१२–७५ पर्यंत वाट पाहण्याचा सल्ला विनोबांनी दिला आणि आपल्या संताळ थाटात 'धीर तो कारण। साह्य होतो नारायण' असे वचन उच्चारून दाखविले. विनोबांनी धीर धरण्याचे तेवढे कार्य या कालात व नंतर केले, त्यातून या देशाला काही लाभले नाही.

कारण विनोबांपुढे देश नव्हताच. स्वतः आणि स्वतःला वाटणारे इंदिराममत्व होते! पण येथेही दादांचे भाष्य आहेच. ते म्हणतात, 'इंदिराबाईविषयी विनोबांच्या मनात पक्षपात होता हेही म्हणणे बरोबर नाही. फार तर एवढे म्हणता येईल की, एवढ्या प्रचंड देशात एका पराक्रमी स्त्रीची राजवट चालू असताना स्त्रीशक्तीच्या विकासाकरता त्या संधीचा लाभ घेण्याची हातोटी आपल्यात असावी आणि स्त्रीशक्तीच्या विकासाचे वर्ष हे विशेष पर्व म्हणून मानण्यात यावे. विनोबा वारंवार सिरिमाओ बंदरनायके आणि गोल्डा मेयर या दोन स्त्री-पंतप्रधानांचा गौरवपूर्ण उल्लेख करीत असत. या दोन्ही पंतप्रधानांची राजवट स्त्री-शक्तीच्या वर्षातच होती. तेव्हा शक्यतो इंदिराजींना सांभाळून घ्यावे अशी दाक्षिण्याची वृत्ती विनोबांची असावी. पण त्याकरता वाटेल तो अन्याय व पक्षपात सहन करावा अशी त्यांची भूमिका नसावी.' कोणता अन्याय हा विनोबाजींच्या मते असह्य अन्याय, हे दादा धर्माधिकारींनी सांगितले असते तर बरे झाले असते. गोल्डा मेयरनी आपल्या ध्येयवादाचा पुरावा दिलेला आहे, पण सिरिमाओंच्या चारित्र्याची लक्तरे श्रीलंकेत चव्हाट्यावर मांडली

जात आहेत. ही बाई खाबूपणा, सत्ताप्रेम आणि अपत्यपक्षपात या बाबतीत इंदिरांशी तोडीस तोड आहे हे सप्रमाण सिद्ध होत आहे. दादांनी कितीही युक्तिवाद केला तरी विनोबांचे नेहरू घराण्यावरील प्रेम ही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून चव्हाट्यावर आलेली गोष्ट आहे. नेहरू-प्रेम ही गोष्ट एक वेळ समजू शकते, पण घराण्यावरील प्रेम म्हणजे अतिच झाले. पण तेही पोटात घालण्याइतकी बुद्धी मिटून घेण्याची ताकद असलेले कौतुकवीर निर्माण करण्याच्या विनोबांच्या व्यक्तित्वाचे कौतुक करायलाच हवे.

वरचा उतारा लिहून झाल्याबरोबर दादा लिहितात की 'परराष्ट्रधोरणाच्या बाबतीत विनोबांची भूमिका काहीशी साम्यवादी पक्षांच्या भूमिकेशी जुळत होती.' दादांना फक्त साम्यवादी पक्षाची आठवण झाली. त्यांना साम्यवादी तत्त्वज्ञान आणि साम्यवाद्यांचा परात्पर गुरू स्टालीन यांचीही आठवण व्हायला हरकत नाही. साम्यवादी तत्त्वज्ञान कामगारवर्गाला हव्या त्या गुन्ह्याची माफी करण्यास तयार असते, कारण त्यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे तो भविष्यकालीन विमुक्त समाजाचा साक्षी आणि निर्माता! माओने तर कामगारवर्गीय जन्म ही सर्व गुणांची जननीच गणली होती. माओच्या राजवटीत शेतकरी कामकरी वर्गांत जन्मलेल्या ठोंब्यालाही उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होता! 'तो बदमाष असेल, पण तो आमचा बदमाष आहे,' ही स्टालीनची उक्ती या वर्गीय सत्याचीच एक डोकेबाज आवृत्ती होती! विनोबांचे स्त्रीवर्गप्रेम याच्याशी मुकाबला करण्यास समर्थ आहे असे आता म्हणायलाच हवे. पण त्यांचा परराष्ट्रीय राजकारणविषयक युक्तिवादही स्टालीनचीच आठवण करून देतो. स्टालीनने – आणि त्यानंतर त्याच्या ब्रेझनेव्ह प्रभृती वारसदारांनी – असा युक्तिवाद केलेला आहे की रशियाला भांडवलशाही राष्ट्रांचे कडे पडलेले असल्यामुळे रशियात निर्घृण हुकूमशाहीची उभारणी करणे भागच आहे. त्याच चालीवर विनोबा म्हणतात की, भारताला हुकूमशाहीवादी राष्ट्रांनी वेढलेले असल्यामुळे इंदिरा गांधींच्या अत्याचारांविरुद्ध संघर्ष करता कामा नये! आहे की नाही!

पण विनोबांच्या भूमिकेस फक्त नेहरू-प्रेम अगर इंदिराममत्व कारण आहे असे मात्र मला वाटत नाही. अगदी स्पष्टच बोलायचे तर तिच्या मुळाशी जयप्रकाशांबद्दल अगर त्यांच्या भूमिकेबद्दल एक सूक्ष्म मत्सर आहे असे मला वाटते. 'जयप्रकाशजींवर माझं प्रथमपासून अगदी नितांत प्रेम आहे.' असे विनोबांनी एकदा वसंतराव नारगोलकरांना सांगितले होते. 'जयप्रकाशांच्या भूमिकेत भरपूर सत्य आहे,' असेही उत्तर नारगोलकरांच्या एका प्रश्नाला विनोबांनी दिले होते. पण नारगोलकरांनीच सांगितलेली ही आठवण पाहा. एकदा वसंतराव विनोबांना भेटायला गेले. योगायोगाने त्याच दिवशी सकाळी इंदिरा गांधी आणि संजय गांधी हे निवडणुकीत उताणे पडल्याची बातमी आली होती. ती आश्रमवासीयांनी ऐकली होती. वसंतराव नारगोलकर लिहितात, "विनोबाजींची प्रतिक्रिया काय झाली असा प्रश्न विचारता विनोबांचे चिटणीस श्री. बाळभाई यांनी

सांगितले की विनोबाजी विनोदाने उद्‌गारले, 'गाय भी गई और बछडा भी गया!' परंतु मी गेलो तेव्हा मला काही विनोबाजी आनंदात आढळले नाहीत. मी त्यांना वाकून नमस्कार केल्यावर त्यांनी नेहमीप्रमाणे माझ्यावर एकदोन विनोद केलेच. मी निवडणूक प्रचारात, गेल्या तीस वर्षांत कधी नाही तो या खेपेस भाग घेतला, हे त्यांना कदाचित समजले असेल. आता राजकारण न करता अध्यात्मकारण करा असा त्यांच्या विनोदी उद्‌गाराचा रोख होता. नंतर त्यांनी आपल्या चिटणीस कु. कुसुम देशपांडे यांना उद्देशून म्हटले 'वसंतरावांना आरती सांगा!' विनोबाजी कोणत्या आरतीचा उल्लेख करीत आहेत हे मला अगोदरच माहीत होते. 'जय देव, जय देव, जय जनार्दना!' या आरतीऐवजी आता 'जय देव, जय देव, जय जयप्रकाशा! जय जगजीवनरामा, जय जनता पक्षा...' अशी आरती म्हटली पाहिजे असे विनोबाजींनी गंमतीत म्हटल्याचे मी ऐकले होते." (महाराष्ट्र टाइम्स, ६ मे १९७७.) विनोद हा साधारणपणे कधीच निर्हेतुक नसतो. — विनोबांचा तर नसतोच. आणि म्हणूनच तो अनेकदा अगदी अभद्र ठरतो. उदाहरणार्थ, श्री. वसंतराव नारगोलकर यांनी आपल्या A Nonentity Fasts for Freedom या पुस्तकात (पृ. ५७) सांगितलेली ही आठवण पाहा. नारगोलकरांना, आपल्या विशिष्ट विनोदाच्या अस्त्राने, उपवासापासून परावृत्त करीत असताना विनोबा सौ. कुसुमताई नारगोलकरांकडे वळून म्हणाले, 'हे मेल्यावर तू सती जायचं ठरवलं आहेस काय?' असल्या अभद्र विनोदामागची बुद्धी निर्विकल्प असेल असे संभवत नाही. नारगोलकर जयप्रकाशांना मिळाले ही गोष्ट विनोबा विसरायला तयार नव्हते. जयप्रकाशांच्या चळवळीचाच एक भाग म्हणून वसंतराव उपोषण करणार या गोष्टीस क्षमा नव्हती. (ते इंदिरा गांधींच्या आणीबाणीविरुद्ध होते, याने हा अपराध द्विगुणितच होत होता.) विनोबाजी म्हणतात त्याप्रमाणे त्यांचे जयप्रकाशांवर नितांत प्रेम असते तर जयप्रकाश आसन्नमरण अवस्थेत जसलोकमध्ये पडले होते तेव्हा ते त्यांना भेटायला गेले असते की नाही? अशा परिस्थितीत गांधीजींनी काय केले असते? विनोबाजी आता सूक्ष्मात गेले आहेत असा त्यांचा बचाव त्यांचा एखादा भक्त करील. पण क्षुद्र राजकीय विनोद करण्यास त्यांची (राजकारणत्याग आणि अध्यात्मस्वीकार उद्‌घोषिणारी) कर्ममुक्ती जर आड येत नाही तर हे अर्थशून्य सूक्ष्मगमन येथे आड का यावे?

जयप्रकाशांबद्दल मत्सर वाटतो हे कोणाला पटत नसेल तर जयप्रकाशांच्या भूमिकेबद्दल वाटतो असे म्हणावे. कारण त्यांनी आपल्या संघर्षात गांधीजींच्या भूमिकेचे जे पुनरुज्जीवन केले आणि बहुसंख्य सर्वोदयवाद्यांची त्याला जी अनुमती मिळविली तो विनोबांचा एक प्रचंड पराभव होता आणि हा पराभव त्यांच्या अंतःकरणात सलत असणार.

महात्मा गांधींचे महान शिष्य म्हणून विनोबा भावे पुढे आले. १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहासाठी विनोबांची प्रथम निवड करून खुद्द गांधींनीच ते आपले शिष्योत्तम

सांगितले की विनोबाजी विनोदाने उद्गारले, ' गाय भी गई और बछडा भी गया ! ' परंतु मी गेलो तेव्हा मला काही विनोबाजी आनंदात आढळले नाहीत. मी त्यांना वाकून नमस्कार केल्यावर त्यांनी नेहमीप्रमाणे माझ्यावर एकदोन विनोद केलेच. मी निवडणूक प्रचारात, गेल्या तीस वर्षांत कधी नाही तो या खेपेस भाग घेतला, हे त्यांना कदाचित समजले असेल. आता राजकारण न करता अध्यात्मकारण करा असा त्यांच्या विनोदी उद्गाराचा रोख होता. नंतर त्यांनी आपल्या चिटणीस कु. कुसुम देशपांडे यांना उद्देशून म्हटले ' वसंतरावांना आरती सांगा ! ' विनोबाजी कोणत्या आरतीचा उल्लेख करीत आहेत हे मला अगोदरच माहीत होते. ' जय देव, जय देव, जय जनार्दना ! ' या आरतीऐवजी आता ' जय देव, जय देव, जय जयप्रकाशा ! जय जगजीवनरामा, जय जनता पक्षा...' अशी आरती म्हटली पाहिजे असे विनोबाजींनी गंमतीत म्हटल्याचे मी ऐकले होते. " (महाराष्ट्र टाइम्स, ६ मे १९७७.) विनोद हा साधारणपणे कधीच निर्हेतुक नसतो. – विनोबांचा तर नसतोच. आणि म्हणूनच तो अनेकदा अगदी अभद्र ठरतो. उदाहरणार्थ, श्री. वसंतराव नारगोलकर यांनी आपल्या A Nonentity Fasts for Freedom या पुस्तकात (पृ. ५७) सांगितलेली ही आठवण पाहा. नारगोलकरांना, आपल्या विशिष्ट विनोदाच्या अस्त्राने, उपवासापासून परावृत्त करीत असताना विनोबा सौ. कुसुमताई नारगोलकरांकडे वळून म्हणाले, ' हे मेल्यावर तू सती जायचं ठरवलं आहेस काय ? ' असल्या अभद्र विनोदामागची बुद्धी निर्विकल्प असेल असे संभवत नाही. नारगोलकर जयप्रकाशांना मिळाले ही गोष्ट विनोबा विसरायला तयार नव्हते. जयप्रकाशांच्या चळवळीचाच एक भाग म्हणून वसंतराव उपोषण करणार या गोष्टीस क्षमा नव्हती. (ते इंदिरा गांधींच्या आणीबाणीविरुद्ध होते, याने हा अपराध द्विगुणितच होत होता.) विनोबाजी म्हणतात त्याप्रमाणे त्यांचे जयप्रकाशांवर नितांत प्रेम असते तर जयप्रकाश आसन्नमरण अवस्थेत जसलोकमध्ये पडले होते तेव्हा ते त्यांना भेटायला गेले असते की नाही ? अशा परिस्थितीत गांधीजींनी काय केले असते ? विनोबाजी आता सूक्ष्मात गेले आहेत असा त्यांचा बचाव त्यांचा एखादा भक्त करील. पण क्षुद्र राजकीय विनोद करण्यास त्यांची (राजकारणत्याग आणि अध्यात्मस्वीकार उद्घोषिणारी) कर्ममुक्ती जर आड येत नाही तर हे अर्थशून्य सूक्ष्मगमन येथे आड का यावे ?

जयप्रकाशांबद्दल मत्सर वाटतो हे कोणाला पटत नसेल तर जयप्रकाशांच्या भूमिकेबद्दल वाटतो असे म्हणावे. कारण त्यांनी आपल्या संघर्षात गांधीजींच्या भूमिकेचे जे पुनरुज्जीवन केले आणि बहुसंख्य सर्वोदयवाद्यांची त्याला जी अनुमती मिळविली तो विनोबांचा एक प्रचंड पराभव होता आणि हा पराभव त्यांच्या अंतःकरणात सलत असणार.

महात्मा गांधींचे महान शिष्य म्हणून विनोबा भावे पुढे आले. १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहासाठी विनोबांची प्रथम निवड करून खुद्द गांधींनीच ते आपले शिष्योत्तम

असल्याचे जगजाहीर केले. दुसऱ्या क्रमांकाचा सत्याग्रही म्हणून गांधींनी नेहरूंना निवडले होते. पण नेहरू गांधीवादी कधीच नव्हते, आणि गांधीजींच्या विचारप्रणालीशी असलेले आपले मतभेद नेहरूंनी कधी लपवूनही ठेवले नव्हते. आणि तरी गांधींनी त्यांना आपले राजकीय वारस केले. नेहरू गांधींच्या राजकीय कार्याचे वारस ठरले आणि विनोबा गांधीजींच्या यतिधर्माचे वारस ठरले. गांधीवाद म्हणून जी नवीन विचारप्रणाली आणि कार्यप्रणाली गांधींनी आपल्या चिंतनाने आणि वर्तनाने बांधली त्याचे वारसदार विनोबा ठरले. निदान सर्वोदयवाद्यांनी त्यांना तसे मानले. १९४८ साली गांधीजींच्या हत्येनंतर सेवाग्रामला जे एक संमेलन भरले त्यात गांधीजींचे कार्य चालविण्यासाठी ‘ सर्वोदय समाज ’ नावाची एक व्यापक संघटना स्थापन करण्यात आली. गांधीजींनी स्थापन केलेला चरखा संघ, हिंदुस्थानी तालिमी संघ, ग्रामोद्योग संघ वगैरे संस्थांचे विलीनीकरण करून त्यातून सर्वसेवासंघ नावाची संस्था स्थापण्यात आली. या संस्थेतर्फे विनोबांच्या भूदान, ग्रामदान, ग्रामस्वराज्य इत्यादी कार्यांची जबाबदारी स्वीकारण्यात आली. भूदान हा मुळी गांधीवादी विचारसरणीचा आणि जीवनसंस्कृतीचा प्रतिभाशाली अविष्कार मानण्यात आला. ग्रामदान वगैरे गोष्टी म्हणजे याच आविष्काराच्या पुढल्या अवस्था मानण्यात आल्या. विनोबाजी हे गांधीजींचे संस्कारित अवतार मानण्यात आले.

पण यात एक गोम होती. आपण गांधीजींच्या पावलावर पाऊल टाकून जात आहोत असे खुद्द विनोबांना वाटत नव्हते. याचे वर्णन मी श्री. वसंत नारगोलकर यांच्या शब्दात करू इच्छितो. कारण वसंतरावांचा विनोबांशी मतभेद असला तरी ते त्यांना महान संतपुरुष मानतात. ‘ ग्यानबा-तुकारामाप्रमाणे विनोबांचे नाव व विनोबांचे वाङ्मय जन-मनावर बरीच शतके प्रभाव पाडीत राहील. ’ याबद्दल त्यांना तिळमात्र शंका नाही. (महाराष्ट्र टाईम्स ११ सप्टेंबर १९७७.) विनोबांच्या विचारांचे ते विकृतीकरण करतील असा संभव नाही. वसंतराव लिहितात, ‘ गांधीजीप्रमाणेच – किंबहुना गांधीजींपेक्षा काकण-भर अधिकच – विनोबांची जीवनदृष्टी अध्यात्मावर आधारलेली आहे, आणि त्यानुसारच ते सर्वोदयी आंदोलनाबाबतची ध्येयधोरणे ठरवीत असतात.

‘ त्यांच्या स्वतःच्या जीवनात तर अध्यात्म ओतप्रोत भरलेले आहेच. परंतु समाजातही ते ‘ ब्रह्मविद्येचा सुकाळ ’ करू इच्छितात. त्यांच्या या वृत्तीची गांधीजींनंतरच्या सर्वोदयी चळवळीवर घनदाट अशी छाया पडली. याचा एक परिणाम असा झाला की, राजकीय प्रश्नांत, विशेषतः पक्षीय राजकारणात, विनोबाजींना आणि सर्वोदयनिष्ठांना सिद्धान्ततः आणि प्रत्यक्षातही मुळीच रस राहिला नाही. आजच्या पक्षाधारित आणि सत्ताभिलाषी राजकारणाऐवजी (पार्टी ॲण्ड पॉवर पॉलिटिक्स) ग्रामदान आणि ग्रामस्वराज्याच्या कार्यक्रमांच्या द्वारा लोकनीतीचा – जनाधारित, जनाभिमुख अशा एक नवीन प्रकारच्या सेवाकांक्षी राजकारणाचा आणि विकेंद्रित लोकशाहीचा – विचार जनतेपुढे मांडण्याचेच काय ते ‘ राजकारण ’ विनोबाजी–जयप्रकाशजी आणि देशातील शेकडो सर्वोदयी कार्यकर्ते यांनी पंधरा वीस वर्षे केले. विधायक कार्यक्रमाबरोबरच गांधीजींचा असहकार, सत्याग्रह,

निरोधन, उपवास आदी प्रत्यक्ष अहिंसक प्रतिकारात्मक आंदोलनावर भर असे. पण विनोबाजींनी तर सत्याग्रह जवळजवळ निषिद्धच ठरवून टाकला.

'ते स्वतःला सत्यग्राही म्हणवितात. आता नुकत्याच त्यांच्याशी झालेल्या चर्चेच्या वेळीही त्यांनी एका कागदावर लिहिले, 'तुम्ही आहात सत्याग्रही, बाबा आहे सत्य-ग्राही' गांधीजींच्या विचारांचा व कृतींचा आधार घेऊन जो अहिंसात्मक का होईना, पण प्रतिकारात्मक आंदोलने करण्यावर भर देतो तो 'सत्याग्रही' आणि भिन्न भिन्न मतातील सत्यांश तटस्थपणाने ग्रहण करून जो आपली विचारसरणी आणि कार्यक्रम शासनाच्या आणि जनतेच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करतो तो 'सत्यग्राही' असा हे दोन शब्द वापरताना स्थूलमानाने त्यांचा आशय असतो.' (महाराष्ट्र टाइम्स, २५ डिसेंबर १९७५.)

आणखी एका लेखात श्री. नारगोलकर लिहितात, 'शंकराचार्यांनी गीतेचा अर्थ संन्यासपर लावला. लोकमान्य टिळकांनी "निष्काम कर्मयोग" हे गीतेचे रहस्य उलगडून दाखविले आणि आधुनिक काळाला अनुसरून मोठ्या सूचकपणे ते "जनतान्मने श्रीशाय" अर्पण केले. बोले तैसा चाले या आदेशानुसार भारताच्या स्वराज्यासाठी सार्वजनिक सेवारूपी "निष्काम कर्मयोगाचे" त्यांनी स्वतः जन्मभर आचरण केले आणि गीतासंदेशानुसार ब्रिटिशांशी सतत संघर्ष केला. गांधींना गीतेत "अनासक्तियोग" आढळला, तर विनोबांनी गीतेतल्या साम्ययोगावर भर दिला. गांधींच्या अहिंसक प्रतिकारापेक्षा (नॉनव्हायोलंट रेझिस्टन्सपेक्षा) दुष्ट व्यक्तीला किंवा अन्याय करणाऱ्याला योग्य चिंतन करण्याच्या बाबतीत अहिंसक साह्य (नॉनव्हायोलंट असिस्टन्स टु द ईव्हल-डुअर इन राइट थिंकिंग) करण्याची कल्पना त्यांनी अनेक वेळा मांडली आहे. गांधींच्या उपवासात किंवा अन्य सत्याग्रह-प्रकारात आत्मक्लेशाचा किंवा संख्याबलाचा दबाव (कोअर्शन) असे; ही एक प्रकारची हिंसाच आहे; म्हणून केवळ लोकशिक्षणाने, हृदयपरिवर्तनाने किंवा बुद्धिपरिवर्तनानेच व जनशक्तीच्या द्वारा क्रांती झाली पाहिजे या दृष्टिकोणातून त्यांनी भूदान-ग्रामदान आंदोलन चालविले.' (महाराष्ट्र टाईम्स, ११ सप्टेंबर १९७७.)

विनोबांचे भूदान-ग्रामदान फसले. क्रांतीच्या विनोबाप्रणीत विचारसरणीचा आणि आचारसरणीचा फज्जा उडाला. या अपयशाचे स्वतः जयप्रकाशांनीच सुरेख वर्णन केले आहे. आपल्या Towards Total Revolution च्या चौथ्या खंडात जयप्रकाश नारायण म्हणतात, 'Looking back I feel there were several mistakes committed by Vinoba and all of us who followed him. For instance, we accepted whatever kind of land, whether cultivable or uncultivable, that was donated by the landowners, This led to colossal self deception on our part, sometimes knowingly, sometimes unknowingly. Another mistake made was ( that ) we were satisfied with mere collection of dan patras and fulfilling targets fixed by Vinoba. The task of actual redistribution of the collected land was left over to a later date or left hopefully to the political parties, mainly the

Congress, that had supported the movement, and to the government itself. Vinobaji and all of us who were working with him moved on to gramdan, which involved the revolutionary principle – land belonged to the community and the individual farmer was entitled only to its use. Unfortunately here also we were content with collecting dan patras... I still believe, had Vinoba remained in the field and persisted in having the pledges (the dan patras) carried out at the ground level a non-violent agrarian revolution would have been consummated, opening the way for a total non-violent revolution, ' ( pp-190–1 )

जयप्रकाशांच्या या उताऱ्यात एक गर्भितार्थ आहे. दानपत्रांतली आश्वासने पूर्ण होण्याचा आग्रह विनोबांनी धरायला हवा होता असे ते म्हणतात. याचा अर्थ असा होतो की जे नुसते पोकळ आश्वासने देत होते त्यांच्याविरुद्ध अहिंसक सत्याग्रहासारख्या मार्गाचा अवलंब करायला हवा होता. ' आपण गांधीजींच्या मार्गाकडे परत जायला हवं होतं ' असे जे उद्‌गार जयप्रकाशांनी १९६९ मध्ये काढले होते त्याचा अर्थ हा होतो. पण विनोबांना हे कसचे रुचते ? जयप्रकाश राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय राजकारणावर बोलत व तिबेटपरिषदे-सारखे प्रपंच करीत त्याने भूदानाच्या शिस्तीत भंग होतो अशी तक्रार विनोबा करीत. जयप्रकाशांनी भूदानात सत्याग्रहाचा अवलंब केला असता तर त्यांनी त्यांचा धिःकारच केला असता. बिहारआंदोलनाला त्यांचा जो विरोध होता त्याचे तात्त्विक अधिष्ठान हेच होते. यात गांधीजींच्या सत्याग्रह मार्गाकडे मागे जाणे होते. जयप्रकाश खरोखर गांधी-वादाचे अस्सल पुनरुज्जीवन करीत होते. गांधीवादाचे सखोल चिंतन करून ज्या यतिधर्माचा मार्ग आचार्य जावडेकरांनी सांगितला – म्हणजे मी राजकारण करीन पण सत्ता स्वीकारणार नाही; लोकसंग्रह व त्यांच्याद्वारे प्रतिकार करीन पण हिंसा करणार नाही, असा जो गांधीवादी यतिधर्म जावडेकरांनी सांगितला त्याचाच नेमका अवलंब जयप्रकाश करीत होते. तेच नेमके विनोबांना नको होते. आपण गांधीवादाची नवनिर्मिती केली असा जो अहंकार विनोबांना होता त्याची फजिती भूदान–ग्रामदानात झाली, आणि बिहारआंदो-लनाच्या रूपाने गांधीप्रणीत सत्याग्रहाचे पुनरुज्जीवन होऊन विनोबांच्या अपयशाचा प्रयोग शास्त्रशुद्ध रीतीने सिद्ध होत होता. हा आपला पराभव आहे हे न कळण्याइतके विनोबा मूर्ख किंवा विमुक्त नाहीत. श्री. वसंतराव नारगोलकरांनी १९७७ च्या निवडणुकीनंतर विनोबाना म्हटले, ' आप की दिल्ली की विल्ली हार गयी !... इस चुनावमें आप हारे है और जयप्रकाशजी जीत गये है ' विनोबा अप्रसन्न चेहऱ्याने म्हणाले, ' हारे को नाम हरि-नाम. ' (जो हरतो त्याला हरीचे नाव.) आता अशा फालतू कोटया करीत बसण्याची पाळी विनोबांवर आली आहे. आणि जेव्हा फालतू कोटया नसतील तेव्हा ' भुट्टोना फाशी देऊ नका, पवनारला पाठवा. मी त्यांना कुराण शिकवीन ' अशा ' इस्से भी जादा ' सूचना ! ही सूचना भुट्टोपर्यंत पोचून त्याची प्रतिक्रिया समजली असती तर तो विनोबांवर एक लक्षणीय शेरा ठरला असता.

१.

## गो. ग. आगरकर आणि वा. म. जोशी

'एका पुरुषाच्या मृत्यूमुळे सार्वजनिक जीवनातील शुचिता आणि सत्त्वशीलता नष्ट झाल्याचा भास, पूर्वी आगरकरांच्या मृत्यूच्याच वेळी, झाला होता' असे उद्गार मी वामनराव जोशीं-वरील मृत्युलेखात (१९४३) काढले तेव्हा काहींना त्या उद्गारांचे आश्चर्य वाटले. आगरकरांच्या मृत्यूला अठ्ठेचाळीस वर्षे झाली. गेल्या अठ्ठेचाळीस वर्षांत आगरकरांच्या योग्यतेचा दुसरा कोणी श्रेष्ठ पुरुष महाराष्ट्रात होऊन गेलाच नाही की काय, असा सवाल त्यांनी मला केला आणि टिळक–राजवाडे प्रभृतींची एक उज्ज्वल नामावलीही मला सादर केली. ही नावे माझ्याही स्मृतिपटलावर तरळत होती, पण वामनरावांकडे मी सत्त्वशीलतेच्या दृष्टीने पहात होतो आणि त्या दृष्टीने आगरकरांखेरीज इतका थोर पुरुष माझ्या दृष्टिपथात खरोखरच आला नाही. पण आगरकर–जोशींच्या सत्त्वशीलतेच्या दृष्टीने मी महाराष्ट्रातील इतर (दिवंगत आणि विद्यमान) थोर पुरुषांकडे नजर टाकतो तेव्हा मन थोडेसे प्रश्नात्मक होते. श्रेष्ठत्वाचे अनेक आदर्श महाराष्ट्रांत गेल्या पन्नास वर्षांच्या अवधींत दिसले. त्यांनी निर्मिलेला महाराष्ट्राचा इतिहास अनेक दृष्टींनी स्फूर्तिदायक आहे. फुले, रानडे, टिळक, गोखले, राजवाडे ही नावे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात सदैव तेजाने तळपत राहातील. पण सत्त्वशीलतेच्या व्यापक अर्थाने आगरकर व वामनराव हे या थोर पुरुषांपेक्षाही काही विशेष होते असे मला वाटते. अर्थात आगरकरांच्या थोर स्मृतीस ही कृतज्ञ मान्यता अद्याप लाभलेली नाही. आजमितीस आगरकरांचे एकही उज्ज्वल असे स्मारक महाराष्ट्रात नाही (मुलींचे 'आगरकर हायस्कूल'ही एक संस्था याला अपवाद वाटेल; पण मुलींची स्वतंत्र शाळा हे आगरकरांचे स्मारक की विटंबना?) ही एकच गोष्ट हे विधान सिद्ध करण्यास पुरेशी आहे. आगरकरांच्या स्मृतीची अशी अनुचित अवस्था महाराष्ट्राने केली असली तरी खुद्द टिळकांची या आपल्या पूर्वस्नेहयाबद्दल अशी भावना नव्हती. आगरकरांचे श्रेष्ठत्व टिळक

मनोमन जाणून होते आणि या साधुपुरुषावरील टीकेने आपण आपली लेखणी वादाच्या भरात का होईना पण केव्हा तरी विटाळली होती याचे शल्य त्यांच्या अंतकरणात सलत असावे असे वामनराव जोशींनीच लिहिलेल्या एका आठवणीवरून वाटते. वामनराव तेव्हा ' मराठ्या 'चे संपादक होते. एका शनिवारी रात्री अकरा बाराच्या सुमारास ते प्रुफे तपासण्यासाठी ऑफिसमध्ये गेले असता टिळक तेथे आले. इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलता बोलता आगरकरांबद्दल गोष्टी निघाल्या – आणि वामनराव लिहितात, ' आगरकरांच्या जुन्या आठवणी जागृत झाल्यावर सहसा भावनावश न होणारे टिळक थोडेबहुत देहभान विसरले.... आगरकरांचें आणि त्यांचें वर्तमानपत्रात किती जरी वाकडें दिसलें तरी टिळकांच्या हृदयाच्या अगदी आतल्या गाभ्यांत आगरकरांविषयीं प्रेम व आदर याशिवाय दुसऱ्या कशाला स्थान असतें तर त्यावेळी ते माझ्याशीं ज्या रीतीनें, ज्या स्वरांत, ज्या कळकळीनें, ज्या उमाळयानें बोलत होते तसें बोलणेंच शक्य नव्हतें. टिळकांना मी त्या वेळेपर्यंत भावनावश झालेलें कधीं पाहिलेलें नव्हतें. पण त्यावेळीं त्यांचें हृदय उचंबळून आलेलें दिसलें व त्या हृदयानें डोळ्यांच्या द्वारें आपल्या दिवंगत सवंगड्याला जलदान केलें. हें जलदान म्हणजे एका दिग्विजयी वीरानें आपल्या तुल्यबल विरोधकाच्या सत्त्वशील स्मृतीला दिलेले अर्घ्यच होय ! "

वामनरावांची आगरकरांशी केलेली ही तुलना कित्येकांना असमर्पक वाटेल, कारण आगरकर आणि वामनराव यांच्या व्यक्तित्वांत खरोखर फार फरक आहे. दोघेही तपस्वी खरे, पण एकाचे तेज अगस्ति ऋषींच्या तेजाप्रमाणे प्रखर होते तर दुसऱ्याचे वशिष्ठांच्या सौम्य शांत तेजाची आठवण करून देते. आगरकरांच्या झुंजार जीवनाचे अवलोकन केले, म्हणजे त्यांच्या रूपाने क्षात्रतेजच पृथ्वीवर अवतरले आहे की काय असे वाटते. वामनरावांत ब्राह्मतेजाचाच साक्षात्कार अधिक होतो. दोघांनीही दारिद्र्याशी जन्मभर झगडा केला. या झगड्याला वाजवीहून अधिक महत्त्व त्यांनी कधी दिले नाही. स्थितप्रज्ञाच्या अलिप्ततेने त्यांनी दारिद्र्याचा स्वीकार केला. पण याही बाबतीत आगरकरांचे क्षात्रतेज मधूनमधून उसळया मारीत असे, हे त्यांनी होळकरांच्या देणगीचे प्रकरण उद्‌भवले तेव्हा, ' असला मत्सरानें विटाळलेसा पैसा मी विष्टेसमान मानतो ' असे उद्‌गार काढले तेव्हा दिसून आले. वामनरावांच्या वृत्ती अशा तीव्र झाल्याचे कधी ऐकिवात नाही. दोघांच्या वृत्तींतील हा फरक त्यांच्या ध्येयसाधनेच्या कार्याचा विचार करताना पदोपदी जाणवतो. लेखन हे दोघांच्याही जीवनकार्याचे प्रधान साधन होते. पण आगरकर लेखणीचा उपयोग शस्त्राप्रमाणे करीत, तर वामनरावांनी तिचा उपयोग, शस्त्रवैद्याच्या उपकरणाप्रमाणे केला. आगरकरांनी ' सुधारक ' सुरू केल्यावर सनातनी शूरांनी दंडेलीच्या व दादागिरीच्या जोरावर तो बंद पाडण्याच्या धमक्या ऐकविल्या तेव्हा आपली लेखणी खड्‌गाप्रमाणे परजीत आगरकरांनी लिहिले, ' कोण स्वस्थ बसणार ? सुधारक

अं ! टांकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल आणि तीं वाचण्यास एक इसम तरी तयार असेल तोंपर्यंत तरी हें स्त्रैण कर्म सुधारकास स्पर्श करूं शकणार नाही.' असे उद्गार काढण्याची वामनरावावर कधी वेळ आली नाही. याचे परिस्थितिभेदाइतकेच वृत्तिभिन्नता हे कारण होते. वामनरावांचे वाङ्मय हे खड्गाच्या चकमकींत उडालेल्या स्फुल्लिंगांनी तेजाळलेले नाहीच. त्याची दीप्ती निरंजनाच्या स्नेहशीतल ज्योतीची दीप्ती आहे. आगरकरांची वृत्तीच युयुत्सू – संग्रामाला आव्हान देणारी होती. उलटपक्षी, वामनरावांची वृत्ती समेटसाधक – शांततेचे आवाहन करणारी होती. झुंजार वृत्तीमुळेच आगरकरांनी सार्वजनिक जीवनात झगड्याला पाचारण केले. येथे मला ' मेस्मनच्या हातच्या भाताचे प्रकारण आठवते. प्रो. जिन्सीवाले व टिळक हे सनातन्यांचे खरे पुढारी नव्हत, या मुद्याची चर्चा करताना आगरकरांनी टिळकांना उद्देशून, ' ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिऊन व स्टेशनवरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेस्मनच्या हातचा भात व बिस्किटें झोडून शंकराचार्यांशी वर्दळ घालीत बसण्यात कांही अर्थ नाहीं ' असा टोमणा दिला व बदनामीच्या फिर्यादीचा प्रसंग ओढवून घेतला. आगरकरांनी हे विधान अखेरीस मागे घेतले; पण त्यासाठी रावसाहेब रानड्यांना त्रागा करून सार्वजनिक जीवनांतून निवृत्त होण्याची धमकी द्यावी लागली. रानड्यांनी आपली पुण्याई अशा विपरीत रीतीने येथे खर्च केली नसती तर कोल्हापूर–प्रकरणात जोडीने तुरुंगात गेलेले हे तेजस्वी पुरुष बदनामीच्याच खटल्यात वादीप्रतिवादी म्हणून कोर्टात हजर झाले असते ! उलटपक्षी, वामनरावांनी असले फिर्यादीचे प्रसंग – स्वतःवर भेसूर अन्याय झाला असतानाही – टाळले. सिंधहैदराबादच्या तुरुंगातून त्यांची सुटका झाल्यावर तेथील बेवकूफ पोलीसांनी त्यांना स्टेशनवर अटक केली आणि त्यांच्यावर तुरुंगातून पळाल्याचा आरोप करून त्यांना यथेच्छ चोपून काढले. तरी देखील वामनरावांनी या अत्याचाराविरुद्ध कोर्टात दाद मागितली नाही. अद्यापही ही हकीकत ऐकली म्हणजे उद्वेग वाटतो. पण उसाच्या कांड्याने निमूट मार खाणाऱ्या रामदासांच्या सोशिक वृत्तीने तो सारा छळ वामनरावांनी सहन केला.

आगरकरांचे क्षात्रतेज, सिंहाचे दात मोजणाऱ्या दुष्यंतपुत्र भरताच्या तेजाप्रमाणे, अगदी बालवयातच व्यक्त झाले. त्यांचा स्वभाव हूड होता. दांडगाईचे खेळ खेळण्याची त्यांना आवड होती. एकदा पेरू काढण्यासाठी ते झाडावर चढले असता, एका वानरपुत्राने त्याना ऐन झाडावरच गाठले, पण आगरकरांनी तेथे, त्याच्याशी दोन हात करून, त्याला पळवून लावले. त्यांच्या अंगी सभाधीटपणाही बराच होता. या सभाधीटपणाचे कौतुक करणारे अमृत श्रीपत नागपुरकर नावाचे एक मुन्सफही तेव्हा कऱ्हाडला होते. ते दर रविवारी एक सभा भरवून, जे कोणी मुलगे निबंध आणतील त्यांतल्या चांगल्या निबंधाच्या लेखकास रुपया दोन रुपयांची बक्षिसे देत असत. आगरकर ही बक्षिसे अनेकदा मिळवीत. त्याच वेळी तेथे आबासाहेब जोशी नांवाचे एक तापट स्वभावाचे मामलेदार होते. मुन्सफांना विरोध करणे हा त्यांच्या स्वभावाचा स्थायी भाव झाला होता. एके दिवशी आगरकरांच्या निबंधाची मुन्सफांनी खूप तारीफ केली. ताबडतोब मामलेदार

गरम झाले आणि, ' असला निबंध लिहिण्याचे मुलांच्या अंगी कसलं सामर्थ्य ? ती कोणाकडून तरी लिहून आणत असतील झाले ! ' असे त्यांनी उद्‌गार काढले. त्याबरोबर दहबारा वर्षे वयाचे आगरकर खाडकन् उठले आणि, ' आताच्या आता, मामलेदारसाहेब सांगतील त्या विषयावर निबंध लिहून दाखविण्यास तयार आहे ' असा त्यांनी सणसणीत जबाब दिला. अशी त्यांची तेजस्विता त्या अल्पवयातही होती. ' मी आपल्यासारखा एम. ए. झालो तरच नावाचा आगरकर ' हे त्यांनी गुरुवर्य महाजनींना अकोल्यास भर वर्गात दिलेले उत्तर तर प्रसिद्धच आहे. वामनरावांकडून अशा आख्यायिकांची आपण अपेक्षाच करीत नाही.

आगरकर–वामनरावांच्या वृत्तीतील या फरकाचा त्यांच्या विचारशीलतेवर खूप परिणाम झाला. मला वाटते, आगरकर वामनरावांपेक्षा अधिक बहिर्मुख होते. वामनरावांच्या स्वभावात अंतर्मुखता अधिक होती. याचाच परिणाम असा झाला की, आगरकर तत्त्वनिष्ठ प्रचारक झाले तर वामनराव हे तत्त्वजिज्ञासु अभ्यासक झाले; आणि आगरकर जसे कोणत्या तरी ' वादा 'च्या भोवती वावरताना आढळतात तसे वामनराव कधीच आढळले नाहीत. आगरकरांनी मिल्–स्पेन्सर यांच्या व्यक्तिवादाचा जन्मभर पुरस्कार केला तर वामनरावांना मार्क्सच्या कम्युनिझम्पासून ड्युईच्या इन्स्ट्रुमेंटयालिझम्पर्यंत एकही वाद पूर्णतः मान्य नव्हता. आगरकर एका निश्चित वादाचे उपासक असल्यामुळे, त्यांच्या वृत्तीत तर्ककर्कशता नसूनही त्यांच्या लेखनात ती कोठे कोठे आढळते. त्यांची हीच तर्ककर्कशता आपणास मान्य नव्हती, अशा अर्थाचे विवेचन, टिळकांनी, ' आगरकरांची श्राद्धतिथी ' या आपल्या लेखात, १९१६ साली, केले होते. अर्थात मिल्‌चा व्यक्तिवाद विकसनशील होता, आणि भारतीय आर्यत्वाची मोहिनी आगरकरांवर असल्याने आपल्या समाजाला या वादाची तत्त्वे लावताना त्यांनी त्याचा विकास केलाही. ' दत्तकाची आवश्यकता ' या लेखात तर त्यांचे विचार समाजवादी झालेले आढळतात. कोणाही मनुष्याचा आपल्या संपत्तीवर नैसर्गिक हक्क असतो हे विधान त्यांनी या लेखात खोडून काढले आहे. संपत्ती ही समाजाकडून प्राप्त झालेली असते, आणि अखेरीस समाजाला ती काढून घेण्याचा हक्क आहे, अशा अर्थाचे त्यांचे ते विवेचन आहे. एकंदरीत आगरकरांच्या व्यक्तिवादाचे स्वरूप अत्यंत उदार आणि म्हणून अतिशय विकसनशील होते. पण अशा एखाद्या विकसनशील ' वादा 'च्या कक्षेत वामनराव कधी सापडले नाहीत. ते ' वादा 'च्या पलीकडे होते, कारण त्यांना दरेक वादातला सत्त्वांश ग्राह्य वाटत होता. मला वाटते, आगरकर थोडेसे अधिक अंतर्मुख असते तर त्यांची वृत्ती अशीच ' वादनिरपेक्ष ' झाली असती. कारण विरोधकांच्या वृत्तीतला सत्त्वांश पाहण्याची अभिजात उदारता त्यांच्या ठिकाणी भरपूर प्रमाणात होती. पण आगरकरांचे व्यक्तित्व वामनरावांच्या व्यक्तित्वाहून वेगळे होते आणि तेच येथे प्रभावी ठरले.

आगरकर–वामनरावांच्या व्यक्तित्वातील भेदामुळे अर्थात त्यांच्या लेखनशैलीतही फरक पडला आहे. माझे मित्र प्रो. वि. ह. कुलकर्णी यांनी 'अर्वाचीन मराठी वाङ्मय-सेवक' या पुस्तकात (पृ. २३) आगरकरांच्या भाषासरणीला खवळलेल्या सागराची उपमा दिली आहे. ते म्हणतात, 'समुद्राच्या पृष्ठभागावरून एकामागून एक झपाट्याने झोकावत जाणाऱ्या लांबच लांब लाटांप्रमाणे त्यांच्या वाक्यपंक्ती, सागराच्या अफाटपणाची व अगाधत्वाची आठवण करून देणारे त्यांचे लेखनातील अर्थगौरव व विचारगांभीर्य, फेसाळलेल्या लाटांच्या गतीलाही मागे टाकणारा त्यांच्या भाषासरणीतला ओघ आणि आवेश, वडवानलालाही चटका बसेल असा त्यांच्या शब्दातील दाहकपणा, इत्यादी गुणसमुच्चयामुळे आगरकरांची लेखनपद्धती ओजस्वी आणि प्रभावशाली झाली आहे. आगरकरांचे शब्द-भांडारही रत्नाकराचीच जाणीव करून देते.'

आगरकरांच्या भाषासरणीला खवळलेल्या सागराची उपमा दिली तर मला वाटते, वामनरावांच्या भाषाशैलीला सरितेच्या प्रसन्न प्रवाहाची उपमा देता येईल. सरितेच्या प्रवाहात ज्याप्रमाणे सौंदर्याचे नवनवे दर्शन होत असते त्याप्रमाणे वामनरावांच्या वाङ्मयात सौंदर्याची नवनवीन प्रतीती येत असते. सरितेचा प्रवाह ज्याप्रमाणे ठिकठिकाणी आपले रूप पालटीत जात असतो त्याप्रमाणे वामनरावांच्या वाङ्मयातील भावनाविष्कारही आपले रूप पालटीत वाहत असतो. सरितेच्या पात्रात ज्याप्रमाणे नवनवे झरे उगम पावून क्षणभर आपल्या बाललीलांचे हृदयंगम प्रदर्शन करतात आणि मातेच्या प्रवाहात मिळून जातात त्याप्रमाणे वामनरावांच्या लेखनात विनोदाचे नवे नवे झरे दृग्गोचर होतात आणि अखेरीस त्या लेखनाशी एकरूप होऊन जातात. सरितेच्या निर्मळ प्रवाहात ज्याप्रमाणे काठावरच्या जीवनाची आणि वरच्या ढगांनी रंगलेल्या आकाशाची सुंदर सुंदर प्रतिबिंबे आढळतात त्याप्रमाणे वामनरावांच्या वाङ्मयात सुंदर सुंदर भावनांची व कल्पनांची प्रतिबिंबे आढळून येत असतात आणि सरितेचा प्रवाह जसा अखंडपणे सागराकडे चाललेला असतो त्याप्रमाणे वामनरावांच्या वाक्सरितेचा प्रवाह तत्त्वज्ञानाकडे चाललेला असतो; व अखेर तत्त्वदर्शनातच त्याची परिणती होते. वामनरावांच्या लेखनात सागराची विशालता यदाकदाचित न आढळली तरी सरितेची विविधता खास आढळेल. सागराची भव्यता न दिसली तरी सरितेची भावमधुरता खास दिसून येईल. आणि सागराची गंभीरता कुणाला कदाचित नच जाणवली तरी सरितेची गतिमानता खात्रीनेच जाणवेल.

आगरकर–वामनरावांच्या वृत्तीतील आणि वाङ्मयातील हा फरक सोडला तर त्यांच्या व्यक्तित्वांत एक मूलभूत साम्य होते. ते म्हणजे ते दोघेहि सत्त्वशील होते. दोघांच्याही जीवनात पहिला प्रत्यय सात्त्विकतेचा येतो. दोघांच्याही जीवनात झऱ्याची सजीव प्रसन्नता आढळून येते. दोघांचीही आयुष्ये हे सार्वजनिक कार्यांचे उदात्त आदर्श होते. दोघांनीही ज्ञानप्रसाराच्या पवित्र कार्याला निरपेक्ष सेवाबुद्धीने वाहून घेतले होते. दोघांनीही

त्यागाच्या दीप्तीने महाराष्ट्राचे जीवन उजळले होते. दोघेही माणुसकीवर मनापासून प्रेम करणारे होते. मानवतेचे प्रबोधन आणि मानवजातीचा उद्धार हे दोघाचेही अंतिम ध्येय होते. दोघेही त्यांच्या स्वतःच्या दृष्टीने अजातशत्रू होते. त्यांनी कधी कोणाचा मत्सर केला नाही, द्वेष केला नाही, दुःश्वास केला नाही. ते कोणालाही शत्रू लेखीत नव्हते. आगरकरांनी सुधारकातून विरोधकांवर इतके प्रखर हल्ले केले, पण त्यांच्या एकाही परिच्छेदाला वैयक्तिक द्वेषाचा दर्प कधी आला नाही. लोकमान्य टिळकांनी, आगरकरांचा समाचार घेताना, आपल्या लेखणीचे कठोर पवित्रे अनेकदा टाकले, पण आगरकरांनी टिळकांचा उल्लेख बहुधा अभिजात प्रेमळपणानेच केलेला आढळून येईल. फर्ग्युसन कॉलेजातून टिळकानी राजिनामा दिल्यावर, थोड्याच दिवसांनी, ‘सार्वजनिक विषयावर वादविवाद करण्याच्या मिषाने खाजगी द्वेषाचे उट्टे काढण्याची संधी क्वचितच मिळते.’ असे एक वाक्य केसरीत आले. हे वाक्य वाचून आगरकरांचे अंतःकरण विद्ध झाले. या विद्ध अंतःकरणाने त्यांनी ‘महाराष्ट्रीयांस’ उद्देशून ते ‘आनवृत पत्र’ लिहिले. मराठीतील अमर लेखनाचा हे पत्र एक नमुना आहे. या पत्रात आगरकर लिहितात, ‘जोंपर्यंत आपण आपल्या विचारांच्या विजयासाठीं व प्रसारासाठीं भांडत आहो असे प्रत्येकाच्या मनांत वागत राहील तोंपर्यंत न्यायसभेंत पक्षकाराचें भांडण भांडणाऱ्या वकिलांच्या दिखाऊ वैरापलीकडे अशा दोन व्यक्तींचें वैर जाईल असें आम्हास वाटत नाहीं व आगरकर आणि टिळक यांच्या वैराचें स्वरूप याहून भयंकर नाहीं असें निदान त्यांपैकी एकाला तरी वाटत आहे. तसेंच या वैरामुळें त्या दोघांच्या व्यासंगात जें अंतर पडलें आहे तें कमी न होता कदाचित अधिकच होत जाण्याचा जरी संभव आहे, तरी जेव्हां खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांत पाणी येण्यासारखी गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस व जव्हां टिळकांच्या घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल तेव्हां आगरकरांस विशेष वाईट वाटून डोळ्यांस पाणी येईल; व मतभेदामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल!’ दुर्दैवाने आगरकरांच्या हयातींत हे उद्‌गार खरे ठरण्याचा प्रसंग आला नाही. पण आगरकरांच्या मृत्यूनंतर, टिळकानी, ‘गेल्या पांच सहा वर्षांत त्यांच्या व आमच्या दरम्यान असलेला मतभेद लोकांपुढें बराच आलेला आहे. पण मृत्यूचें स्वरूप इतकें उग्र व भयंकर आहे कीं, त्यामुळें बारीकसारीक गोष्टी विसरून जाऊन, प्रथमतः दृढनिश्चयानें त्यांनी व आम्ही कांही विशिष्ट लोकोपयोगी कार्यें करण्याचें मनांत आणलें व त्यानंतर तीं कार्यें सिद्धीस नेण्यास एक-दिलानें घरीं, दारीं, कारागृहीं जे बेत व उद्योग केले त्यांचें तीव्र स्मरण पुनः पुन्हा जागृत होऊन आमची बुद्धी व लेखणी गोंधळून जाते’ असे हृदयभेदक उद्‌गार, एकीकडे उपरण्याने डोळे पुशीत पुशीत, काढले. कधीही भावनाभराच्या आधीन न होणारे टिळक आगरकरांच्या स्नेहस्मृतीस अश्रूंचे अर्घ्यप्रदान करायला कसे तयार असत हे वामनरावांनीच वर्णिले आहे. खुद्द वामनराव अजातशत्रू म्हणून प्रसिद्ध होते. ते कोणाला शत्रू मानीत नव्हते; त्यांना कोणी शत्रू म्हणून लेखीत नव्हते.

हे औदार्य, ही उदात्तता अभिजात सत्त्वशीलतेमुळे निर्माण झाली हे तर खरेच, पण त्याचे इतकेच विलोभनीय दर्शन झाले याचे कारण दोघांच्याही ठिकाणी उत्कृष्ट प्रकारची विनोदबुद्धी होती हे होय. महाराष्ट्राच्या विनोदी लेखकांत आगरकर–वामनरावांची गणना कोणी करीत नाही. आपल्या लेखनातला विनोद सहसा कोणी पहात नाही अशी, आपल्या अभिजात ऋजुतेने, तक्रार करताना वामनराव ' विचार-लहरी ' ( पृ. ५४ ) या आपल्या पुस्तकात म्हणतात, " माझ्या लिखाणांत कोठें कोठें सूक्ष्म व सौम्य विनोद आहे असें मला आपलं वाटतं. पण पुष्कळांना तसं वाटत नाहीं. विनोदाची चर्चा चालली म्हणजे माझं नाव कोणीच घेत नाही...अगदी खरी गोष्ट अशी आहे कीं मराठींत धंदेवाईक विदुषकाचं सोंग घेतलं तरच सामान्यतः विनोद ओळखू येतो असं दिसतं...माझ्या या म्हणण्यात परनिंदेचा भाग नाहीं, आत्मस्तुतीचा थोडासा असल्यास तो मानवी दोष म्हणून क्षम्य समजावा. आणि सगळयांत उत्तम गोष्ट म्हणजे मला हंसावं ! आणि वाटलं तर असा उद्‌गार काढावा की, गडकऱ्यांच्या भावबंधनांत इंदु का बिंदु प्रभाकरपंतांना विचारते, ' सुंदर लोकांमध्ये, प्रभाकरपंत, आमची पण गणना करता ना तुम्ही ? ' तशापैकी वामनरावांची अवस्था झाली आहे. " आगरकरांची विनोदी लेखकांत गणती होत नसली तरी त्यांची विनोदी वृत्ती अधिक प्रसिद्ध आहे. याचे कारण त्यांचा, विनोद विदुषकी होता असे मला सुचवावयाचे नाही. त्यांच्या वेळी मराठी विनोदाने विदूषकाच्या ' कोल्हाट उड्या ' मारण्यास सुरवात केली नव्हती. पण आगरकरांच्या व वामनरावांच्या विनोदांत फरक आहे. वामनरावांचा विनोद शांत, सौम्य, सूक्ष्म, सभ्यतेच्या अगदी सनातनी मर्यादाही न ओलांडणारा असा, खानदानी कुलवधूप्रमाणे होता; आगरकरांचा विनोद आजच्या सुशिक्षित, काव्यात्म, शृंगारसाजाची आवड असलेल्या कॉलेजकन्येप्रमाणे होता. एकाची विनोदवृत्ती ही रागिणीप्रमाणे शालीन होती तर दुसऱ्याची उत्तरेप्रमाणे सुसंस्कृत, पण तडफदार होती. आगरकरांच्या युयुत्सू वृत्तीमुळे त्यांच्या विनोदाला अनेकदा प्रखर उपहासाचे स्वरूप प्राप्त होई. आयुष्याच्या अखेरीस वृत्तींना थोडीशी समधातता प्राप्त झाल्यावर दोघांच्याही विनोदाला बरेचसे सारखे स्वरूप आले होते असे मृत्युपूर्वीच्या त्यांच्या विनोदवचनांवरून दिसते. आगरकरांना दम्याची दुष्ट व्यथा होती. दम्यावर मात करण्यासाठी त्यांनी अक्षरशः अनेक औषधें घेतली. याला उद्देशून ते एकदा म्हणाले ' या दम्यासाठीं इतकीं औषधें माझ्या पोटांत गेलीं आहेत की, मी मेल्यावर माझें पोट जर एकाद्या वैद्यानें ठेवून घेतलें तर त्याच्या हातांत एक दवाखाना आल्यासारखें होईल ! ' वामनरावांचे उद्‌गार ऐन अंतकालचे आहेत. शेवटी त्यांना ऑक्सिजनवर ठेवले होते. ऑक्सिजनची नळी त्यांच्या नाकाला लावलेली होती. तिला उद्देशून ते डॉ. भालेरावांना म्हणाले, ' आता ही वेसण एकदा काढा की – काही उपयोग नाही तिचा ! ' जीवनातील प्रत्येक गोष्टीप्रमाणे मृत्यूचे स्वागत देखील आगरकर–वामनरावांनी हसत-खेळत केले !

आणि याचे कारण ते स्थितप्रज्ञ होते. त्यांचे जीवन कर्मयोग्याचे होते, ' करीकर '-वाद्याचे नव्हते. जीवनकार्य संपल्यावर शरीराचा पांगुळगाडा रखडत-खरडत ओढीत जाणे

त्यांच्या निरामय वृत्तीस मुळीच मानवले नाही. मृत्यूची गोष्ट निघाली म्हणजे आगरकर म्हणत, 'आता मी मरणाला तयार आहे. मला लोकांना जे सांगायचं होतं ते मी सांगून टाकलं आहे.' असेच उद्गार, पण अधिक कलात्मक रीतीने, ता. ११-१२-४२ रोजी सौ. सुधा जोशी यांना लिहिलेल्या पत्रात वामनरावांनी काढले होते. त्यांनी लिहिले होते, 'वाङ्मयीन कार्य करा, असे तुम्ही इतरांप्रमाणे लिहिले नाही, हे उपकारच आहेत. कारण आता असले कार्य होणे कठीण आहे. लोकानी अपेक्षा कराव्यात व आपण त्या पुऱ्या करू शकत नाही ही जाणीव थोडीशी दुःखद. पण मी reconcile झालेलो आहे. तांबे कवींच्या मधुघटाप्रमाणे माझा मधुघट रिकामा झालेला आहे. ही गोष्ट केव्हा तरी व्हायचीच होती. ती झाली. ह्यांत दुःख कसले करावयाचे ? मोठे शब्द वापरावयाचे म्हणजे "अवतारकृत्य संपले" असे म्हणावे.' आगरकर-वामनराव दोघांनीही अगदी समाधानवृत्तीने जगाचा निरोप घेतला. आगरकरांच्या मृत्यूच्या आदल्या दिवशी त्यांनी एक जबरदस्त रेचक घेतले होते. त्याने त्यांचा अगदी शक्तिपात झाला. आप्तमंडळी अतिशय घाबरून गेली. पण आगरकर शांत होते. रात्री ते शौचाला जाऊन आले व सौ. यशोदाबाईंना म्हणाले, 'मला थोडं बरं वाटतं आहे. मी निजतो. तुम्हीही निजा' म्हणून आगरकर जाऊन झोपले ते पुनः उठलेच नाहीत. अगदी शांतवृत्तीने ते मृत्यूच्या स्वाधीन झाले. वामनरावांनी मृत्यूपूर्वी चार दोन क्षण चहा मागितला होता (असे म्हणतात) यात काही लोकाना जीवनासक्तीचा आढळ झाला. 'जीवन म्हणजे चहा' (सर्व अर्थांनी) अशी प्रामाणिक समजूत असणारांना तसे वाटणे साहजिकच आहे. पण अखेरच्या चारसहा महिन्यांत त्यांच्या निकटवर्तीयांना जो अनुभव आला त्यावरून त्यांची जीवनेच्छा मावळली होती व म्हणून त्यांनी अगदी संतोषाने जीवनाचा निरोप घेतला असावा असेच अनुमान काढणे भाग पडते.

आगरकर आणि वामनराव हे दोघेही आधुनिक महाराष्ट्राचे थोर ऋषी होते. महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनाचे उद्बोधन करण्यासाठी दोघांनीही स्वतःचा देह चंदनाप्रमाणे झिजविला. महाराष्ट्राची विचारसंपदा वाढविण्यासाठी दोघांनीही आपल्या बुद्धिमत्तेचा अविरत उपयोग केला. महाराष्ट्रात सद्विचार, सद्भावना, सुजनता आणि सहृदयता यांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी लेखणी अक्षय चालविली. आगरकरांवर परप्रत्ययनेयत्वाचा आणि वामनरावांवर संशयवादाचा आरोप आला. भारतीय आर्यत्वावर आगरकरांची किती श्रद्धा होती, भारतीय वाङ्मयाचा आणि कलाकौशल्यांचा त्यांना किती अभिमान होता, भारतातील रम्य स्थळांचा आणि स्मृतींचा उल्लेख त्यांनी वेळोवेळी किती प्रेमभराने केला होता, परकीयांचे उसने विचार त्यांनी आत्मप्रत्ययाच्या अग्नीत कसे विशुद्ध करून घेतले होते, हे ज्यांना माहीत आहे ते आगरकरांवरील या सवंग आरोपाची योग्य ती उपेक्षा

हे औदार्य, ही उदात्तता अभिजात सत्त्वशीलतेमुळे निर्माण झाली हे तर खरेच, पण त्याचे इतकेच विलोभनीय दर्शन झाले याचे कारण दोघांच्याही ठिकाणी उत्कृष्ट प्रकारची विनोदबुद्धी होती हे होय. महाराष्ट्राच्या विनोदी लेखकांत आगरकर–वामनरावांची गणना कोणी करीत नाही. आपल्या लेखनातला विनोद सहसा कोणी पहात नाही अशी, आपल्या अभिजात ऋजुतेने, तक्रार करताना वामनराव 'विचार-लहरी' (पृ. ५४) या आपल्या पुस्तकात म्हणतात, "माझ्या लिखाणांत कोठें कोठें सूक्ष्म व सौम्य विनोद आहे असें मला आपलं वाटतं. पण पुष्कळांना तसं वाटत नाहीं. विनोदाची चर्चा चालली म्हणजे माझं नाव कोणीच घेत नाही...अगदी खरी गोष्ट अशी आहे कीं मराठींत धंदेवाईक विदुषकाचं सोंग घेतलं तरच सामान्यतः विनोद ओळखू येतो असं दिसतं...माझ्या या म्हणण्यात परनिंदेचा भाग नाहीं, आत्मस्तुतीचा थोडासा असल्यास तो मानवी दोष म्हणून क्षम्य समजावा. आणि सगळयांत उत्तम गोष्ट म्हणजे मला हंसावं! आणि वाटलं तर असा उद्गार काढावा की, गडकऱ्यांच्या भावबंधनांत इंदु का बिंदु प्रभाकरपंतांना विचारते, 'सुंदर लोकांमध्ये, प्रभाकरपंत, आमची पण गणना करता ना तुम्ही?' तशापैकी वामनरावांची अवस्था झाली आहे." आगरकरांची विनोदी लेखकांत गणती होत नसली तरी त्यांची विनोदी वृत्ती अधिक प्रसिद्ध आहे. याचे कारण त्यांचा, विनोद विदुषकी होता असे मला सुचवावयाचे नाही. त्यांच्या वेळी मराठी विनोदाने विदूषकाच्या 'कोल्हाट उडया' मारण्यास सुरवात केली नव्हती. पण आगरकरांच्या व वामनरावांच्या विनोदांत फरक आहे. वामनरावांचा विनोद शांत, सौम्य, सूक्ष्म, सभ्यतेच्या अगदी सनातनी मर्यादाही न ओलांडणारा असा, खानदानी कुलवधूप्रमाणे होता; आगरकरांचा विनोद आजच्या सुशिक्षित, काव्यात्म, शृंगारसाजाची आवड असलेल्या कॉलेजकन्येप्रमाणे होता. एकाची विनोदवृत्ती ही रागिणीप्रमाणे शालीन होती तर दुसऱ्याची उत्तरेप्रमाणे सुसंस्कृत, पण तडफदार होती. आगरकरांच्या युयुत्सू वृत्तीमुळे त्यांच्या विनोदाला अनेकदा प्रखर उपहासाचे स्वरूप प्राप्त होई. आयुष्याच्या अखेरीस वृत्तींना थोडीशी समधातता प्राप्त झाल्यावर दोघांच्याही विनोदाला बरेचसे सारखे स्वरूप आले होते असे मृत्युपूर्वीच्या त्यांच्या विनोदवचनांवरून दिसते. आगरकरांना दम्याची दुष्ट व्यथा होती. दम्यावर मात करण्यासाठी त्यांनी अक्षरशः अनेक औषधें घेतली. याला उद्देशून ते एकदा म्हणाले 'या दम्यासाठीं इतकीं औषधें माझ्या पोटांत गेलीं आहेत की, मी मेल्यावर माझें पोट जर एकाद्या वैद्यानें ठेवून घेतलें तर त्याच्या हातांत एक दवाखाना आल्यासारखें होईल!' वामनरावांचे उद्गार ऐन अंतकालचे आहेत. शेवटी त्यांना ऑक्सिजनवर ठेवले होते. ऑक्सिजनची नळी त्यांच्या नाकाला लावलेली होती. तिला उद्देशून ते डॉ. भालेरावांना म्हणाले, 'आता ही वेसण एकदा काढा की – काही उपयोग नाही तिचा!' जीवनातील प्रत्येक गोष्टीप्रमाणे मृत्यूचे स्वागत देखील आगरकर–वामनरावांनी हसत-खेळत केले!

आणि यांचे कारण ते स्थितप्रज्ञ होते. त्यांचे जीवन कर्मयोग्याचे होते, 'करीकर'-वाद्याचे नव्हते. जीवनकार्य संपल्यावर शरीराचा पांगुळगाडा रखडत-खरडत ओढीत जाणे

त्यांच्या निरामय वृत्तीस मुळीच मानवले नाही. मृत्यूची गोष्ट निघाली म्हणजे आगरकर म्हणत, ' आता मी मरणाला तयार आहे. मला लोकांना जे सांगायचं होतं ते मी सांगून टाकलं आहे. ' असेच उद्गार, पण अधिक कलात्मक रीतीने, ता. ११-१२-४२ रोजी सौ. सुधा जोशी यांना लिहिलेल्या पत्रात वामनरावांनी काढले होते. त्यांनी लिहिले होते, ' वाङ्मयीन कार्य करा, असे तुम्ही इतरांप्रमाणे लिहिले नाही, हे उपकारच आहेत. कारण आता असले कार्य होणे कठीण आहे. लोकानी अपेक्षा कराव्यात व आपण त्या पुऱ्या करू शकत नाही ही जाणीव थोडीशी दुःखद. पण मी reconcile झालेलो आहे. तांबे कवींच्या मधुघटाप्रमाणे माझा मधुघट रिकामा झालेला आहे. ही गोष्ट केव्हा तरी व्हायचीच होती. ती झाली. ह्यांत दुःख कसले करावयाचे ? मोठे शब्द वापरावयाचे म्हणजे " अवतारकृत्य संपले " असे म्हणावे.' आगरकर-वामनराव दोघांनीही अगदी समाधानवृत्तीने जगाचा निरोप घेतला. आगरकरांच्या मृत्यूच्या आदल्या दिवशी त्यांनी एक जबरदस्त रेचक घेतले होते. त्याने त्यांचा अगदी शक्तिपात झाला. आप्तमंडळी अतिशय घाबरून गेली. पण आगरकर शांत होते. रात्री ते शौचाला जाऊन आले व सौ. यशोदाबाईंना म्हणाले, ' मला थोडं बरं वाटतं आहे. मी निजतो. तुम्हीही निजा ' म्हणून आगरकर जाऊन झोपले ते पुनः उठलेच नाहीत. अगदी शांतवृत्तीने ते मृत्यूच्या स्वाधीन झाले. वामनरावांनी मृत्यूपूर्वी चार दोन क्षण चहा मागितला होता (असे म्हणतात) यात काही लोकांना जीवनासक्तीचा आढळ झाला. ' जीवन म्हणजे चहा ' (सर्व अर्थांनी) अशी प्रामाणिक समजूत असणारांना तसे वाटणे साहजिकच आहे. पण अखेरच्या चारसहा महिन्यांत त्यांच्या निकटवर्तीयांना जो अनुभव आला त्यावरून त्यांची जीवनेच्छा मावळली होती व म्हणून त्यांनी अगदी संतोषाने जीवनाचा निरोप घेतला असावा असेच अनुमान काढणे भाग पडते.

आगरकर आणि वामनराव हे दोघेही आधुनिक महाराष्ट्राचे थोर ऋषी होते. महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनाचे उद्बोधन करण्यासाठी दोघांनीही स्वतःचा देह चंदनाप्रमाणे झिजविला. महाराष्ट्राची विचारसंपदा वाढविण्यासाठी दोघांनीही आपल्या बुद्धिमत्तेचा अविरत उपयोग केला. महाराष्ट्रात सद्विचार, सद्भावना, सुजनता आणि सहृदयता यांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी लेखणी अक्षय चालविली. आगरकरांवर परप्रत्ययनेयत्वाचा आणि वामनरावांवर संशयवादाचा आरोप आला. भारतीय आर्यत्वावर आगरकरांची किती श्रद्धा होती, भारतीय वाङ्मयाचा आणि कलाकौशल्यांचा त्यांना किती अभिमान होता, भारतातील रम्य स्थळांचा आणि स्मृतींचा उल्लेख त्यांनी वेळोवेळी किती प्रेमभराने केला होता, परकीयांचे उसने विचार त्यांनी आत्मप्रत्ययाच्या अग्नीत कसे विशुद्ध करून घेतले होते, हे ज्यांना माहीत आहे ते आगरकरांवरील या सवंग आरोपाची योग्य ती उपेक्षा

करतील. वामनरावांनी स्वतःच्या संशयाबद्दल स्वतःच सुंदर उद्गार काढले आहेत. आपल्या टीकाकाराना उद्देशून ते म्हणतात, 'मीं त्यांना (म्हणजे वाचकांना व विद्यार्थिनींना) एकही निश्चित स्वरूपाचा विचार दिला नसला आणि अमुकच भावना श्रेष्ठ असा निर्णय त्यांच्यामध्यें उत्पन्न केलेला नसला, पण त्यांच्यामध्यें मीं जर सद्विचार करण्याची व ओळखण्याची, तसेंच सद्भावनांनी प्रेरित होण्याची व त्यांची मूल्यमीमांसा करण्याची शक्ति निर्माण केलेली असली, तर मला धन्यता वाटेल.'

'आगरकर–वामनरावांनी' लोकांसाठी स्वतः विचार केला नाही तर लोकांना विचार करायला लावले, आणि ही कामगिरी, विचारांचे भाराभर गाडे ओढण्यापेक्षा अधिक महत्त्वाची आहे. पण त्यांची विशेष थोरवी ही की, त्यांनी आपल्या त्यागी, तत्त्वनिष्ठ, ध्येयवादी आणि सत्त्वशील आचरणाने महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन सोज्ज्वल केले. त्यांचे जीवन हा एक उदात्त स्वरूपाचा आदर्श होता. 'लेखन वगैरे काहीही न करता वामनराव आणखी काही वर्षे नुसते जगले असते तरी मराठी वाङ्मयावर त्यांचे अगणित उपकार झाले असते.' असे जे उद्गार वि. स. खांडेकरांनी काढले होते त्यांचे मर्म झाले तरी हेच होय. आगरकरांच्या जीवनालाही हे उद्गार समर्पकतेने लागू पडतात. आगरकरांच्या मृत्यूनंतर सुधारणा होत राहिल्या, पण सुधारकांची प्रतिष्ठा झपाट्याने ओसरत चालली. आगरकर आणि वामनराव यांच्या रूपाने निसर्गाने आपल्या सत्त्वसंगतीचे दोन आदर्श निर्माण केले, आणि म्हणूनच

The elements
So mix'd in him, that nature
might stand up
And say to all the world
This was a man!

हे शेक्सपीयरने ब्रूटसबद्दल काढलेले उद्गार, त्यांचा विचार करत असताना, आठवणे अपरिहार्य ठरतें. (आगरकरांच्या बाबतीत गोखल्यांना ते आठवले होतेच.) आगरकर–वामनरावांचे आयुष्य म्हणजे एक थोर तपश्चर्या होती. त्यांचे सारे जीवन ही सात्त्विकतेची एक अखंड सरिता होती. ध्येयाच्या दीपाने त्यांचा जीवनपथ उजळलेला होता. त्यांच्या जीवनात ध्येयांची दीप्ती, त्यागाचे तेज, सेवेची सुजनता, बुद्धीचे सौभाग्य, ज्ञानाचे पावित्र्य आणि सत्त्वशोधनाची निष्ठा होती.

आणि म्हणूनच, हिमालयाच्या एकाद्या अज्ञात शिखरावर बसून, विश्वातील सत्तत्वांचा, आपल्या सत्त्वशोधक नेत्रांनी वेध घेत असलेल्या आगरकर–वामनरावांच्या दिव्य मूर्ती माझ्या मनश्चक्षूंसमोर कधी कधी तरळत असतात.

१०.

# वामन मल्हार जोशी

'अखेर Sweetness and Light नेच जिंकली '— आपल्या 'स्मृति-लहरी 'तल्या एका आठवणीचा शेवट वामनराव जोशी यांनी या वाक्याने केला आहे.

Sweetness and Light – माधुर्य आणि प्रकाश ! वामनरावांच्या स्वभावाचे हे दोन अंतिम विशेष होते. वामनरावांच्या व्यक्तित्वातील असामान्य आकर्षणाचे रहस्य या दोन शब्दांत साठविलेले आहे असे मला वाटते.

माधुर्य आणि प्रकाश ! वामनरावांचे व्यक्तित्त्व म्हणजे या दोन विशेषांच्या छटांनी तयार झालेले एक मनोहर चित्र होते. प्रकाशामुळे त्यांच्या स्वभावातील माधुर्याला सात्त्विकता प्राप्त झाली होती आणि माधुर्यामुळे हा प्रकाश प्रातःकालच्या सूर्यकिरणांप्रमाणे सौम्य आणि आल्हाददायक बनला होता.

वामनरावांच्या जीवनात ज्या दोन प्रवृत्तींचा आढळ वारंवार होई, त्यांचा उगम त्यांच्या स्वभावजन्य माधुर्यात सापडू शकेल. कोणत्याही लहान-थोर व्यक्तीशी ते क्षणात समरस होत आणि कोणत्याही दुःखाचा अगर संकटाचा तडाखा विनोदाने सौम्य करून ते सहन करीत. वामनरावांच्या ठिकाणी असलेल्या प्रकाशामुळे या दोनही प्रवृत्तींना विदग्ध आणि विकसित स्वरूप प्राप्त झाले होते.

वामनरावांच्या जीवनातल्या समरसतेची अनेक उदाहरणे मला येथे आठवतात. सौ. कृष्णाबाई मोटे यांनी सांगितलेले विशेष उल्लेखनीय आहे. 'रागिणी'कर्ते वामनराव हिंगण्याच्या संस्थेत शिकवायला आले तेव्हा सौ. मोटे या तेथे विद्यार्थिनी होत्या. ' रागिणी 'कर्ते जोशी आपल्याला शिक्षक म्हणून लाभणार म्हणून विद्यार्थिनींना खूप आनंद झाला आणि एक प्रकारचा अभिमानही वाटला. पण त्याचबरोबर वामनराव ' केसरी ' संस्थेतून आले ही गोष्ट मनाला खटकतही होती. वामनरावांविषयीच्या या अनुकूल–प्रतिकूल भावनांमुळे विद्यार्थिनी त्यांना पाहवयास फार उत्सुक झाल्या आणि सायंकाळी त्यांना पाहण्यास त्यांच्या निवासस्थानाकडे मुद्दाम

फिरायला गेल्या, तेव्हा कोणते दृश्य त्यांच्या दृष्टीस पडले ? महाराष्ट्राचा हा थोर लेखक कोणत्या महत्त्वाच्या कामगिरीत दंग होता ? तर धोतराचा काचा करून चारदोन लहान मुलांशी विटीदांडू खेळण्यात !

त्या एका दृश्याने त्या विद्यार्थिनींच्या मनातले वामनरावांविषयीचे सर्व संशय क्षणार्धात वितळून गेले. त्यांच्या अंतःकरणात वामनरावांना भक्तिभावाचे स्थान मिळाले.

माझा स्वतःचा एक अनुभव पुष्कळसा असाच आहे. वामनरावांचा पुतण्या जगू – प्रोफेसर टी. एम्. जोशी – हे माझे वर्गबंधू. एल्फिन्स्टन कॉलेजात आम्ही बरोबरच बी. ए. चा अभ्यास केला. बी. ए. झाल्यावर ते झटकन् एम्. ए. (फर्स्ट क्लास) होऊन फर्ग्युसन कॉलेजात प्रोफेसर झाले आणि मी इकडे तिकडे भटकत हरिभाऊ मोटयांच्या 'प्रतिभे'त लेखणीशी चाळे करायला सुरुवात केली. माझा मुक्काम तेव्हा पुण्याला होता आणि मी जेवायला जोश्यांकडेच जात असे. अगदी पहिल्याच दिवशी जेवायला गेलो तेव्हाचा प्रसंग. जोश्यांकडे खानावळीचा डबा येत असे. पुण्याच्या खानावळीतले जेवण म्हणजे काय चीज आहे याचे वर्णन करण्याचे कारण नाही. गडकऱ्यांनी या जेवणाला अमर करून ठेवले आहे. (पुण्याच्या खानावळीतले जेवण आणि मुंबईची हवा यांची युती कधी-काळी झाली तर जी काही मौज उडेल तिच्याच वर्णनाची काय ती उणीव आहे !) आम्ही डबा उघडून जेवायला सुरुवात केली. मी त्या घरी बराचसा नवखा असल्याने थोडासा संकोचानेच वागत होतो. इतक्यात कोणीतरी आमटीच्या आग्रहाला सुरुवात केली. पुण्याच्या खानावळीतली आमटी आणि हा आग्रह यांची सांगड कशी घालावी हे मला समजेना. इतक्यात वामनरावांनीही या आमटीचा आग्रह मला करण्यास सुरुवात केली. मला आमटी नको होती. तिचा एक थेंबही तोंडात घालणे शक्य नव्हते. पण एवढा थोर विद्वान गृहस्थ आग्रह करतो आहे, तेव्हा त्यांना नाही कसे म्हणायचे ? मी माझी वाटी पुढे केली आणि वामनरावांनी डब्यातली बरीचशी आमटी माझ्या वाटीत रिकामी केली. मी तिचा सत्कार करण्यासाठी तोंड वेडेवाकडे करीत तिचा एक भुरका मारला. त्याबरोबर सारेजण – जगू, पुंडू, शकुताईसुद्धा – हसायला लागले. हे सारे एकदम हसतात का आणि मला आमटीचा आग्रह करणारे वामनरावही त्यात हळूच सामील होतात का हे प्रथम माझ्या ध्यानात येईना, पण थोड्याच वेळात माझ्या डोक्यात प्रकाश पडला ! डब्यातला सर्वांत वाईट पदार्थ स्वतः न घेता इतरांना आग्रह करकरून वाढण्याची त्या मंडळींची एक गंमतीची टूम होती. मी आज नवीनच असल्याने त्यांच्या या चेष्टेला बेमालूम बळी पडलो. माझ्या हे ध्यानात आल्यावरोबर मीही त्या हास्यात सामील झालो आणि माझा नवखेपणा पार पळाला. वामनरावांनी क्षणार्धात मला आपल्या मंडळीशी एकरूप करून घेतले. दुसऱ्याशी समरस होण्याच्या आणि दुसऱ्याला समरस करून घेण्याच्या वामन-रावांच्या शक्तीचा मोठा मजेदार प्रत्यय मला आला आणि क्षणार्धात त्यांच्याविषयीच्या नितांत आदरात आपलेपणाच्या गोड भावना मिसळल्या.

जरा वेळाने मला आणखी एक जाणीव झाली आणि या थोर गृहस्थाच्या स्वभावातल्या

आणखी एका विशेषाचे ज्ञान झाले. या जोशीमंडळींच्या घरात कोणी जाणते स्त्रीमाणूस नव्हते. (शकूताई मोठया होत्या, पण कॉलेजांत शिकत होत्या.) म्हणून त्यांना खानावळी-तल्या डब्याने पोटाची उपासना करावी लागे. ही वस्तुस्थिती दुःखद होती पण विनोदाने दुःखाला जिंकण्याची श्रेष्ठ कला वामनरावांना साधली होती आणि या कलेच्या जोरावरच वामनरावांनी आपले दुःखपूर्ण आयुष्य केवळ सुसह्यच नव्हे तर समाधानी केले होते.

विनोदाची शास्त्रीय उपपत्ती काय वाटेल ती असो, वामनरावांच्या विनोदवृत्तीचा उगम त्यांच्या अभिजात माधुर्यात होता याबद्दल मला तरी शंका नाही. यामुळेच वामनरावांनी विनोदाचा उपयोग लोकांना हसवण्यासाठी केला नाही तर स्वतःची आणि इतरांची दुःखे कमी करण्यासाठी केला. वामनरावांचा विनोद ही करमणूकप्रिय माणसाची क्रीडा नव्हती तर तो दुःखपूर्ण आयुष्यावरचा एक गोड उतारा होता. अखेरच्या आजारीपणात वामनराव मृत्यूच्या दाराशी पडलेले असताना सुद्धा ही विनोदबुद्धी त्यांना पारखी झाली नाही असा मला अनुभव आला. माझे मित्र र. गो. सरदेसाई यांच्याबरोबर मी त्यांना भेटायला गेलो होतो. मी आल्याचे त्यांच्या ध्यानात आल्यावर ते मला म्हणाले, ‘ या – पण तुम्हीच बोला. मला बोलायची डॉक्टरनी बंदी केली आहे. ’ पण मी काय बोलणार ? त्यांना ऑक्सिजनवर, ठेवले होते. त्यांची ती अवस्था पाहून मी विषण्ण झालो होतो. मी काही तरी बोलण्याचा प्रयत्न करणार इतक्यात तेच बोलू लागले, ‘ डॉक्टर सांगतील तेच खरं. माझं शरीर ही त्यांची प्रयोगशाळा झाली आहे. ’ यानंतर दोनतीन दिवसांनी ते गेले. जाण्यापूर्वी दोन तास त्यांनी डॉ. भालेरावांपाशी असेच काही विनोदी उद्गार काढले होते. हे उद्गार त्यांनी काढले तेव्हा जवळ जवळ येत असलेल्या मृत्यूच्या छायेच जाणीव त्यांना झाली होती हे उघड आहे. तरीही त्यांची तत्त्वज्ञ वृत्ती विचलित झाली नाही. जीवनावर त्यांची जितकी शांत पकड होती, तितकीच शांत, संथ पकड त्यांची मृत्यूवर असली पाहिजे. या अंतिम संकटालाही त्यांनी विनोदी वृत्तीने तोंड दिले.

त्यांच्या या वृत्तीतला गोडवा अगर माधुर्य अभिजात होते, जन्मजात होते आणि कुटुंबातल्या प्रेमळ वातावरणामुळे त्याचा परिपोषही सुरेख झाला. आई, बहिणी, पत्नी, भाऊ वगैरे नातेवाइकांच्या प्रेमळ वागणुकीमुळे वामनरावांच्या वृत्तीतला हा गोडवा वाढीला लागला. त्याचा अत्यंत रम्य आविष्कार त्यांच्या वाङ्मयात आढळतो. त्यांच्या ‘ रागिणी ’ अगर ‘ सुशीलेचा देव ’ या कादंबऱ्यांत जे प्रेमळ कौटुंबिक वातावरण दिसते त्याचे मूळ या कौटुंबिक अनुभवांत आहे. त्यांच्या वाङ्मयात स्त्रियांबद्दल जो एक आदर-भाव आणि सहानुभूती दिसते त्याचे कारणही आई, पत्नी इत्यादींनी त्यांना दिलेला प्रेमळ अनुभवच होय. विद्यार्थिनींच्या विश्वातहि त्यांना सात्त्विकपणाचे अनेक नमुने आढळले आणि त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावर व लेखनावर झाला. वामनराव हे एक विचारनिष्ठ, विचारप्रधान लेखक आहेत अशी त्यांची कीर्ती आहे आणि ती बरोबर आहे. परंतु त्यांच्या लेखनात जो विचारविलास आढळतो, जे विचारसौंदर्य प्रतीत होते, ज्या विचार-लहरी हेलावताना दिसतात त्यांत विचारप्रधान लोकांत बहुधा आढळणारी कर्कशता मुळीच

आढळत नाही. 'रागिणी', 'आश्रमहरिणी', 'इंदु काळे – सरला भोळे' यांसारख्या त्यांच्या कादंबऱ्यांत विचारांचे प्रवाह सारखे वाहत असतात, परंतु त्यांच्या सभोवती माधुर्याची रम्य राजी पसरलेली असते, आणि म्हणून या रसराजीतून होणारे विचारांचे नागमोडी दर्शनही तितकेच गोड व रम्य वाटते.

वामनरावांच्या स्वभावातला जो दुसरा विशेष मी सांगितला तो म्हणजे प्रकाश. हाही त्यांच्या माधुर्याइतकाच अभिजात होता. वामनरावांच्या कुटुंबाला प्रकाशपूजनाची दीक्षाच दिलेली आहे असे म्हटले तरी चालेल. प्रकाशाच्या दोन विलोभनीय स्वरूपांचा – ज्ञानप्रकाश आणि ध्येयप्रकाश यांचा – विलास वामनरावांच्या कुटुंबात आढळतो. वामनरावांचे एक बंधू विख्यात वेदान्ती होते आणि दुसरे ध्येयवादी मजूरपुढारी म्हणून त्रिखंडविख्यात होते. वामनरावांनी ज्ञान आणि ध्येय या दोहोंची साधना केलीच, पण प्रतिभेच्या प्रकाशाने या साधनेला वैशिष्ट्य प्राप्त करून दिले. महाराष्ट्राच्या प्रतिभाशाली लेखकांत वामनरावांचे स्थान पहिल्या रांगेत आहे. अर्थात वृत्तीने ते कलेपेक्षा ज्ञानाचे उपासक होते. आपल्या हातून काही तरी ज्ञानसंशोधन व्हावे हीच अखेरच्या दिवसांतली त्यांची मुख्य इच्छा होती. वामनरावांसारखे निष्ठावंत ज्ञानोपासक महाराष्ट्रात फार थोडे झाले. अगदी बालवयात ग्रंथकर्ता (ज्ञानोपासक) होण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात उद्भूत झाली आणि ही आकांक्षा त्यांनी अत्यंत अभिमानास्पद रीतीने पुरी केली. ज्ञानोपासनेमुळे त्यांना जीवनाचे सखोल दर्शन तर झालेच, पण जगात दुष्टपणापेक्षा अज्ञानामुळे अधिक गैरसमज व गोंधळ माजतो हा महत्त्वाचा सामाजिक शोध त्यांना लागला, किंवा त्यांच्या मनावर बिंबला. या गोंधळाकडे, किंवा अधिक अचूक बोलावयाचे म्हणजे हा गोंधळ माजविणारांकडे, ते शक्य तितक्या क्षमाशील वृत्तीने पाहत याचे कारण त्यांची ज्ञानोपासनाच. To understend all is to pardon all या सुवचनाची आंतरिक जाणीव त्यांना अतिशय होती. ही जाणीव त्यांना इतकी झाली याचे कारण त्यांची ध्येयशील दृष्टी. ज्ञानासाठी ज्ञान अशी त्यांची धारणा कधीच झाली नाही, आणि म्हणून त्यांच्या वृत्तीला अगर व्यक्तित्वाला ज्ञानाचा दर्प अगर गर्व याची बाधा कधी झाली नाही. (कलेसाठी कला अशीही त्यांची वृत्ती कधी नव्हती म्हणूनच कलेच्या उन्मादाने त्यांना फारसे कधी ग्रासले नाही.) वामनरावांच्या ध्येयवादाचे अतिशय ओजस्वी दर्शन विश्ववृत्त–प्रकरणी झाले. प्रो. विजापुरकरांना वाचवण्यासाठी त्यांनी, आक्षिप्त लेखामध्ये त्यांचा एका स्वल्पविरामाचा सुद्धा संबंध नसूनही, त्याची सारी जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली आणि तीन वर्षांचा सश्रम कारावास अत्यंत सहनशीलतेने, इतकेच नव्हे तर एक प्रकारच्या सात्त्विक निष्ठेने सोसला.

मला वाटते, वामनरावांच्या साऱ्या वाङ्मयाचे (आणि कर्तृत्वाचे) मूळ या तुरुंगवासात आहे. तुरुंगात त्यांना जीवनाचा खोल अनुभव आला, भावनांची खरी प्रतीती आली, मनुष्यस्वभावाचे ज्ञान झाले आणि माणुसकीचा साक्षात्कार झाला. गोमलसारख्या बलुची

वॉर्डरचे त्यांना जे अपूर्व साहाय्य झाले त्याचे वर्णन त्यांनीच वारंवार केले आहे. पण गोमलच्या विरुद्ध स्वभावाचेही मासले त्यांच्या अनुभवास आले, आणि ते चांगल्या ‘ सुशिक्षित ’, ‘ सुसंस्कृत ’ माणसांत आढळले. अनुभव-संपादनाच्या दृष्टीने वामनरावांचा कारावास महत्त्वाचा ठरला, म्हणून मला पुष्कळदा वाटते की, विश्ववृत्त–प्रकरणाने वामनरावांच्या राजकीय जीवनाची जरी एक प्रकारे इतिश्री केली तरी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर त्याने महदुपकारच करून ठेवले आहेत. चांगले खंबीर, संकटमय व निर्मळ जीवन जगल्याखेरीज तेजस्वी वाङ्मय लिहिता येत नाही, असा संदेश मृत्यूपूर्वी तीनच महिने अगोदर, त्यांनी लेखकांना दिला होता. हा वामनरावांच्या स्वतःच्या जीवनाचा संदेश होता – आणि त्याचा महत्त्वाचा भाग हैद्राबादच्या तुरुंगांत जन्माला आला होता.

वामनरावांच्या वृत्तीतील ‘ प्रकाश ’पूजनामुळेच वामनराव सार्थवादी बनले आणि वाईटातही चांगले शोधण्याची सात्त्विक वृत्ती त्यांच्या अंगी बाणली. अगदी वाईटातल्या वाईट गोष्टीतही काही तरी चांगले आहे, कारण प्रत्येक गोष्टीत काही तरी रस, काही तरी आशय, काही तरी अर्थ आहे, अशी वामनरावांची निष्ठा होती. वाईटात चांगले, कुरूपपणात सौंदर्य आणि दुःखात सुख त्यांना याचमुळे प्रतीत होत असे. या वृत्तीचे एक मजेदार उदाहरण आठवते. ‘ माझ्या आयुष्यांतील सुखदुःखाचे क्षण ’ या लेखात, आपण साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झालो तेव्हा आपले हे भाग्य पाहवयास आई नसल्याने आपणास दुःख होऊन, रडू आले असे सांगून ते लगेच म्हणतात, ‘ माझे काही दिवस बेकारीत गेले आहेत. अशा स्थितीत हे हाल पहावयास आई नाही हा विचार मनात येऊन त्यातल्या त्यात बरे वाटायचे. ’

जगाकडे क्षमाशील दृष्टीने पहाणाऱ्या, वाईटात चांगले शोधणाऱ्या, सर्वत्र सत्तत्त्वाचा शोध करणाऱ्या त्यांच्या वृत्तीचा अनुभव मला स्वतःला एकदा आला. माझी ‘ यात्रेची रात्र ’ ही गोष्ट नुकतीच प्रसिद्ध झाली होती. त्यांना ती आवडली. त्यांनी मला बोलून दाखविले. त्यावर मी म्हटले, ‘ अहो पण ही गोष्ट x x x मासिकाने उलट टपाली परत केली होती.’ एवढे बोलून ते त्या मासिकाच्या ‘ वाङ्मयपारखीपणा ’ बद्दल काही बोलतील या अपेक्षेने मी त्यांच्याकडे पाहू लागलो. पण ते म्हणाले, ‘ अहो, त्याचं असं आहे, त्या तुमच्या गोष्टीत वेश्येचं पात्र रंगविलं आहे म्हणून नसेल आवडली त्यांना. ’

गोड स्वभावाचे लोक अनेक आढळतात. प्रतिभापूजनात दंग असलेले लोकही खूप आहेत. ज्ञानोपासनेला आयुष्य वाहिलेलेही कमी नाहीत आणि आपल्या या अश्राप भूमीत ध्येयवाद्यांचा वास अगदी प्राचीन कालापासून झालेला आहे. पण वामनरावांत या साऱ्या गुणांचा सजीव संगम झाला होता. त्यांच्या जीवनात माधुर्य आणि प्रतिभा यांमुळे रम्यता आली होती आणि ज्ञान व ध्येय यांच्या प्रकाशामुळे त्याला तेज प्राप्त झाले होते. या सजीव संगमामुळे त्यांचे व्यक्तित्व वैशिष्ट्यपूर्ण बनले होते. म्हणूनच त्याचा गोडवेपणाही

वेगळा होता. त्याच्या तेजाची चमकही निराळी होती. त्यांचा गोडवेपणा (एखाद्या प्रणयी जीवाच्या प्रमाणे) विकारी नव्हता. आणि त्यांचे तेज (एखाद्या तर्ककर्कश व्यक्तीच्या प्रमाणे) उग्र नव्हते. म्हणूनच वामनराव आले की वातावरणात गोड सात्त्विकता आणि मृदु विचारविलास यांच्या लहरी उठत आणि काव्य शास्त्र विनोद या तीन शब्दांचा ' काव्यशास्त्रविनोद ' असा सलग एकसंध शब्द बने.

वामनराव गेले – पण महाराष्ट्राचे नशीब असे थोर की, ते आपले सारेच्या सारे जग बरोबर घेऊन गेले नाहीत. त्यांचे जग त्यांच्या वाङ्मयांत – विशेषतः त्यांच्या ' स्मृतिलहरी 'त–केव्हाही दृष्टीस पडेल. 'स्मृतिलहरीं'तल्या धोंडोपंत बर्व्यांचे जग हेच वामनरावांचे जग. त्या जगात, ' सर तुम्ही मला जास्त मार्क का देता ? ' अशी रडून तक्रार करणाऱ्या मुली; ' कडू सत्याचे औषध गिळून त्याच्याविषयी गोड गळ्याने बोलणारी ' काळी मुलगी आणि तिला त्याचसाठी पसंत करणारा मुलगा; ' आपल्या प्रियतमेचे कोणाशी तरी लग्न जुळवून द्या ' अशी गुरुजींना विनंती करणारा असन्नमरण विद्यार्थी – आणि याच विद्यार्थ्यासाठी सकुंकुम वैधव्य पत्करणारी त्याची प्रियतमा; ' संस्कृत कच्चे असले तरी मने सुसंस्कृत असणारे ' विद्यार्थी; माणुसकी आणि विनोदबुद्धी शाबूत असलेले कम्युनिस्ट; बायको रुसतफुगत नाही आदळआपट करीत नाही अशी तक्रार करणारा नवरा व नवरा अंगावर ओरडत नाही, पुस्तके इकडे तिकडे फेकीत नाही अशी तक्रार करणारी बायको; पतीची प्रेमळ फसवणूक करून धिरड्यात अंडे घालणारी पत्नी आणि प्रकाशकाकडून उघड्या डोळ्यांनी फसवले जाऊन मिळतील त्या अल्पस्वल्प मोबदल्यातून पत्नीसाठी मोहनमाळ आणून उशिराने का होईना तिची हौस फेडण्याचा प्रयत्न करणारा पती आढळतात. मानवी स्वभावाचे हे व असेच नमुने वामनरावांच्या जगात अधिक सांपडायचे. या जगात बौद्धिक वातावरण पसरणारे असे खेळकर वादविवाद होत, जीवनाचा संदेश मिळे, सात्त्विक विनोदाचे फवारे उडत आणि किरकोळ लहानसहान प्रसंगांत आणि गोष्टींत मोठा अर्थ प्रतीत होई. मधूनच दुःख अगर आपत्ती यांचे भूत आपल्या चेष्टितांनी या वातावरणाची प्रसन्नता नष्ट करण्याचा प्रयत्न करी, पण असल्या भुतांच्या बाबतीत वामनराव मोठे जबरदस्त मांत्रिक होते !

ज्यांना वामनरावांच्या, सात्त्विक मधुरता आणि मृदु तेजस्विता यांनी भरलेल्या जीवनाचे रहस्य समजले नाही तेच त्यांना मंत्रचळे म्हणू शकत. पण महाराष्ट्राला त्यांच्या जीवनाचे रहस्य बऱ्याच प्रमाणात समजले होते. अर्थात महाराष्ट्राने त्यांच्याविषयीचे कर्तव्य (त्यांच्या जिवंतपणी अगर नंतर) पूर्णत्वाने बजावले असे जरी म्हणता आले नाही तरी वामनरावांचा विशिष्ट अधिकार विचारी महाराष्ट्राने नेहमीच मान्य केला. म्हणूनच वामनरावांचा मराठी वाङ्मयात एक प्रकारचा दरारा होता. वामनरावांच्या मताला एक अनन्यसाधारण महत्त्व होते. हे महत्त्व नुसत्या वाङ्मयामुळेच प्राप्त झालेले नव्हते; तो मुख्यत्वेकरून त्यांच्या चारित्र्याचाच परिणाम होता.

## ११.

# शंकरराव जावडेकर

**आचार्य शंकरराव** जावडेकरांच्या जीवनाचा माझ्या मनावर झालेला परिणाम, एक थोर चारित्र्याचा पुरुष आणि एक थोर विचारवंत असा आहे. त्यांच्या ग्रंथांच्या वाचनाने प्रथम हाच परिणाम झाला आणि पुढे प्रत्यक्ष परिचयाने तो दृढ झाला. आचार्यांच्या लेखनात शुद्ध बुद्धीचा प्रत्यय येतो आणि त्यांच्या वर्तनात स्वाभाविक सभ्यतेबरोबर चिंतनशीलतेचे संस्कार जाणवत. आचार्य जावडेकर शुद्ध बुद्धीची महती नेहमी सांगत. त्यांचा बुद्धिवाद आणि १८-१९ व्या शतकातील युरोपात प्रभावी असलेला बुद्धिवाद यांच्या दरम्यान हा फार मोठा फरक आहे. युरोपीय बुद्धिवाद मानवाच्या विवेकशक्तीला महत्त्व देतो. ही विवेकशक्ती विकारांपासून मुक्त असली पाहिजे असेही तो प्रतिपादितो. पण आचार्यांच्या बुद्धिवादात आत्मशक्तीला आणि आत्मबलाला मोठे महत्त्व होते. आत्मबलाने बुद्धी शुद्ध करता येते म्हणून बुद्धिवादात आत्मबलाला मोठे स्थान आहे असे ते सांगत. ते गांधीवादी असूनही बुद्धिवादी होते आणि म्हणून अखेरीस ते गांधीवाद आणि केवळ बुद्धिवाद या दोहोंच्याही पलीकडे गेले.

आचार्यांच्या जीवनात या शुद्ध बुद्धीचा विलास सर्वत्र आढळे. आचार्य भागवत, आचार्य शंकरराव देव हे त्यांचे मोठे स्नेही. त्यांच्याशी, विशेषतः देवांशी, त्यांचे मतभेद होत. या दोघांचे स्वभावदोषही त्यांना चांगले ठाऊक होते. या दोषांचा उल्लेखही ते मोकळ्या मनाने करीत. पण आचार्य भागवतांची प्रतिभाशाली बुद्धिमत्ता व वक्तृत्व आणि शंकरराव देवांची त्यागनिष्ठा व देशसेवा यांसंबंधीची आदरभावना सदैव जागृत ठेवूनच ते बोलत, आणि या सर्व गोष्टींचा शुद्ध बुद्धीनेच सतत विचार करीत असल्याने यांच्याशी त्यांचा आदर्श स्नेह जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत होता. आचार्यांच्या थोर चारित्र्याचा प्रत्यय आयुष्यात सतत येत गेला. महाराष्ट्र ही थोर चारित्र्याच्या पत्रकारांची भूमी आहे. महाराष्ट्राच्या पत्रव्यवसायात चारित्र्याची गुप्त सरस्वती सतत वाहत आलेली आहे,

आणि आजच्या व्यापारी पत्रव्यवसायाच्या युगातहि (व्यापारवादाचे तत्त्वज्ञान बनविण्याचा प्रयत्न काही विद्वान पत्रकारांनी केलेला असूनही) ती पूर्णतः आटलेली नाही. आचार्यांचे पत्रव्यावसायिक चारित्र्य टिळक–आगरकरांच्या तोडीचे होते. १९३४ साली 'नव-शक्ती'चे ते संपादक असताना, मालक सदानंद यांनी, या पत्राने वालचंद हिराचंद यांच्या सेन्ट्रल असेम्ब्लीच्या उमेदवारीला पाठिंबा द्यावा म्हणून त्यांच्याशी युक्तिवादाचा जबरदस्त घोळ घातला तेव्हा ते बधले नाहीत. लोकशक्तीचे संपादक असताना गांधीवादी सह-काऱ्यांशी मतभेद झाला तेव्हा त्यांनी सरळ त्यागपत्र दिले. हा मतभेद सोयिस्कर मतभेदाच्या कोटीतला नव्हता. १९४८ साली महात्मा गांधींनी काँग्रेसचे लोकसेवासंघांत रूपान्तर झाले पाहिजे असे प्रतिपादिल्यावर अनेक गांधीशिष्यांनी या सोयिस्कर मतभेदाचा आश्रय घेतला आणि काँग्रेसमधील अधिकारपदांना आणि त्यांच्याद्वारा सत्तेला ते चिकटून राहिले. पण आचार्यांनी मात्र काँग्रेसच्या सभासदत्वाचा राजिनामा दिला. त्यांची शुद्ध बुद्धी इतर मोहांपासून जशी अलिप्त होती तशीच सत्तेच्या मोहापासूनही अलिप्त होती. सत्तेचा स्वीकार करण्यासाठी जनसेवेची सबब इतर अनेकांप्रमाणे त्यांनाही सापडली असती. पण सत्तेचा संपर्क लागू न देता चिंतन आणि विचार आणि त्यांच्या द्वारे जनसेवा हे व्रत त्यांनी आयुष्यात फार लवकरच घेतले आणि त्यांचे जीवन, ज्या कालात सत्ता-स्वीकार प्रतिष्ठित बनला होता त्या कालात बरेचसे व्यतीत झालेले असूनसुद्धा, या व्रताचा भंग कधी झाला नाही.

सत्तेचा त्यांना हपाप नव्हता तसा प्रसिद्धीचा देखील नव्हता; इतकेच काय, पण स्वयं-निष्ठेचा सुद्धा नव्हता. अखेरीअखेरीस कित्येक वर्षे त्यांचे लेखन सुटले होते. त्यांची बुद्धिमत्ता निस्तेज बनली होती अगर विचारशक्ती मंदावली होती असे नव्हे. त्यांची प्रकृती अधिक अधिक खालावत होती हे खरे आहे. पण त्यांची प्रकृती वादविवाद अगर विचारविनिमय यांच्या आड कधी आली नाही. समानशील विचारवंत भेटला म्हणजे त्याच्याशी अनेक विषयांवर, कित्येकदा अगदी तावातावाने, वादविवाद करण्यात ते रंगून जात. पण लेखनाचा उत्साह कमी झाला होता. 'तुम्ही अलीकडे लिहीत का नाही?' असे मी एकदा विचारले असता ते म्हणाले, 'मला लिहिण्याची आता काय गरज आहे? मला जे काय म्हणायचे आहे ते एम्. एस्. जोशी, नारायणराव गोरे व इतर काही लेखक सांगत आहेत, लिहीत आहेत. मी त्यांचे लिखाण वाचतो आणि त्यात मला आनंद आहे.' अहंप्रतिपादनाचा हा अभाव किती विचारवंतांत खरोखर आढळेल?

आचार्यांची ही शुद्ध बुद्धी आणि उदार चारित्र्य मोठमोठ्या बिकट प्रसंगी कसोटीस उतरले आहे. गांधीवधानंतर दक्षिण महाराष्ट्रात ब्राह्मणविरोधाची उग्र लाट पसरली. त्यात सुमारे सात कोटींची मालमत्ता आणि अनेक जीव बळी पडले. पण आचार्य जावडेकर या क्षोभाच्या साधारणपणे केंद्रस्थानी राहत असून आणि त्यांच्या घरी इस्लामपूरचे एक

प्रसिद्ध हिंदुमहासभावादी गृहस्थ राहात असूनसुद्धा त्यांच्या घरादाराला काडीइतका उपद्रव पोचला नाही. ब्राह्मणविरोधी प्रक्षोभाची झळ या ' खऱ्या ब्राह्मणा 'ला अंशमात्रहि लागली नाही. जावडेकरांच्या थोर चारित्र्याला हे वंदन सुखासुखी झालेले नाही. आचार्यांच्या विचारांत त्याचप्रमाणे वर्तनात जातिवादाला तीळमात्र जागा नाही याबद्दल सर्वांची मनोमन खात्री प्रत्यक्ष अनुभवाने झालेली होती. या संबंधात श्री. श्री. शं. नवरे यांनी सांगितलेली एक आठवण नमूद करण्यासारखी आहे. आचार्यांना एकदा एका ' अस्पृश्य ' गृहस्थाकडून सत्यनारायणाचे निमंत्रण आले. आचार्य गेले, यजमानाने प्रसाद दिला, पण त्याचबरोबर भोजनाची तयारी असेल तर भोजनासही पाचारण केले. तत्काळ आचार्य कपडे काढून पाटावर बसले. उलट पंचक्रोशीत ' सत्यशोधक ' म्हणून प्रसिद्ध असलेल्या अनेकांनी काहीना काही सबब सांगून काढता पाय घेतला. आचार्यांच्या आचारात आणि विचारात अंतर नव्हते याची मनोमन जाणीव असल्यामुळेच अगदी शंभर नंबरी ' सत्यशोधकां 'ना सुद्धा त्यांच्याबद्दल आदर होता. किंबहुना हाच खरा सत्यशोधक अशीही त्यांची भावना होती. गांधीवधोत्तर जाळपोळीत त्यांना तिळमात्र उपद्रव झाला नाही हा थोर चारित्र्याने क्षोभ द्वेष संताप यांवर मिळविलेला विजय होता.

शुद्ध बुद्धी हे जसे त्यांच्या थोर चारित्र्याचे रहस्य होते त्याचप्रमाणे त्यांच्या व्यापक विचारसरणीचेही रहस्य होते. अर्थात लहानपणापासून त्यांचा वैचारिक विकासच व्यापक दृष्टीस पोषक असा झाला होता. कै. विजापूरकर हे त्यांच्या वडिलांचे स्नेही होते. विजापूरकरांचा टिळक आणि गोखले या दोघांशीही स्नेहसंबंध होता. गोखले स्वतःला रानडयांप्रमाणेच आगरकरांचेही शिष्य म्हणवीत. साहजिकच टिळक, गोखले आणि आगरकर यांच्या विचारांचा अभ्यास आचार्यांनी अगत्याने केला. आगरकरांच्या लेखनाचा तर त्यांच्यावर फार प्रभाव पडला. कारण आगरकर हे शुष्क बुद्धिवादी नव्हते. त्यांच्या बुद्धिवादाला उच्च भावनेची आणि उदात्त चारित्र्याची बैठक होती. अध्यात्माची उपासना करणाऱ्या संतांच्या वृत्तीची अनेक लक्षणे त्यांच्या जीवनात होती. व्यापक आणि शुद्ध बुद्धीने विचार करण्याची आचार्यांची स्वतःची वृत्ती असल्यामुळे आगरकरांचे थोर वैशिष्टय त्यांच्या ध्यानात यावयास वेळ लागला नाही. ' आधुनिक भारता 'त त्यांनी टिळकांची शंकराचार्यांशी तर आगरकरांची बुद्धाशी तुलना केली आहे. आगरकर हे राजकारण आणि समाजसुधारणा या दोनही बाबतींत जहाल होते आणि या विचारवैशिष्टयाचा (आणि अर्थात चारित्र्याचा) आगरकरांसारखा दुसरा पुरुष त्या वेळी उभ्या हिंदुस्थानात नव्हता, इकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. व्यक्ती आणि विचार यांचे अशा प्रकारचे रहस्यशोधन ' आधुनिक भारत ' आणि त्यांच्या इतर ग्रंथातही विपुल आढळते. सुदैवाने आचार्यांचा विद्यालयीन अभ्यास या विचासंशोधनास उपकारक ठरला. इण्टरपर्यंत त्यांनी गणिताचा अभ्यास केला, बी. ए.ला तत्त्वज्ञान हा विषय घेतला आणि एम्. ए.ला राज्यनीतिशास्त्राचे अध्ययन केले. मार्क्सवादाच्या अभ्यासाच्या निमित्ताने अर्थशास्त्राची ओळख झाली. हे सारे विषय परस्परपूरक आहेत. त्यांचे बहुतेक लेखन राज्यशास्त्रावर झाले, पण

तत्त्वज्ञान हा त्यांचा खास आवडीचा विषय होता. ‘ शास्त्रांचे शास्त्र ’ आणि ‘ विज्ञानांचे विज्ञान ’ ही तत्त्वज्ञानाची व्याख्या ध्यानात ठेवली म्हणजे या आवडीचे मर्म लक्षात येईल.

बुद्धीचा असा व्यापक विकास झाल्यामुळे आचार्यांच्या लेखनात सर्वत्र विशाल विचारांचा विलास आढळावा हे स्वाभाविक होय. दोन दूरस्थ व्यक्तींच्या विचारांत अनपेक्षित साम्य किंवा दोन विरुद्ध समजल्या जाणाऱ्या विचारसरणींत समन्वय शोधण्यात त्यांची प्रतिभा रमलेली दिसते याचे मर्म हेच सांगता येईल. कार्ल मार्क्स आणि दादाभाई नवरोजी यांचे काही सोयरसुतक ? पण ‘ आधुनिक भारता ’त मार्क्स आणि दादाभाई यांच्या विचारांत आश्चर्यकारक साम्य आचार्यांनी दाखविले. ते म्हणतात, ‘ कार्ल मार्क्सने भांडवलशाहीची मीमांसा किंवा पृथक्करण केले आणि तिच्या रचनेतच तिच्या विनाशाचे बीज कसे आहे ते शोधून काढले, त्याचप्रमाणे या भांडवलशाहींतून निर्माण होणारी आर्थिक साम्राज्यशाही किती भयानक आहे व तिच्या रक्तशोषणातच तिच्या विनाशाची बीजे कशी आहेत, हे दादाभाईंनी जगासमोर मांडले. कार्ल मार्क्सचा जन्म स्वतंत्र भांडवलशाही राष्ट्रात झाला होता व म्हणून त्याने एकाच राष्ट्रातील एक वर्ग सामान्य जनतेचे रक्तशोषण कसे करतो या प्रश्नाचा शास्त्रीय अभ्यास केला. दादाभाईचा जन्म साम्राज्यशाहीच्या कचाट्यात सापडलेल्या परतंत्र राष्ट्रात झाला होता व म्हणून त्यांनी एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचे रक्तशोषण कसे करते याचे शास्त्रीय संशोधन केले व याच रक्तशोषणात साम्राज्यशाहीच्या विनाशाची बीजे कशी आहेत, ते लोकांना व ब्रिटिश राज्यकर्त्यांना दाखवून दिले. मार्क्सने एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे चालविलेले रक्तशोषण थांबण्यास समाजवाद हा एकच उपाय आहे असे दाखवून दिले; दादाभाईंनी एका राष्ट्राकडून होणारे दुसऱ्या राष्ट्राचे रक्तशोषण थांबण्यास स्वराज्य हा एकच व प्रमुख उपाय आहे हे दाखवून दिले. ’ (आधुनिक भारत, पृ. १५७).

गांधीवाद आणि मार्क्सवाद यांच्यांतला विरोध हिंदुस्थानात तरी विशद करून सांगण्याचे कारण नाही. गांधीवाद अध्यात्मवादी आहे तर मार्क्सवाद भौतिकवादी आहे. गांधीवाद वैयक्तिक मूल्ये मानतो तर मार्क्सवाद वर्गीय मूल्ये कल्पितो. प्रेम हे गांधीवादाचे साधन आहे तर मार्क्सवाद विरोधाच्या शस्त्राने लढू पाहतो. मानवातला परमेश्वर जागृत करणे हे गांधीवादाचे उद्दिष्ट आहे तर मानवसमूहातली प्रतिकारशक्ती जागृत करणे हा मार्क्सवादाचा उद्देश आहे. खरोखर गांधीवाद आणि मार्क्सवाद हे दोन ध्रुव आहेत. पण दोघांतही अखेरीस शोषणरहित समाज अभिप्रेत आहे आणि दोनही विचारसरणी मूलतः मानवतेच्या प्रेमाने स्फुरलेल्या आहेत, एवढे साम्य आचार्य जावडेकरांना पुरले आणि त्या साम्यावर त्यांनी ‘ सत्याग्रही समाजवाद ’ ही एक स्वतंत्र आणि समग्र विचारप्रणाली उभी केली !

भांडवलवाले हे समाजाच्या संपत्तीचे विश्वस्त आहेत अगर असले पाहिजेत ही गांधींची

विचारसरणी आचार्य जावडेकरांना मान्य नव्हती; पण गांधींची साधनांची शुचिता अगर साध्यसाधनवाद त्यांना मान्य होता. मार्क्सवादातला विरोधविकास आणि वर्गविग्रह त्यांना संमत होता; पण द्वेष, हिंसा आणि सर्वंकष हुकूमशाही ही मार्क्सवादाची शस्त्रे त्यांना मान्य नव्हती. वर्गविग्रहासाठी अहिंसा आणि आत्मबल यांची साधने त्यांनी सांगितली. दोन परस्परविरोधी तत्त्वज्ञानांचा समन्वय करू पाहणाऱ्या आचार्यांनी गांधीवाद अगर मार्क्सवाद यांतील त्यांना संमत असलेल्या तत्त्वांकडेही चिकित्सक आणि शोधक दृष्टीने पाहावे हे स्वाभाविक होय. म्हणून मार्क्सचा विरोधविकास मान्य करताना त्याचा केवळ भौतिक अर्थ लावण्यास त्यांनी नकार दिला आणि गांधीजींच्या अहिंसेचा स्वीकार करताना तिच्या मर्यादा मान्य करण्याचे धैर्य दर्शविले. उदाहरणार्थ, १९४२ च्या लढ्यातील साताऱ्यातील ग्रामराज्यांचे समर्थन करताना, प्रतिपक्षी राक्षसी फॅशिस्ट साधनांचा अवलंब करू लागला तर (आवश्यक तेवढ्याच) हिंसेचा अवलंब करणे कसे अपरिहार्य आहे हे त्यांनी सांगितले. यातून आचार्यांनी कोणकोणते निष्कर्ष काढले ते आता मला आठवत नाही, पण अहिंसा लोकशाहीत आवश्यक असली तरी हुकूमशाहीत ती प्रस्तुत मानण्याचे कारण नाही हे स्पष्ट होते. ‘ समाजवादाचा पुनर्जन्म ’ या पुस्तिकेत, लोकशाहीत अन्याय्य कायद्याचा प्रतिकार करताना तो कायदा मोडून कायद्यात सांगितलेली शिक्षा भोगणे का अवश्य आहे; व उलट हुकूमशाहीत अशा कायद्याचा प्रतिकार करतांना तो कायदा मुदलातच न मानणे, म्हणजे भूमिगत वगैरे होऊन अगर उघड बंड वगैरे करून त्या कायद्याचा अगर कायद्यामागच्या सत्तेचा मोड करणे कसे समर्थनीय आहे याचे विवेचन मी केले होते. आचार्यांच्या लिखाणाचे संस्कार या विवेचनावर किती आहेत ते न सांगताही समजण्यासारखे आहे.

गांधीवादाकडे आदराने पण असे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची शक्ती असल्यानेच टिळक आणि गांधी यांच्या विचारात साम्य शोधणे आचार्यांना सोपे झाले. आचार्य जावडेकर हे गांधीवादी म्हणून प्रसिद्ध असले तरी वस्तुस्थिती अशी आहे की, टिळकांवर त्यांची बालवयांत अंकुरित झालेली अशी गाढ भक्ति होती. १९५० साली आचार्यांच्या सहवासात मी ‘ गीतारहस्य ’ वाचले तेव्हा मी माझ्या बुद्धीने लोकमान्यांच्या गीतारहस्यातील काही शंकास्थळे त्यांच्यापुढे ठेवली. माझ्या काही शंका मूलभूत होत्या. त्यात काही अर्थ आहे असे त्यांना वाटत असावेसे दिसले. पण त्यांना त्यामुळे बरे वाटलेले दिसले नाही. लोकमान्य, दादाभाई नवरोजी, वगैरेंवर त्यांची भक्ती होती आणि त्या भक्तीला धक्का लागणे त्यांना फारसे आवडत नसावे. विद्यार्थिदशेत आपण एकदा दादाभाई नवरोजीना भेटायला कसे गेलो होतो आणि त्यांच्या नुसत्या दर्शनाने आपणास कसे धन्य वाटले होते याचे वर्णन त्यांनी मजपाशी एकदा केले होते. तरीपण आगरकरांच्या प्रखर लेखनाच्या वाचनामुळे, प्रसंग पडल्यास – बहुधा टिळकांकडेही – चिकित्सक दृष्टीने पाहण्याची त्यांची तयारी होती. किंबहुना टिळक आणि गांधी यांच्या विचारांकडे अशा

चिकित्सक दृष्टीने पाहण्याची त्यांची शक्ती नसती तर त्या दोघांमध्ये जे वैचारिक सूत्र ते दाखवून देत ते दाखविणे त्यांना शक्य झाले नसते. अंधभक्ताला आपल्या दैवताचे दुसऱ्या दैवताशी असलेले साम्य दाखविणे सहसा शक्य होत नाही, कारण दोहोंची तुलना करण्यास जी चिकित्सकता आवश्यक असते ती अंधभक्तीशी सुसंगत नसते. त्याचमुळे अंधभक्ताला आपल्या देवतेचे वास्तविक श्रेष्ठत्व विशद करणे अशक्य बनते. जावडेकर हे अनेक टिळकपंथीयांप्रमाणे टिळकांचे अंधभक्त नव्हते. पण टिळकांचे तेजस्वी श्रेष्ठत्व त्यांनी जसे विशद करून दाखविले तसे कोणा टिळकभक्ताने केलेले असेलसे वाटत नाही. ‘ आधुनिक भारता ’त टिळकांच्या कार्याचे जे विवेचन आहे तसे तेजस्वी आणि सत्त्वशोधक विवेचन सबंध मराठी वाङ्मयात इतरत्र आहे असे मला वाटत नाही. पण त्यांचे हे सामर्थ्य आगरकरांच्या वाचनाने निर्माण झाले अशी माझी समजूत आहे. आगरकरांमध्ये राजकीय आणि सामाजिक क्रांतिकारक प्रवृत्तीचा मोठा तत्त्वनिष्ठ आविष्कार झालेला दिसतो. त्याचा साक्षात्कार झाल्यामुळेच आचार्यांना टिळक आणि गांधी या दोघांचेही खरे क्रांति-कारकत्व समजले. टिळकांचे क्रांतिकारकत्व राजकीय होते. गांधींचे सर्वांगीण होते. पण क्रांति-कारकत्वाच्या समान तत्त्वामुळे आचार्यांना टिळक आणि गांधी यांच्यातले समान सूत्र सहज स्पष्ट करून सांगता आले.

महात्मा गांधींच्या सत्याग्रहशास्त्राचे काही महत्त्वाचे विशेष लोकमान्यांच्या राजकीय प्रतिपादनात आढळतात आणि म्हणून महात्माजी हे लोकमान्य टिळकांचे स्वाभाविक वारसदार ठरतात असा आचार्यांचा सिद्धान्त आहे. ‘ आधुनिक भारता ’त टिळकांच्या लिखाणातले अनेक उतारे देऊन त्यांनी आपला सिद्धान्त सिद्ध केला आहे. या सत्याग्रही क्रांतिशास्त्राचा प्रथम अविष्कार १९०६ साली बंगालमध्ये बारिसाल येथे सुरेंद्रनाथ बानर्जीप्रभृतींनी, रस्त्यावर ‘ वंदेमातरम् ’चा उद्घोष करण्यावर घातलेली बंदी मोडून जो कायदेभंग केला त्याबाबत केसरीत लिहिलेल्या अग्रलेखात झाला. लोकमान्यांनी लिहिले, ‘ जुलूम तो जुलूम. मग तो कायदेशीर असो नाहीतर बेकायदेशीर असो. कायदेशीर जुलूम असला तर शांततेने व हाल सोसण्याच्या दृढनिश्चयाने त्याचा प्रतिकार केला पाहिजे. तो बेकायदेशीर असला तर बेकायदेशीर रीतीने त्याचा प्रतिकार केला पाहिजे. कोणचाही हुकूम कायदेशीर ठरविण्यास विशिष्ट संस्कारांच्या भट्टीतून त्या हुकमास काढून घेण्याची इंग्रज सरकारची रीत आहे. त्याप्रमाणे कोणचाही हुकूम जुलमाचा आहे हे ठरविण्यास विशिष्ट हालअपेष्टांच्या भट्टीतून चालून जाण्यास, तक्रार करणारांनी तयार असले पाहिजे. ’ यातला ‘ गांधीवाद ’ अगदी स्पष्ट आहे. अर्थात याला निःशस्त्र प्रतिकार असे नाव टिळकांनी दिले होते, आणि ‘ सत्याग्रह ’ आणि ‘ निःशस्त्र प्रतिकार ’ यांमध्ये फरक आहे. पण १९१६ साली अलाहाबाद येथे भाषण करताना टिळकांनी ‘ निःशस्त्र प्रतिकारा ’ची जी मीमांसा केली त्या मीमांसेत या प्रतिकाराला त्यांनी दिलेल्या नैतिक अधिष्ठानामुळे ‘ निःशस्त्र प्रतिकारा ’चे ‘ सत्याग्रहा ’शी निकटचे नाते प्रस्थापित झाले यात शंका नाही. त्या भाषणात टिळक म्हणाले, ‘ निःशस्त्र प्रतिकार हे एक साधन आहे, ते

साध्य नव्हे. विशिष्ट हुकूम पाळण्यापासून आणि मोडण्यापासून आपले हिताहित तोलून वागणे म्हणजे निःशस्त्र प्रतिकार होय. जर आपल्या समतोल बुद्धीने असा निर्णय दिला की, विशिष्ट परिस्थितीत हुकूम मोडणे हेच आपल्या हिताचे आहे तर या निर्णयानुसार वागणे नैतिक दृष्ट्या समर्थनीय ठरेल. निःशस्त्र प्रतिकार हा पूर्णपणे सनदशीर आहे. कायदेशीर आणि सनदशीर हे शब्द एकाच अर्थाचे नाहीत, हे इतिहासाने सिद्ध केले आहे. जोपर्यंत कोणताही कायदा न्यायाला अगर नीतीला धरून नसेल, आणि एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील नीतीस अनुसरून लोकमताला धरून नसेल तोपर्यंत तो कायदेशीर असला तरी सनदशीर नव्हे. ' येथे टिळकांनी नैतिकतेवर भर दिला आहे. गीतारहस्यातले नीतिशास्त्र आणि गांधींचे नीतिशास्त्र यातलेही साम्य आचार्यांनी एका लेखात विशद केले आहे. अर्थात टिळकांचा ' निःशस्त्र प्रतिकार ' आणि गांधीजींचा ' सत्याग्रह ' एक नव्हेत हे याही विवेचनावरून स्पष्ट आहे; पण त्या दोहोंमध्ये एक नैसर्गिक नाते निर्माण होते आणि गांधीजी टिळकांचे स्वाभाविक वारस बनतात एवढे सिद्ध होते.

टिळकांच्या उक्तींचा आणि कृतींचा असा सर्जनशील अर्थ जसा आचार्यांनी लावून दाखविला तसाच गांधींच्या उक्तींचा आणि कृतींचाहि दाखविला, आणि म्हणून टिळक आणि गांधी यांच्यावरील आचार्यांचे लिखाण म्हणजे राज्यनीतिशास्त्रात टाकलेली महत्त्वाची भर ठरली आहे. येथे एकच उदाहरण देतो. आपल्या ' लोकशाही ' ग्रंथात आचार्यांनी गांधीजींनी लोकसत्ताक तत्त्वांचा कसा विकास केला हे दाखवून दिले आहे. समाजामध्ये सत्तेचे राजकारण करणारे जसे पक्ष असतात तसा सत्तेचे राजकारण करण्यास नकार देणारा पण त्याचबरोबर जनजागृती आणि जनसेवा यांचे व्रत घेतलेला एक यतिवर्ग असला पाहिजे असा गांधीजींचा कटाक्ष होता. आपल्या राजकीय मृत्युपत्रात काँग्रेसचे लोकसेवासंघात रूपान्तर व्हावे असे प्रतिपादण्यात त्यांची हीच दृष्टी होती. ही गांधींनी लोकशाहीच्या तत्त्वज्ञानात फार मोठी भर टाकली असे आचार्यांचे म्हणणे होते. सत्तेसाठी टपून बसलेले पक्ष प्रतिपक्षाकडे विकृत दृष्टीने पाहतात. यामुळे एकंदर राजकारण विकृत होते; एवढेच नव्हे तर जनतेच्या खऱ्या इच्छाआकांक्षा डावलल्या जातात. सत्तेच्या मोहापासून अलिप्त असलेला पक्ष, ' मी राजकारण करीन पण सत्ता स्वीकारणार नाही, मी संघर्ष करीन पण हिंसा करणार नाही, मी जनसंघटन करीन पण सत्तासंपादनाचे साधन म्हणून करणार नाही ' असे व्रत स्वीकारून, जनसेवानिष्ठ राजकारण करू लागला तर जनतेच्या इच्छा प्रभावी तर बनतातच, पण पक्षीय राजकारणालाही इष्ट वळण लागू शकते, हा लोकशाहीच्या सिद्धान्ताचा विकास होय हे उघड आहे.

' आधुनिक भारत ' हा आचार्यांच्या ग्रंथातला मेरुमणी होय, कारण त्याच्यात त्यांच्या विचारांचे सार आणि संकलन आढळते. कै. वामनराव जोशींनी त्याला 'गीतारहस्या'च्या जोडीला बसवले आणि याबद्दल दुमत होईल असे वाटत नाही. या ग्रंथात त्यांच्या

चिंतनाचे, विद्वत्तेचे आणि शैलीचे सारे पैलू आढळतात. शैलीदार लेखक अशी त्यांची ख्याती नाही, पण टिळकांनंतर टिळकांच्या शैलीने लिहिणारे लेखक म्हणून मी त्यांच्याकडेच बोट दाखवीन. लोकमान्यांनी आपल्या लेखनाला आवश्यक असलेली परिभाषा जशी तयार केली तशी जावडेकरांनी गांधीवादी–मार्क्सवादी कालाला अनुरूप अशी भाषा निर्माण केली. टिळकांच्या लेखणीचा रोखठोक बाणा आणि तेजस्विताही आचार्यांच्या शैलीत भरपूर आढळते. पण अर्थात आचार्यांच्या शैलीत आचार्यांचे व्यक्तित्वच विशेष झळकणार. लोकमान्य टिळक प्रतिपक्षावर प्रसंगी जसे तुटून पडत तसे आचार्य सहसा पडत नसत. त्यांनी लेखणीचा उपयोग तलवारीसारखा फार करून केला नाही. केळकरांप्रमाणे प्रतिपक्षाची कुचेष्टा करण्याचा मोहही त्यांना पडला नाही. लोकमान्यांच्या शैलीतला सोपेपणा आणि केळकरांच्या शैलीतले लालित्य त्यांजपाशी नव्हते. त्यांची सारी मदार सरळपणा आणि विचारसामर्थ्य यांवर होती. शैलीच्या विलासात त्यांची शुद्ध बुद्धी बेशुद्ध झाली नाही. महाराष्ट्रामध्ये गांधीवादी कॉंग्रेसचा प्रभाव पाडताना त्यांना केळकरांशी सामना करावा लागला, पण केळकरांच्या शैलीचे लालित्य नसूनही आणि 'केसरी'-सारख्या पत्राचा आधार नसूनही त्यांनी केळकरांच्या युक्तिवादाला सपशेल पराभूत केले. अर्थगौरव आणि विचारसामर्थ्य यांनी लालित्य आणि विनोद यांच्यावर मात केली. त्यांच्या शैलीचे श्रेष्ठत्व हे अखेरीस त्यांच्या व्यक्तित्वाचे श्रेष्ठत्व होते. त्यांची शैली लेखनाच्या रूपाने शिल्लक राहिली व त्यांचे सारे विचारधन विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचे पोषण करण्यासाठी उपलब्ध राहिले हा महाराष्ट्राच्या अभिमानाचा एक चिरंतन विषय होय.

१२.

# धनंजयराव गाडगीळ

डॉ. धनंजयराव गाडगीळ गेले! मी येथे त्यांचा उल्लेख 'डॉक्टर' असा केला आहे. पण ते डॉक्टर (पीएच्. डी.) वगैरे नव्हते. ते केंब्रिज विद्यापीठाचे एम्. लिट्. होते. ती पदवी त्यानी भारताचा औद्योगिक विकास या विषयावर प्रबंध लिहून मिळविली होती. आणि तरी त्यांना लोक डॉक्टर म्हणत असत. त्यांच्या नावातल्या डी. आर. या आद्याक्षरामुळे बहुधा या पदवीचा फैलाव झाला असावा. पण त्यांना डॉक्टर म्हटल्याशिवाय बरे वाटत नाही.

देशाची आर्थिक नाडी त्यांना अचूक समजत असे, वगैरे कोट्या करून त्याना डॉक्टर म्हणणे बरोबर होते असा युक्तिवाद मी करणार नाही. विद्याक्षेत्रातला डॉक्टर म्हणजे विद्वान. एका काळी प्राध्यापक म्हटल्याने विद्वत्तेचा गौरव केल्यासारखे होई. पण प्राध्यापक ही पदवी पुढे फार 'चीप' झाली. विख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉक्टर राजकृष्ण हे शिकागोचे डॉक्टर होण्यापूर्वी दिल्लीच्या एका कॉलेजात अर्थशास्त्र शिकवीत असत. मी त्याना प्राध्यापक म्हणे म्हणून मला त्यानी पत्र लिहून कळविले की, मी साधा शिक्षक आहे, मला प्राध्यापक म्हणू नका. पण आजकाल कॉलेजातला प्यून सुद्धा आपल्या गोटात प्राध्यापक म्हणून ओळखला जात असेल इतकी ही पदवी सवंग झाली आहे.

धनंजयराव गाडगीळ हे विद्वान होते हे सिद्ध करण्याचे कारण नाही. पण ते महाराष्ट्रीय विद्वत्तेच्या परंपरेतले विद्वान होते हे लक्षात ठेवले पाहिजे.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात जे प्रबोधन झाले त्याच्या नेत्यांत अनेक विद्वान होते. विद्वत्तेची साधना करणे, ज्ञानाची उपासना करणे हा त्यांचा एक छंद असे. न्यायमूर्ती रानड्यांना 'पदवीधर–मुकुटमणि' म्हणत. गोखल्यांनी वीस वर्षे फर्ग्युसन कॉलेजात शिकविले होते. ओरायन, गीतारहस्य वगैरे ग्रंथ हे टिळकांच्या विद्वत्तेचे स्फूर्तिदायक प्रवक्ते आहेत. 'त्राटिका'कर्ते केळकर याना नाटक

आणि नाटक-कंपन्या यांचे वेड होते, पण ते वातावरण सुद्धा त्यानी विद्वत्तेने उजळले. त्या वेळचा विद्वान हा विचारवंत होता. म्हणजे सॉक्रेटिसाचा आदर्श त्याच्यापुढे होता. ग्रंथालयाच्या चार भिंतीत (लोकांपासून दूर) विद्वत्तेची साधना करणे, ती कपाळाच्या कवटीत भरून ठेवणे, आणि लोकांना समजणार नाही अशी खबरदारी घेऊन तिला सूर्यप्रकाशात आणणे ही त्या विद्वानांची रीत नव्हती.

सॉक्रेटिस विद्वान होता. पण तो आपल्या तत्त्वज्ञानाचा उहापोह भर चौकात करीत असे. आपले ज्ञान जनतेपर्यंत आणून पोचविणे आणि जनतेकडून आपल्या तत्त्वज्ञानाला स्फूर्ती घेणे ही आदर्श विचारवंताची परंपरा सॉक्रेटिसाने घालून दिली. विद्वत्ता तर चोख असली पाहिजे, तिचा मानदंड उत्तुंगच असला पाहिजे; पण तिची सांगड जीवनाशी घातली पाहिजे, जीवनाचे प्रश्न समजण्यासाठी आणि सोडविण्यासाठी तिचा उपयोग झाला पाहिजे हा या विद्वत्तेचा कटाक्ष होता. महाराष्ट्राच्या प्रबोधकांनी अशा विद्वत्तेची साधना केली. म्हणून ते देशसेवेस लागले, समाजसुधारणेस लागले, लेखक बनले, पत्रकार बनले, व्याख्याते बनले. लोकहितवादी, फुले, चिपळूणकर, आगरकर, टिळक, तेलंग, रानडे, गोखले, खाडिलकर, केळकर, परांजपे, कोल्हटकर, किती म्हणून नावांची उजळणी करू !

या विद्वानांच्या परंपरेत धनंजयराव होते. आपल्या विद्वत्तेचा उपयोग समाजाला झाला पाहिजे, मग त्यासाठी त्याग करावा लागला तरी हरकत नाही, अशी त्यांची धारणा होती. एम्. लिट्. होऊन परत आल्यावर ते सुरतेच्या कॉलेजचे प्राचार्य बनले, पण पुढे त्यांचे सासरे, साताऱ्याचे रावबहादूर काळे यांनी सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीच्या विद्यमाने ' गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अ‍ॅण्ड इकॉनॉमिक्स ' ही संस्था काढली तेव्हा तिचे संचालक म्हणून ते पुण्याला आले.

त्यावेळी ते अवघे दोनशे रुपये वेतन घेत असत. सहा-सातशे रुपयांची नोकरी सोडून ही संस्था चालवायला ते आले होते.

आजच्या पिढीला कदाचित त्यांच्या या त्यागाचे महत्त्व कळणार नाही. आजचे आदर्शच बदलले आहेत. मूल्येच बदलली आहेत. मूल्ये बदलली म्हणजे अशा साध्या साध्या पण मूलभूत महत्त्वाच्या गोष्टी कशा कळत नाहीत याचा अनुभव मला धनंजयरावांच्या संदर्भातच टोकिओला आला.

अमेरिकेचे एक समाजशास्त्रज्ञ आणि जपान-विशारद हर्बर्ट पासीन यांच्यावरोबर १९५४ साली मी जपानला गेलो. टोकिओला गेल्यावर धनंजयरावांचा मुक्काम टोकिओत आहे असे कळले व मी त्यांना भेटण्याचा प्रयत्न करू लागलो. माझी ती तळमळ पाहून पासीननी मला विचारलं,

" या गृहस्थाला भेटायला तू इतका का आतुर झाला आहेस ? "

मी म्हटले, " एकदा मी त्यांचा विद्यार्थी होतो. शिवाय त्यांच्याबद्दल मला फार आदर आहे."

" का आदर आहे ? "

" त्यांनी त्यांच्या संस्थेसाठी जो त्याग केला तो मी विसरू शकत नाही. ते चांगल पगारदारी नोकरी सोडून या संस्थेसाठी केवळ दोनशे रुपयावर आले याचं मला फार महत्त्व वाटतं. "

" मला मुळीच वाटत नाही. त्यांनी आपल्याला योग्य असंच वेतन घ्यायला हवं होतं. "

अमेरिकेच्या धनाढ्य वातावरणात वाढलेल्या लोकांची जीवनदृष्टीच निराळी असते, त्यांना भारतासारख्या गरीब देशाचे प्रश्नच समजणे शक्य नाही, त्यांचे त्यांना प्रारंभिक आकलनच होत नाही, याचा मोठा विलक्षण प्रत्यय पासीनच्या त्या उद्‌गारांनी मला आला.

पण धनंजयराव सुखवस्तू जीवनात वाढलेले असून सुद्धा त्यांना भारताच्या प्रश्नांचे बरोबर आकलन होत असे. मुख्य प्रश्न, जोडा कुठे चावतो हे जाणण्याचा आहे.

१९४८ साली गांधी-खुनानंतर धनंजयरावानी लिहिलेल्या एका लेखात, ब्राह्मणांनी सत्तावादी राजकारणातून निवृत्त व्हावे असे एक विधान होते. मी 'नवशक्ती'त या मताचा अनुवाद केला होता. माझ्या काही मित्रांना ही भूमिका मुळीच पटली नाही, पण इतिहासाची साक्ष काय मिळाली ? जे ब्राह्मण सत्तावादी राजकारणातून स्वेच्छेने दूर झाले नाहीत, त्यांना दूर करण्यात आले.

चातुवर्ण्याची उपासना करणाऱ्या पेशव्यांना राज्य करण्याचा काही अधिकार नव्हता. महाराष्ट्रातील ब्राह्मणांना राज्यकारभार स्वतःच्या हातात घेण्याचा काही अधिकार नव्हता. तो त्यांनी घेतला आणि आपली सामाजिक धारणा जुनी तीच राखली. या धारणेप्रमाणे राज्य क्षत्रियांच्या हातात असायला हवे होते. पेशव्यांनी पराक्रम खूप केला. पण हा मूळ अन्याय होता. इतरही अनेक अन्याय झाले. पुढे ब्रिटिशांच्या राजवटीतही ब्राह्मणांनी आपली वर्चस्वाची धारणा सोडली नाही. त्याग खूप केला, पण दृष्टी बदलली नाही. ज्योतिबा फुल्यांच्या सार्वजनिक सत्यधर्माचे रहस्य त्यांना समजले नाही. त्यांच्या परंपरागत दृष्टिकोणाचा प्रत्यय या शतकाच्या सुरवातीस वेदोक्त प्रकरणात आला. मराठे दुखावले गेले. या नव्या जागृत क्षत्रिय वर्गाचे दुःख धनंजयरावांनी अचूक ओळखले. ब्राह्मणांनी स्वेच्छेनेच निवृत्त व्हायला हवे होते. अखेर त्यांना दूर व्हावे लागलेच. त्याने त्यांचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही. आज महाराष्ट्रातला ब्राह्मण वर्ग मागासला अगर मागे पडला असे मुळीच नाही.

पिगू आणि मार्शल यांच्या अर्थशास्त्रावर वाढलेले धनंजयराव भारतात आले ते, भारताच्या आर्थिक प्रश्नांचा, त्यांच्या मुळांना ( grassroots ) तपासून, ठाव घेण्याच्या निश्चयाने. त्यावेळी विद्यार्थ्यांत अर्थशास्त्राच्या तात्त्विक प्रश्नांचा वेध घेण्याची वृत्ती अधिक होती. निदान माझी होती. 'भारतीय भांडवलशाहीचा विकास' हा विषय मी एम. ए.च्या प्रबंधासाठी निवडला.

पण माझ्या विषयाबद्दल धनंजयराव साशंकच होते. तुम्हा विद्यार्थ्यांना लायब्ररती

बसून अभ्यास करण्याची सवय आहे. या वृत्तीला पोषक असेच विषय तुम्ही निवडता. पण भारताच्या आर्थिक प्रश्नांचा अभ्यास, ज्या क्षेत्रांत ते उद्‌भवतात त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून केला पाहिजे, 'फिल्ड वर्क' केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

'दि. के. बेडेकर गौरव ग्रंथा'च्या प्रकाशन-समारंभात बोलताना (हेच त्यांचे पुण्यातले अखेरचे भाषण) ते म्हणाले, "समाजवादाचा पुस्तकी विचार या देशात फार होतो, पण खेड्यात जाऊन लोकांचे प्रश्न प्रत्यक्ष समजावून घेऊन ते सोडविण्यासाठी कोणता समाजवाद स्वीकारणे जरूर आहे याचा विचार केला पाहिजे." याच भाषणात त्यांनी एक महत्त्वाचा आशयपूर्ण विचार मांडला होता. ते म्हणाले, "राजकीय सत्ता एकाच ठिकाणी एकवटली तर तिचा समाजवादावर काय परिणाम होईल याचा विचार झाला पाहिजे." आजच्या संदर्भात मला तरी हे उद्‌गार फार फार अर्थपूर्ण वाटले. पण त्यांची अधिक फोड त्यांनी केली नाही.

त्यांचा विकेन्द्रीकरणावर फार भर होता. आर्थिक प्रश्नांना प्रत्यक्ष हात घालण्यावर फार भर होता. आणि त्या दृष्टीनेच आपल्या गोखले इन्स्टिटयूटचा विकास त्यांनी केला. गोखले इन्स्टिटयूट ही नुसती आर्थिक सिद्धान्त शिकविणारी संस्था उरली नाही. ती परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून साक्षात उपाययोजना शिकविणारी संस्था बनली. त्या दृष्टीने ते अखेरीस भारताचे नियोजनकार झाले ही त्यांच्या कारकीर्दीची तर्कशुद्ध बांधणी झाली. आपले नियंत्रणसुद्धा आपल्या अर्थशास्त्राप्रमाणेच सैद्धान्तिक होते. आणि म्हणूनच राष्ट्रीयीकरण हा त्याचा परवल बनला. पण गाडगीळांच्या अमदानीत त्याला खूप वास्तव स्पर्श झाला. मात्र त्याचा प्रत्यक्ष प्रत्यय येण्यापूर्वीच राजकारणाची सरशी झाली आणि त्यांना योजनाभवनाचा निरोप घ्यावा लागला! दिल्लीहून परत येत असतानाच ते गेले. जणू त्यांचे अवतारकार्यच पुरे झाले होते!

पण महाराष्ट्राला त्यांची फार गरज होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला तात्त्विक अधिष्ठान देण्यासाठी त्यांनी जे कष्ट घेतले त्याचा महाराष्ट्राला विसर पडणार नाही.

आणि संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनात क्रांती करणारा जो सहकारयोग पसरला त्याचेही ते आद्य प्रवर्तक होते, हेही महाराष्ट्र कधी विसरणार नाही. पण कोणी काय सांगावे? चालू युग कृतज्ञतेसाठी प्रसिद्ध नाही!

मजपाशी गाडगीळांच्या दोन हृदयंगम आठवणी आहेत.

मी त्यांचा विद्यार्थी असताना त्यांनी मला एक पुस्तक वाचायला सांगितले (मला वाटते ते मोरलँडचे मोगलकालीन आर्थिक परिस्थितीसंबंधीचे असावे) आणि लगेच म्हटले, "अगदी सामान्य पुस्तक आहे ते."

यावर मी म्हटले, "मग तुम्ही मला ते का वाचायला सांगता आहात?"

"ते कसं आहे ते तुमचं तुम्ही स्वतः वाचून ठरविलं पाहिजे."

गाडगीळांच्या या युक्तिवादात अनुभूतिवादाचे मोठे अमोल तत्त्वज्ञान दडलेले आहे, आणि त्याचा प्रत्यय जीवनाच्या सर्व क्षेत्रांत येतो.

'आपण मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही' या साध्या मराठी म्हणीत हे तत्त्वज्ञान, नव्हे जीवनभाष्य, समाविष्ट झाले आहे.

दुसरी आठवण –

मी बी. ए.च्या परीक्षेत तिसरा वर्ग मिळविला असून सुद्धा प्रा. आर. पी. पटवर्धनांच्या शिफारसशीवरून धनंजयरावांनी मला शिष्यवृत्ती दिली, पण मी मात्र लेखणींचे चाळे करण्यात अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष्य केले आणि माझा प्रबंध कधी पुरा केलाच नाही.

आपण शिष्यवृत्ती घेऊनही प्रबंध पुरा केला नाही ही गोष्ट माझ्या मनाला लागून राहिली होती. म्हणून पुढे मी वेळप्रसंगी गोखले इन्स्टिटयूटला देणगीदाखल लहानशी रक्कम पाठवीत असे.

एकदा मला धनंजयराव दिल्लीला भेटले. त्यांनी हा विषय काढला नि ते म्हणाले, "तुम्ही आता पैसे पाठवीत जाऊ नका. आम्हाला पैसे खूप मिळतात आणि तुम्ही झीज सोसून पैसे पाठविता हे मला चालणार नाही."

गाडगीळांच्या आवाजात राग शिरला होता. त्यांच्या आवाजावर त्याचा ताण बसलेलाही जाणवला.

पण त्या रागाच्या पोटी केवढी आपुलकी होती!

# १३.

# चिंतामणराव देशमुख

**परवा एस्.** एम्. जोशी यांनी एक लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट सांगितली.

राष्ट्रपतिपदाच्या १९६९ सालच्या निवडणुकीचा निकाल लागल्यावर एक टॅक्सी-ड्रायव्हर त्यांना म्हणाला, " देशमुख निवडून आले नाहीत हेच बरे झाले. त्यांच्या सारखा सज्जन माणूस दिल्लीच्या या खराब राजकारणाला लायक नव्हताच. "

हा टॅक्सी-ड्रायव्हर एकदा देशमुखांचा ड्रायव्हर होता. ' नो मॅन इज हिरो टु हिज व्हॅलेट ' ही म्हण ड्रायव्हरलाही लागू पडावी. पण देशमुख हे या ड्रायव्हरचे ' हिरो ' होते.

देशमुख आपल्या हाताखालच्या लोकांना कसे वागवीत असत याची एक गोष्ट सांगतो. ते अर्थमंत्री असताना एकदा पॅरिसला गेले होते. बरोबर त्यांचा पर्सनल सेक्रेटरी (वैयक्तिक चिटणीस) होता. एकदा टॅक्सीचे बील देताना त्याने चक्क ६० फ्रॅंक-ऐवजी ६०० फ्रॅंक दिले. हिशेब करताना हे ध्यानात आले. तेव्हा देशमुखांनी ते त्याच्या-कडून वसूल केले नाहीत तर स्वतः भरले! हिंदुस्थानात परत आल्यावर त्यांच्या अर्थ-खात्यातील अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की ' अभावित चूक ' म्हणून ही रक्कम त्यांना सरकारी खर्चात टाकता येईल. तशी ती टाकावी असा त्यांनी आग्रहही केला. पण छट! देशमुखांनी तो भुर्दंड स्वतः सोसला!

असा सात्त्विक स्वच्छ माणूस आजच्या राजकारणाला कसा पचणार?

आज अधिकारावर असलेल्या प्रमुख राजकीय पक्षांनी आपापले उमेदवार निवडले किंवा ' दत्तक ' घेतले तेव्हाच आजच्या राज-कारणाच्या प्रकृतीचे एक दर्शन झाले. वस्तुतः राजेन्द्रप्रसाद, राधा-कृष्णन आणि झाकीर हुसेन यांनी जे स्थान भूषविले त्या स्थाना-साठी निदान कॉंग्रेसने चिंतामणराव देशमुख, हृदयनाथ कुंझरू किंवा जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या नावाची निवड करायला हवी होती. निदान श्रेष्ठ मूल्याची नेहमी पोपटपंची करणाऱ्या

समाजवाद्यांनी तरी एकदा देशमुख उभे राहिल्यावर त्यांना निःसंदिग्ध पाठिंबा द्यायला हवा होता. ते राहू द्या. पण ज्या महाराष्ट्रासाठी देशमुखांनी आपली राजकीय सत्ता आणि कारकीर्द स्वेच्छेने सोडली त्या महाराष्ट्राचे नाव सांगणाऱ्या समितीने तरी देशमुखांना पाठिंबा द्यायला हवा होता! पण डांग्यांना देशमुखांची स्वातंत्र्यपूर्व काळातली सरकारी नोकरी आठवली. ज्या इसमाने जन्मभर रशियन राज्यकर्त्यांचे पाय चुरले त्याने देशमुखांना देशप्रेमाच्या गोष्टी सांगाव्यात! पण राजकारणात लाजलज्जेला फारसा अवसर नसतो हेच खरे!

इतर महाराष्ट्रवाद्यांचा काँग्रेसविरोध प्रबल झाला. काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव करण्यासाठी ते गिरींचा गल्ला भरू लागले. रेड्डी पडले की काँग्रेस मोडेल हे यांचे राजकीय शहाणपण!

देशमुख, स्वार्थ गुंतलेला असताना सुद्धा तत्त्वांना किती चिकटून रहातात याची आणखी एक गोष्ट सांगतो. वयाच्या ६५ व्या वर्षानंतर नोकरी करायची नाही असे आपण ठरविले आहे असे त्यांनी मला एकदा सांगितले होते. दिल्ली विद्यापीठाचे ते कुलगुरू होते. या जागेवर त्यांना पैसा, मानमान्यता दोनही मिळत होती. पण त्यांनी वय झाल्यावर स्वतः होऊन ती जागा सोडली. वस्तुतः दिल्ली विद्यापीठाला त्यांच्या योग्यतेचा कुलगुरू मिळत नव्हता, आणि देशमुखांना राहण्याचा आग्रहही होत होता. देशमुखांना पैशाची गरज होतीच. आपण आर्थिक दृष्टया किती खालावलो आहोत, हे देशमुखांनी एकदा सांगितलेले अनेकांना आठवत असेल. पण देशमुखांनी निवृत्त व्हायचे टाळले नाही.

देशमुख दिल्लीला राष्ट्रपती म्हणून गेले नसले तरी दिल्लीला त्यांनी उभारलेले कार्य इतके हालतेबोलते आहे की निदान दिल्लीतल्या विचारवंतांना त्यांचा विसर पडणार नाही.

हे म्हणताना त्यांचा इंडिया इंटरनॅशनल सेण्टर माझ्या मनात आहे. इंडिया इंटरनॅशनल सेण्टर हे दिल्लीच्या बौद्धिक जीवनाचे एक आगळे भूषण आहे. नेहरूंच्या राज्यात दिल्लीची साऱ्याच दृष्टींनी भरभराट झाली, पण विशेष उल्लेख मी दिल्लीच्या बौद्धिक जीवनाचा करीन. हा हा म्हणता दिल्लीचे विद्यापीठ हे देशातले सर्वश्रेष्ठ विद्यापीठ बनले. या विद्यापीठाशी स्पर्धा करतील अशी स्वतंत्र बौद्धिक केंद्रे दिल्लीत निर्माण झाली. ऑल इंडिया मेडिकल सेण्टर, पूसा इन्स्टिटयूट, सप्रू हाऊस, स्कूल ऑफ्ह इंटरनॅशनल स्टडीज ही त्यातली काही. पण देशमुखांनी निर्माण केलेल्या इंडिया इंटरनॅशनलचे स्थान स्वतंत्र आहे. देशापुढे निर्माण होणाऱ्या बौद्धिक समस्यांचे संशोधन आणि समीक्षण करण्याचे ते एक जीवंत पीठ आहे, आणि वैचारिक विसर्जनाची स्वाभाविक आराधना करणाऱ्या या राजधानीत, वैचारिक विनिमयाचा ते एक जिवंत झरा बनले आहे! या केंद्राची आखणी, उभारणी, बांधणी सारे काही देशमुखांच्या देखरेखीखाली झाले. देशमुख हे एक मोठे निर्माणक आहेत. त्यांच्या प्रेरणेने निर्माण झालेली सेण्टरची वास्तू हा वास्तूशास्त्रातला एक

लहानसा चमत्कार आहे.

असे चमत्कार अर्थात दिल्लीत अनेक आहेत. सुंदर सुंदर इमारतींनी दिल्ली नुसती शोभते आहे. आजच्या वास्तुशास्त्राचे काही नमुने पाहायचे असले तर दिल्लीच्या इमारती नजरेखालून घालून यावे. आपल्यालाच काय पण पाश्चात्यांना हेवा वाटावा अशा त्या आहेत. पाश्चात्यांना हेवा वाटतोच. अनुभवाने बोलतो आहे. 'एन्काउंटर'चे संपादक मेलव्हिन लास्की यांना मी एकदा दिल्लीच्या नव्या वास्तू दाखविल्या तेव्हा ते म्हणाले, "खरे म्हणजे ही आमची विद्या. पण सस्त्या मजुरीच्या जोरावर तुम्ही तिचा फायदा उपटला आहेत." त्यांच्या आवाजात मत्सराचा विखार थोडासा भासलाच.

इण्डिया इण्टरनॅशनल सेण्टरची इमारत हे आधुनिक वास्तुशास्त्राचे एक वैभव आहे. या सेण्टरमध्ये जे दृष्ट लागण्यासारखे बौद्धिक कार्य चालते त्याला अगदी तोलून धरील असे या इमारतीचे सौंदर्य आहे.

पण दिल्लीत कोणतेच सत्कार्य विनाअडथळा होत नाही. या सेण्टरची जागा ही मुळात पं. नेहरूंनी निवडली. नेहरूंच्या दृष्टीत सौंदर्य आणि संस्कृती यांचा सुरेख संगम वावरे. पण ते नोकरशाहीला क्वचितच भावत असे. ही जागा जेव्हा निवडली गेली तेव्हा वर्क्स ॲण्ड हौसिंगच्या मंत्रालयातील काही घोटीव अधिकाऱ्यांना मोठी चिंता पडली. सेण्टरच्या इमारतीने लोदी गार्डन्सची शोभा नष्ट झाली तर! तेव्हा त्याने अट घातली की सेंटरच्या इमारतीने लोदी गार्डन्स इस्टेटीची जी काही एक खास शान आहे तिला धक्का लागता कामा नये.

लोदी गार्डन इस्टेटीत लोदी घराण्याची थडगी आहेत. त्यांची एक ऐतिहासिक शैली आहे. तिला धरून आधुनिक इमारत बांधायची हे मोठेच आव्हान होते पण ते सेंटरचे आर्किटेक्ट ऑर्थर स्टाईन यांनी ते स्वीकारले.

त्यात त्यांनी किती बेमालूम यश मिळविले याचा मोठा मजेदार प्रत्यय मला आला. मी एक दिवस त्या रस्त्याने चाललो होतो. सूर्य पश्चिम क्षितिजावर होता. त्याच्या पार्श्वभूमीवर लोदी थडग्याचा एक कळस सेंटरच्या इमारतीचाच एक भाग आहे असे क्षणभर मला वाटले! एका आधुनिक इमारतीचा ऐतिहासिक परंपरेशी हा मोठा मजेदार मिलाफ होता!

ही इमारत आणि हा सेंटर दिल्लीला आहे तोपर्यंत जाणते लोक देशमुखांची कृतज्ञतापूर्वक आठवण काढतील. संयुक्त महाराष्ट्राच्या वादात देशमुखांना उत्तर देताना नेहरू एकदा म्हणाले होते की आम्ही क्रांतिकारक आहोत! देशमुखांच्या कार्यात क्रांतीचा स्फोट नसेल. पण त्यात नंदादीपाचे तेवणारे तेज, शांती आणि पावित्र्यसुद्धा आहे. आणि याचे श्रेय देशमुखांच्या व्यक्तीत्वाकडे जाते. त्यात शिस्त आहे, समर्पण वृत्ती आहे, आणि कर्तव्याची प्रखर जाण आहे.

हलक्याफुलक्या अगर चटचटीत वक्तृत्वासाठी देशमुख प्रसिद्ध नाहीत. सन १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर दादरला, अमर हिंद मंडळाच्या जागेत, देशमुखांनी महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दल जे भाषण केले ते ऐकून गंगाधर गाडगीळ मला म्हणाले, " लोकांची देशमुखांवर किती भक्ती आहे पाहा. दुसऱ्या कोणी असलं भाषण केलं असतं तर ते त्यांनी उधळून लावलं असतं. "

पण देशमुखांचे एक अतिशय विनोदी भाषण मी ऐकलेले आहे. आझाद भवनाच्या सभागृहात झालेल्या जयंत नारळीकरांच्या एका व्याख्यानाला ते अध्यक्ष होते. नारळीकरांनी ग्रह आणि तारे यांच्या विश्वात फेरफटका केला. समारोपाच्या भाषणात देशमुख म्हणाले, " हे ग्रह आणि तारे परस्परांहून दूर जात आहेत तशी आपली परस्परांशी भांडणारी राष्ट्रे दूर जात असती तर किती बरे झाले असते ! " अशा उद्गारांनी आणि अभिप्रायांनी ते भाषण अगदी खुसखुशित बनले होते.

आपल्या नेहमीच्या संभाषणात देशमुख गंभीरच वाटतात. पण त्यांच्या संभाषणातला एक विनोद माझ्या चांगला लक्षात राहिला आहे. इंडिया इंटरनॅशनल सेंटरच्या आवाराची आखणी अशी मजेदार रीतीने केली आहे की पलीकडची लोदी बाग हा सेंटरच्या आवाराचाच एक भाग वाटावा ! लोदी बागेत लोक फिरायला येतात. देशमुख आम्हाला सेंटर दाखवीत होते. शेजारच्या बागेत फिरणारे लोक सेंटरच्या आवारातच फिरत आहेत असे वाटते, असे काहीतरी मी म्हणालो. लगेच देशमुख म्हणाले, " तसे ते अधून मधून फिरायला आले तर आमची काही हरकत नाही ! "

सी. डी. देशमुख हे दिल्लीचे एक वैभव होते. इंडिया इंटरनॅशनल सेंटरखेरीज त्यांचे काही इतरही उपक्रम आपल्या राष्ट्रीय जीवनाची भूषणे ठरले आहेत. उदाहरणार्थ, ' युनिव्हर्सिटी ग्रँट्स् कमिशन ' ही देशमुखांची कल्पना. या कमिशनचे पहिले प्रमुख देशमुख होते. ' नॅशनल बुक ट्रस्ट ' ही सुद्धा त्यांच्या मेंदूचीच देणगी.

भारताच्या राजकारणात देशमुख फार प्रगती करू शकले नाहीत यात आश्चर्य नाही. राजकारणाच्या प्रकृतीला भावणारे असे देशमुखांचे व्यक्तित्वच नाही. यात देशमुखांचा गौरव आहे, या राजकारणाचा नाही. पण दुर्दैवाने लोकांनी हे फारसे जाणले नाही. राजधानीतील महाराष्ट्रीयांनीही नाही. न्या. गजेंद्रगडकरांसारख्या संधिसाधू व्यक्तीला तिच्या एकसष्टीच्या निमित्ताने रानडे-आगरकर म्हणून गौरवणाऱ्या दिल्लीकर महाराष्ट्रीयांना देशमुखांच्या एकसष्टीची आठवण झाली नाही. कारण तेव्हा ते सत्तेवर नव्हते. देशमुखांनी दिल्ली सोडली तेव्हाही त्यांना भव्य निरोप देण्याची कल्पना कोणाच्या डोक्याला शिवली नाही. पण संस्कृती त्यांना विसरणार नाही, कारण संस्कृती व्यावहारिक गाळ विसरते तेव्हाच तिला तिचे वैभव लाभते.

## १४.

# जॉर्ज केनन

आंतरराष्ट्रीय परिसंवादांना हजर रहाण्याची, काही वेळा त्यात भाग घेण्याची, संधी आल्यामुळे मला अनेक जागतिक विचारवंतांचे विचार ऐकण्याचा आणि त्यांना जवळून पाहण्याचा योग आला. मायकेल पोलान्यी, इग्नातिसओ सिलॉने, रेमों आरों, आर्थर कोत्सलर, डब्ल्यू. एच्. थॉर्प, बर्नार्ड द ज्युवेनेल, अशांसारख्या लोकांचे विचार ऐकताना माणसाची विचारशक्ती किती उच्च पातळीवर जाऊ शकते याचा जीवंत प्रत्यय आला आणि खरा वैचारिक आनंद जो म्हणतात त्याचा अनुभव आला. पण या साऱ्यांत ब्रिटनचे रोनाल्ड मॅक्के आणि अमेरिकेचे जॉर्ज केनन यांनी माझ्यावर जो संस्कार केला तो काही विशेष होता. त्यांच्या विचारांना जी एक नैतिक बैठक होती आणि आवाजाला जी एक नैतिक झार होती तिचा प्रभाव माझ्यावर अधिक पडला. मॅक्के हे वैज्ञानिक. अर्थात या विश्वाच्या यांत्रिक स्वरूपाची पकड त्यांच्या विचारांवर बसलेली. मानवाचा मेंदू हे एक गणिती यंत्रच आहे असे आव्हान त्यांच्या बुद्धीला मिळालेले. आणि तरी देखील मानवाच्या नैतिक परंपरेची महत्ता त्यांच्या अंतःकरणांत कुठे तरी खोल जाऊन बसली आहे असा प्रत्यय त्यांचे बोल ऐकताना आला. १९६७ साली इटलीतील लेक कोमो येथील मज्जाशास्त्रज्ञांच्या आणि मानसशास्त्रज्ञांच्या परिषदेत दोन-तीनदा तोंड उघडण्याचा जो धीर मी केला तो बराचसा त्यांच्या एकदोन विधानांबद्दल शंका व्यक्त करण्यासाठी आणि तरी देखील त्या परिषदेत मला जिंकले ते त्यांनीच. जॉर्ज केनन हे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे विशारद. कित्येक वर्षे अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीत रमलेले. काही वर्षे अमेरिकेचे रशियाच्या दरबारी वकील. वकील म्हणजे असत्यवदनाचा वस्ताद अशी त्याची व्याख्याच. पण केनन यांच्या लिहिण्याबोलण्यातून नेहमी सत्यसंशोधनाचाच प्रत्यय आला. त्याहीपेक्षा अधिक म्हणजे त्यांच्या प्रतिपादनाला असलेली नैतिक कडा जाणवली. केनन यांच्या या वैशिष्ट्याचा प्रथम प्रत्यय मला, १९६० साली, काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडमच्या

बर्लिन येथील दशवार्षिक परिषदेत आला. निळ्या डोळ्यांची, लंबगोल चेहऱ्याची ती उंच देखणी, संस्कारित मूर्ती – प्रथमदर्शनीच लोभस. पण त्याहीपेक्षा तेथे बोलताना त्यांनी जो एक दाखला दिला तो माझ्या अंतःकरणात भिनला आहे. अमेरिकेच्या इतिहासातली एक गोष्ट त्यांनी सांगितली. त्या नवजात राष्ट्राच्या घटना समितीची सभा चालू होती. इतक्यात वादळ झाले. प्रचंड वादळ. धरणी कोसळून पडते की काय असे वाटले. सारे दिवे वगैरे जाऊन काळोखमिट्ट झाला. समितीच्या एका सभासदाने सुचविले की सभा तहकूब करावी, तेव्हा समितीच्या अध्यक्षाने म्हटले, ‘ Either this is the end of the world or it is not. In either case nothing can be gained by adjourning the session. Let the candles be brought ’ स्वातंत्र्याची साधना अशा निष्ठेने करावी लागते, असा केनन यांच्या म्हणण्याचा आशय होता. मला पाकिस्तानच्या ए. के. ब्रोहींच्या उद्‌गारांची आठवण झाली. १९५५ च्या मिलान येथील ‘ स्वातंत्र्याचे भवितव्य ’ या विषयावरील परिषदेत त्यांनी स्वातंत्र्याची उपासना एकलव्याच्या निष्ठेने करायला हवी असे सांगितले होते.

त्यानंतर काही दिवसांनीच जॉर्ज केनन यांचे असेच सुभग दर्शन मला व्हेनिस येथील टॉल्स्टॉय-परिषदेत झाले होते. टॉल्स्टॉय ज्या अभिजात रशियन संस्कृतीचा प्रवक्ता होता तिच्याबद्दल केननना नितान्त आदर. स्टालीनशाहीच्या पंधरा वर्षांच्या संस्कृतिहननानंतर-सुद्धा ही रशियन संस्कृती कशी अक्षत राहिली होती याचे वर्णन करताना केननी (१९४८ साली) लिहिले होते, Fifteen years of negation of the Russian classics on the part of the regime, all received with flawless acquiescene by the mass of the public, did not prevent Leo Tolstuy from becoming at the end of that period the most widely read of all the authors is the Soviet Union.

रशियाची अभिजात रंगभूमी अशीच मोडून काढण्याचा प्रयत्न स्टालीनशाहीने केला आणि तरी रशियन रंगभूमीवरील आधुनिकतेचा शिल्पकार म्हणून मॉस्को आर्ट थिएटर ’ आपल्या चाळीस वर्षांपूर्वीच्या वैभवानेच झळकले. रशियन प्रार्थनामंदिरांचे नास्तिक केंद्रांत रूपांतर करण्याचा असाच प्रयत्न या राजवटीने केला, पण न्यू व्हर्जिन मॉनेस्-टरीच्या आवारात ऑर्थोडॉक्स चर्चच्या निष्ठावंतांची गर्दी पूर्वीच्याच उत्साहाने उसळली. या अभिजात संस्कृतीवरील खोल निष्ठेने जॉर्ज केनन बोलले, आणि त्या परिषदेत थोर थोर टॉल्स्टॉय-विद्वानांचा आवाज ऐकू आला होता तरी, केनन यांचा स्वर ऐतिहासिक गांभीर्याने घुमला.

या परिषदेच्या निमित्तानेच माझा आणि केनन यांचा थोडा सहवास घडला आणि ते दिवस माझ्या जीवनात मोठे संस्मरणीय ठरले. आम्ही व्हेनिसच्या बाहेर एकाच हॉटेल-

मध्ये राहत होतो आणि परिषद व्हेनिसमध्ये साँ जॉर्जियो येथे भरत असे. आम्ही रोज सकाळी एकाच लाँचने परिषदेला जात असू. ते बोलत कमी, पण त्यांचे मोजके उद्गार अतिशय अर्थपूर्ण असत. व्हेनिस त्यांना अतिशय पसंत होते. कारण काय, तर व्हेनिसमध्ये मोटारींना बंदी होती. त्यांचा मोटारीवरचा राग त्यांच्या आत्मवृत्तपर लिखाणात दिसतो. मिलवॉकीच्या ज्यूनॉ पार्कमध्ये ते लहानपणी खेळले. तेथे भेटलेल्या पऱ्यांचा त्यांना अजून मोह आहे. ‘ मिलवॉकीची विश्रब्धता मोटरगाड्यांनी आज गाडली असेल आणि त्याबरोबर हा पार्कही ’ असे संतप्त उद्गार त्यांनी आत्मचरित्रात काढले आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे एका अमेरिकन देशभक्ताचे हे उद्गार आहेत.

पण केनन ह्यांचे अधिक संस्कारित दर्शन घडले साँ जॉर्जियोच्या आवारात. तेथील वास्तुशिल्पाबद्दल, चर्चमधील चित्रांबद्दल, त्यांचे उद्गार ऐकत फिरण्यात मला विलक्षण धन्य वाटले. ते सारे मला समजले नाही. त्या साऱ्यांचा संदर्भ मला कोठे माहीत होता ? पण त्याची गरजच नव्हती. या साऱ्या गोष्टींचा आस्वाद घेताना, त्यांची चिकित्सा करताना, त्यांच्या समर्पित वृत्तीचा जो प्रत्यय येत होता तेवढाच पुरे होता. हे एक फार थोर सांस्कृतिक व्यक्तित्व आहे, असा ठसा उमटला.

त्यानंतर केननना भेटण्याचा योग आला नाही. पण त्यांचे काही लिखाण वाचले. हे मुख्यतः राजकीय लिखाण. प्रिन्स्टनच्या विद्यापीठातून पदवी घेतल्यानंतर लवकरच ते अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्यात शिरले, आणि रशियन राजकारणाचा आणि राजनीतीचा खास अभ्यास त्यांनी केला. यात त्यांना एक जबरदस्त स्फूर्ती, त्यांच्या घराण्यातील जॉर्ज केनन नावाच्याच एका व्यक्तीकडून मिळाली. या व्यक्तीशी त्यांचे साम्य केवळ नावापुरते मर्यादित नव्हते. दोघेही वर्षाच्या एकाच तारखेला जन्मले. दोघेही रशियन-विशारद बनले. दोघांनीही वाणीचा आणि लेखणीचा उद्योग भरपूर केला. दोघांनीही रशियन जुलूमशाहीमुळे बनलेल्या निर्वासितांना साहाय्य हे आपले एक महत्त्वाचे कार्य मानले. दोघांनीही अमेरिकेत जपानची तरफदारी केली. दोघेही द नॅशनल इन्स्टिटयूट ऑव्ह आर्टस अ‍ॅण्ड लेटर्स संस्थेचे सभासद झाले. दोघेही गिटारवादनात निपुण होते. दोघांचीही कामगिरी अशी झाली की एकाचे स्मरण झाल्यावर दुसऱ्याचे अपरिहार्य ठरावे. दोघांचीही कामगिरी मुख्यतः मुत्सद्देगिरीच्या राजकारणाची झाली. पण आपल्या जार्ज केननचे वैशिष्टय असे की, त्यांच्या कामगिरीला एक नैतिक धार सदोदित आली.

केनन यांची राजकारणाकडे पाहण्याची दृष्टीच अशी की, ऐतिहासिक प्रश्नांत त्यांना नैतिक समस्या दिसतात. राजकारण्यांच्या चुकांत त्यांना पापाचा प्रत्यय येतो. आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा नैतिक प्रत्यय त्यांना तावडतोब येतो. आपल्या हातून काही राजकीय चुका झाल्या की काही तरी नैतिक गुन्हा झाल्यासारखे त्यांचे मन खात राहते.

याचा उत्तम पुरावा, ‘ मिस्टर एक्स ’ नावाने ‘ फॉरिन अफेअर्स ’मध्ये लिहिलेल्या

आणि नंतर अतिशय गाजलेल्या लेखाबद्दल आपल्या आठवणीत त्यांनी जे लिहिले आहे त्यात दिसतो. १९४६ च्या डिसेंबरची गोष्ट. तेव्हा ते वॉशिंग्टनच्या 'वॉर कॉलेज'मध्ये होते. अमेरिकन सरकारच्या आरमाराचे चिटणीस जेम्स फॉरेस्टाल यांनी 'मार्क्सवाद आणि सोव्हिएट सत्ता' या विषयावर एक लेख लिहिला आणि केनन यांच्याकडे अभिप्रायार्थ पाठविला. केनन म्हणाले, 'आपला अभिप्राय आपण एका लेखाच्याच रूपाने दिला तर?' फॉरेस्टालना ती कल्पना आवडली. त्यानी तो लेख वाचला आणि त्याची शिफारस सेक्रेटरी ऑव्ह् स्टेट जनरल जॉर्ज मार्शल यांच्याकडे केली. त्याचवेळी 'फॉरेन अफेअर्स'चे संपादक हॅमिल्टन फिश् आर्मस्ट्राँग यांना केनन यांच्याकडून लेख हवा होता. केनन यांच्याकडे हा लेख होता. त्यांनी सरकारी परवानगी मिळविली आणि हा लेख 'द सोर्सेस ऑव्ह सोव्हिएट कॉण्डक्ट' या नावाने छापला. लेखकाचे नाव स्वतःचे न देता 'मिस्टर एक्स' असे दिले. हा लेख अतिशय गाजला. 'लाईफ' आणि 'रीडर्स डायजेस्ट' या नियतकालिकांनी त्यातले लांबलचक उतारे छापले, पण अतिमहत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांत 'containment' (बंदिस्ती) असा जो शब्द होता तो अमेरिकेच्या रशिया-विषयक धोरणाचे सूत्र ठरला, आणि पुढे त्याची शीतयुद्ध (Cold War) शब्दाशी पक्की गाठ बसली.

यात काही फारसे वावगे झाले नाही. पण या लेखावर वॉल्टर लिपमन प्रभृतींनी कडक टीका केली. हा टीकेचा मारा आपल्याला कसा वाटला हे सांगताना 'एखाद्याने अनवधानाने कड्याच्या टोकावरून एखादी दरड दरीत लोटून द्यावी आणि त्यामुळे ओढवलेल्या आपत्तीचे असहाय दर्शन कणाकणाने व्हावे तसे झाले' असे उद्‌गार केनन यांनी काढले आहेत. हे सर्व प्रकरण केनननी अनुतप्त वृत्तीने लिहिले आहे असे जाणवते. मुख्यतः containment म्हणजे लष्करी बंदिस्ती असा अर्थ घेतला गेला याचे त्यांना फार दुःख झाले. हा अर्थ मित्रांनीही घेतला आणि शत्रूंनीही घेतला आणि शीतयुद्धाचे जालीम राजकारण सुरू झाले. केनन यांच्या मनात लष्करी बंदिस्ती असे नव्हतेच. कम्युनिस्टेतर जगाची (मुख्यतः युरोपची) आर्थिक वगैरे स्थिती सुधारून कम्युनिझमला अटकाव करण्याचा विचार त्यांच्या डोक्यात होता.

असाच प्रकार 'ट्रुमन डॉक्ट्रिन'बाबत झाला होता. कम्युनिझमविरुद्ध ग्रीसच्या साहाय्याला जाताना ग्रीसला आर्थिक वगैरे मदत केनन यांच्या डोक्यात मुख्यतः होती. पण या कल्पनेवर परराष्ट्रीय खात्याच्या व्यापांचे आणि विचारांचे असे काही संस्कार झाले की, प्रेसिडेंट ट्रुमननी ग्रीसलाच केवळ नव्हे तर तुर्कस्तानलाही लष्करी साहाय्य करण्याची घोषणा केली, आणि जेथे जेथे (कम्युनिस्ट) धोका उद्‌भवेल तेथे तेथे धावून जाण्याचे धोरण पुकारले. केनन यांच्या अंतःकरणाला वेदना झाल्या. 'अमेरिकन मुत्सद्देगिरीला हा विश्वीकरणाचा शापच आहे की काय न कळे' असे संत्रस्त उद्‌गार त्यांनी काढले. प्रश्न असतो विवक्षित, एखाद्या विशिष्ट देशातल्या विशिष्ट बाबीपुरता मर्यादित; पण अमेरिका भाषा करणार जागतिक चिंतेची. मग घोषणा जन्मणार to make the

world safe for democracyची, जागतिक लोकशाहीच्या हमीची ! प्रत्यक्षात हे शक्य नसते. हातून उलट घडते आणि नाचक्की होते अवघ्या राष्ट्राची.

दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिम युरोपच्या आर्थिक-सांस्कृतिक पुनरुत्थानाची जी ' मार्शल योजना ' निघाली तिच्या उभारणीतही केनन यांचा वाटा होताच. ही योजना केनन यांच्या अंतःकरणाला संतोष देणारी होती. त्यांच्या विधायक संस्कारशील मनाचे समाधान करणारी होती. पण युरोपच्या पुनरुत्थानामुळे सोव्हिएटचे युरोपीय क्रांतीविषयीचे मनसुबे जमीनदोस्त झाले. आपले साम्राज्य अॅटलांटिकपर्यंत पोचविण्याची स्वप्ने भंग पावली केनन यांच्या करुण अंतःकरणात रशियाच्या दुःखावर फुंकर घालावी असे आले. काही म्हटले तरी पुढील राजकारणात रशियाशी संबंध येणारच तो सुकर व्हावा, सुशीतल व्हावा ही इच्छा. आपल्या मार्शल योजनेत रशियाचा मानभंग करण्याची इच्छा नव्हती असे सोव्हिएट नेत्यांना दाखवून द्यावे अशी तीव्र इच्छा केननना झाली. त्यांनी व राजदूत बोहलेन यांनी रशियाच्या दिशेने स्नेहाचा कटाक्ष सोडावा अशी जनरल मार्शल यांना सूचना केली. त्यांना ती पटली. त्यांनी अमेरिकन सरकारच्या वतीने जाहीर केले की, ' आपला दरवाजा विचारविनिमयासाठी आणि परस्परातील अडचणी दूर करण्यासाठी सदैव उघडाच आहे. '

रशियाचा परराष्ट्र मंत्री मोलोटोव्ह असे वस्ताद की त्यांनी या घोषणेचा वाटाघाटीसाठी निमंत्रण असा अर्थ लावला आणि लगेच त्याचा स्वीकार केला. विशिष्ट वाटाघाटी अमेरिकन मुत्सद्द्यांच्या डोक्यात नव्हत्याच. पण मुख्यतः अमेरिकेच्या पश्चिम युरोपीय दोस्तांना, अंधारात आपल्या डोक्यांवरून उडया मारण्याचा हा प्रकार वाटला, आणि ते अतिशय संतप्त झाले. वृत्तपत्रांतही टीकेचे जलाल उठले. केनन यांच्या अंतःकरणाला पुन्हा वेदना झाल्या. फॉक्सहॉलच्या रस्त्यावरून त्यांची अस्वस्थ विचारमग्न पावले फेऱ्या घालू लागली. अखेर ते जनरल मार्शल यांच्याकडे गेले आणि म्हणाले,

' जनरलसाहेब मला ठाऊक आहे की माणसाने आपल्या चुकांपासून बोध घ्यावा, नुसता अश्रुपात करीत बसू नये. गेले दोन दिवस मी आमचं चुकलं तरी काय याचा शोध घेत आहे. पण मला काही शोध लागत नाही. पण ज्या अर्थी इतकी टीका होत आहे त्या अर्थी कुठे तरी काही चुकलं असलं पाहिजे.'

' हे पहा केनन ' मार्शल उत्तरले, ' या तुमच्या सूचनेला माझा पाठिंबा होता. मंत्रिमंडळात आम्ही त्याची चर्चा केली. प्रेसिडेंटची अनुमती मिळविली. अधिक काय हवं ? तुमचा खरा दोष असा की पत्रकाराची ती चलाखी आणि शहाणपण तुमच्यापाशी नाही. समजलं ? अच्छा नमस्कार. '

खरी गोष्ट अशी होती की, ही घोषणा करण्यापूर्वी अमेरिकन सरकारने आपल्या युरोपीयन दोस्तांशी सल्लामसलत करायला हवी होती. पण केनन यांच्या पश्चात्तापदग्ध

बुद्धीला हे कधी समजलेच नाही. असे हे केनन! सदोदित नैतिक भावनेने आंदोलित झालेले. नैतिक विचाराने व्यग्र असलेले.

हे एक अलीकडचे उदाहरण पाहा. स्टालीनकन्या स्वेट्लाना हिने अमेरिकेत आसरा घ्यायचे ठरविले. तेव्हा तिचे स्वागत करण्यासाठी, तिला अभय देण्यासाठी, केनन यांची योजना झाली.

हा केवढा नाट्यपूर्ण प्रसंग! येथे एक इतिहास घडत होता. एका सैतानी वृत्तीच्या का होईना पण राष्ट्रपुरुषाची कन्या शत्रूच्या भूमीचा आश्रय शोधीत होती, आणि त्या विधीचे यजमानपद केनन यांच्याकडे आले होते. हा एक संकल्पसिद्धीचा विजयक्षण होता.

पण या मुलीला आपला देश कसा वाटेल, तिचा भ्रमनिरास, निराशा तर होणार नाही ना, हीच चिंता केननना ग्रासीत होती. त्यांनी स्वेटलानाला लिहिले. ' There will inevitably be troubles and difficulties in this country...You simply cannot judge our society as a whole. You must discriminate. It is not really a unified society but a great battlefield. एक मोठा परिपूर्तीचा क्षण पण केनन त्याच्याकडे विनम्रतेने पाहत होते — नैतिक विनम्रतेने.

नैतिकतेची राजकारणाशी युती झाली की मोठमोठे आश्चर्यकारक सिद्धान्त निष्पन्न होतात — जसे ते गांधींच्या राजकारणातून आले. गांधींच्या राजकारणाचा आणि जीवनाचा अभ्यास करून आचार्य शंकरराव जावडेकरांनी यतिधर्माचा सिद्धान्त काढला. हा सिद्धान्त अगदी सोपा आहे. प्राचीन भारतात ब्राह्मणवर्ग असे — निदान काही चारित्र्यशाली ब्राह्मण असत की जे राजकारणात भाग घेत नसत, पण राजा राजधर्मापासून ढळला अगर चळला तर त्याला ताळ्यावर आणण्यासाठी ते आपल्या चारित्र्याचा, विद्वत्तेचा, अधिकाराचा उपयोग करीत. याला आचार्य जावडेकर यतिधर्म म्हणतात. असा यतिधर्म म. गांधींनी भारतीय राजकारणात निर्माण केला होता. स्वतः म. गांधी हेच एक महान यती होते. असा राजकीय यती म्हणतो, मी राजकारण करीन पण सत्ता स्वीकारणार नाही, मी संघर्ष करीन पण हिंसा करणार नाही, मी लोकांच्या संघटना बांधीन पण त्यांना अहिंसा आणि शांतता यांची शिस्त लावीन. लोकशाही म्हणजे पक्षीय राजकारण. दोनच पक्ष असले तर फार उत्तम असे आपण मानतो. पण हे पक्ष सत्तावादी असतात, आणि सत्तेच्या हपापापायी ते लोकशाहीचा गळा घोटण्यास तयार असतात. सत्तेपायी राजकारणाची विटंबना करण्यास त्यांना शरम वाटत नाही. शिवाय या सत्तेच्या सोसात द्रव्याचा लोभ शिरला की राजकारणाचा अधःपात केव्हा आणि किती होईल हे काही सांगता येत नाही. गांधींनी जो केवळ सेवाभावी सत्ताविन्मुख कार्यकर्त्यांचा वर्ग निर्माण केला होता त्याने या सत्तावादी लोकांना सन्मार्गावर ठेवण्यासाठी आपल्या शक्तीचा आणि संघटनांचा उपयोग केला पाहिजे असे यतिधर्म सांगतो. ही लोकशाही राजकारणा-

तली ' तिसरी शक्ती ' म्हणावी.

अशा तिसऱ्या शक्तीचा पुरस्कार, अमेरिकन राजकारणासाठी, जॉर्ज केननी, अलीकडे, सप्टेंबर १९७६च्या एन्काउंटरच्या अंकात, दिला आहे. ते म्हणतात, ' What I would like to see in the United States is a third party, a minority party, which would, if necessary, remain a minority party for a long time to come – an ideological party which would conduct itself by high sense of discipline and take immense pains to elaborate an intellectually rigorous programme for the long-term future of the United States. Neither of our two political parties is going to do this; and I don't think any party which puts top priority on getting itself into office by electoral process rather than on its function as an educational force in our society is going to do it. The moment you say that the most important thing is to win the next election, and if this means a lot of talking non-sense, indulging in a lot of hypocrisy and over–simplification, and taking enormous liberties with the truth – the moment you say that, you have ruled yourself out as a force to which the solution of our real problems could be safely entrusted. ' केनन असे सांगताहेत की त्यांना अमेरिकेत, सध्याच्या डेमोक्रॅट आणि रिपब्लिकन पक्षाच्या जोडीने आणखी एक तिसरा पक्ष हवा आहे. तो अल्पसंख्याक असेल. कदाचित तो फार काल अल्पसंख्याक राहील. हा पक्ष विचारप्रणालीवर आधारलेला असावा. त्याच्या मध्ये एक पक्की शिस्त असावी. अमेरिकेचा भविष्यकाल सुखरूप राहावा या दृष्टीने त्याने आपला बौद्धिक दृष्ट्या सक्त असा कार्यक्रम आखावा. सध्याच्या दोनहींपैकी एकही पक्ष हे करणार नाही. एक शैक्षणिक शक्ती याऐवजी निवडणूकयंत्र राबवून सत्तास्थाने पटकविण्याची कांक्षा बाळगणारा कोणताही पक्ष हे करणार नाही. पुढली निवडणूक लढविणे हीच प्रधान गोष्ट मानली आणि यासाठी हवी तितकी अर्थशून्य बडबड, ढोंगबाजी, सत्याचा विलक्षण अपलाप आणि लोकांना छळणाऱ्या प्रश्नांना सोपी उत्तरे, यांचा जर अवलंब केला तर आपले वास्तव प्रश्न सोडविण्यासाठी आपण नालायक आहोत याचा कबुलीजवाब देणेच होय.

हा गांधींचा यतिधर्म नव्हे, पण ही विचारसरणी यतिधर्माकडे नेणारी आहे. मुख्य प्रश्न सत्तानिरपेक्षता हा आहे. सत्तानिरपेक्ष दृष्टीने तुम्ही पाहू लागला की तुमच्या नैतिक बुद्धीला अवसर मिळतो, आणि मग तुमचे प्रश्न निराळे बनतात आणि ते सोडविण्याचे मार्गही अधिक शुद्ध बनतात. अमेरिकेसारख्या ज्या राष्ट्रात सर्वसाधारण माणसाची सारासारबुद्धी आणि सार्वजनिक प्रश्नांचे आकलन व अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकसत्ताक बुद्धी जागृत असते तेथे जर जॉर्ज केननसारख्या अनुभवी आणि सत्त्वशील विचारवंताला एका सत्तानिरपेक्ष पक्षाची गरज भासते तर भारतासारख्या मागास देशाला त्याची किती गरज भासत असेल ! भारताची प्रजा तितकी शिक्षितही नाही आणि जागृतही नाही. मुख्य म्हणजे

तिला लोकशाहीची परंपरा नाही. अशा परिस्थितीत सत्तावाद्यांची बुद्धी चळण्याचा अधिक संभव असतो. पण त्याच बरोबर सत्तानिरपेक्षतेची आणि त्यागाची एक परंपरा या देशात आहे. म्हणून या देशात यतिधर्माची गरजही जास्त आहे आणि गांधीवादी परंपरेमुळे त्याच्या यशाचाही संभव अधिक आहे. पण केननसारख्या परिणतप्रज्ञ मुत्सद्याला तशाच प्रकारचा 'धर्म' अमेरिकन लोकांना सांगावा लागतो, आणि तो सांगण्याची बुद्धी त्याना होते, यावरून अखेर नैतिकतेची प्रेरणा सर्व देशांत सारखीच असते याचा प्रत्यय येतो. ही नैतिकता अर्थात नेहमीची व्यावहारिक नैतिकता नव्हे. तिच्याहून उच्च आणि चिरंतन स्वरूपाची ही नैतिकता आहे, आणि तिची प्रेरणा जॉर्ज केननना व्हावी हे त्यांच्या एकंदर जीवितधारेला अगदी धरून आहे.

अर्थात या जीवनाला व्यावहारिक यश लाभण्याचा संभव नाही. अमेरिकन धर्तीचे व्यावहारिक यश तर नाहीच नाही. पण जॉर्ज केननच्या शब्दांना अद्यापही एक नैतिक प्रतिष्ठा प्राप्त होते, यावरून अमेरिकन जीवनालाही भवितव्य आहे असा निष्कर्ष काढायला हरकत नाही.

तली ‘ तिसरी शक्ती ’ म्हणावी.

अशा तिसऱ्या शक्तीचा पुरस्कार, अमेरिकन राजकारणासाठी, जॉर्ज केननी, अलीकडे, सप्टेंबर १९७६च्या एन्काउंटरच्या अंकात, दिला आहे. ते म्हणतात, ‘ What I would like to see in the United States is a third party, a minority party, which would, if necessary, remain a minority party for a long time to come – an ideological party which would conduct itself by high sense of discipline and take immense pains to elaborate an intellectually rigorous programme for the long-term future of the United States. Neither of our two political parties is going to do this; and I don't think any party which puts top priority on getting itself into office by electoral process rather than on its function as an educational force in our society is going to do it. The moment you say that the most important thing is to win the next election, and if this means a lot of talking non-sense, indulging in a lot of hypocrisy and over–simplification, and taking enormous liberties with the truth – the moment you say that, you have ruled yourself out as a force to which the solution of our real problems could be safely entrusted. ’ केनन असे सांगताहेत की त्यांना अमेरिकेत, सध्याच्या डेमोक्रॅट आणि रिपब्लिकन पक्षाच्या जोडीने आणखी एक तिसरा पक्ष हवा आहे. तो अल्पसंख्याक असेल. कदाचित तो फार काल अल्पसंख्याक राहील. हा पक्ष विचारप्रणालीवर आधारलेला असावा. त्याच्या मध्ये एक पक्की शिस्त असावी. अमेरिकेचा भविष्यकाल सुखरूप राहावा या दृष्टीने त्याने आपला बौद्धिक दृष्ट्या सकस असा कार्यक्रम आखावा. सध्याच्या दोनहींपैकी एकही पक्ष हे करणार नाही. एक शैक्षणिक शक्ती याऐवजी निवडणूकयंत्र राबवून सत्तास्थाने पटकविण्याची कांक्षा बाळगणारा कोणताही पक्ष हे करणार नाही. पुढली निवडणूक लढविणे हीच प्रधान गोष्ट मानली आणि यासाठी हवी तितकी अर्थशून्य बडबड, ढोंगबाजी, सत्याचा विलक्षण अपलाप आणि लोकांना छळणाऱ्या प्रश्नांना सोपी उत्तरे, यांचा जर अवलंब केला तर आपले वास्तव प्रश्न सोडविण्यासाठी आपण नालायक आहोत याचा कबुलीजबाब देणेच होय.

हा गांधींचा यतिधर्म नव्हे, पण ही विचारसरणी यतिधर्माकडे नेणारी आहे. मुख्य प्रश्न सत्तानिरपेक्षता हा आहे. सत्तानिरपेक्ष दृष्टीने तुम्ही पाहू लागला की तुमच्या नैतिक बुद्धीला अवसर मिळतो, आणि मग तुमचे प्रश्न निराळे बनतात आणि ते सोडविण्याचे मार्गही अधिक शुद्ध बनतात. अमेरिकेसारख्या ज्या राष्ट्रात सर्वसाधारण माणसाची सारासारबुद्धी आणि सार्वजनिक प्रश्नांचे आकलन व अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकसत्ताक बुद्धी जागृत असते तेथे जर जॉर्ज केननसारख्या अनुभवी आणि सत्त्वशील विचारवंताला एका सत्तानिरपेक्ष पक्षाची गरज भासते तर भारतासारख्या मागास देशाला त्याची किती गरज भासत असेल ! भारताची प्रजा तितकी शिक्षितही नाही आणि जागृतही नाही. मुख्य म्हणजे

तिला लोकशाहीची परंपरा नाही. अशा परिस्थितीत सत्तावाद्यांची बुद्धी चळण्याचा अधिक संभव असतो. पण त्याच बरोबर सत्तानिरपेक्षतेची आणि त्यागाची एक परंपरा या देशात आहे. म्हणून या देशात यतिधर्माची गरजही जास्त आहे आणि गांधीवादी परंपरेमुळे त्याच्या यशाचाही संभव अधिक आहे. पण केननसारख्या परिणतप्रज्ञ मुत्सद्याला तशाच प्रकारचा 'धर्म' अमेरिकन लोकांना सांगावा लागतो, आणि तो सांगण्याची बुद्धी त्याना होते, यावरून अखेर नैतिकतेची प्रेरणा सर्व देशांत सारखीच असते याचा प्रत्यय येतो. ही नैतिकता अर्थात नेहमीची व्यावहारिक नैतिकता नव्हे. तिच्याहून उच्च आणि चिरंतन स्वरूपाची ही नैतिकता आहे, आणि तिची प्रेरणा जॉर्ज केननना व्हावी हे त्यांच्या एकंदर जीवितधारेला अगदी धरून आहे.

अर्थात या जीवनाला व्यावहारिक यश लाभण्याचा संभव नाही. अमेरिकन धर्तीचे व्यावहारिक यश तर नाहीच नाही. पण जॉर्ज केननच्या शब्दांना अद्यापही एक नैतिक प्रतिष्ठा प्राप्त होते, यावरून अमेरिकन जीवनालाही भवितव्य आहे असा निष्कर्ष काढायला हरकत नाही.

१५.

## मॅक्स ईस्टमन

**मॅक्स ईस्टमन** यांना मी १९६५ साली दिल्लीला भेटलो. तल्लख प्रतिभेचा आणि तजेल सौंदर्याचा पुरुष असा त्यांचा ठसा माझ्या बुद्धीवर पूर्वी उमटलेला होता. पण आता त्यांचे वय झालेले होते' त्यांच्या सौंदर्याच्या तजेलपणाच्या तुरळक छटा अद्याप दिसत होत्या. पण त्यांची बोलण्याची शक्ती अतिशय क्षीण झाली होती. म्हणून त्यांच्याशी मनमुराद गप्पा मारता आल्याच नाहीत. त्यांनी तोंड उघडले की त्यांच्या ध्वनियंत्राची अपंग अवस्था मेंदूला डसे आणि मन करुणेने आणि त्याहीपेक्षा असहायतेने भरून जाई. ईस्टमन काही केवळ सौंदर्य आणि तल्लख लेखनशैली एवढ्याच साठी प्रसिद्ध नव्हते. अमेरिकेतले एक उत्तम विनोदी वक्ते म्हणूनही त्यांची ख्याती होती. एकदा एका मातबर अमेरिकन व्यापारी संस्थेने त्यांना भाषण द्यायला बोलाविले. अमेरिकेचे त्यावेळचे प्रेसिडेण्ट वूड्रो विल्सन हे या समारंभाचे मुख्य पाहुणे होते. संस्थेच्या चालकांनी ईस्टमनना म्हटले की तुम्ही प्रेसिडेण्टसाहेबांना जितक्या वेळेला हसवाल तितके डॉलर्स तुम्हाला अधिक मिळतील. आणि मग आपल्या भाषणात ईस्टमननी विनोदाच्या अशा काही फैरी झाडायला सुरवात केली की संस्थाप्रमुखाची बुद्धी ईस्टमनच्या विनोदापेक्षा त्यांचा मोबादला किती वाढतो यांचा हिशोब करण्यातच गढून गेली. ईस्टमनचे असे वक्तृत्व आम्हाला दुर्दैवाने ऐकायला मिळाले नाही. पण आम्ही केलेल्या त्यांच्या स्वागत-समारंभास इतक्या लोकांनी गर्दी केली की त्यांच्या शक्ती कमी झाल्या असल्या तरी त्यांची लोकप्रियता कमी झालेली नाही याचा प्रत्यय आला.

ईस्टमनची लोकप्रियता त्यांनी स्टालीनचे सत्यस्वरूप उघडे करून दाखविण्यात जी बहादूर कामगिरी बजावली तिच्यामुळे होती. १९४० साली स्टालीनने मेक्सिकन कम्युनिस्ट पक्षाच्या एका हस्तकाकडून ट्रॉट्स्कीचा खून करविला, तरी ट्रॉट्स्कीच्या या स्नेह्याने, स्टालीनचे वस्त्रहरण करण्याच्या कामी आपली लेखणी आणि वाणी यांचा उपयोग करण्याच्या आपल्या कामात जराही शिथिलता आणली

नाही. उलट ईस्टमनचा स्टालीन-विरोध अधिकच कडवा बनला. स्टालीनवरील माझ्या टीकेत मला ईस्टमन-सिड्ने हूकच्या लिखाणाचा खूपच उपयोग झाला. पण मला जे ऋण वाटते ते मार्क्सवादाविषयी माझी बुद्धी स्वच्छ करण्यास ईस्टमनच्या लेखणीचा जो उपयोग झाला त्याचे. ' द आर्टिस्ट्स इन् युनिफॉर्म ', ' द एण्ड ऑव्ह सोशालिझम् इन रशिया ' यासारख्या ग्रंथांचा या कामी उपयोग झालाच, पण ' मार्क्स, लेनिन अॅण्ड द सायन्स ऑव्ह रेव्होल्यूशन ' या पुस्तकाने माझ्या डोक्यातल्या मार्क्सवादी सिद्धान्तांना जबरदस्त धक्का दिला. आयुष्यात निरनिराळ्या वेळी निरनिराळे ग्रंथ निरनिराळ्या प्रकारे तुमच्यावर प्रभाव पाडीत असतात. तेव्हा अमुकच एक ग्रंथ काढून ' हा माझा गुरू ' असे म्हणणे कठीण असते. पण ज्या एका ग्रंथाने माझ्या विचारांवर आणि लेखनशैलीवरहि अर्थपूर्ण परिणाम केला असे मला वाटते तो ग्रंथ म्हणजे मॅक्स ईस्टमन यांचा ' मार्क्स, लेनिन अँड द सायन्स ऑव्ह रेव्होल्यूशन '. ईस्टमनचे हे पुस्तक, मला वाटते, प्रथम १९२६ साली प्रसिद्ध झाले. आज हे ' मार्क्सिझम् : इज इट् सायन्स ? ' या नावाने उपलब्ध आहे.

प्रथमच हे सांगून टाकले पाहिजे की, मार्क्सवादाची मीमांसा करणाऱ्या वाङ्मयात या पुस्तकाला फार मोठे स्थान आहे असे नाही. आजकाल मार्क्सवादाची जी विदग्ध चर्चा होत असते तिच्यात त्याचा सहसा उल्लेख नसतो. मॅक्स ईस्टमन हे प्रगाढ पंडित असल्याचे कोणीच मानीत नाही. मार्क्स–लेनिन–स्टालीन वगैरे संबंधांत ईस्टमनची कीर्ती आहे ती मुख्यतः ट्रॉट्स्कीच्या ग्रंथांचा प्रभावशाली भाषांतरकार म्हणून. आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला जातो. लेनिनचे मृत्युपत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्राला अमर करून ठेवण्याचे श्रेय ईस्टमनकडे जाते. लेनिनने आपल्या अखेरच्या दिवसांत कम्युनिस्ट पार्टीला उद्देशून एक पत्र लिहिले होते. त्यात ट्रॉट्स्कीची स्तुती केली होती, आणि स्टालीन हा दुष्ट आहे, क्रूर आहे, पाताळयंत्री आहे, सत्तेचा त्याला हपाप आहे, असा त्याचा अधिक्षेप करून त्याला पक्षाच्या सरचिटणीसपदावरून त्वरित काढून टाकावे असे लेनिनने म्हटले होते. लेनिन तेव्हा अतिशय आजारी होता (त्या आजारात तो वारला) आणि स्टालिन पक्षाचा सरचिटणीस होता. तेव्हा त्याने ते पत्र दडपून टाकले, आणि पुढे तो सर्वसत्ताधीश झाल्यामुळे ते पत्र रशियात तरी उजेडात येणे अशक्य झाले. पण अशा एखाद्या पत्राचे अस्तित्व स्टालीनला एकदा अप्रत्यक्षपणे मान्य करावेच लागले आणि पुढे ख्रुश्चोव्हने तर ते प्रसिद्धही करून टाकले. याचे मुख्य श्रेय मॅक्स ईस्टमनला आहे. स्टालीन-ट्रॉट्स्कीमधला बेबनाव रशियात उफाळून आलेला असताना ईस्टमनना ट्रॉट्स्कीकडून ते पाहायला मिळाले. त्यांनी ते तोंडपाठ केले आणि रशियातून बाहेर आल्याबरोबर प्रसिद्ध करून टाकले.

मार्क्स–लेनिनविषयक वादविवादाच्या इतिहासात ईस्टमनचे आज हे स्थान आहे, पण बत्तीस साली त्या पुस्तकाने माझ्यावर विलक्षण परिणाम केला. त्याला एक कारण घडले.

तेव्हा मार्क्सवादाचा मी कसून अभ्यास करीत होतो. ( इतका की, गॉर्कीची ' मदर ' ही कादंबरी अर्धवट वाचलेली टाकून मी मार्क्सचे ' कॅपिटल ' वाचायला घेतले होते ! ) पुण्याचे कृष्ण नारायण फडके आणि मी तेव्हा एकमेकाना भेटत असू, वादविवाद करीत असू, आणि आम्ही दोघेहि चांगले भडक असल्यामुळे आमचा वाद भरपूर रंगत असे. ( आणि हरिभाऊ मोटे यांसारख्या आमच्या मित्रांची भरपूर करमणूक होत असे. ) एक दिवस त्र्यं. वि. पर्वते यांनी आमचा वाद ' मराठा ' या इंग्रजी साप्ताहिकाच्या रकान्यांत आणून टाकला. ( पर्वते तेव्हा ' मराठ्या 'चे संपादक होते. ) मी त्या वेळी गोखले इन्स्टिटयूटमध्ये अर्थशास्त्राचा अभ्यास करीत असे, आणि सर्व्हंट्स ऑव्ह इंडियाच्या वाचनालयातल्या पुस्तकांवरून नजर फिरवीत असे. अशीच एकदा माझी नजर ईस्टमनच्या ' मार्क्स, लेनिन अँड द सायन्स ऑव्ह रेव्होल्यूशन ' या पुस्तकावर पडली, आणि मी तेव्हा त्या वादाच्या भरात असल्यामुळे ते पुस्तक आणले नि लगेच वाचून काढले.

ते पुस्तक वाचून मी चकित झालो. त्याच्या शैलीमुळे आणि प्रतिपादनामुळे. ट्रॉट्स्कीच्या या भाषांतरकाराची वादविवादाची शैली तितकीच प्रखर आणि प्रतिभाशाली आहे. बर्नार्ड शॉने ट्रॉट्स्कीला ' द प्रिन्स ऑफ पॅम्फ्लेटीअर्स ' असे एकदा म्हटले होते. ईस्टमनना या प्रिन्सच्या दरबारातला एक बडा सरदार तरी म्हणावे लागेल. कॉलेजमध्ये असताना मी बर्नार्ड शॉ भरपूर वाचला होता. त्या वेळी त्याच्या नाटकांपेक्षा त्या नाटकांच्या वादप्रचुर (किंवा वादंगप्रचुर) प्रस्तावनांनी अधिक वेध लावला होता. (आज मला शॉची नाटके आणि प्रस्तावना दोन्हीही सुमार वाटतात.) त्या आवडीला ही ईस्टमनची फाडणी मिळाली. माझ्या वृत्तपत्रीय शैलीवर याचा फार परिणाम झाला. माझ्या अगदी वृत्तपत्रीय उमेदवारीच्या काळात लिहिलेल्या ' प्रकाशातील व्यक्ती ' या पुस्तकाचे वर्णन ' व्यक्तिचित्रे ' असे न करता ' वादचित्रे ' असे करावे असे एका मित्राने सुचविले होते. वादविवाद हा माझा वृत्तपत्रीय लेखनाचा आत्मा बनला होता. पुढे एकदा पां. वा. गाडगीळांना मी ईस्टमनचे एक पुस्तक वाचायला दिले होते तेव्हा त्या पुस्तकाबद्दल प्रतिकूल मत व्यक्त करताना ते म्हणाले होते की, " हे पुस्तक वाचून मला तुमची शैली अशी का हे समजले. "

ईस्टमनच्या ' मार्क्स-लेनिन ' पुस्तकाने मी इतका चकित झालो की मी तडक ' इंटरनॅशनल बुक सर्व्हिस 'मध्ये गेलो नि विठ्ठलराव दीक्षितांना म्हणालो, " या ग्रंथकाराची जितकी म्हणून पुस्तके तुम्ही मला मागवून देऊ शकाल तितकी मागवून द्या. ', दीक्षितांनी ती मागवली. त्यांच्याकडे आलेल्या पुस्तकांत ' दि लिटररी माइंड ' नावाचे पुस्तक होते. तेही मी अधाशासारखे वाचून काढले. तोपर्यंत वाङ्मयाच्या वाटेस मी फारसा कधी गेलो नव्हतो. पण या पुस्तकाने वाङ्मयीन चर्चेची विलक्षण गोडी मला लागली. अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे कला आणि वाङ्मय यांच्या स्वायत्ततेची महती मला कळली. या स्वायत्ततेला मी माझ्या सौंदर्यशास्त्रात एक तात्त्विक अधिष्ठान दिले आहे. ईस्टमनच्या प्रभावामुळे त्या वेळच्या पाश्चिमात्य वाङ्मयीन वादविवादात, एखाद्या तळयात अपघाताने

पडावे तसा मी पडलो आणि गटांगळया खाऊ लागलो. याचा परिणाम म्हणून 'प्रतिभा' पाक्षिकात मी वाङ्मयविषयक लेख आणि 'पश्चिमेकडचे वारे' हे सदर लिहायला सुरवात केली. वाङ्मयीन चर्चेचा हा नाद इतका वाढला की त्यामुळे पुढे (मी संपादक असताना) 'धनुर्धारी' साप्ताहिक (त्याच्या एका संपादकाच्या भाषेत बोलायचे म्हणजे) 'साहित्याचे व्यासपीठ' बनले – आणि माझे 'कलेचीं क्षितिजे' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. हे सारे कशामुळे झाले याची जाणीव मला होती, आणि म्हणून 'कलेचीं क्षितिजे' हे माझे पुस्तक मी मॅक्स ईस्टमन यांना अर्पण केले.

या साऱ्या प्रपंचाचे मूळ ईस्टमनच्या 'मार्क्स–लेनिन' या पुस्तकात होते. ३५ साली मी पुणे सोडले, आणि ते पुस्तक पुन्हा हाती लागण्याचा संभव दूर झाला. (पुढे केव्हा तरी १९४१–४२ साली 'मार्क्सिझम् : इज इट सायन्स ?' या नावाने ते माझ्या हाती आले.) पण वाङ्मयीन चर्चेइतकीच मार्क्सवादी चर्चेत त्याची मला प्रेरणा मिळत होती – आणि त्या प्रेरणेने ईस्टमनचे मिळतील ते लेख मी वाचीत होतो. एका मासिकात 'द एण्ड ऑव्ह सोशालिझम् इन रशिया' हा लेख दिसला. १९४० साली रशियाने फिनलंडवर स्वारी केली, तेव्हा मी या आक्रमणावर आक्रमक अशी टीका करण्यास सुरवात केली. तेव्हा व्ही. वी. कर्णिक आणि अनंत काणेकर या माझ्या जिव्हाळयाच्या दोन स्नेह्यांनी माझ्यावर आक्षेप घेतला. त्यांच्या प्रतिपादनाचा इत्यर्थ असा होता की, ज्याअर्थी रशिया हा समाजवादी देश आहे त्याअर्थी त्याच्या आक्रमणावर आक्षेप घेण्याचे कारण नाही. तेव्हा 'धनुर्धारी'त एक लांबलचक लेख लिहून रशिया हा समाजवादी देश म्हणणे हेच कसे थोतांड आहे, आणि रशियात कामगारांची पिळणूक कशी चालते आणि उत्पन्नाची विषमता रशियात अमेरिकेतल्यापेक्षाही कशी अधिक आहे हे सप्रमाण दाखवून दिले. त्यावर कर्णिक गप्प बसले, आणि काणेकर खाजगी रीत्या मला म्हणाले, "पाध्ये, यू आर डिस्ट्रॉयिंग माय लास्ट इल्युजन."

पण ईस्टमनच्या 'मार्क्स–लेनिन'चा माझ्यावर झालेला परिणाम केवळ असा अप्रत्यक्षच नव्हता. मार्क्सवादाचा चिकित्सक बोध त्या वेळी मला या पुस्तकाने झाला तसा दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाने झाला नव्हता. सिड्ने हूकचे अधिक विदग्ध लिखाण मी नंतर वाचले. पण ईस्टमनच्या पुस्तकाने झालेले संस्कार पार पुसून काढण्याची आवश्यकता कधी भासली नाही. मार्क्सवरील आजच्या अधिक विदग्ध भाष्यांमुळेही ईस्टमनचे विवेचन पार कालबाह्य झाले आहे असे मला वाटत नाही.

येथे मी काही मुद्द्यांचाच उल्लेख करतो. मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाची फार भलावण केली जाते. मानवाची बौद्धिक संस्कृती ही त्याच्या भौतिक संबंधावर आणि त्या संबंधांस कारण असलेल्या उत्पादनसाधनांवर अवलंबून असते असे त्याचे स्थूल (अतिस्थूल) स्वरूप आहे. पण या वादात जो घोटाळा आहे तो मार्क्सच्या या सिद्धान्ताच्या आद्यप्रतिपादनातच कसा रुतून बसला आहे हे ईस्टमनने या पुस्तकात जसे सप्रमाण दाखवून दिले आहे तसे दुसऱ्या कोणी दाखविलेले माझ्या आढळात नाही. मार्क्सचा घोटाळा अगदी

साधा आहे. (पण त्याने घोटाळयाचे महाभारत निर्माण करून ठेवले आहे.). आपल्या ' द क्रिटीक ऑव्ह पोलिटिकल इकॉनॉमी ' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत मार्क्सने हा विख्यात सिद्धान्त साक्षेपाने मांडला. तो मांडताना determine आणि condition हे दोन शब्द एकाच अर्थाने वापरले. (मार्क्सचे मूळ जर्मन शब्द bestimmt आणि bedingt असे आहेत.) आता एखादी गोष्ट अमुक एका गोष्टीने ठरते (determined) म्हणणे निराळे आणि अमुक एक गोष्ट निर्माण होण्याची परिस्थिति निर्माण होते (conditioned) असे म्हणणे निराळे. पहिल्या शब्दप्रयोगाने अपरिहार्यता सूचित होते; उद्योगीकरणाने संयुक्त कुटुंबपद्धती मोडते हे म्हणणे निराळे आणि मोडण्याचा संभव निर्माण होतो हे म्हणणे निराळे. पहिल्यात अपरिहार्यता आहे; दुसऱ्यात नुसती शक्यता आहे. मार्क्सच्या सिद्धान्तातला हा घोटाळा अगदी मूळ प्रतिपादनात आहे आणि तो दूर करणे त्याच्या कोणत्याही अनुयायाला शक्य झालेले नाही. उत्पादन-साधनांनी संस्कृती ठरते हे म्हणणे निराळे आणि संस्कृतीचे काही एक स्वरूप निर्माण होण्यासारखी परिस्थिती निर्माण होते हे म्हणणे निराळे. हा फरक मार्क्सवाद्यांनी लक्षातच घेतलेला नाही.

मार्क्स आणि फ्रॉइड यांच्या विचारांतले साम्य दर्शविणारे ईस्टमन हे फार अगोदरचे लेखक आहेत. आणि हे साम्य त्यांनी मार्क्सच्या ऐतिहासिक लिखाणातल्या एका विधानाने हुडकून काढले : ' Men think they are defending and pursuing such goals as Liberty, Equality and Fraternity, when in reality their concern is, as Marx puts it, with Infantry, Cavalry and Artillery. Their concern is to defend their own privileged position in a class which, in its unconscious but ultimately reliable motivation, knows nothing and cares nothing about liberty, or equality, or fratertnity. (Marxism : Is it Science ? P. 109) ' एटिन्थ ब्रूमेर ' या पुस्तकातल्या एका वाक्यात ईस्टमनने हा अर्थ पाहिला आणि फ्रॉइड्मध्ये लैंगिक भुकेला जे स्थान आहे ते मार्क्समध्ये आर्थिक भुकेला कसे आहे ते दाखवून दिले. अशाच अर्थाचे प्रतिपादन पुढे वामन मल्हार जोशींच्या ' इंदु काळे, सरला भोळे ' या कादंबरीत आले आणि ईस्टमनचे प्रतिपादन वाचलेले असल्यामुळे (कादंबरीतील) विनायकरावांच्या या विचारसरणीवर अचूक बोट ठेवणे मला शक्य झाले.

कामगारवर्ग हा स्वभावतः स्वतःच्या सुखसोयींचा विचार करणारा असतो, म्हणून क्रांतीचे कार्य मध्यवर्गीय आजीव क्रांतिकारकांकडे सोपविले पाहिजे या लेनिनच्या प्रतिपादनातला मार्क्सवादद्रोह ईस्टमनने या पुस्तकात चांगला चवाट्यावर मांडला आहे.

मार्क्सच्या तत्त्वज्ञानात धर्मभावना कशी दडून बसलेली आहे, लेनिनने प्रत्यक्ष कार्यात मार्क्सचे सिद्धान्त कसे धुडकावून दिले, नव्हे, ते कसे विकृत करून सोडले, इत्यादी मोठे अर्थपूर्ण विवेचन या पुस्तकात आहे. त्यात प्रगाढ पांडित्य नसेल, पण मौलिक दृष्टी आहे, आणि विचारात पांडित्यापेक्षा मौलिक दृष्टीला कणभर अधिकच महत्त्व असते.

पण माझ्या तात्त्विक विचारसरणीवर या पुस्तकाने जो खोल परिणाम केला तो निराळाच आहे. या पुस्तकात, आम्हा मार्क्सवाद्यांची वैचारिक क्रिया विरोधविकासी असते तर इतरांची ठरीव तार्किक असते, अशी जी शेखी लेनिनने मिरवली आहे, आपले हेगेलिअन तर्कशास्त्र म्हणजे एक प्रकारचे प्रवाही लवचिक तर्कशास्त्र आहे अशी जी त्याची घमेंड आहे, तिचा ईस्टमननी खरपूस समाचार घेतला आहे. तो घेताना ईस्टमननी दाखवून दिले आहे की वैचारिक क्रियेची काही तरी नवी किमया आपल्याला लाभली आहे अशी जी मार्क्सवाद्यांची समजूत आहे तीत काही अर्थ नाही. मार्क्सवाद्यांचा मेंदू (अगर विचार करण्याचे यंत्र) काही निराळा आहे असे मुळीच नाही. इतर जसे विचार करतात तसेच मार्क्सवादी करतात. इतरांच्या वैचारिक क्रियेत विचारांचे जसे बांधीव तुकडे असतात तसेच मार्क्सवाद्यांच्या असतात. इतर जण ‘ अ म्हणजे ‘ अ ’ प्रतिपादतात, तेव्हा ‘ अ ’ म्हणजे ‘ अ ’ हे जसे खरे त्याप्रमाणे ‘ अ ’ म्हणजे ‘ अन्-अ ’ हेही खरे याची मार्क्सवादी जाणीव देतात. हे जग, वस्तुमात्र, विश्व अखंड बदलत असते. पण या बदलत्या वास्तवाचा विचार मात्र लोक विचाराच्या स्थिर, स्थितिस्थापक तुकड्यांनी करतात. गतीचा वेध स्थितीने घेण्याचा प्रयत्न करतात, आम्ही मार्क्सवादी मात्र गतीची दखल गतीने घेतो‘ असा त्यांचा दावा आहे. पण ‘ अ ’ म्हणजे ‘ अ ’ याच्या ऐवजी ‘ अ ’ म्हणजे ‘ अ ’ आणि ‘ अन्-अ ’ असे म्हणण्याने नवीन वैचारिक क्रियेचा प्रत्यय येत नाही. ‘ अ ’ म्हणजे ‘ अ ’ यात जी विचारांची क्रिया आहे तीच ‘ अ ’ म्हणजे ‘ अ ’ आणि ‘ अन्-अ ’ यात आहे असे ईस्टमननी दाखवून दिले. मार्क्सवाद्यांच्या विरोधविकासवादाने प्रचलित तार्किक दृष्टीची मर्यादा ध्यानात येते, पण नवे प्रवाही तर्कशास्त्र पदरात पडत नाही हे ईस्टमनचे म्हणणे निर्विवाद आहे.

या साऱ्या प्रतिपादनाचा माझ्यावर अगदी वेगळाच परिणाम झाला. हे विश्व, वस्तुमात्र सारखे बदलते आहे, पण आपला मेंदू मात्र विचारांचे बांधीव तुकडे पाडून विचार करीत असतो. विश्व जसे प्रवाही असते तसा विचार प्रवाही नसतो. विचार स्थिर असतो. विचार खंडित असतो. जोपर्यंत मानवाच्या मेंदूची जात आहे तीच आहे तोपर्यंत असेच चालणार. उद्या मानव उत्क्रांत होऊन अतिमानव झाला म्हणजे काय होईल ते होवो, पण आज तरी मानवाचे तात्त्विक प्रतिपादन म्हणजे गतीचा वेध स्थितीने घेण्याचा खटाटोप आहे, आणि म्हणून कोणत्याच तत्त्वप्रणालीला सतत परिवर्तनशील असणाऱ्या विश्वाची म्हणजे सत्याची अचूक परिपूर्ण कल्पना देणे शक्य नाही, याची मला खात्री पटली. आणि ‘ पाण्याने भरलेले घडे एकमेकांना ओळीने लावून ठेवले म्हणून काय त्यांची नदी होईल ? ’ या हेरॅक्लिटसच्या सवालात, आणि आपली विचारक्रिया ही सिनेमाच्या छायाचित्रणासारखी आहे, ती सारी स्थिर (still) चित्रेच असतात, ती झर्कन् दाखवून गतीचा आभास निर्माण करण्यात येतो – आपले वैचारिक ज्ञान सिनेमाच्या छायाचित्रणासारखे फसवे असते, या अर्थी बेर्गसाँच्या विधानात मला खोल आशय दिसू लागला. मी एका निराळ्याच अर्थाने अज्ञेयवादी झालो.

हेरॅक्लिटस–बेर्गसाँचा मुद्दा मी निराळ्या प्रकारे मांडीत असतो. प्रत्येक व्यक्तीचा अनुभव हा खास तिचा स्वतंत्र असतो. प्रत्येक नवी बोधना (पर्सेप्शन) ही तिच्या जुन्या बोधनांच्या प्रकाशात होत असल्यामुळे आणि प्रत्येक व्यक्तीच्या जुन्या बोधना इतरांच्या जुन्या बोधनांपेक्षा नक्कीच वेगळ्या असल्यामुळे ही नवी बोधना आणि त्यांतून निष्पन्न होणारा अनुभव वेगळा स्वतंत्र असणारच. पण प्रत्येक व्यक्तीला जगण्याकरता आपल्या अनुभवांची देवघेव इतरांच्या अनुभवांशी करावी लागते, आणि ही देवघेव ज्या संकल्पनांच्या साहाय्याने होते त्या संकल्पना या विविध अनुभवांना जे समान असते तेवढ्यालाच स्पर्श करतात. अर्थात ज्ञानाचा आधार असलेली संकल्पना समग्र अनुभवाला गवसणी घालू शकत नाही. पण अनुभव हा जीवनाचा आधार व पाया असतो. ज्ञान तेथे कमी पडते. सार्वत्रिक संकल्पना आणि व्यक्तिविशिष्ट अनुभव असा हा पेच असतो.

एखाद्या कलाकृतीचे रहस्य कोणत्याच टीकेने का सापडत नाही, साऱ्याच टीका अपुऱ्या का वाटतात, असा एकदा प्रश्न पडला असताना त्याचे उत्तर मी या अनुरोधाने दिले. कला ही जीवनाचे प्रतिबिंब असते. वैचारिक विचारपूर्ण अर्धसंज्ञ, असंज्ञ मनाचे व्यापार तिला कारण ठरलेले असतात. आपले अबोध-मन आणि बोध-मन यांच्या व्यापारांचे ते एक रसायन असते. त्याचे रहस्य केवळ बोध-मनाच्या क्रियेने कसे गवसणार? तेव्हा बोध-मनाच्या व्यापारावर आधारलेल्या टीकेचा खटाटोप फुकट आहे, किंबहुना कलाकृतीच्या आस्वादाने आपल्या संज्ञ–असंज्ञ–अर्धसंज्ञ मनावर जो परिणाम होतो तो टीकेत व्यक्त होणे दुरापास्त आहे, अशी माझी खात्री झाली.

या निष्कर्षाची गाठ मी, ईस्टमनपासून शिकलेल्या एका दुसऱ्याच सत्याशी घातली. कला ही स्वायत्त असते असे मी ईस्टमनच्या ‘द लिटररी माइंड’ आणि ‘आर्ट ॲण्ड द लाइफ ऑव्ह ॲक्शन’ या पुस्तकातून शिकलो. कला स्वायत्त का, तर कलेत अंतर्भूत झालेला अनुभव हा व्यावहारिक अनुभवापेक्षा वेगळा असतो. हे तत्त्व मी ईस्टमनकडून शिकलो, पण हे तत्त्व मूळ कांटचे आहे. पण त्याची व्याप्ती अधिक आहे. प्रत्येक कलाकृतीचा अनुभव व्यावहारिक अगर तात्त्विक अनुभवापासून जसा वेगळा असतो तसा तो प्रत्येक व्यक्तीपुरता वेगळा असतो. प्रत्येक कलाकृतीचा आस्वाद हा त्या व्यक्तीचा त्या कलाकृतीशी झालेला संवाद असतो आणि हा संवाद प्रत्येक व्यक्तीपुरता स्वतंत्र असतो. सर्व व्यक्तींच्या एखाद्या कलाकृतीचा अनुभव काही समान असेल, पण त्या अनुभवाची खरी खुमारी प्रत्येक आस्वादकाच्या स्वतंत्र अनुभवात असू शकेल.

•

माझ्या बौद्धिक जीवनात दोन गोष्टींच्या बाबतीत मी अढळ उभा आहे. एक लोकशाही आणि दुसरी कलेची स्वायत्तता. लोकशाहीचे महात्म्य मला मार्क्सवादाने राजकीय जीवनात आणलेल्या विकृतीने विशेष कळले. या विकृतीची खरी कल्पना मला प्रथम ईस्टमनच्या लेखांवरून आली. स्टालीनशाहीची खरी ओळख मला ईस्टमनने करूनदिली.

(हीसुद्धा किती अपुरी होती हे पुढे ख्रुश्चोव्हने केलेल्या स्फोटामुळे समजले.) कलेच्या स्वायत्ततेचे तत्त्व ईस्टमनमार्फतच माझ्यापर्यंत पोचले. मी आता या तत्त्वाचा शोध माझ्या बुद्धीच्या मगदुरानुसार स्वतंत्रपणे घेतला आहे, पण या तत्त्वाचा अवलंब केल्याने कलेचे रहस्य कसे खोलवर जाणवते हे प्रथम ईस्टमनमुळे समजले. खरे म्हणजे या तत्त्वाचे महात्म्य माझ्या ध्यानात आले ते कम्युनिस्टांनी कलेच्या क्षेत्रात केलेल्या अत्याचारांमुळेच. सामाजिक बांधिलकीच्या नावाने सर्जनशीलतेचा शहाजोग शेवट कम्युनिस्ट राज्यकर्ते करीत असतात, याची पहिली प्रज्वलित जाणीव मला मॅक्स ईस्टमननीच दिली.

ईस्टमननी एका विलक्षण व्यक्तित्वाचा ठसा माझ्या मनावर उमटविला आहे. एक अत्यंत रसिले, धारदार, तलवारीच्या पात्यासारखे व्यक्तित्व; तात्त्विक विचारांचा करवती-सारखा उपयोग करणारे व्यक्तित्व; विनोद, वाद आणि विद्वत्ता यांच्या गुणाकारांचा लयबद्ध घाणा घालून बसलेले व्यक्तित्व; प्रतिभा जणू पिकनिकला निघाली आहे असे वाटायला लावणारे व्यक्तित्व; जीवनाची मस्त मजाच जीवन-साफल्याच्या शोधास निघाली आहे असे सांगणारे व्यक्तित्व – त्यांच्या जीवनातल्या काही घटना या व्यक्तित्वाच्या तळटीपा म्हणून अगदी झकास शोभतात. विख्यात तत्त्वज्ञ जॉन ड्युई यांच्या या आवडत्या विद्यार्थ्याने त्यांच्या हाताखाली पी एच्. डी. केली, पण स्वीकारली मात्र नाही. एका वृत्तपत्राच्या कचेरीत त्यांनी एकदा कादंबरीकार अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्याशी चक्क मारामारी केली, त्याचा वृत्तान्त इतरांच्या अगोदर स्वतःच प्रसिद्ध करून टाकला – आणि वर्तमान-पत्र म्हणजे बौद्धिक अड्डा हा आपला सिद्धान्त, ‘ अड्डा ’ शब्दाच्या बंगाली आणि मराठी, दोन्ही अर्थांनी खरा केला. ट्रॉट्स्कीच्या एका लेनिनविषयक पुस्तकाचे भाषांतर करून नंतर त्याचे काय झाले हे स्वारी साफ विसरून गेली. आयुष्य म्हणजे आक्रमक उलाढाल असेच मानणाऱ्या या जीवनवीराने मला मात्र एकदा सांगितले होते, ‘ गृहस्था, तुझा तो सिद्धान्त अगोदर प्रसिद्ध करून टाक आणि मग त्याची वाच्यता कर. ’

१६.

# उ थांट

'**युनायटेड नेशन्स**'चे माजी सरचिटणीस उ थांट हे पुढे एवढ्या मोठ्या पदास चढले की त्यांच्याशी माझी एकदा चांगली ओळख होती आणि आपण एकदा त्यांच्याशी दिलखुलास गप्पा मारलेल्या आहेत हे सत्य धुक्यात गुंडाळलेले वाटते.

उ थांटशी ओळख योगायोगाने झाली. १९५५ साली, 'काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम' या संस्थेतर्फे, रंगून येथे आशियाई सांस्कृतिक स्वातंत्र्य-परिषद भरली होती. या परिषदेला ब्रह्मदेशाच्या 'सोसायटी फॉर द एक्स्टेन्शन ऑव्ह् डेमॉक्रसी' या संस्थेचे सहकार्य होते. उ थांट हे या संस्थेचे सरचिटणीस होते आणि मी या परिषदेचा प्रमुख कार्यवाह होतो. या निमित्ताने थांटशी ओळख झाली.

उ थांट यांच्या पारदर्शक प्रामाणिकपणाचा, स्नेहाळ वृत्तीचा आणि नितळ सद्‌भावनेचा माझ्यावर असा परिणाम झाला की रंगूनला गेल्यावर त्यांना भेटलो नाही तर आपले काही तरी चुकले असे वाटे.

उ थांट हे तेव्हा पंतप्रधानांच्या कचेरीचे मुख्य कार्यवाह होते. पंतप्रधान उ नू यांनी ही महत्त्वाची जागा त्यांच्या स्वाधीन मुद्दाम केली होती. उ नूंचा नितान्त विश्वास थांटनी संपादन केला होता. विश्वास आणि आधार देखील.

उ नू आणि थांट हे अनेक वर्षांचे जिवलग स्नेही. मंडालेला दोघे एका शाळेत शिक्षक होते. आँग सान यांच्या खुनानंतर पंतप्रधान-कीची वस्त्रे उ नूंच्या अंगावर चढली आणि आपल्याला वैयक्तिक मदत करण्यासाठी उ नूंनी थांटना बोलावून घतले. त्यांच्या रूपाने एक सात्त्विक शिक्षक चाणक्यनीतीच्या रंगणात आला. पण उ थांट यांनी आपला सात्त्विक बाणा सोडला नाही. आणि उ नूसुद्धा हाडाचे सज्जन असल्यामुळे उ थांटना आपल्या वृत्तीचा त्याग न करता या जागेवर टिकून राहता आले.

ब्रह्मी राजकारणात असाधारण ठरणारा आणखी एक गुण उ थांटपाशी होता. उ नूंच्या सरकारचे उपपंतप्रधान रात्री दोन अडीच वाजेपर्यंत क्लबमध्ये बिलिअर्ड खेळत, आणि स्वत: उ नू धर्म-

कारणात बरेच गुंग असत. पण उ थांट कष्टाळू व कर्तव्यनिष्ठ होते.

उ नूंना पदच्युत केल्यावर ने विनना सुद्धा उ थांटना वाऱ्यावर सोडून देणे अशक्य झाले. पण नव्या सर्वाधिकारशाही राजकारणात थांटसारख्या सोज्वळ लोकशाहीवाद्याला स्थान नव्हते. ने विननी त्यांना न्यूयॉर्कला राष्ट्रसंघातले (यू. एन.मधले) ब्रह्मी प्रतिनिधी म्हणून पाठविले.

उ थांट हे अमाप बुद्धिमत्तेचे वगैरे काही नव्हते. कृष्ण मेनन अगर किसिंजर यांच्या वर्गात त्यांचा कोणत्याही अर्थाने समावेश होण्यासारखा नव्हता. बौद्धिक पेच टाकून अगर राजनैतिक व्यूह रचून बुद्धी गोंधळून टाकण्याची त्यांची शक्ती नव्हती आणि वृत्तीही नव्हती. जागतिक सत्तास्पर्धेत ब्रह्मदेश गुंतलेला असता तर ते अल्पकालही टिकले नसते. पण आपल्या सात्त्विक स्वभावाने आणि प्रांजल प्रामाणिकपणाने कोणालाही जिंकण्याची विलक्षण ताकद उ थांटपाशी होती. कोणाच्याही अंतःकरणाला तलस्पर्श ते केवळ आपल्या सुजनतेने करीत. या गुणांच्या जोरावर त्यांनी निरनिराळ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची मने जिंकली. हॅमरशोल्ड गेल्यानंतर त्यांच्या जागेवर उ थांटची निवड उस्फूर्त उत्साहाने झाली.

·

रंगून शहर वाङ्मय, संस्कृती वगैरे दृष्टीने तसे ओसाडच म्हटले पाहिजे. पण उ थांटना भेटण्याची संधी ही मला रंगूनकडे ओढणारी एक शक्ती होती. पहिल्याच भेटीत त्यांनी मला सांगितले होते, " तुला काही अडचण आली तर सरळ मला फोन कर. "

उ थांटच्या स्वभावाचा एक विशेष असा की ते तुम्हाला लगेच विश्वासात घेत. त्यांच्यावरचा इतरांचा विश्वास ही विश्वासाने विश्वास संपादण्याची किमया होती.

एक उदाहरण सांगतो. उदाहरण जरा नाजूक आहे. त्यांच्या सद्भावनेची कदर करण्यासाठीच आजवर मी ते प्रसिद्ध केले नव्हते.

उ थांटचे स्वच्छ व्यक्तित्व त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले असे. म्हणजे त्यात सात्त्विक भाव असेच, पण त्यांच्या अंतःकरणाचा प्रामाणिकपणाही त्यात मिसळलेला असे. म्हणून त्यांच्या नजरेत एक विमल आनंद खेळे.

पण त्या दिवशी त्यांचा चेहरा गढूळ दिसला. त्या गढूळपणात चिंतेची झाक होती. मी म्हटले, " यू लूक् वरीड ? "

ते उत्तरले, " माझी पत्नी आजारी आहे. "

" काय आजार आहे ? " मी विचारले. " रंगूनमध्ये वैद्यकीय उपचार उत्तम आहेत ना ? "

" ती काही अडचण नाही, पण हा आजार डॉक्टरांच्या औषधाने सुधारणारा नाही. "

" म्हणजे ? "

" ती एक लांबलचक कथा आहे. आमचं लग्न झाल्यावर बरेच दिवस आम्हाला

मूल नव्हतं. म्हणून आम्ही एक मुलगा दत्तक घतला. तो मोठा झाला नि आम्हाला मुलगा झाला. त्यामुळं आमचा दत्तक मुलगा आमचा कमी आवडता झाला असं नाही. पण लहान मुलाकडे आईचं लक्ष अधिक असतं. असावंच लागतं. पण दत्तक मुलगा बिथरला. त्याला वाटलं, आता आम्हाला त्याची गरज नाही. एवढंच नाही तर त्याला वाटू लागलं की आपण मूळचे खालच्या जातीतले म्हणून हे आपली उपेक्षा करीत आहेत. तसं तो सर्वांना सांगू लागला."

ब्रह्मदेशातही एक प्रकारचा जातिभेद आहे हे मी ऐकले होते. पण त्याचे हे स्वरूप अनपेक्षित होते. मी म्हटले, "टू बॅड!"

"काही दिवसांपूर्वी तो घर सोडून गेला."

"काय!" मी ओरडलोच.

"होय. आणि त्याचाच धसका माझ्या बायकोनं घेतला व अंथरूण धरलं."

थांट थांबले. त्यांच्या डोळयात एक चमत्कारिक असहायता दाटली. तिच्यात वेदना जाणवली.

जरा वेळाने ते म्हणाले, "रोगावर औषध मिळते, पण दुखावलेल्या जाणिवेवर मिळत नाही."

मी नुसता गोंधळलेल्या नजरेने पाहात राहिलो.

"तो घर सोडून गेला याचं दुःख आहेच, पण तो गेल्यामुळं आपली सामाजिक इभ्रत ढासळली या भावनेमुळं ती अधिक घायाळ झाली आहे."

त्यांच्या विद्ध चेहऱ्याकडे पाहवेना.

त्यानंतर कित्येक वर्षांनी – ते राष्ट्रसंघाचे महामंत्री झाल्यावर – त्यांचा मुलगा रंगूनच्या रस्त्यावर अपघातात ठार झाल्याचे वाचले. कोणता मुलगा? तो दत्तक की पोटचा? – आठवण झाल्याबरोबर हा प्रश्न माझ्या मनात उमटतो. आज तर तो पिळवटतो.

१७.

# रा. भि. जोशी

रामभाऊ जोशी एक उत्कृष्ट लेखक अगर आदर्श शिक्षक म्हणून जसे प्रसिद्ध आहेत त्याचप्रमाणे एक सद्‌गृहस्थ असाही त्यांचा लौकिक आहे. आणि मला वाटते, त्यांच्या वाङ्मयाची विशिष्ट जात त्यांच्या सद्‌गृहस्थी वृत्तीने बनलेली आहे.

सद्‌गृहस्थाकडून आपण, निदान आपल्या समाजात, कसली अपेक्षा करीत असतो? मुख्यतः संयमाची. सद्‌गृहस्थाचे वर्तन संयत, वृत्ती संयत आणि प्रवृत्तीही संयत असली पाहिजे. थोडक्यात म्हणजे त्याने कसलीच अभिलाषा धरता कामा नये. अतिरेक सर्वत्र वर्ज्य केला पाहिजे.

म्हणजे सद्‌गृहस्थाने अ-माणूस बनले पाहिजे असे नाही. माणसाच्या विकार-भावना त्याला असतातच. फक्त त्या साऱ्यांचे शमन त्याने प्रमाणात केले पाहिजे. उपभोग घ्या, पण तो उप-भोग असला पाहिजे; भोग नव्हे!

आपले रामभाऊ या दृष्टीने आदर्श सद्‌गृहस्थ ठरतील, नव्हे आहेतच. तुम्ही त्यांना अतिरेकाने वागताना पाहिले आहे? एखादी गोष्ट आवडली म्हणून हवी तशी ओरपली, ‘ओल्या’ प्रदेशांत आलो म्हणून हवी तेवढी झोकली, मित्रमंडळी आली म्हणून स्वतःला विसरले, संताप आला म्हणून हवे तसे टाकून बोलले, एखादी गोष्ट पसंत पडली म्हणून तिची बेफाट स्तुती केली, हातात अधिकार आला म्हणून दडपून वापरला, किंवा कीर्ती लाभली म्हणून तिची मिजास वाहिली, असे काही रामभाऊंनी केल्याचे कोणी कधी पाहिले आहे काय? रामभाऊ साधारणपणे आनंदी गृहस्थ आहेत. पण आनंदाने उतू गेलेले असे कधी दिसले आहेत काय? खो खो करून कधी हसले आहेत का? (फारच हसले तर जिवणी आडवी पसरते, पण ती वेडीवाकडी झाल्याचे आढळणार नाही!) विकारांचा खळखळाट रामभाऊंच्या ठिकाणी कधी दिसणार नाही. त्यांच्या भावनेचे रूपांतर वासनेत कधी होणार नाही. अतीच्या आधीन ते जाणार नाहीत. रामाला मर्यादापुरुषोत्तम म्हणतात. आमचे रामभाऊही मर्यादा-

पुरुष आहेत.

रामभाऊंच्या मर्यादशीलतेचा आविष्कार त्यांच्या वाङ्मयातही तुम्हांला दिसेल. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या वाङ्मयीन जीवनाच्या मर्यादा चांगल्या आखल्या. एकदा त्यांचा पत्रव्यवसायात पडण्याचा विचार होता असे ऐकले होते. बरे झाले, ते त्यात 'पडले' नाहीत ते. तेथे त्यांच्यासारख्या सद्‌गृहस्थाचा निभाव लागला नसता. सद्‌गृहस्थी वाणा ही नुसती वरवरची चारचौघांत वापरण्याची वस्तू नाही. ती हाडीमासी खिळलेल्या व्यक्तीचे वर्तमानपत्र हे क्षेत्र नव्हे. जे आपल्याला माहीत नाही ते धडाकून सांगण्याची हिंमत रामभाऊंपाशी नाही. जगाला अक्कल नाही, तिचा ठेवा काय तो अस्मादिकांपाशीच आहे असे जगालाच काय पण स्वतःलाही सांगण्याची धडाडी पत्रकारापाशी लागते, ती रामभाऊंपाशी नाही. माझ्या 'नेत्रदीपक' शब्दावर विलक्षण टीका झाली, तो व्याकरण-दृष्टया चूक आहे असे टीकाकारांनी म्हटले, तेव्हा तो व्याकरणशुद्ध आहे असे सिद्ध करण्यासाठी मी पुण्याच्या मोडकशास्त्रांकडे धाव घेतली नाही. (पुढे त्यांनी तसे 'परमिट' त्या शब्दाला दिले, पण त्यात माझा काही संबंध नव्हता.) मी म्हटले, काय बिघडले शब्द अशुद्ध असला म्हणून? रामदासांनी 'अचपळ' हा शब्द 'चपळ' अर्थाने वापरला नव्हता काय? इतके सहजासहजी रामदासाच्या रांकेत उडी मारण्याचे कसब रामभाऊं-पाशी नाही. त्यांना अगोदर वाटेल—Do two blacks make one white? 'नेत्रदीपक' शब्द रूढ झाला हे वाईट झाले असे रामभाऊंनी जाहीरपणे म्हटले आहेच. शिवाय, एक 'नेत्रदीपक' शब्द काढण्यासाठी दहा भिकार शब्द बनवावे लागतात, तो उद्योगही त्यांना मानवला नसता. वृत्तपत्रव्यवसायात बुद्धीचा आणि ज्ञानाचा चक्रवाढ-व्याजाने ऱ्हास होत असताना आपली अक्कल भूमितीश्रेणीने वाढत आहे या समजुतीच्या तोऱ्याने वागणे आणि त्या तोऱ्याने मिरविणे रामभाऊंना जमले नसते—

आणि आज त्यांना जे वाङ्मयीन यश मिळाले आहे ते मिळाले नसते. रामभाऊंच्या लिखाणात तुम्हांला कल्पनेच्या कुबेरनगऱ्या, विचारांचे सेतुबंध किंवा भावनेची कुरुक्षेत्रे फारशी आढळणार नाहीत, पण विशुद्धतेचा गंगाप्रवाह आढळेल. कोणत्याही वावगे-पणाला—विचारांच्या अगर शब्दप्रयोगाच्या—तेथे वाव नाहीं. 'औचित्याला' रामभाऊंच्या वाङ्मयात मोठे अस्सल स्थान आहे. खिरस्ताच्या जन्माचे वर्णन immaculate birth असे केलेले आहे. रामभाऊंचे वाङ्मय अगर शैली अशी immaculate आहे. लिखाणात त्यांचा कधी तोल सुटत नाही. त्यांच्या लाहोरवरच्या लेखात (कदाचित दुसऱ्या एखाद्या लेखात असेल. मी हे सारे स्मरणाने लिहितो आहे. मला त्यांच्या वाङ्मयाचे विवेचन करायचे नाही. फक्त त्यांच्या प्रवृत्तीचे दिग्दर्शन—शब्दशः अर्थाने दिग्दर्शन—करायचे आहे.) पंजाबी प्रमदेचा दुपट्टा फडफडतोसा वाटतो न वाटतो, इतक्यांत ते आवरतात. आणि मौज अशी की आपण असे आवरतो आहोत याची त्यांना जाणीवच असत नाही. दिल्लीवरच्या लेखात दिल्लीकरांच्या वढाईत त्यांना ठकबाजी दिसली असली तरी वाचकाला पत्ता लागणार नाही. असे त्यांचे लिखाण चोखून-चाखून, आखून-

मापून होत असते. ‘ होत असते ’ असे मी म्हटले; ‘ केलेले असते ’ असे नाही म्हटले. कागदावर अक्षर उमटविण्यापूर्वीच आपण तेथे मर्यादेच्या अदृश्य रेखा मारून ठेवलेल्या आहेत हे त्यांना माहीतच नसते !

हे सारे खरे, तर त्यांच्या लेखनात जिवंतपणा कसा आला ? कारण अगदी सोपे. रामभाऊ तसे मोठे रसिक आहेत. प्रत्येक गोष्टीची त्यांना चव आहे. त्यांच्याबरोबर कधी सहलीला तुम्ही गेला आहात ? झाडाच्या शेंड्यावर बसलेल्या पिवळ्या पक्ष्याची लाल चोच त्यांनी कशी हेरली ते तुम्ही पाहिले आहे ? तळ्यातल्या पाण्यात उडणाऱ्या पक्ष्याचे प्रतिबिंब कसे झर्कन पडून जाते ते त्यांनी तुम्हाला कधी दाखविले आहे ? गडाच्या बुरजावरची भोके कोणाच्या तोफेने पडली याची चवकशी करतानाचा त्यांचा आतुर पण व्यग्र चेहरा तुम्ही कधी पाहिला आहे ? राईतल्या देवळाची लोककथा ऐकताना किंवा सांगताना त्यांची चष्म्याआडून लकाकणारी नजर कशी मुग्ध होते हे तुम्ही कधी वेधले आहे ? मग तुमच्या ध्यानात आलेच असेल की दर्भाच्या पात्यावरचे दंव अलगदपणे जिभेच्या अग्राने टिपून घेण्याचे कौशल्य त्यांच्यापाशी आहे. हे दंव इतिहासाचे असेल, कलेचे असेल, लोकजीवनाचे असेल, नाहीतर साधे निसर्गाचे असेल. अशी सर्व गोष्टींची त्यांना मोठी खुमास आणि खमंग चव असल्यामुळेच, विदर्भामधल्या एखाद्या रस्त्यावरच्या धुळीत पक्ष्याची पावले उमटलेली दिसली तर त्यांच्या आकृतीवरून ती उमटवितानाची पक्ष्याची वृत्तीसुद्धा त्यांच्या ध्यानात येईल; किंवा एखाद्या गुहेतल्या चित्राचा एखादा रंग उडाला असला तर त्या रंगहीन जागी कालाच्या बोटाचा कसा व किती स्पर्श झाला असेल याचा वेध घेण्याचा प्रयत्न ते करतील; अगर एखाद्या भंगलेल्या मूर्तीचा नाहीसा झालेला अवयव नजरेसमोर आणून ते स्तब्ध बनतील; आणि नदीच्या काठी फिरताना गतभर्तुकेने नदीच्या पात्राकडे तरळ दृष्टीने पाहिले तर तिच्या त्या तरळत्या दृष्टीने पाण्याच्या प्रवाहाशी केलेल्या गुजगोष्टीशी ते समरस होतील.

अशा स्नेहल, रसाळ, अगत्यशील दृष्टीने रामभाऊंनी स्थलव्यक्तींकडे पाहिले म्हणूनच त्यांची प्रवासवर्णने अगदी संमयाने आणि चोखंदळपणाने लिहिलेली असूनही मोठी वेधक बनली आहेत. त्यात सपाटा अगर झपाटा नसेल. पण त्यांत समरसता आहे आणि सौंदर्य आहे. त्यांच्या टीकेत समतोल मर्मज्ञता आहे. आणि त्यांच्या कथांत मानवी स्वभावातल्या काही विलक्षण गोष्टींचे रहस्य जाणून घेण्याचा हव्यास आहे. त्यांनी हिंदुस्थानभर प्रवास केला. प्रवासाची त्यांना आवडच आहे. ठिकठिकाणच्या स्थलांचे आणि व्यक्तींचे त्यांना आकर्षणच आहे. त्यांचे मूळ रसायन जाणून घेण्याची जबरदस्त इच्छा आहे. पण त्यातल्या त्यात महाराष्ट्रातल्या स्थलव्यक्तींवर त्यांची विशेष मेहरनजर दिसते. याचे कारण मला असे दिसते, की त्यांचा जन्म हैद्राबादेत झाला आणि बालपण एका मराठी वाण्याच्या गरीब घराण्यात गेले. निजामी राज्यात आणि उर्दू-तेलगू शहरात त्यांच्या मराठी प्रकृतीने

अंग चोरून घेतले, पण आपल्या आत्म्याचे हळुवारपणे जतन केले. त्या संस्कारसंपन्न शिक्षक घराण्यातच त्यांना सभ्यतेचे, अभ्यासाचे वळण लागले. त्या हैद्राबाद शहरात त्यांना उर्दू भाषेचे पाठ मिळाले, आणि उर्दू जीवनाच्या आंतरभागाकडे झरोक्यातून पाहण्याची हुरहूर लागून राहिली (आणि ती. उर्दू कथांच्या भाषांतराने थोडीबहुत शमली !) मला नेहमी वाटते, रामभाऊ जोशी त्या गरीब शिक्षक घराण्यात जन्माला न येता पलीकडच्याच एखाद्या जहागीरदाराच्या घराण्यात जन्माला आले असते तर नबाबी बाण्याने कसे शोभले असते ! त्यांच्या उंच उभ्या गौरवर्ण मूर्तीच्या देखण्या डोक्यावर लाल फेझ झकास शोभली असती, नाही ?

पण ते आजचे सभ्य, मर्यादशील, सद्गृहस्थ झाले असते का ? आणि त्यांच्या जीवनाला, वृत्तीला, प्रकृतीला एक सूक्ष्म कलाकुसर आहे ती दिसली असती का ? मी वर म्हटले आहे की रामभाऊ मोठे चवदार गृहस्थ आहेत. तेव्हा कदाचित दिसलीही असती. नबाबी जीवनांत चवीचे हजार प्रकार हजार प्रकारे त्यांना उपभोगता आले असते. पण लाभलेल्या आयुष्यात त्यांना शिस्तीत वागावे लागले. अर्थात ते मोठे संवेदनाशील आहेत. सूक्ष्म तरल गोष्टींची त्यांना आस आहे. रुची आहे. रुचीवर संयमाचे संस्कार झाले, अभिजात संस्कार झाले, आणि रुचीची अभिरुची झाली. त्यांचे जीवन, आणि तुम्हाआम्हाला माहीत आहे ते त्यांचे वाङ्मय हा या अभिरुचीचाच आविष्कार आहे. अभिजात आविष्कार.

१८.

**ज. र. आजगावकरांच्या** जन्मशताब्दीच्या या वर्षात ते मला त्यांच्या साठाव्या वर्षी कसे दिसले हे मनोरंजक वाटावे.

## ज. र. आजगावकर

महाराष्ट्रभाषाभूषण आजगावकर यांच्या वयाला १६-३-४१ रोजी साठ वर्षे पुरी झाली. तरीपण त्यांच्या भाषणाची 'रेकॉर्ड' एखाद्याने ऐकली किंवा त्यांचा नवमतवादावरील लेख एखाद्याने वाचला तर त्यात त्याला तरुणपणाचा सारा जोम आढळेल, इतकी त्यांची वाणी आणि लेखणी तडफदार आहे. बहुतेकांना आजचे त्यांचे विचार त्यांच्या वयाला साजेसे म्हणजे वृद्ध वाटतील; पण ते विचार व्यक्त करण्याच्या त्यांच्या पद्धतीतील तडफ व उत्साह मुळीच कमी झालेला नाही. पिंपळाचे झाड कितीही जुने झाले म्हणून काही त्याच्या पानांची सळसळ कमी होत नाही.

आपल्या या स्वभावसिद्ध तडफेमुळेच सुमारे चाळीस वर्षांपूर्वी ते एका वादात धडाडीने पडले आणि झटकन प्रसिद्धीस आले. ज्या वाङ्मयाचे एक अधिकारी तज्ज्ञ म्हणून पुढे आजगावकरांची कीर्ती झाली त्या संतवाङ्मयातील 'ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव व अभंगकर्ते ज्ञानदेव एक की दोन' या कूटप्रश्नावर तो वाद झाला. श्री. शिवराम एकनाथ भारदे नावाच्या एका गृहस्थांनी 'सुधारक' पत्रात 'भारद्वाज' या टोपण नावाने दहाबारा लेख लिहून असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव आणि अभंगकर्ते ज्ञानदेव एक नसून दोन आहेत. 'भारद्वाजां'चे लेख कौशल्याने आणि तर्कवादाचा असा काही पसारा मांडून लिहिलेले होते की, न्यायमूर्ती रानडे यांच्यासारख्या समतोल आणि चिकित्सक विद्वानाचीही खात्री पटली आणि त्यांनी भारद्वाजांना मुद्दाम पत्र लिहून त्यांचे अभिनंदन केले. तरीपण मुंबईत सॉलिसिटरच्या ऑफिसमध्ये कारकुनी करीत असलेल्या आजगावकरांचे भारद्वाजांच्या युक्तिवादाने समाधान झाले नाही. त्यांनी ज्ञानेश्वरी आणि ज्ञानदेवाचे अभंग यांचा, उपमा, दृष्टान्त,

अलंकार आणि विचारप्रणाली इत्यादी दृष्टया तौलनिक अभ्यास करून एक अडीच स्तंभ मजकुराचे उत्तर ' केसरी 'कडे पाठविले आणि लो. टिळकांनी ते तत्परतेने छापले. केसरी-तल्या त्या उत्तराचा परिणाम विलक्षण झाला. इतर विद्वानांचे लक्ष त्या वादाकडे वेगाने वळले. हा वाद आजगावकर खेळले तेव्हा त्यांचे वय अवघे एकोणीस–वीस वर्षांचे होते हे लक्षात ठेवले पाहिजे. त्यांचे विशेष शिक्षण झाले होते अशातलाही प्रकार नव्हता. आजगावच्या शाळेत ते व्हर्न्याक्युलर फायनल झाले होते व त्यानंतर त्यांच्या इंग्रजी शिक्षणास चवथी इयत्ता पास झाल्यावर कायमचा विराम मिळाला होता. तरीपण खाजगी रीतीने त्यांचे वाचन भरपूर झाले होते. वडिलांमुळे त्यांना जुन्या कवितेचा बराच नाद लागला होता आणि चिपळूणकर, केरळकोकिळकार इत्यादींच्या ग्रंथांच्या अविरत वाचनामुळे त्यांच्या भाषेस एक प्रकारचे आधुनिक वळणही लागले होते.

मुंबईच्या ' गुराखी ' पत्रात आजगावकरांनी लेखनास सुरुवात केली. त्यानंतर 'मराठा-दीनबंधु ', ' ज्ञानप्रकाश ' ' सुधारक ', ' इंदुप्रकाश ', ' संदेश ' इत्यादी पत्रांशी त्यांचा संपादक–उपसंपादक इत्यादि अनेक नात्यांनी संबंध आला. ' ज्ञानांजन ' मासिक आणि ' हास्यविनोद ' साप्ताहिक ही दोन नियतकालिके काही काल त्यांनी आपल्या स्वतःच्या हिंमतीवर चालविली होती. तरीपण त्यांचा वाङ्मयीन विकास त्यानी मधूनमधून खेळलेल्या वादांतून आणि वादांनीच अधिक झाला असे म्हणण्यास हरकत नाही. कोल्हापूरला ' मराठा–दीनबंधु ' पत्रात असताना त्यानी, त्याच पत्रात प्रसिद्ध झालेल्या कै. राजारामशास्त्री भागवत यांच्या ' मराठयांनी ख्रिश्चन व्हावे ' असा उपदेश करणाऱ्या एका लेखाची अशी खमंग हजेरी घेतली की, भागवतांनी त्या पत्राशी असलेला सर्व संबंध कायमचा सोडला. पुढे पुण्यात आल्यावर हातवळणे, गोडबोले हे प्रसृत करीत असलेल्या ' बोलल्यासारखे लिहावे ' या नवीन लेखनपद्धतीवर त्यांनी हल्यार धरले आणि विनायक कोंडदेव ओकांसारख्यांचे धन्यवाद मिळविले. पण विशेष महत्त्वाचा वाद त्यांनी कै. बाळकृष्ण अनंत भिडे यांच्याशी केला. भिडे यांनी ' सरस्वति-मंदिर ' मासिकात एक लेख लिहून निरनिराळे पाच वामन होऊन गेले असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. आजगावकरांनी त्याला ज्ञानप्रकाशातून उत्तर दिले आणि मुख्य वामन कवी दोन ठरतात असे सिद्ध केले. या वादात इतिहासाचार्य राजवाडयांसारखे विद्वान पडले होते; तरी चिकित्सक वाचकांचे आजगावकरांकडे दुर्लक्ष झाले नव्हते. याही वादात आजगावकरांचा पक्ष यशस्वी ठरला; कारण भिडयांनी आपला आग्रह सोडला. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या ' मति-विकार ' नाटकावर आजगावकरांनी ' पौंड्र ' या टोपण नावाने ' मुमुक्षू 'त केलेल्या टीके-मुळे त्यांचा श्री. कोल्हटकरांशी वाद झाला.

आजगावकरांनी हे सर्व वाद केले, पण त्यामुळे या सर्व ' वादशत्रू 'शी असलेल्या त्यांच्या स्नेहास कधीही बाध आला नाही. कै. बाळकृष्ण अनंत भिडे आणि कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्याशी अखेरपर्यंत त्यांचे संबंध नितान्त स्नेहाचेच होते; आणि याचे श्रेय बहुतांशी आजगावकरांच्या मनमोकळ्या स्वभावासच दिले पाहिजे. वाद उपस्थित झाला

किंवा मतभेदाचा प्रसंग आला म्हणजे आजगावकर रागावतील, संतापतील, किंचित वाकडी मान करून टीकेचा भडिमार सुरू करतील; हा त्यांचा वाक्प्रहार सुरू असता ते आपले डोळे – संतापाचे स्फुलिंग आसमन्तात उडू नये म्हणून की काय – किंचित मिटून घेतील; क्षुब्ध होऊन काही काल अगदी गप्प राहतील. पण तो वाद संपला, वातावरण निवळले की, त्यांची पूर्वीची बोलघेवडी प्रसन्नता पुनरपि अवतीर्ण होईल. आजच्या तरुण पिढीतील लेखकांशी त्यांचे नवमतवाद वगैरे विषयावर अगदी कडवट वाद अनेकदा झाले आहेत; पण त्यापैकी एकाही लेखकाशी त्यामुळे त्यांचे संबंध दुरावले असतील असे मला वाटत नाही.

वादविवादाच्या प्रसंगी लेखणीपेक्षा त्यांची वाणीच अधिक प्रभावी ठरते. कारण ती इतकी वेगाने वाहते की, त्यांच्या प्रतिपादनातील उलट-सुलट सर्व तपशिलांची नोंद करण्यास प्रतिपक्षाला अवसरच राहत नाही ! महाराष्ट्राच्या प्रमुख वक्त्यांत आजगांवकरांची गणना करावी लागेल. आजगावकरांचे वक्तृत्व ऐकण्यास जाहीर सभेची संधीच साधली पाहिजे असे नाही. त्यांचे खाजगी संभाषण देखील अगदी वक्तृत्वपूर्ण असते. वेचक शब्दप्रयोग, सुस्पष्ट आणि जोरकस शब्दोच्चार, अप्रतिहत प्रवाह हे त्यांच्या वाणीचे विशेष म्हणून सांगता येतील. त्यांच्या वक्तृत्वात काही ठिकाणी उपरोध दिसला तरी निर्भेळ विनोद क्वचितच आढळतो. पण ते तळमळीने बोलतात आणि साहजिकच रसवत्ता निर्माण होते. त्यांच्या दोन भाषणांचा संस्मरणीय म्हणून उल्लेख करण्यास हरकत नाही. १९१० सालच्या वसंतव्याख्यानमालेत त्यांनी ' मराठी कवी आणि त्यांजवरील आक्षेप ' यांची चिकित्सा करणारे जे व्याख्यान दिले ते तेव्हा फारच गाजले होते. विषय त्यांच्या जिव्हाळ्याचा. दोन तास त्यांची वाणी अस्खलितपणे चालली होती. सर्व सभा मंत्रमुग्ध होऊन ऐकत होती. या सभेस गडकरी हजर होते. वक्तृत्वाच्या ओघात, ' मला कोणी महार म्हटलेले चालेल, पण सुधारक म्हटलेले खपणार नाही. ' असे एक वाक्य आजगावकर बोलून गेले. तेवढेच नेमके त्यांनी उचलले व त्याच रात्री लिहिलेल्या ' प्रेमसंन्यासा 'च्या गोकुळाच्या तोंडात घातले ! अशा रीतीने गडकऱ्यांनी ते व्याख्यान अमर केले !

आजगावकरांचे दुसरे सर्वोत्तम व्याख्यान १९०९ च्या बडोदे येथील महाराष्ट्र साहित्यसंमेलनात झाले. भाषणाचा विषय ' मराठी वाङ्मयाचा महाराष्ट्र-समाजावर परिणाम ' असा होता. कर्नल कीर्तिकर अध्यक्ष होते. त्यांनी प्रत्येक वक्त्याला पाच मिनिटे वेळ दिला होता. आजगावकर बोलायला आले आणि त्यांनी आपल्या वक्तृत्वाची ' डेक्कन क्वीन ' अशा काही वेगात सोडली, की मामुली वक्ता पंधरावीस मिनिटांत बोलेल ते ते पाच मिनिटात बोलले. पण भाषण पुरे झाले नव्हते. वेळ भरल्यावर अध्यक्षांनी घंटा वाजविली. आजगावकर भाषण अर्धवट सोडून जाग्यावर जाऊन बसले; पण श्रोते ऐकत ना. ' वन्समोअर 'च्या गर्जनेने गंधर्वाला पडद्यातून खेचून आणून ' सत्य वदे... ' आठव्यांदा म्हणायला लावणाऱ्या चिकाटीने त्यांनी ' आजगावकर, आजगावकर ' असा ओरडा चालू ठेवला आणि कर्नल कीर्तिकरांना आजगावकरांना अधिक वेळ देणे भाग

पडले ! आजच्या उतारवयात देखील आजगावकरांच्या वक्तृत्वाचा वारू पूर्वीप्रमाणेच दौडत असतो !

मराठी वाङ्मयात आजगावकरांना इतके महत्त्व प्राप्त झाले आहे ते अर्थात त्यांच्या महाराष्ट्रकविचरित्रमालेमुळे. आजगावकरांची संतकविचरित्रे शास्त्रशुद्ध चरित्रलेखनाचा नमुना ठरतील अशातला मुळीच प्रकार नाही. या चरित्रांत त्यांच्या भाविक वृत्तीचेच प्रदर्शन जागोजाग होते. पण त्यामुळेच ती रसाळ झाली आहेत. केवळ वाङ्मयीन व पारिचायक दृष्टीने ही चरित्रे कितीही महत्त्वाची ठरली तरी संतांच्या कर्तबगारीचे यथायोग्य आलेखन करण्याचे आजगावकरांना कधीच जमले नाही असे म्हणणे भाग आहे. संत-कवी म्हणजे सद्गुणांची खाण आणि कर्तृत्वाचा कुतुबमिनार अशीच प्रायः त्यांची समजूत आहे. आपल्या एका प्रस्तावनेत ते म्हणतात, ' एकंदरीत तात्पर्य काय, की जुने मराठी कवी चांगले विद्वान, व्यवहारचतुर, सदाचारी, प्रेमळ आणि हरिभक्त होते व इतक्या सर्व गुणांचा त्यांच्या काव्यात ठिकठिकाणी ठसा उमटलेला असल्यामुळे ते काव्य सहजच निसर्गमनोहर उतरले आहे. ' महाराष्ट्रीय साधुसंतांत देशाभिमान, भाषाभिमान असून त्यांनी प्रचलित देशस्थितीचा राष्ट्रीयत्वाच्या भावनेने सूक्ष्म अभ्यास केला होता अशी आजगावकरांची ठाम समजूत आहे. किंबहुना ' आमच्या अंगात जे आज नाहीत, परंतु ज्यांची आज आम्हांस फार आवश्यकता आहे ते स्वार्थत्याग, करारीपणा, दीर्घोद्योग इत्यादि अमोलिक गुण जर आमच्या अंगी येणे शक्य असेल तर ते आमच्या कवींच्या काव्याचा व त्यांच्या चरित्रांचा मनःपूर्वक अभ्यास केल्यानेच होय ' असे ते ठासून सांग-तात. सद्वर्तनामुळे तर या कवींची चरित्रे व त्यांचे काव्यही आदर्शवत झाले आहे. ते म्हणतात, ' आमच्या बहुतेक जुन्या कवींचे आचरण अत्यंत शुद्ध होते. अर्थात त्या त्यांच्या सदाचरणाचा ठसा त्यांच्या कवितेवर उमटला आहे. बेकनसारखे लाचखाऊ, गोल्डस्मिथसारखे दारूबाज, बायरन्सारखे व्यभिचारी व शेरिडनसारखे दिवाळखोर आमचे कवी नव्हते. ' त्यांचे काव्य एकांगी, बहुतेक परमार्थपर होते याचाही विषाद आजगाव-करांना वाटत नाही. आंग्ल काव्यांतील विविधतेचे गोडवे गाणाऱ्या रसिकांना ते विचार-तात, ' ज्ञानेश्वरी, तुकारामाचे अभंग आणि दासबोध यांच्या तोडीचे ग्रंथ आंग्ल वाङ्मयात तरी कोठे व कितीसे आहेत ? ' यावरून ' मराठी काव्य सबंध जाळून टाकले तरी जगाचे काही नुकसान होणार नाही ' असे उद्गार काढणाऱ्या डॉ. केतकरांची संभावना ते कशी करीत असतील ते कल्पनेनेच जाणावे !

थोडक्यात म्हणजे ही त्यांची चरित्रे भाविक वृत्तीने पछाडलेली आहेत. या आत्यंतिक भाविकतेमुळेच संतचरित्रांतील चमत्कारादि प्रकारांवर ते विश्वास ठेवताना आढळतात. आजगावकरांच्या भाविक वृत्तीचा आत्यंतिक साक्षात्कार, त्यांनी मला प्रो. फाटकांबद्दल एक हकीकत सांगितली तेव्हा झाला. रामदासस्वामींच्या चरित्रातील आध्यात्मिक आणि

व्यावहारिक उदात्ततेवर आपल्या अहृदय चिकित्सकतेचा विदारक प्रकाश पाडण्याचा फाटकांचा प्रयत्न सुप्रसिद्धच आहे. हा वाद नुकताच संपला होता. इतक्यात धुळ्याचे प्रसिद्ध रामदासभक्त श्री. शंकरराव देव हे जांब येथे बांधावयाच्या रामदासमंदिरासाठी फंड गोळा करण्याच्या हेतूने मुंबईस आले आणि साहाय्यासाठी श्री. खाडिलकरांकडे गेले. खाडिलकरांनी फाटकांना शंकररावांबरोबर हिंडायला व त्यांना काही दानशूर इसमांकडे न्यावयास सांगितले. आणि खाडिलकरांच्या शब्दासाठी फाटक त्याप्रमाणे गेलेही. आजगावकरांना या घटनेत विसाव्या शतकातील एक ईश्वरी चमत्कार आढळला ! ते तात्काळ फाटकांकडे गेले आणि म्हणाले, ' पाहा, फाटक ! तुम्हाला रामदासस्वामींच्या निर्मळ चारित्र्यावर शिंतोडे उडवायला हवेत, नाही का ? आता आली की नाही यांच्याच मंदिरासाठी चौपदरी हातात घेऊन हिंडण्याची पाळी ? चांगला सूड घेतला स्वामींनी. अरे बाबा ! ईश्वर काही झोपलेला नाही ! ' अशा भाविक वृत्तीच्या चरित्रकारास संतचरित्रांचे चिंतन करताना प्रत्यक्ष ईश्वराचे दर्शन (म्हणजे त्याचा भास!) कसे झाले नाही याचेच मला नवल वाटते !

अशा भाविक वृत्तीचे आजगावकर सनातनी वृत्तीचे गृहस्थ आहेत हे निराळे सांगण्याचे कारण नाही. संतवाङ्मयाखेरीज त्यांनी लिहिलेले इतर बहुतेक वाङ्मय या सनातनी वृत्तीनेच स्फुरलेले आहे असे सहज सिद्ध करता येईल. टिळकांच्या जमान्यात आजगावकरांची जहालांत गणना होत असे. कै. हरिभाऊ आपटे तर त्यांना ' जहाल ' या नावानेच संबोधीत असत. पण ते जहाल होते ते राजकारणाचा स्वतंत्र वृत्तीने सखोल अभ्यास करून जहालमतवादित्वाची इष्टता पटल्यामुळे, असे वाटत नाही. टिळकांबद्दलच्या अभिमानामुळे आणि तेव्हा सर्वसाधारण सनातनी वर्ग टिळकांच्या जहाल राजकारणाचा पुरस्कर्ता होता म्हणूनच आजगावकर जहाल होते अशी माझी समजूत आहे. त्यांचे जहाल राजकारण आता थंडावले आहे आणि त्यांच्या स्वभावजन्य जहाल वृत्तीचा आविष्कार आजकाल फक्त नवमतविरोधी सनातनी लेखनातच होतो. त्यांच्या जीर्णमतवादित्वाची बैठक भाविक वृत्तीवर उभारलेली असल्यामुळे त्यांच्या या लेखनात तर्कशुद्धतेपेक्षा तर्कदुष्टतेचा विलासच अधिक प्रमाणात दृष्टीस पडतो, आणि तर्कशुद्धतेची उणीव ते कित्येकदा थयथयाटाने भरून काढताना आढळतात. ' वैषयिक विचारांनी बरबटलेले व्यभिचारप्रवर्तक वाङ्मय प्रसवणारे हल्लीचे काही लेखक आणि लेखिका व ते वाङ्मय, श्वानाने वमनावर ताव मारावा त्याप्रमाणे मिटक्या मारीत वाचणारे तरुण आणि तरुणी यांजकडे पाहून भर्तृहरिवर्णित सारमेयाची आठवण होते ! ' अशा संस्कृतप्रचुर गालिप्रदानाने ते आपल्या नवमतवादावरील लेखनास प्रायः प्रारंभ करतात.

नवमतवादावर लिहिण्यासाठी लेखणी उचलण्यापूर्वी त्या वादाचे स्वरूप समजावून घेण्याची आवश्यकताही त्यांना वाटत असावीसे दिसत नाही. ' हे वाङ्मय की गोमय ? ' या लेखात काढलेल्या ' वैषयिक सुखोपभोग आणि प्रजोत्पत्ती हेच मनुष्यप्राण्याचे इति-

कर्तव्य, त्यापलीकडे उदात्त असे जगात काहीच नाही, असे जे एक नवीन तत्त्वज्ञान महाराष्ट्रात हल्ली बोकाळू लागले आहे त्याचा उगम मास्को शहरात झालेला असला तरी हल्लीची गुलामगिरी महाराष्ट्रातील तरुण पिढीच्या कशी पचनी पडत चालली आहे याचेही ते निदर्शक आहे यात संशय नाही,' या त्यांच्या उद्गारांवरून माझ्या उपर्युक्त विधानाची प्रतीती येईल. या एका लहानशा वाक्यात त्यांनी महाराष्ट्रीय नवमतवाद आणि नवमतवादी यांच्याबद्दल शक्य तितके अज्ञान प्रदर्शित केले आहे. त्यांच्या तर्कदुष्टतेची चारदोन उदाहरणे नजरेखालून घालण्यास हरकत नाही. 'नवमतवाद्यांना शेलापागोटे' या त्यांच्या थोड्याबहुत गाजलेल्या लेखात नवमतवाद्यांच्या अधार्मिक वृत्तीवर हल्ला चढवितांना ते म्हणतात, 'समाजवादाचा प्रणेता कार्ल मार्क्स याने धर्म ही अफूची गोळी आहे असे म्हटले असले तरी त्या विषयावर मत देण्याचा अधिकार त्याला नव्हता. तो अधिकार विज्ञानशास्त्रज्ञांचा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे आणि हे विज्ञानशास्त्री तर ईश्वराचे अस्तित्व आणि धर्माची आवश्यकता मान्य करीत आहेत!' कार्ल मार्क्सला उपर्युक्त उद्गार काढण्याचा अधिकार का नव्हता हे ते सांगत नाहीत. अर्थात ते त्यांच्या पथ्यावरच पडले. कारण त्या भरीस ते पडले असते तर मार्क्स हा कोणत्याही विश्वविद्यालयात विज्ञानशास्त्राचा प्रोफेसर नसला तरी विज्ञानशास्त्राचा चांगला अभ्यासक होता आणि स्वतः एक उत्तम समाजशास्त्रज्ञ होता याची जाणीव त्यांना झाली असती व त्यांचे पुढचे सर्व प्रतिपादन तेथेच खुंटले असते!

ईश्वराचे अस्तित्व मान्य करणाऱ्या या विज्ञानशास्त्र्यांची मते खोडून काढणारे इतरही नास्तिक पण अधिकारी विज्ञानशास्त्री पाश्चात्य देशात व हिंदुस्थानातही आहेत याचीही कल्पना आजगावकरांना दिसत नाही. दुसरे असे की, 'ईश्वराचे अस्तित्व' आणि 'धर्माची आवश्यकता' हे दोन वेगळे प्रश्न आहेत. पहिला मुख्यत्वे करून तत्त्वज्ञानाचा प्रश्न आहे, तर दुसरा प्रायः समाजशास्त्राचा आहे; आणि आजगावकरांचे सर्व अधिकारी विज्ञानशास्त्री पहिल्या प्रश्नाबद्दल बोलत आहेत तर मार्क्सचे वचन मुख्यतः दुसऱ्या बाबीबद्दल आहे. आजगावकरांच्या ध्यानात ही गोष्ट अंधुक अंधुक रीतीनेही आलेली दिसत नाही. श्री. भास्करराव जाधवांबद्दल (रामायणकालीन संशोधन-प्रकरणी) त्यांनी केलेले पुढील विधान तर्कशास्त्राचा असाच उपमर्द करणारे आहे. ते म्हणतात, 'महमद पैगंबराविषयीं असलें संशोधन एखाद्या दीडशहाण्यानें केलें तर त्याची काय स्थिती होईल याची कल्पना कठीण नाहीं.' खरे आहे. गॅलिलिओप्रभृती शास्त्रज्ञांचा जसा छळवाद झाला तसाच कदाचित भास्कररावांचा झाला असता; पण धर्मांधांनी छळवाद केला म्हणून गॅलिलिओचे संशोधन चुकीचे ठरले नाही.

शास्त्रीय वाद करताना उपरोधाचे शस्त्र वापरून प्रतिपक्षाची टर आजगावकर चांगली उडवितात; त्यामुळे त्यांचे हे लिखाण करमणूक करते. पण जीर्णमतवादाचे चंद्रमौळी खोपट सावरून धरण्यास त्यांच्या अनेक लेखांत, श्री. अनंत काणेकरांच्या 'मोठेपणाच्या मर्यादा' या लेखाला त्यांनी 'विहार' पत्रात दिलेले उत्तरच काय ते थोडेबहुत यशस्वी होते असे

मला आठवते. पण त्याचे कारण काणेकरांचे ते प्रतिपादन बरेचसे अशास्त्रीय आणि आत्यंतिक होते हे होय. आजगावकरांचे नवमतविरोधी लेखन बहुतेक सारे भरमसाट झाले आहे.

असे असले तरी आजगावकरांच्या गोड्या आणि आतिथ्यशील स्वभावामुळे कोण-त्याही 'तय्यार' नवमतवाद्याला त्यांच्याकडे जाऊन चार घटका गमतीदार गप्पा मारावयास कंटाळा येणार नाही. बोलण्याचे कार्य बहुतेक सर्व तेच करीत असल्याने पाहुण्याला ऐकण्यापलीकडे फारशी तकलीफ पडण्याचे कारण नसते. अनेक थोर व्यक्तींशी घडलेल्या परिचयामुळे मिळालेला अनुभव, वृत्तपत्रीय व्यवसायात मुरल्यामुळे प्राप्त झालेली बहुश्रुतता, आणि दांडगी स्मरणशक्ती, यांचा कलात्मक संगम आजगावकरांच्या संभाषणात प्रतीत होतो. त्यांच्या त्या साध्या संसाराची हकीकत मोकळेपणाने सांगणाऱ्या बिऱ्हाडात गोजिरवाणी मांजरे जशी खेळत बागडत असतात, त्याप्रमाणे त्यांच्या साध्या जीवनाचा इतिहास सांगणाऱ्या त्यांच्या संभाषणात आठवणी आणि सुभाषिते यांची बागड सारखी चालू असते. मराठी वाङ्मयाच्या आजच्या चित्रविचित्र प्रदर्शनात आजगावकरांची मूर्ती इकडे तिकडे गडबडीने फिरताना आणि त्याहून अधिक जलदीने वाग्विहार करताना मला जेव्हा जेव्हा आढळते, तेव्हा तेव्हा त्यांच्याविषयी हरिभाऊ आपटे नेहमी काढीत असलेल्या एका उद्‌गाराची आठवण मला होते. हरिभाऊ आपटे पुणे म्युनिसिपालिटीच्या स्कूलबोर्डाचे चेअरमन असताना त्यांनी 'रे इंडस्ट्रिअल म्यूझिअम'मधील कारकुनाच्या जागेवर आजगावकरांची योजना केली. 'आजगावकर म्यूझियममध्ये काय करतात?' असे हरिभाऊंना कोणी विचारले तर 'He is an exhibit in the Museum' असा जवाब ते देत असत! आजगावकरांबद्दल हा जवाब हरिभाऊ जितक्या आपुलकीने आणि प्रेमळपणाने देत तितक्याच आपुलकीच्या आणि प्रेमळपणाच्या भावनेने मीही म्हणू शकेन की, 'Mr. Ajgaonkar is an exhibit in the Museum of Marathi Literature! What a lovable exhibit!'

१९.

**अच्युत बलवंत** कोल्हटकरांना मी आयुष्यात एकदाच पाहिले होते. कोठे ते आठवत नाही. बहुधा खटाववाडीत असेल. त्यांचे ते दर्शन फारसे सुखद वाटले नव्हते. त्यांचा तो बसक्या चपट्या नाकाचा, दात थोडे पुढे आलेला निस्तेज चेहरा; डोक्यावर झुलपे – तेव्हाच्या फॅशनला साफ खो देणारी; आणि पायात बूट आणि पायमोजे – त्या झुलपाइतकेच अजागळ आणि ते सुद्धा धोतरावर; अंगात खादीचा नेहरू शर्ट – त्याचा पुढचा भाग ढेर पोटावर उचललेला आणि दोनही खिशात खूप आत गेलेल्या हातांनी दोनही बाजूस थोडासा ओढलेला. कपडे परीटघडीचे वगैरे काही नव्हते. अर्थात वरच्या झुलपांना आणि खालच्या पायमोजांना शोभणारे ते होते. एवढी एक सुसंगती त्यांच्या शरीरावर होती, पण ती विपरीतच वाटत होती.

# अच्युत बलवंत कोल्हटकर

त्यांच्याकडे बोट दाखवीत रॉय किणीकर मला म्हणाला, ‘ते पाहा साहेब.’ नंतरच्या काळात अत्र्यांना साहेब म्हटलेले ऐकले म्हणजे मला हा प्रसंग आठवे आणि वाटे, बेजबाबदारी आणि साहेबगिरी यांची गाठ बांधलेली असते काय ?

पण असे काही त्यावेळी मनात आले नाही. कोल्हटकरांचा दराराच तसा होता ! त्यांच्या विषयींच्या दंतकथांनी तयार केलेला.

एक अगदी सवंग दंतकथा म्हणजे बलवंत हे काही त्यांच्या वडिलांचे नाव नव्हे. त्यांच्या वडिलांचे नाव होते वामन. वामनराव नेमस्त मवाळ राजकारणाचे मोठे पुरस्कर्ते. याच्या उलट अच्युतराव टिळकांच्या जहाल राजकारणाचे मोठे अभिमानी. टिळकांवर त्यांची विलक्षण भक्ती. वडिलांच्या राजकारणाविषयीचा तिटकारा आणि टिळकांच्या राजकारणाविषयीची आपुलकी आपल्या जीवनात भिनविण्यासाठी त्यांनी वामन या मधल्या पितृस्थानावरच्या स्वाभाविक नावाचा त्याग करून तेथे बलवंत या टिळकांच्या नावाची प्रतिस्थापना केली होती. आता वामनराव नेमस्त असले तरी तत्त्वनिष्ठ होते. सुंदर श्रीमंत विधवांना गटविण्यासाठी सुधारक पुनर्विवाह करतात या

क्षुद्र आरोपाला ठोकरण्यासाठी त्यांनी मुद्दाम एका गरीब कुरूप विधवेशी लग्न केले होते. वडिलांच्या या नेकदारीबद्दल या सुपुत्राला अभिमान होता, पण राजकारण हा देशाच्या अब्रूचा सवाल होता आणि या बाबतीत पिताजींच्या पापाला क्षमा नव्हती.

आता ही शुद्ध बावडी होती. लोकप्रवादाच्या वाऱ्यावर इतस्ततः फडफडणारी. 'अच्युत वामन 'चे 'अच्युत बलवंत' झाले याचे कारण अगदी साधे होते. अच्युतराव चुलत्याला दत्तक गेले होते आणि दत्तक वडिलांचे नाव बलवंत होते.

पण याची चवकशी करण्याची कोणाला गरज भासत नव्हती. अच्युतरावांच्या टिळक-भक्तीची ही मोठी ग्वाही होती, आणि तेवढी लोकांना पुरे होती. मलाही पुरेशी वाटली होती. टिळकांचा माझ्यावरचा पहिला परिणामकारण ठसा अच्युतरावांनीच उमटविला होता. टिळक वारल्यानंतर अच्युतरावांनी आपल्या पत्राची एक रंगीन पुरवणी प्रसिद्ध केली होती. या रंगीन चित्रात, कुरुक्षेत्रावर अर्जुन श्रीकृष्णाऐवजी लोकमान्यांचे पाय धरून बसल्याचे दाखविले होते. अच्युतरावांची टिळक-भक्ती आणि टिळकांच्या माहात्म्याचा मला झालेला बोध यांची पक्की गाठ त्या चित्राने घातलेली होती.

हे सारे मनात असल्यामुळेच ते गबाळ ढगळ दर्शन माझ्या गाभ्याला कोठे तरी स्पर्श करून गेले.

हा पहिला भर ओसरल्यावर मला अच्युतरावांनी टिळकांच्या बाबतीत केलेले पावित्र्य-विडंबन आठवले. 'टिळक बाळंत झाले' असा मथळा देणारा पत्रकार आत कोठेतरी विलक्षण बेजबाबदार असला पाहिजे यात शंका नाही. ज्या संदर्भात अच्युतरावांच्या लेखणीला ही अवदसा आठवली होती ते फण्डगुण्ड-प्रकरण टिळकांच्या नावाशी संल्लग्न होऊ शकत नव्हते. टिळक-शिष्यांवर अच्युतरावांनी या प्रकरणी आरोप केले ते तरी कसे ? तर

टिळक जाणा शंभू जैसा । भिक्षा मागोनि करी तपस्या ।।
तरी टिळकगणासि फण्डपिपासा । मत्त करी निर्धारे ।।

असे टिळकांना बावळट ठरविणारे !

एका थोर पत्रकाराच्या या विसंगत दर्शनाने तेव्हा मी गोंधळूनच गेलो. पण आज मला वाटते की पत्रकारितेला बेजबाबदारीचा शापच असतो. यातून चिपळूणकर सुटले नाहीत, आगरकर सुटले नाहीत, टिळक सुटले नाहीत आणि सुवर्णमध्यावर स्थिर झालेले सावध-बुद्धी केळकरही सुटले नाहीत. चिपळूणकरांनी फुल्यांना ब्राह्मणांच्या कनवटीला असलेल्या विद्येच्या किल्लीची आठवण करून दिली. आगरकरांनी टिळकांवर मत्सराचा आरोप केला. टिळकांच्या 'केसरी'त आगरकरांना उद्देशून 'माळावरचा महारोगी' असे अभद्र अभिधान प्रसिद्ध झाले. आणि शाहू महाराज वारले तेव्हां 'स्वराज्यद्रोही छत्रपतीचे निधन' असा मथळा केळकरांनी त्यांजवरील मृत्यूलेखाला दिला. मी या श्रेष्ठ पत्रकारांच्या मालिकेत

बसतच नाही, तेव्हा बेजबाबदारीतून मी सुटलो नसणारच. पण एका बेजबाबदारीचे दुःखद स्मरण मला नेहमीच होते. चिमूरला ब्रिटिश सोजिरांनी केलेल्या स्त्रियांवरील अत्याचारांच्या संदर्भात, तेव्हा व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत असलेल्या अण्यांनी, सौ. अनूसयाबाई काळे यांसारख्या मान्यवर महिलेची भेट घेण्याचे नाकरले तेव्हा, आमच्या ‘ धनुर्धारी ’त, ‘ वऱ्हाडचा बेशरम बुढ्ढा ’ असा पानभर मथळा मी दिला होता. पण अच्युतरावांची लेखणी एखाद्या क्षणिक उद्रेकाने विचलित झालेली नव्हती. त्यांनी या फण्डगुण्ड-प्रकरणी एक मोहीमच उघडली. त्यातून काही निघाले नाही. त्यांनी आपले हकनाक नुकसान मात्र करून घेतले.

या संदर्भात मला आणखी एका पत्रकाराचे नाव आठवते. तो म्हणजे बी. जी. हॉर्निमन. होमरूल चळवळीच्या काळात ‘ बॉम्बे क्रॉनिकल ’चे संपादक या नात्याने हॉर्निमनी राष्ट्रीय तेजस्वितेच्या ज्वाळा आसमन्तात पसरविल्या होत्या — इतक्या की ब्रिटिश सरकारने त्यांना हद्दपार केले. पण पुनः भारतात आल्यानंतर त्यांचे लोकांना जे दर्शन घडले ते या संचिताला शोभेसे नव्हते. परिणामी या महान पत्रकाराला पुढे उपेक्षित आपत्तियुक्त आयुष्य काढावे लागले.

अच्युतराव आणि हॉर्निमन — दोघांचीही लेखणी तप्त तेजस्वी होती. प्रतिभेच्या दीप्तीचा स्पर्श दोघांच्याही लिखाणाला होता. दोघांच्याही लेखणीत वाचकांचे अंतःकरण भावाविष्ट करून सोडण्याची ताकद होती. पण दोघेही बेजबाबदारीचे बळी ठरले. त्यांचा संपादकीय संचारच बेजबाबदार होता असे नाही. संपादनाला आवश्यक असणारी व्यवहाराची बैठकही दोघांची ढिली होती. या दोघांची आठवण झाली म्हणजे माझे मन, आज इतक्या वर्षांचा अवधी लोटल्यानंतरही, विषादाने भरून जाते. त्यांच्या बाबतीतली शक्यता नजरेपुढे तोरणे बांधते आणि ती चक्क कोसळत असलेली दिसतात !

लोकमान्य आणि त्यांचे नरसोपंत केळकरांसारखे शिष्य यांच्यावर बेहद्द लेखणी चालविल्यामुळे अच्युतराव लोकांत अतिशय अप्रिय झाले — इतके की त्यांच्यासारख्या वाणीसिद्ध वक्त्याला जाहीर सभांत तोंड उघडणे मुष्किल झाले. पण मौज अशी की एका काळी खुद्द टिळकांना अच्युतरावांच्या पत्रकारितेचे भारी आकर्षण होते. ‘ संदेशची प्रत दररोज माझ्या टेबलावर आणून टाकीत जा ’ असा आदेश त्यांनी बाबा विद्वांसांना दिलेला होता. एका दृष्टीने अच्युतरावांचे लिखाण टिळकांना उपकारक असे. टिळकांना ‘ केसरी ’ची प्रतिष्ठा सांभाळून त्यात जे लिहिता येत नसे ते ‘ संदेश ’मध्ये सालंकृत प्रसिद्ध होई. अच्युतरावांच्या या आगळ्या अलंकारांची शोभा टिळकांना, ते जरा मोकळे असताना, आकर्षक वाटत असावी असे वाटते. टिळक स्वतः रोखठोक लिहिणारे होते. कल्पनाविलासाच्या लतापल्लवांचा त्यांना सोस नव्हता; पण आपला युक्तिवाद, अच्युतरावांच्या कल्पनाविलासाची लेणी लेवून लोकांच्या नजरेसमोर उभा असलेला पाहताना टिळक नाराज होते असे मानण्याचे कारण नाही.

अच्युतरावांची संपादकीय बेजबाबदारी आणि व्यावहारिक विस्कळितपणा त्यांना

चांगलाच बाधला. काही काल त्यांची वाणी आणि लेखणी कुंठित झाली. ते स्वतः वाळीत पडल्यासारखे झाले. पुढे त्यांनी 'संजय', 'चाबूकस्वारा 'सारखी पत्रे काढली. 'संदेश'चे पुनरुज्जीवन केले. पण त्यांना त्यांचे संदेशकालीन संपादकीय वैभन पुनः कधीच लाभले नाही. आणि तरी देखील त्यांचे मराठी वृत्तपत्र–सृष्टीतले स्थान केव्हाच कोणाला हिरावून घेता येणार नाही, कारण इतिहासानेच ते नोंदून ठेवलेले आहे.

मराठीतली पहिली वहिली पत्रकारिता गंभीर होती. ध्येयाविष्ट होती. ज्ञानसंपादनाच्या ईर्ष्येने पल्लवित झालेली होती. 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानप्रसारक' 'ज्ञानोदय' 'विविधज्ञानविस्तार' असली नावेच या उद्दिष्टाची ग्वाही देतात. ज्ञानाच्या संपादनाने समाजोद्धाराची क्षितिजे विस्तीर्ण झाली, राष्ट्रोन्नतीची क्षेत्रे दृष्टिपथात आली. आपली पत्रकारिता आणि आपले वाङ्मयसुद्धा समाजसुधारणा आणि राष्ट्रविमोचन यांच्या ध्येयांनी भारले गेले. पण शिक्षणाच्या प्रसाराने निव्वळ करमणुकीसाठी वाचणारा (आणि लिहिणाराही) एक वर्ग हळूहळू निर्माण झाला. या वर्गाच्या अस्तित्वाची द्वाही हरिभाऊंच्या 'करमणूकी'ने आणि मित्रांच्या 'मनोरंजना'ने फिरविली. पण ज्याला वृत्तपत्र असे म्हणावे त्याची प्रकृती अद्याप गंभीरच होती. फडक्यांच्या 'हिंदू पंचा'सारखा एखादाच अपवाद. या वृत्तपत्रांचे वाचनसुद्धा कर्तव्यबुद्धीने वाचनालयात जाऊन व्हायचे.

अच्युतरावांच्या 'संदेश'ने या वाचनालयांच्या ग्राहकांना वर्तमानपत्र विकत घेऊन वाचण्याची सवय लावली. ती अपरिहार्य होती. सकाळच्या चहाची चव वाढविण्याची करामत 'संदेश'मध्ये होती. वृत्तपत्रानाही सजावटीचा काही भाग असतो इकडे 'संदेश'ने लक्ष पुरविले. मोठ्या टाइपातले आकर्षक मथळे देण्यास सुरवात केली. मजकुराची रचनाही बदलली. पण हा नुसता बहिरंगाचा मामला होता. अच्युतरावांचे स्वतःचे बहिरंग आकर्षक नव्हते, पण त्यांच्या डोक्यात विविध विचार आणि अंतरंगात अनेकविध भाव असायचे. ते मजकुरात उतरून 'संदेश'चे अंतरंग नानारंगी नानाढंगी बनू लागले. अंतरंगाच्या या ज्या नाना कळा त्यांनी 'संदेश'च्या रकान्यांत दाखविल्या त्यांनी मराठी पत्रकारितेत एक नवाच पायंडा पाडला. महाराष्ट्रात तटणीस, बावडेकर, रांगणेकर, बांदेकर, रॉय किणीकर प्रभृतींची जी एक पिढी नंतर निर्माण झाली तिने एका विशिष्ट प्रकारचे चमकदार वृत्तलेखन वाचकांना पुरविले. चटकदारपणा हा या वृत्तलेखनाचा पहिला विशेष असे. त्यासाठी विनोद, आख्यायिका, काल्पनिक वृत्तांत, काल्पनिक संवाद, काल्पनिक पत्रव्यवहार, काल्पनिक स्वप्ने आणि दिवास्वप्ने, अनेक भानगडी आणि कुलंगडी यांचे स्फोट, आणि हे सारे सांगण्यासाठी हलकीफुलकी, चुरचुरित, क्वचित विषारी भाषाशैली – अशा युक्त्याप्रयुक्त्यांचा मनमुराद वापर या लोकांनी केला. मजकूर खमंग-खुसखुशित करण्यासाठी लेखणीचे अनेक भ्रमविभ्रम आणि वाटावळणे त्यांनी उपयोगात आणली. अनेक वक्रालंकार वापरले. अनेक चेष्टितांची दर्शने घडविली. या पत्रकारांनी मराठी पत्रकारितेचे एक नवे युगच निर्माण केले. या युगाचा इतिहास 'विविधवृत्त', 'तुतारी', 'वसुंधरा', 'चित्रा', 'आशा', 'धनुर्धारी', 'आलमगीर' वगैरे पत्रांच्या रकान्यांत

बसतच नाही, तेव्हा बेजबाबदारीतून मी सुटलो नसणारच. पण एका बेजबाबदारीचे दुःखद स्मरण मला नेहमीच होते. चिमूरला ब्रिटिश सोजिरांनी केलेल्या स्त्रियांवरील अत्याचारांच्या संदर्भात, तेव्हा व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत असलेल्या अण्यांनी, सौ. अनूसयाबाई काळे यांसारख्या मान्यवर महिलेची भेट घेण्याचे नाकरले तेव्हा, आमच्या 'धनुर्धारी'त, 'वऱ्हाडचा बेशरम बुढ्ढा' असा पानभर मथळा मी दिला होता. पण अच्युतरावांची लेखणी एखाद्या क्षणिक उद्रेकाने विचलित झालेली नव्हती. त्यांनी या फण्डगुण्ड-प्रकरणी एक मोहीमच उघडली. त्यातून काही निघाले नाही. त्यांनी आपले हकनाक नुकसान मात्र करून घेतले.

या संदर्भात मला आणखी एका पत्रकाराचे नाव आठवते. तो म्हणजे बी. जी. हॉर्निमन. होमरूल चळवळीच्या काळात 'बॉम्बे क्रॉनिकल'चे संपादक या नात्याने हॉर्निमनने राष्ट्रीय तेजस्वितेच्या ज्वाळा आसमन्तात पसरविल्या होत्या – इतक्या की ब्रिटिश सरकारने त्यांना हद्दपार केले. पण पुनः भारतात आल्यानंतर त्यांचे लोकांना जे दर्शन घडले ते या संचिताला शोभेसे नव्हते. परिणामी या महान पत्रकाराला पुढे उपेक्षित आपत्तियुक्त आयुष्य काढावे लागले.

अच्युतराव आणि हॉर्निमन – दोघांचीही लेखणी तप्त तेजस्वी होती. प्रतिभेच्या दीप्तीचा स्पर्श दोघांच्याही लिखाणाला होता. दोघांच्याही लेखणीत वाचकांचे अंतःकरण भावाविष्ट करून सोडण्याची ताकद होती. पण दोघेही बेजबाबदारीचे बळी ठरले. त्यांचा संपादकीय संचारच बेजबाबदार होता असे नाही. संपादनाला आवश्यक असणारी व्यवहाराची बैठकही दोघांची ढिली होती. या दोघांची आठवण झाली म्हणजे माझे मन, आज इतक्या वर्षांचा अवधी लोटल्यानंतरही, विषादाने भरून जाते. त्यांच्या बाबतीतली शक्यता नजरेपुढे तोरणे बांधते आणि ती चक्क कोसळत असलेली दिसतात !

लोकमान्य आणि त्यांचे नरसोपंत केळकरांसारखे शिष्य यांच्यावर बेहद्द लेखणी चालविल्यामुळे अच्युतराव लोकांत अतिशय अप्रिय झाले – इतके की त्यांच्यासारख्या वाणीसिद्ध वक्त्याला जाहीर सभांत तोंड उघडणे मुष्किल झाले. पण मौज अशी की एका काळी खुद्द टिळकांना अच्युतरावांच्या पत्रकारितेचे भारी आकर्षण होते. 'संदेशची प्रत दररोज माझ्या टेबलावर आणून टाकीत जा' असा आदेश त्यांनी बाबा विद्वांसांना दिलेला होता. एका दृष्टीने अच्युतरावांचे लिखाण टिळकांना उपकारक असे. टिळकांना 'केसरी'ची प्रतिष्ठा सांभाळून त्यात जे लिहिता येत नसे ते 'संदेश'मध्ये सालंकृत प्रसिद्ध होई. अच्युतरावांच्या या आगळ्या अलंकारांची शोभा टिळकांना, ते जरा मोकळे असताना, आकर्षक वाटत असावी असे वाटते. टिळक स्वतः रोखठोक लिहिणारे होते. कल्पनाविलासाच्या लतापल्लवांचा त्यांना सोस नव्हता; पण आपला युक्तिवाद, अच्युतरावांच्या कल्पनाविलासाची लेणी लेवून लोकांच्या नजरेसमोर उभा असलेला पाहताना टिळक नाराज होते असे मानण्याचे कारण नाही.

अच्युतरावांची संपादकीय बेजबाबदारी आणि व्यावहारिक विस्कळितपणा त्यांना

चांगलाच बाधला. काही काल त्यांची वाणी आणि लेखणी कुंठित झाली. ते स्वतः बाळीत पडल्यासारखे झाले. पुढे त्यांनी ‘ संजय ’, ‘ चाबूकस्वारा ’सारखी पत्रे काढली. ‘ संदेश ’चे पुनरुज्जीवन केले. पण त्यांना त्यांचे संदेशकालीन संपादकीय वैभन पुनः कधीच लाभले नाही. आणि तरी देखील त्यांचे मराठी वृत्तपत्र–सृष्टीतले स्थान केव्हाच कोणाला हिरावून घेता येणार नाही, कारण इतिहासानेच ते नोंदून ठेवलेले आहे.

मराठीतली पहिली वहिली पत्रकारिता गंभीर होती. ध्येयाविष्ट होती. ज्ञानसंपादनाच्या ईर्ष्येने पल्लवित झालेली होती. ‘ ज्ञानप्रकाश ’, ‘ ज्ञानप्रसारक ’ ‘ ज्ञानोदय ’ ‘ विविधज्ञानविस्तार ’ असली नावेच या उद्दिष्टाची ग्वाही देतात. ज्ञानाच्या संपादनाने समाजोद्धाराची क्षितिजे विस्तीर्ण झाली, राष्ट्रोन्नतीची क्षेत्रे दृष्टिपथात आली. आपली पत्रकारिता आणि आपले वाङ्मयसुद्धा समाजसुधारणा आणि राष्ट्रविमोचन यांच्या ध्येयांनी भारले गेले. पण शिक्षणाच्या प्रसाराने निव्वळ करमणुकीसाठी वाचणारा (आणि लिहिणाराही) एक वर्ग हळूहळू निर्माण झाला. या वर्गाच्या अस्तित्वाची द्वाही हरिभाऊंच्या ‘ करमणूकी ’ने आणि मित्रांच्या ‘ मनोरंजना ’ने फिरविली. पण ज्याला वृत्तपत्र असे म्हणावे त्याची प्रकृती अद्याप गंभीरच होती. फडक्यांच्या ‘हिंदू पंचा’सारखा एकादाच अपवाद. या वृत्तपत्रांचे वाचनसुद्धा कर्तव्यबुद्धीने वाचनालयात जाऊन व्हायचे.

अच्युतरावांच्या ‘ संदेश ’ने या वाचनालयांच्या ग्राहकांना वर्तमानपत्र विकत घेऊन वाचण्याची सवय लावली. ती अपरिहार्य होती. सकाळच्या चहाची चव वाढविण्याची करामत ‘ संदेश ’मध्ये होती. वृत्तपत्रानाही सजावटीचा काही भाग असतो इकडे ‘ संदेश ’ने लक्ष पुरविले. मोठ्या टाइपातले आकर्षक मथळे देण्यास सुरवात केली. मजकुराची रचनाही बदलली. पण हा नुसता बहिरंगाचा मामला होता. अच्युतरावांचे स्वतःचे बहिरंग आकर्षक नव्हते, पण त्यांच्या डोक्यात विविध विचार आणि अंतरंगात अनेकविध भाव असायचे. ते मजकुरात उतरून ‘ संदेश ’चे अंतरंग नानारंगी नानाढंगी बनू लागले. अंतरंगाच्या या ज्या नाना कळा त्यांनी ‘ संदेश ’च्या रकान्यांत दाखविल्या त्यांनी मराठी पत्रकारितेत एक नवाच पायंडा पाडला. महाराष्ट्रात तटणीस, बावडेकर, रांगणेकर, बांदेकर, रॉय किणीकर प्रभृतींची जी एक पिढी नंतर निर्माण झाली तिने एका विशिष्ट प्रकारचे चमकदार वृत्तलेखन वाचकांना पुरविले. चटकदारपणा हा या वृत्तलेखनाचा पहिला विशेष असे. त्यासाठी विनोद, आख्यायिका, काल्पनिक वृत्तांत, काल्पनिक संवाद, काल्पनिक पत्रव्यवहार, काल्पनिक स्वप्ने आणि दिवास्वप्ने, अनेक भानगडी आणि कुलंगडी यांचे स्फोट, आणि हे सारे सांगण्यासाठी हलकीफुलकी, चुरचुरित, क्वचित विषारी भाषाशैली – अशा युक्त्याप्रयुक्त्यांचा मनमुराद वापर या लोकांनी केला. मजकूर खमंग-खुसखुशित करण्यासाठी लेखणीचे अनेक भ्रमविभ्रम आणि वाटावळणे त्यांनी उपयोगात आणली. अनेक वक्रालंकार वापरले. अनेक चेष्टितांची दर्शने घडविली. या पत्रकारांनी मराठी पत्रकारितेचे एक नवे युगच निर्माण केले. या युगाचा इतिहास ‘ विविधवृत्त ’, ‘ तुतारी ’, ‘वसुंधरा ’, ‘ चित्रा ’, ‘ आशा ’, ‘ धनुर्धारी ’, ‘ आलमगीर ’ वगैरे पत्रांच्या रकान्यांत

आकारास आलेला आढळेल. या युगाचे आद्यपुरुष 'अच्युतराव कोल्हटकर' हे होते.

'संदेश'ची काही सदरांची नावेच याची ग्वाही देतील : 'संदेशाचा अहेर', 'संदेशाचा फुलबाग', 'संदेशाचे साखरदाणे', 'संदेशाचे चणेफुटाणे', 'संदेशाचे पदवीदान', 'चहा चिवडा चिरूट', 'नाटक मंडळयांचे गॅझेट', 'बेटा गुलाबच्या कानगोष्टी', 'संदेशाची आर्ट गॅलरी' वगैरे. या सदरांतून जो आत्मा वावरत होता त्यानेच पुढे 'चित्रा'दी पत्रांतून विविध रूपे आणि अपरूपे धारण केली, पण काही सदरे निव्वळ मनोविनोदनापलीकडे गेली. उदाहरणार्थ, 'नाटकमंडळयांचे गॅझेट'. पूर्वी न. चिं. केळकरांसारख्या एखाद्या मातबर लेखकाच्या 'तोतयाच्या बंडा'सारख्या नाटकावर श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारखे मान्यवर लेखक पानेच्या पाने अभिप्राय खरडीत आणि क्वचित वाचकाच्या सहनशीलतेची कसोटी पाहत. वाचक अर्थात हा मजकूर कर्तव्यबुद्धीने वाचीत. पण नाटक हे नुसते वाङ्मय नव्हे, रंगभूमीचा तो एक विशेष आहे आणि रंगभूमी ही एक सांस्कृतिक धारा आहे याची जाणीव फारशी नव्हती. असली तरी तिला वृत्तपत्रीय वाचा फुटलेली नव्हती. संदेशने ती फोडली. रंगभूमी हे समाजजीवनाचे एक महत्त्वाचे अंग आहे; समाजाच्या वृत्तप्रवृत्तींनी निर्मिलेले ते एक दृश्य जग आहे; वाङ्मय, कला, क्रीडा यांच्याप्रमाणे समाजाच्या प्रगतीचे ते एक निदर्शक आहे; थोडक्यात रंगभूमी ही वाङ्मय, संगीत, चित्रकला, शिल्पकला, अभिनय इत्यादींची एक जिवंत साक्षिणी आहे; या दृष्टीने अच्युतरावांपूर्वी कोणा पत्रकाराने तिच्याकडे पाहिले नव्हते. रंगभूमी ही एक चळवळ आहे; समाजाच्या सांस्कृतिक उत्साहाची ती एक वाहिनी आहे; हे ध्यानात घेऊन अच्युतरावांनी, महाराष्ट्रात ठिकठिकाणी होणाऱ्या नाट्यप्रयोगांची, नव्याजुन्या नटनट्यांची (म्हणजे बव्हंशी नटांची), नाटककंपन्यांच्या दौऱ्यांची, नाटकमंडळयांच्या घडामोडींची, संदेशाच्या गॅझेटमध्ये चिकित्सक व प्रोत्साहक दखल घेतली. या गॅझेटमध्ये निरनिराळ्या नाटकांनी आणि नटांनी हजेरी तर लावलीच, पण प्रेक्षकांच्या अभिरुचीची सुद्धा तेथे झडती झाली.

अच्युतरावांच्या विशिष्ट वृत्तपत्रीय प्रकृतीची प्रतिमा 'वत्सलावैनी'च्या रूपाने उमटली. एका नेमस्तपक्षीय पतीची जहालपक्षीय पत्नी अशी भूमिका धारण करून वत्सलावैनी आपली पत्रे सादर करीत. या पतिपत्नीचे लडिवाळ भांडण या पत्रांतून प्रकट होई. या पत्रांच्या संग्रहाला खुद्द पतिराजांनी प्रस्तावना लिहिली, आणि सांगितले, 'माझी पत्नी माझ्याप्रमाणेच महादेव गोविंद राजवाड्यांची भक्त आहे. फक्त मी समजतो तसे टिळक दोषी नाहीत असे तिचे म्हणणे आहे.' पतीवरील प्रेमामुळे असेल कदाचित, पण वत्सलावैनीची मवाळाग्रणीवरील टीका सहानुभूतीने भरलेली असे. अच्युतरावांच्या गुणग्राहकतेचा पुरावा या पत्रांतून दिसतो. अर्थात अच्युतरावांच्या खट्याळ बुद्धीची बाधा या पत्रांना मुळीच झालेली नव्हती असे नाही. आणि त्यामुळे नेमस्त प्रवक्त्यांच्या नाकांना मिरच्या झोंबून त्यांचे लाल शेंडे नेमस्तपक्षीय पत्रांत शिवराळ टीकेच्या रूपाने अनेकदा प्रदर्शित झाले होते. मात्र ही पत्रे इतकी खमंग असत; त्यांची शैली इतकी अभिजात बायको असे; बायकी बुद्धीचा अकल्पित युक्तिवाद या पत्रातून इतका दिसे; अच्युतरावांच्या अवखळ

विनोदाच्या कोलंटउड्या इतक्या नजरबंद करीत; या पत्रांचे, ‘ डोहाळ जेवणाची धांदल ’, ‘ सगळेच मुसळ केरात ’, ‘ काकडीला मीठ ’, ‘ कडबोळी अन् शंकरपाळे ’, ‘ हुलग्याचे माडगे ’, ‘ श्रीखंडपुरी ’ असे मथळे इतके चविष्ट असत; आणि मुख्य म्हणजे ही पत्रे वाचकांच्या स्वतःच्या मीठमसाल्याने इतकी रंगत की जहाल वाचकच काय, पण नेमस्तांचे पुढारीही (बहुधा चोरून) ही पत्रे नजरेखालून घालण्यास चुकत नसत. बायकी शैली, बायकी विनोद, आणि बायकी युक्तिवाद आणि या साऱ्यांची फोडणी देऊन सादर केलेला राजकीय फोडणीभात त्यापूर्वी अगर त्यानंतर मराठी वाङ्मयात वाढला गेला असे वाटत नाही.

अच्युतरावांचा वृत्तपत्रीय थाट हे अगदी स्वतंत्र प्रकरण होते. त्यांच्या स्वभावाचा अतिरेकीपणा, अस्थिरपणा, किंचित आचरटपणा आणि बहुतेकदा अचाटपणा त्याला बाधला नसता तर अच्युतराव ही मराठी पत्रसृष्टीची एक दीर्घकालीन संस्था बनली असती. पण त्यांचा उथळपणा आणि उच्छृंखलपणा या पत्रकारितेला बाधला आणि ते प्रकरण अल्पायुषी ठरले. तरीसुद्धा अच्युतराव आणि त्यांच्या पठडीतले पुढील पत्रकार यांच्यामध्ये जो एक महत्त्वाचा फरक होता तो नमूद करायला हवा. हे पुढचे पत्रकार कोणत्याही प्रकारच्या बांधिलकीला फारसे बांधलेले नव्हते. वृत्तपत्रीय यशापलीकडे त्यांची फारशी दृष्टी नव्हती. उलट अच्युतराव हे काही ध्येये आणि काही आदर्श उराशी बाळगून पत्रसृष्टीत उतरले होते. त्या दृष्टीने अर्थात त्यांची पत्रकारपद्धती आत्मघातक होती. जेव्हा वाचकाचे लक्ष आशयापेक्षा अभिव्यक्तीच्या शैलीत गुंगून पडते तेव्हा तो मूळच्या ध्येयांनी प्रज्वलित होण्याचा संभव कमी असतो. दुसरे असे की अशा उठवळ पत्रकारितेला जे वाचक मिळतात ते सुद्धा ‘ दोन घटका करमणूक ’ या दृष्टीचेच असतात. म्हणून अच्युतरावांनी जरी मराठी पत्रसृष्टीत एक नवे युग सुरू केले आणि ही त्यांची कामगिरी जरी केवळ ऐतिहासिक असली तरी तिने त्यांच्या ध्येयाविष्ट अंतरात्म्याला अंतिम समाधान थोडेच दिले असेल. अच्युतरावांची ध्येये केवळ राजकारणापुरती मर्यादित होती असे नव्हे. राजकीय ध्येयांची साधना अच्युतरावांसारख्यांना पुष्कळदा कृतार्थ करीतच नाही. पण अच्युतरावांच्या नजरेसमोर मराठी भाषा आणि हिंदू धर्म यांच्या वैभवाची स्वप्ने तरळत होती. वेदांच्या मराठी भाषांतरासाठी त्यांनी ‘ श्रुतिबोध ’ मासिक काढले होते आणि वेदांच्या अध्ययनविषयक चर्चेसाठी ‘ उषा ’ काढली होती. पण दोनही नियतकालिके अल्पायुषी ठरली. असले उद्योग यशस्वी करण्यासाठी जी सातवळेकरी बुद्धी आणि जिद्द लागते ती अच्युतरावांपाशी नव्हती.

अच्युतराव हाडाने केवळ पत्रकार नव्हते. ते साहित्यिक होते. त्यांच्या नियतकालिकांच्या रकान्यात अनेक साहित्यिक लेणी झळकली. साहित्यगुणांनी मंडित असे अनेक लेख आणि व्यक्तिचित्रे त्यांनी लिहिली. ‘ छत्रपती शिवाजी व समर्थ रामदास ’, ‘ राष्ट्रध्येयाची

कांचनगंगा ',' मराठी काव्याचा प्रभातकाल ',' बापू गोखले ',' दादाभाई गया ', ' फेरोझ-शहा मेहता ',' रावसाहेब रानडे ',' विष्णुशास्त्री चिपळूणकर ',' आगरकर ', ' जिन्सीवाले ', ' गोपालकृष्ण गोखले ', वगैरे त्यांचे लेख मराठी वाङ्मयात भर टाकणारे आहेत. त्यांची वाङ्मयाची जाण खोल होती. ' मराठी काव्याची प्रभात ' या लेखात त्यांनी लावणी वाङ्मयाने निखळ काव्याची महाराष्ट्रात सुरवात झाली असे म्हटले आहे. यात त्यांची नेहमीची बेजबाबदारीही आहे. ज्ञानेश्वर गीताभाष्य करीत असले आणि तुकाराम पांडुरंगा-कडे दृष्टी लावून असले तरी त्यांच्या लेखनात निखळ काव्य अमाप आहे. पण लावणी-वाङ्मयाला काव्याची प्रभात म्हणण्यात एक खोल जाण आहे. यात प्रणय-पाण्डुरंगाची भक्तीच निवळ पाहण्याचे कारण नाही. अच्युतरावांना संतवाङ्मयाचा मोठा अभिमान होता. पण शुद्ध वाङ्मयाची एक स्वतंत्र जात असते आणि तिची भक्तीशी अगर भाष्याशी गल्लत करून चालणार नाही ही जी जाणीव या लेखात दिसते ती मला महत्त्वाची वाटते. अच्युतराव आत्मप्रत्ययाने बोलत असावेत. वाङ्मयाच्या मुळाशी जो कल्पनाविलास असतो, जो रूपविलास असतो, त्याचे ते स्वतः वस्तादच होते.

याचा शुद्ध प्रयोग करण्यासाठी की काय त्यांनी नाटके लिहिली. ' विवेकानंद ', ' सुंदोपसुंद ', ' नारिंगी निशाण ', ' ताई तेलीण ', ' बहुया बोळ ', ही त्यांच्या काही नाट-कांची नावे. त्यांचे ' सुंदोपसुंद ' तर किर्लोस्कर कंपनीने रंगभूमीवर आणले होते, आणि त्यात कृष्णराव कोल्हापुरे, चिंतोपंत गुरव, मा. दीनानाथ यांसारख्या नटांनी कामे केली होती. पण यशस्वी नाटककार काही ते झाले नाहीत. याला प्रतिभेच्या कमतरतेपेक्षा त्यांचा उतावळा, उच्छृंखळ स्वभावच कारण झाला असे दिसते. नाट्यलेखन ही एक तपस्या असते. रंगभूमी–व्यवहार ही सुद्धा एक तपस्या असते. तिला शिस्त लागते, दीर्घ प्रयत्न लागतो, स्थिरता लागते, जिद्द लागते हे त्यांनी कधी ध्यानातच घेतले नाही. उदाहरणार्थ, ते आपली ' नारिंगी निशाण नाटक कंपनी ' घेऊन एखाद्या शहरात जायचे आणि तेथल्या एखाद-दुसऱ्या प्रमुख–अर्धप्रमुख व्यक्तीला आपल्या प्रयोगांत काम करायला लावायचे. ही जाहिरातगिरी असली तरी ती अगदी उथळ, उठवळच म्हणावी लागेल. असल्या उद्योगांनी अंगीकृत कार्ये तडीस जात नसतात हे त्यांना कधी कळलेच नाही. नाटकात त्यांना सतत खोटच आली असे नव्हे. चिंतामणराव कोल्हटकरांच्या म्हणण्या-प्रमाणे त्यांना थोडे पैसेही मिळाले. पण ते उधळले गेले.

खरे म्हणजे अच्युतरावांनी आपले सारे आयुष्यच असे बेफाम बेहिशेब उधळले. त्यांनी आपल्या गुणांची धड मशागतही केली नाही आणि नीट विनियोगही केला नाही. एका गुणी जीवनाची अकारण उधळण झाली.

२०.

# श्री. शं. नवरे

श्रीपाद शंकर नवरे यांचे निधन झाले तेव्हा वृत्तपत्रसृष्टीतील एक महर्षी गेले अशी प्रतिक्रिया उमटली. या महर्षींनी एखादे उपनिषद् प्रसविले होते अशी गोष्ट नाही. वृत्तपत्रसृष्टीला एखादा चिरंजीव मंत्र दिला होता असेही नाही. वाचकांच्या बौद्धिक उद्धारासाठी त्यांनी आपली लेखणी खास राबवली होती अशातली बाब नाही. काकासाहेब नवरे हे वृत्तपत्रातील एखादे 'दर्शन'कार होते असे म्हणता येत नाही. 'दर्शन'काराचे स्वागत करणे हा पत्रसृष्टीचा स्वभावच नाही. आणि तरी नवरे गेले तेव्हा एक महर्षी हरपला असे वाटले. कारण नवरे यांचे वृत्तपत्रीय जीवन ही एक तपस्या होती – शुद्ध कष्टसाध्य तपस्या.

केव्हातरी ३५-३६ साली – सुमारे ४३-४४ वर्षांपूर्वी – मी त्यांना दादरच्या पारशी कॉलनीतील मेधा-भुवनमध्ये पाहिले तेव्हा अशीच काहीशी छटा माझ्या मनावर उमटली. तेव्हा ते 'प्रताप'चे संपादक होते. कायदेभंगाच्या चळवळीत शिक्षा भोगून आलेला आणि राष्ट्रसेवेचे साधन म्हणून पत्रकारिता करणारा पुरुष या दृष्टीने तेजस्वितेचे विवरण त्यांच्या दर्शनाने झाले असेलच. काकासाहेबांची कांती काळसर पण सतेज होती, आणि नजरेत चमक होती. पण मला भावलेले तेज असे भौतिक नव्हते. तेव्हा त्यांना बोलताना मी ऐकलेच नव्हते. त्यांच्या आवाजातला मोकळेपणा आणि स्नेहार्द्रता यांनी त्या तेजात स्निग्धता शिरली असती. पण तो ऐकू आला नव्हता आणि तपस्वितेची तेवढी छाप उरली होती

पुढे मी नवऱ्यांना थोडेबहुत पाहिले ते माझे मित्र डॉ. माधवराव उदगावकर आणि भिकूमामा धडफळे यांच्यामुळे. हे तिघे माटुंग्याला श्रद्धानंद आश्रमाचे काम पाहत असत. नवरे आणि उदगावकर हे तर आश्रमाच्या कामात जिवाभावाने गुंतलेले होते. उदगावकर आणि धडफळे माझ्याहून वयाने फारच मोठे, पण ते माझ्याशी बरोबरीच्या स्नेहाने वागत. जिव्हाळ्याचे मित्र एकमेकांशी आडपडदा न ठेवता वागतील तसे आम्ही वागत असू. पण नवरे वेगळे वाटत. माझ्याशी

अर्थात त्यांची जवळीक नव्हती. पण या गृहस्थांच्या कार्याची जात निराळी वाटायची. त्यांच्या जीवनात एक हटयोग आहे असे वाटायचे.

नंतर बऱ्याच वर्षांनी मी नवऱ्यांना साहित्यसंघाच्या कार्यकारणीत पाहिले. आता हट-योगाचा घाव बसेनासा झाला. तरी त्यांच्या बोलण्यात एक ठामपणा असायचा. त्यात कठोरपणा नव्हता; पण जे काय बोलायचे ते स्वच्छ, स्पष्ट, निःस्पृह, ठाशीव स्वरात. क्वचित खोचकपणा असायचा, पण तो उपद्रवी नसे. तपस्वितेची तिरीप आता जाणवेनाशी झाली.

पण नवऱ्यांशी एक प्रकारची जवळिक साधली ती मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभांत. तेथे ते खूप आपुलकीने आणि मोकळेपणाने वागत. क्वचित एखाद्या पत्रकाराच्या खांद्यावर हात टाकून त्याची टोपी उडविण्याचा (शाब्दिक) प्रकारही ते करीत. आमच्या 'धनुर्धारी'च्या अड्डयावर ते कधी आल्याचे आठवत नाही. तसा संभवच नव्हता. त्यांचा दिनक्रमच आगळा असे. घरातून सकाळी ते लवकरच बाहेर पडत. एका हातात छत्री व दुसऱ्या हातात पिशवी अशा थाटात. पिशवीत वर्तमानपत्रे आणि कामाचे कागद. दुपारच्या खाण्याचा डबाही असावा. घरातून बाहेर पडल्यावर ते बहुधा चालत माटुंग्याच्या श्रद्धानंद आश्रमात जात. आश्रम अनाथ, परित्यक्ता, अडचणीत सापडलेल्या स्त्रियांसाठी उभारलेला होता. आश्रमाच्या कामात किती व कोणत्या कटकटी असत याची कल्पना यावरून येईल. या कटकटीत डोके घालून ते बसत ते दुपार उलटून जाईपर्यंत. नंतर आश्रमाच्या व इतर कामासंबंधात देणगीदार, अधिकारी आणि तत्सम लोकांना भेटून ते ४॥ ते ५ च्या सुमारास 'प्रभात' दैनिकाच्या कचेरीत येत. त्यानंतर त्या दिवशीच्या वृत्तपत्रांचे कसून वाचन, पत्रव्यवहार आणि अग्रलेख-लेखन. अग्रलेखाची प्रुफे वगैरे वाचून कचेरीतून बाहेर पडायला ९-९॥ वाजत. आमच्या सारख्यांच्या अड्डयावर जाऊन चकाट्या पिटायला त्यांना फुरसतच नसे.

तसे ते पूर्णवेळ संपादक नव्हते. वृत्तीने विचारवंत संपादक नव्हते. शैलीदार म्हणजे शैलीच्या विभ्रमात रस शोधणारे संपादक नव्हते. जे काय लिहायचे ते स्वच्छ, स्पष्ट, सरळ. त्यात आग्रहही नसायचा आणि अनाग्रहही नसायचा. त्याचा प्रभाव त्याच्या आशयातच असायचा. नवरे हिंदुत्वनिष्ठ म्हणून प्रसिद्ध होते. पण त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेत आंधळी आच नव्हती. मला वाटते, वाईच्या प्राज्ञपाठशाळेत, स्वामी केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे) यांच्या हाताखाली त्यांनी जे शिक्षण घेतले त्याची त्यांच्या वैचारिक व्यक्तित्वावर कायमची छाप उठली. स्वामी केवलानंद सरस्वती हे हिंदू धर्माचे आणि हिंदू तत्त्वज्ञानाचे परिपूर्ण पंडित होते, पण ते परंपरावादी नव्हते. आधुनिक विज्ञानाची माहिती देणारे ग्रंथ वाचण्याचा त्यांना नाद होता. वैज्ञानिक प्रयोग करण्याचीही आवड त्यांना होती. मिल-स्पेन्सरसारखे ग्रंथकार वाचण्याची हौसही त्यांना होती. आपले राज्य गेले ते सामाजिक

फुटीरतेमुळे असे त्यांचे मत होते. प्राचीन काळी जातिव्यवस्था नव्हती, समाज बदलत असतो, बदलू शकतो, सामाजिक एकतेची साधना आपण करायला हवी – अशी त्यांच्या विचारांची धारणा होती. पण प्राज्ञपाठशाळेच्या वातावरणात आणखीही काही प्रवाह आले होते. तळेगावचे समर्थ विद्यालय सरकारने बंद केल्यानंतर तेथले अनेक जहाल राष्ट्रवादी विद्यार्थी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत आले होते. त्यांच्यामुळे तेथल्या वातावरणात राष्ट्रवादाचे जहाल वारे वाहू लागले. नंतर १९१७ साली विनोबा भावेही प्रस्थानत्रयी शिकण्यासाठी प्राज्ञपाठशाळेत आले. तेथे ते सात आठ महिने होते. त्यांनी गांधीजींचे काही संस्कार आणले असतील. एकंदरीत निरनिराळे प्रवाह प्यालेल्या प्राज्ञपाठशाळेत नवऱ्यांच्या व्यक्तित्वावर व्यापक संस्कार झाले असतील. अर्थात नवरे विचारांत विचारासाठी रमणारे गृहस्थ नव्हते. महादेवशास्त्री दिवेकर अगर रघुनाथशास्त्री कोकजे यांनी स्वामीजीपासून स्फूर्ती घेऊन धर्मपरिवर्तनाच्या विचारप्रसाराचे कार्य हाती घेतले तसे कार्य हाती घेण्याचीही नवऱ्यांची वृत्ती नव्हती. शिवाय पुढे त्यांनी आधुनिक विद्यापीठीय शिक्षण घेतले. त्यामुळे त्यांची हिंदुत्वनिष्ठा कोती आणि कडवी असणे शक्यच नव्हते. याचमुळे बहुधा सावरकरांबद्दल त्यांना खास आदर वगैरे नव्हता. किंबहुना सावरकरांच्या अहंकाराचा त्यांना तिटकारा होता. ‘ सावरकरांच्या घरावरून नुसती खेप टाकली तरी अहंकाराचा उग्र भपकारा नाकात शिरतो ’ असे ते म्हणत. तेव्हा त्यांचे अग्रलेख हिंदुत्वनिष्ठेने तिडतिडलेले नसत. खरे म्हणजे ते कोणत्याच आग्रहाने आक्रसलेले नव्हते.

आणि तरी नवऱ्यांची संपादकीय लेखणी एका गोष्टीसाठी प्रसिद्ध होती. ती म्हणजे त्यांचे मृत्यूलेख. नवऱ्यांचे मृत्यूलेख म्हणजे मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या जीवनकार्याचे सत्त्वशोधक मूल्यमापन. या मृत्यूलेखात नवऱ्यांच्या लेखणीला भरती येई, तिची कांती तळपू लागे, वगैरे काही नसे. इतर अग्रलेखांप्रमाणे हाही लेख सरळ स्पष्ट पण संयत भाषेत लिहिलेला असे. पण या लेखाला कारण झालेल्या व्यक्तीच्या स्वभावाचे आणि कार्याचे रेखीव सुस्पष्ट मापन त्यात आढळे. या लेखात त्या व्यक्तीच्या आयुष्यातल्या काही घटनांचा मोठा जिवंत आणि अर्थपूर्ण वेध घेतलेला असे – कधीकधी इतका जिवंत की नवरे त्या घटनेचे जणू स्वतः साक्षी होते. आणि जयकर, केळकर, वगैरेंसारख्या व्यक्तींच्या सार्वजनिक कार्याचे नवरे स्वतः साक्षी असतच. कारण ते नुसते लेखणीचे चालक नव्हते. अनेक प्रकारच्या कार्यात ते स्वतः गुंतलेले असत, आणि या व्यक्तींबरोबर काही कार्यही त्यांनी केव्हा तरी केलेले असे. परिणामी नवऱ्यांचा अग्रलेख ही एक बौद्धिक देणगी असे. नुसती देणगी नव्हे तर इतिहासाचा एक निर्णय. म्हणूनच नवऱ्यांचा मृत्यूलेख हा आमच्यासारख्यांचे एक ‘ आवश्यक ’ वाचन असे. आमच्यासारख्यांचेच कशाला ? काही विशिष्टांचेही त्यांच्यावर लक्ष असे. एक दिवस डॉ. आंबेडकरांचा नवऱ्यांना निरोप आला, ‘ भेटून जा. ’ नवरे गेले तर डॉ. आंबेडकरांनी त्यांना आपल्यावर मृत्यूलेख लिहा व मला दाखवा असे सांगितले

पण नवरे पत्रकार म्हणून जितके प्रसिद्ध होते त्याहूनही माणूस म्हणून अधिक थोर

होते. त्यांच्या माणुसकीचा प्रत्यय त्यांच्या संपादकीय कार्यातच प्रत्ययास येई. त्यांची संपादकीय नीती माणुसकीच्या जाणिवेने नेहमी जागृत असे. एखाद्या बलात्कार झालेल्या मुलीचे नाव वगैरे न छापण्याची नीती सारेच जण पाळतात. पण एखाद्या सार्वजनिक संस्थेवर टीका करणारा लेख अगर बातमी आली तर ती छापण्यास पुष्कळ संपादक उत्सुक असतात. फारसे घरचे कष्ट न करता आकर्षक ' कॉपी ' मिळण्याचे ते आश्वासन असते ना! संस्थेच्या चालकाचा खुलासा छापण्याची तयारी ठेवली की आपले कर्तव्य संपले असे त्यांना वाटते. पण नवऱ्यांकडे असा एखादा लेख आला आणि तो प्रथमदर्शनी विचारार्ह वाटला तर तो प्रसिद्ध करण्यापूर्वी ते त्या संस्थेची कसून चवकशी करीत किंवा करवीत, आणि त्या टीकेत तथ्य असले तरच ती प्रसिद्ध करीत. सार्वजनिक संस्थांच्या उभारणीस रक्त आटवलेले गृहस्थ होते ते. संस्था उभारणे सोपे नसते, ते अतिकष्टाचे काम असते; पण ती मोडायला एखादी बिनबुडाची टीकाही कारण होऊ शकते, आणि संस्थाचालकांचा खुलासा ती सावरण्यास पुरेसा पडत नाही, असे स्वानुभवाचे उद्गार ते काढीत.

नवऱ्यांच्या माणुसकीचे एक अगदी आगळे दर्शन त्यांच्या दोन मुलींच्या लग्नांच्या संदर्भात घडले. त्यांच्या एका मुलीने एका मराठा तरुणाशी विवाह जमविला. हा तरुण नवऱ्यांना पसंत होता, पण त्याच्या संस्कृतीचा समूळ शोध घेण्यासाठी त्याच्या कुटुंबाची माहिती असणे आवश्यक होते. तशी ती मिळणे सोपे नव्हते. तेव्हा नवऱ्यांनी काय केले? एक दिवस ते उठले आणि कोणालाही न कळविता त्या मुलाच्या गावी गेले, आणि एक फिरस्ता पाहुणा म्हणून त्याच्या वडिलांकडेच मुक्कामास राहिले. अशी साक्षात माहिती मिळवून नवरे घरी आले. इकडे मुलगी आपल्या वाग्दत्त वराबरोबर, आर्यसमाजिस्ट पद्धतीने विवाहबद्ध होण्यासाठी, पं. लक्ष्मणशास्त्री ओगल्यांकडे आली. ओगले नवऱ्यांचे मित्रच होते. ते तिला म्हणाले, ' तुझ्या वडिलांना विचारल्याशिवाय मी नाही तुझं लग्न लागणार. ' असे म्हणून त्यांनी नवऱ्यांशी संपर्क साधला. नवऱ्यांनी तत्काळ संमती देऊन वधू, वर आणि पुरोहित, साऱ्यांनाच चकित केले!

दुसऱ्या मुलीचे लग्न अधिक परीक्षा पाहणारे ठरले. मुलीने एका ख्रिश्चन तरुणाशी लग्न ठरविले आणि आईवडिलांच्या नकळत लग्न करूनही ती मोकळी झाली. यांवर नवऱ्यांनी काय केले असेल? त्यांनी नातेवाईक, मित्र आणि परिचित यांना एक परिपत्रकवजा पत्र पाठविले. त्यात मुलीच्या लग्नाची बातमी देऊन त्यांनी असे म्हटले की, ' मला अगोदर कळले असते तर मीच हे लग्न लावून दिले असते, आणि मग विवाहसमयी आपले स्वागत करून वधूवरासाठी आशीर्वाद घेता आले असते. मला हे करता आले नाही याबद्दल मी दिलगीर आहे. आपल्याला विनंती एवढीच की आपण आपले आशीर्वाद पाठवून द्यावेत. ' काकासाहेब अर्थात एवढयावर थांबले नाहीत. ते स्वतः मुलीच्या घरी गेले आणि दोनही घरांचे दळणवळण सुरू झाले. पुढे नाताळच्या सणात ते मुलीच्या घरी जेवायला गेले. तेथे त्यांच्या ध्यानात आले की आपण शाकाहारी असल्यामुळे मुलीच्या सासरची माणसे संकोचली आहेत. तेव्हा ते त्यांना म्हणाले, ' हे पाहा. तुम्ही

संकोचू वगैरे काही नका. मला जेवायला जरा बाजूला वाढा. मी तिकडे बसून आनंदाने जेवीन. आणि तुम्हाला इकडे जे काही खायचं प्यायचं असेल ते तुम्ही खुशाल करा.' नवऱ्यांच्या अंगी जी उदारता होती तिचा उगम हिंदुधर्माभिमानात नव्हता, अंतरंगात भिनलेल्या माणुसकीत होता.

नवऱ्यांनी आयुष्यात खूप भोगले यात शंका नाही. पण याच्या व्यथा त्यांना जाचल्या नसाव्यात. त्यांनी स्वेच्छेने कष्टाचे सेवाव्रत स्वीकारले होते. पत्रव्यवसाय हा त्यांचा धर्म होता. अक्षरशः धर्म. पत्रकाराने फार पगार घेऊ नये अशी त्यांची धारणा होती. आणि ते पत्रकार होते तेव्हा मराठी पत्रव्यवसाय धंदा बनला नव्हता. त्यांच्या 'प्रभात' पत्राला सुबत्ता ठाऊकच नव्हती. उत्तरवयात प्रकृतीनेही त्यांना साथ दिली नाही. रक्तदाबाच्या विकाराने त्यांना ग्रासले. पण आपल्या व्याधीकडेही त्यांनी एक प्रकारच्या उपेक्षामिश्रित सोशिकपणाने पाहिले. या तितिक्षेने त्यांच्यामध्ये या बाबतीत एक बेफिकीर खेळकरपणा निर्माण केला होता असे वाटते. याचे एक विलक्षण उदाहरण मला आठवते. १९७२ साली पुण्याला केळकर जन्मशताब्दीचे व्याख्यान देता देता ते अचानक बेशुद्ध झाले आणि कोसळले. लोकांच्या तोंडचे पाणी पळाले. पण ते काही वेळाने सावध झाले. दुसऱ्या दिवशी याबद्दल बोलताना ते एक प्रकारच्या मिस्किल स्वरात म्हणाले, 'हे असं काही प्रथमच घडलेलं नाही. पूर्वीही मी असाच व्याख्यान देता देता बेशुद्ध होऊन कोसळलेलो आहे.' जणू काय ते एक सुरस कथा सांगत होते!

यात एक अंतस्थ ताकद होती. ती त्यांनी आपल्या जीवन–तपश्चर्येने मिळविलेली होती. १९७५ साली आणीबाणीत टिळक–पुण्यतिथीचा दिवस आला आणि त्यांना एक कल्पना सुचली. प्रत्येकाने १ ऑगस्ट रोजी चौपाटीला जाऊन टिळकांच्या पुतळ्याला पुष्पप्रदान करावे आणि प्रतीकरूपाने आपला आणीबाणी-निषेध व्यक्त करावा.

आज मला समाधान वाटते ते एवढेच की पत्रव्यवसायाचे लौकिक फायदे त्यांना मिळाले नसले तरी पत्रकार–महर्षी अशी उत्स्फूर्त मान्यता त्यांनी मिळविली. मराठी पत्रकार परिषदेच्या नागपूर–अधिवेशनाचे अध्यक्ष ते होतेच, पण मराठी पत्रकारसृष्टीत त्यांच्या शब्दाला एक मान होता. मात्र त्यांना अगदी अंतःकरणापासून आनंद झाला असेल तो श्रद्धानंद आश्रमात त्याचा अमृतमहोत्सव साजरा झाला तेव्हा. ज्या पद्धतीने तो साजरा झाला ती पद्धत म्हणजे साक्षात कृतार्थताच होती. श्रद्धानंद आश्रमात वाढलेल्या आणि तेथेच लग्न होऊन सासरी गेलेल्या ७५ सुवासिनींनी नवऱ्यांना त्यावेळी ओवाळले. त्या दीपमालिकेतील ज्योतींत आपले एकेक वर्ष तेवते आहे असे नवऱ्यांना तेव्हा वाटले असेल!

२२६९१
२०५२

REFBK-0022691

मूल्य रु. १२-५०

विश्वकर्मा साहित्यालय

'व्यक्तिवेध'नंतरचा प्रभाकर पाध्ये यांचा हा व्यक्तिचित्रांचा संग्रह. व्यक्तीकडे पाध्ये कोणत्या नजरेने पाहतात, याला काही नियम नाही. महात्मा गांधींच्या रूपाने भारताच्या सदसद्विवेकबुद्धीचे दर्शन त्यांना घडते, तर माओच्या जीवनात नाट्यमयतेचा ऐतिहासिक विलास त्यांना आढळतो. आगरकरांच्या सत्त्वशीलतेचा शोध ते घेतात, तर टिळकांच्या तुरुंगवासांनी त्यांच्या व्यक्तित्यातील तेजस्वितेचे विकसन कसे झाले हे ते न्याहाळतात. जॉर्ज केननची नैतिकता त्यांना साद घालते तर मॅक्स ईस्टमनच्या रूपाने प्रतिभाच पिकनिकला निघाली असा त्यांना भास होतो. एकदा त्यांना उ थांटच्या व्यथित 'मूड'चा प्रत्यय येतो तर अनेकदा ते जयप्रकाशांच्या 'मूड्स'चे साक्षी बनतात. हे सारे एकाच पद्धतीने चालते असे नाही. ट्रॉट्स्की–स्टॅलिनचे 'लॉंग शॉट्स', तर वा. म.–नवरे–रा. भि. यांचे क्लोजअप्स. चिंतामणराव–धनंजयराव यांना जवळून दंडवत, तर विचारवंत नेहरूंपुढे अभिजात आदराने नतमस्तक. कधी कोमल व्यक्तित्वाच्या नाजूक धाग्यांना हळुवार स्पर्श, तर कधी एखाद्या घटनेवर अधाशी झडप. अच्युत बळवंत कोल्हटकरांचा कलंदरपणा पाध्यांना जसा भावतो तशीच संतभक्त आजगावकरांची वादप्रियताही भावते. विविध व्यक्तित्वांच्या विविध विलसितांत रस घेणाऱ्या लेखणीचे हे नानाविध विभ्रम मराठी वाङ्मयाला लक्षणीय वाटावेत.

विश्वकर्मा साहित्यालय टिळक पथ, पेशवे पार्क चौक, पुणे ३०